राज्यशास्त्र

लेखक

नरसिंह चिंतामण केळकर

नवभारत ग्रंथमाला कार्यालय

शके १८५४] नागपूर [इ. स. १९३२

मुद्रक—**गणेश काशिनाथ गोखले**, सेक्रेटरी,
श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स, ४९५-९६
शनिवार पेठ, पुणें नं. २.

प्रकाशक—**वेंकटेश शामराव बलकुंदी**, बी. ए., एलएल् बी.
व्यवस्थापक, **नवभारत ग्रंथमाला, नागपूर.**

कांही संदर्भ ग्रंथांची यादी

राज्यशास्त्राचें ज्ञान मिळवूं इच्छिणाऱ्या अभ्यासकांनीं या खाली दिलेल्या यादीतील ग्रंथ वाचण्यासारखे आहेत.

1. Grammar of Politics–by Prof. Laski.
2. Introduction to political Science by–Sir John Seeley.
3. The State–by Woodrow Wilson.
4. Elements of Politics–by Prof. Sidgwick.
5. Modern Democracies–by Viscount Bryce.
6. English Political Institutions–by J. Marriott.
7. Government and Politics in the United States–by Guittean.
8. Government in Switzerland–by Vincent.
9. Public opinion and Popular Government–by Lowell.
10. Democratic Ideals and Reality–by Mackinder.

हिंदुस्थानविषयक राज्यशास्त्रासंबंधानें खालील ग्रंथ किंवा प्रबंध वाचावे.

हिंदुस्थानांतील राज्यघटनेसंबंधी

१. हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधी सरकारी कायदा व त्या खालचे नियम.

२. ना. शिवस्वामी अय्यर, ना. तेज बहादुर सप्रू, प्रो. के. टी. शहा, प्रो. सप्रे, प्रो. काळे इत्यादि गृहस्थांचीं पुस्तकें.

भारतीय प्राचीन राज्यशास्त्रासंबंधी

१. चाणक्याचें अर्थशास्त्र, महाभारत इ.

२. प्रो. सरकार. प्रो. जयस्वाल यांचे ग्रंथ. मराठींत राज्यशास्त्र या विषयावर रा. जावडेकर, रा. हुद्दार, इत्यादिकांनीं लिहिलेलीं लहानमोठीं पुस्तकें निवळ मराठी वाचकांना उपयोगी पडण्यासारखीं उपयुक्त आहेत.



प्रस्तावना.

—:o:—

'राज्यशास्त्र' या विषयावरील हें पुस्तक मीं, प्रो. श्री. ना. बनहट्टी, अभिनव भारत ग्रंथमालेचे मुख्य चालक, यांच्या विनंतीवरून मुद्दाम त्या मालेकरितांच लिहिलें आहे. या नवीन ग्रंथमालेची कल्पना मजपुढें मांडण्यांत आली तेव्हां ती मला फार पसंत पडली. तिच्या कार्यप्रारंभीं प्रो. बनहट्टी यांच्याशीं मीं बराच विचारविनिमय केला व मजकडून शक्य तितकें त्यांना प्रोत्साहन दिलें. पण प्रोत्साहनाचें फळ म्हणून, मालेकरितां मीहि एक ग्रंथ लिहून द्यावा अशी जबाबदारी ओघानेंच मजवर येऊन पडली ! अर्थात् ती जबाबदारी कर्तव्यबुद्धीनें व आनंदानें मी स्वीकारली. आणि त्याप्रमाणें, वेळांत वेळ काढून, स्वतः प्रो. बनहट्टी यांनींच मजकरितां सुचविलेल्या विषयावर हें पुस्तक लिहून देऊन मीं त्या जबाबदारींतून उत्तीर्ण झालों आहे.

हें पुस्तक लिहिण्याला हल्लींहून वेगळी वेळ, कांहीं अधिक मुदत, व हल्लींहून अधिक स्वस्थता लाभती तर ती मला हवी होती. परंतु तशी स्वस्थता मिळेपर्यंत वाट पाहावयाची तर ती किती पाहावी लागेल याचा नियम नाहीं. शिवाय मालेच्या चालकांनी, त्यांच्या शिरस्त्याप्रमाणें, इतर पुस्तकांबरोबर माझ्या पुस्तकाचीहि जाहिरात दिल्याकारणानें वाचकांचा एकप्रकारचा तगादाच त्यांनीं आपल्या मागें लावून घेतल्यासारखा झाला. तेव्हां वाचकांची अपेक्षा पूर्ण करण्यासाठीं सवडीत सवड काढून मी हें पुस्तक आज लिहून हातावेगळें करीत आहे. अशा रीतीनें मी त्यांना दिलेल्या अभिवचनांतून, व ते स्वतः वाचकांना दिलेल्या अभिवचनांतून, असे दोघेही आज मोकळे होत आहों याविषयीं आम्हा उभयतांना सारखाच आनंद होत आहे.

प्रस्तुत मालेच्या नियमा प्रमाणें हें पुस्तक लहान आकाराच्या अवघ्या दोनशें पानांतच लिहून संपवावें लागत आहे. आणि विषय तर इतका मोठा यामुळें लिहिताना बरीच कुचंबणा झाली. म्हणजे विषयांतील मुद्दे थोडेच घ्यावे पण तेच खुलासेवार सांगावे ही पद्धति अनुसरावी लागली.

तथापि वाचकांची ती एक निराळ्या प्रकारें सोयच होईल असें वाटतें. राज्यशास्त्राच्या विषयावर जितकें वाचावें किंवा लिहावें तितकें थोडेंच होणार हें उघड आहे. आणि या विषयाचा सूक्ष्म सांगोपांग सविस्तर असा अभ्यास करणाराला इतर साधनें वाटतील तितकीं आहेतच. पण 'शास्त्रें फार अपार जीवित तुझें अत्यल्प रे मानवा' या वचनाप्रमाणें लिहिणारा व वाचणारा याना अल्पसंतुष्ट बनावें लागतें. किंबहुना या वचनाचें रहस्य लक्षांत घेऊनच या ग्रंथमालेतील ग्रंथांच्या विस्तारासंबंधीचे हल्लीचे नियम ठरवावे लागले. तथापि, कोणत्याहि विषयावर हल्लींच्या ग्रंथाच्या आकाराच्या दोन सवाशे पृष्ठाइतका मजकूर वाचून सामान्य वाचकांची (अभ्यासू विद्यार्थ्यांची नव्हे) ज्ञानार्जनाची साधारण भूक भागण्यासारखी आहे असें म्हणण्यांत फारशी चूक होणार नाहीं असें वाटतें. आणि तसें या पुस्तकानें घडल्याचें दिसून आलें तर माझा श्रमपरिहार झाला असें मी मानीन.

या पुस्तकाचीं मुद्रितें तपासण्याचे कामीं रा. सदाशिव विनायक बापट यांनीं साहाय्य केल्याबद्दल मीं त्यांचा आभारी आहे.

पुणें, रविवार, वैशाख
शुद्ध तृतीया
ता. ८ माहे मे सन १९३२

न. चिं. केळकर

राज्य-शास्त्र

(भाग १ ला)

प्रास्ताविक

(१) राज्य-शास्त्र म्हणजे काय ?

'राज्य-शास्त्र' हें इतर शास्त्रांप्रमाणेंच एक शास्त्र आहे. 'शास्त्र' शब्दाचा सहजच मोठा बाऊ वाटतो. कोणत्याहि विषयाचें शास्त्र सांगोपांग घेतलें तर तें गहन व कठीण असणारच. कोणत्याहि शास्त्रांत मुख्यतः येतात त्या गोष्टी खालीलप्रमाणें–१ शास्त्रविषयासंबंधानें ज्ञानेंद्रियांच्याद्वारें अनुभवाला आलेल्या तुटक गोष्टी. २ त्यांवरून बांधलेले पक्के नियम. पक्के म्हणजे हजार हिश्शांनीं कधीं खोटे न ठरणारे. ३ अनुभवावरून बांधलेले कच्चे नियम. (या कच्चेपणाचें कारण असें कीं, अनुभव असावा तितका पुरा व विस्तृत किंवा हुकमी नसतो.) ४ अनुभव नसतांहि केवळ उपजत बुद्धीनें सुचणारे सिद्धांत किंवा कल्पना. यांना 'कच्चे नियम' इतकेंहि म्हणतां येत नाहीं. कारण त्या कल्पना अद्यापि अनुभवांत उतरलेल्या नसतात. ५ शास्त्र–विषयासंबंधानें कालांतरानें परंपरेनें बनलेली प्रक्रिया व रूढ परिभाषा. ६ शास्त्रविषयांतील कूट प्रश्न. ७ शास्त्रविषयाची ऐतिहासिक माहिती. कोणतेंहि 'शास्त्र' म्हटलें कीं, त्यासंबंधी या सहा सात गोष्टींची विचिकित्सा असावयाचीच. राज्य-शास्त्राचेंहि तसेंच आहे.

(२) राज्य-शास्त्र व कर्मयोग

राज्यशास्त्र हा विषय किती तरी अवघड असा प्रथम वाटतो. पण खरोखर तो तसा नाहीं. प्रत्यक्ष राज्य करणें हें अवघड असेल. पण राज्य-शास्त्राचीं मूलतत्त्वें सोपीं आहेत. बरें राज्य करणें अवघड म्हणून तरी केवळ त्या कारणानें कोणी तें हातचें टाकलें आहे काय ! आपली सत्ता चालते तोंपर्यंत तें सोपेंच म्हणावयाचें. आणि हातीं सत्ता नसेल तर तें एखाद्याला

सोपें वाटून तरी काय उपयोग ? आजपर्यंत हजारों लाखो राज्य-सत्ताधीश जगाच्या पाठीवर होऊन गेले. पण एक तरी छातीवर हात ठेवून सांगू शकला असता काय, कीं मी अमलांत आणिली तीच सर्वोत्कृष्ट राज्यपद्धति ! तिच्याहून अधिक चांगली पद्धति शक्यच नाहीं ! पण पद्धतीचा तात्त्विक उत्तमपणाचसा काय, नुसत्या यशापुरतें पाहिलें तरी या हजारों लाखोपैकीं एकहि म्हणूं शकला नसता, कीं माझें राज्य यशस्वी होण्यांत बाकी म्हणून कांहीं राहिलें नाहीं. मनुष्यप्राणी हा जसा पूर्णता पावलेला नाहीं, तशीच त्याची राज्यपद्धति, तसाच त्याचा राज्यकारभार, आणि तसेंच त्याच्या राज्यकारभारातलें यश !

(३) शास्त्र फारसें कठिण नसतें

'राज्य' या शब्दाचा बाऊ वाटतो तसाच तो 'शास्त्र' या शब्दाचाहि वाटत असतो. पण शास्त्राचींहि मूलतत्त्वें फारशीं कठीण नाहींत. राज्यपद्धतीप्रमाणेंच शास्त्राच्याहि पद्धति अनेक असतात. त्यांपैकीं अमूक एकच सर्वोत्कृष्ट असें म्हणतां येत नाहीं. शास्त्राभ्यासी व शास्त्रसंशोधक असे जगांत आजवर हजारों लोक होऊन गेले. पण त्यांपैकीं कोणीहि छातीवर हात ठेवून असें म्हणूं शकला नाहीं, कीं माझीच शास्त्रपद्धति सर्वोत्तम ! किंवा मला इतकें यश आलें, कीं त्यांत कांहीं बाकी उरलें नाहीं. राजे लोकांत अहंकारबुद्धि असते तितकीहि शास्त्री लोकांत नसते. कारण राजे हे सत्तेचे भोक्ते व उपासक असतात; पण शास्त्राभ्यासी शास्त्रसंशोधक हे केवळ सत्याचे उपासक असतात. आज जगांत शास्त्राला जें यश, जी प्रतिष्ठा लाभली आहे तिचें कारण हेंच कीं, राजे लोकांप्रमाणें त्यांची सत्ता, अर्थात् ज्ञान-सत्ता, ही परस्परविरोधी नसून परस्परोपकारक आहे. एक राजा दुसऱ्या राजाला आपलें असें कांहींहि उचलून देणार नाहीं. पण शास्त्राभ्यासी व शास्त्रसंशोधक आपलें ज्ञान दुसऱ्याला न देण्याचा कृपणपणा करीत नाहींत, किंवा दुसऱ्याचें ज्ञान उपयोगाला घेण्यांत कमीपणा मानीत नाहींत.

(४) शास्त्र व कला

शास्त्र म्हटलें कीं, त्याचा प्रतियोगी शब्द 'कला' हा डोळ्यापुढें उभा राहतोच राहतो. शास्त्राचा संबंध ज्ञानाशीं तसा कलेचा कृतीशीं असतो.

शास्त्र–ज्ञाना शिवायहि मनुष्य कलेचा व्यासंग करूं शकतो, यार्चे कारण उपजतबुद्धि ! कलावंत हा कलेचीं बीजें मनांत रुजलेलीं घेऊनच जन्मतो. त्यानंतर त्यानें त्या कलेच्या शास्त्राचा अभ्यास केला तर चांगलेंच. त्या दुधांत ती साखरच पडली म्हणावयाची. शास्त्रांतील तत्त्वाभ्यासानें कलावंताला आपलीं ध्येयें, आपली अभिरुची, आपलीं साधनें सुधारतां येतात. तो परिणतप्रज्ञ, प्रतिष्ठितप्रज्ञ, महानुभाव होतो. बरें, शास्त्रालाहि कलेचा उपयोग आहेच. कारण तत्त्व कितीहि चांगलें वाटलें तरी त्याचा प्रत्यक्ष उपयोग कलेच्या कृतींत झालेला दिसल्याशिवाय व लोकांना तो पटल्याशिवाय काय उपयोग ? तें तत्त्व किंवा तें ज्ञान नुसतें कल्पनासृष्टींतच भ्रमण करीत राहावयाचें ! कलावंत म्हणजे हात चालविणारे व शास्त्री म्हणजे बुद्धि चालविणारे–हे लोक प्रायः वेगळे वेगळे असतात. शास्त्र व कला या दोनहि घोड्यांवर एकदम बसणारा स्वार विरळा. ईश्वर बहुधा चांगल्या गुणांचा मक्ता एकालाच न देतां त्यांची वाटणी करीत असतो. हें मनांत ओळखून मनुष्यानें शास्त्र व कला यांचा विरोध न मानतां त्यांचा शक्य तितका एकत्र उपयोगच करून घेतला पाहिजे.

(५) ज्ञान व कर्म यांचा ऋणानुबंध

असो. प्रस्तुत आपण सर्वसामान्य शास्त्र व सर्वसामान्य कला यांचा खोल विचार करीत नसून फक्त राज्यशास्त्र व तदनुषंगानें राज्यकला यांचाच विचार करीत आहों. तथापि, जें जातिसामान्याविषयीं सांगितलें तें व्यक्तिविशेषाविषयींहि समजावयाचें आहे. राज्याचा व्यासंग कला या नात्यानें करणारे लोक, राज्याचा विचार शास्त्र या नात्यानें करणाऱ्या लोकांपेक्षां, प्रायः वेगळेच असतात; पण उभयतांनींहि मनांत आणलें तर ज्ञान व कृती यांचा ऋणानुबंध त्यांना पुष्कळसा जोडतां येईल. मात्र एकाकरतां दुसऱ्याला हात आखडून थांबण्याचें केव्हांहि कारण नाहीं. राज्यशास्त्र व राज्यकला यांचे प्रवाह नदीच्या फाट्यांप्रमाणें सतत समांतर व जवळजवळ वाहत असतात. राजकीय राष्ट्रांतील मनुष्यसमाज हा या दोन प्रवाहांच्या मध्य प्रदेशांत वावरत, खपत, श्रमत असतो; व त्याला जरूरीप्रमाणें या प्रवाहांपैकीं केव्हां एकाचें तर केव्हां दुसऱ्याचें पाणी पिण्याला मिळण्यासारखें

असतें. स्वतंत्र सत्ताधिकारी राजांच्या राज्यांत राज्य-शास्त्रांत निष्णात असणाऱ्या पंडितांना दरबाराकडून बहुमानाचें निमंत्रण येऊन त्यांचा सल्ला घेतला जातो. लोकसत्ताक राज्यांत असले हे तज्ज्ञ व पंडित लोकमताच्या बळावर कायदेमंडळांत स्वतःच निवडले जाऊन प्रधानपद पावतात. मिळून एकच.

(६) राज्य-शास्त्राचे दोन प्रकार

राज्य-शास्त्र व राज्य-कला हीं दोनहि कांहींशीं कल्पनासिद्ध पण पुष्कळशीं अनुभवसिद्ध असतात. विद्वान् बुद्धिवान् लोक हे एका अर्थानें अंतर्ज्ञानी. यामुळें अनुभवाकरितां न थांबतां, डोळे मिटून पण डोकें चालवून, आपल्या कल्पनेनेंच ते राज्यशास्त्रें बनवितात. आणि त्यांत राजा कसा असावा, प्रजा कशी असावी, दोघांनीं परस्परांशीं कसें वागावें, राज्यकारभाराची पद्धति कशी राहावी, तिचा अंमल कसा करावा, इत्यादि गोष्टी ते मनच्या—म्हणजे त्यांना इष्ट वाटतात अशा—लिहितात. चाणक्यानें अर्थशास्त्रांत कल्पना व अनुभव या दोहोंचाहि उपयोग केला आहे. ॲरिस्टॉटल यानें राज्य-शास्त्रावरील ग्रंथांत ग्रीसच्या नगरमित राष्ट्रांतील राज्यांच्या अनुभवाचा उपयोग केला आहे, पण स्वतःच्या कल्पनेनेंहि कांहीं सुचविलें आहे. उलट प्लेटो यानें आपल्या रिपब्लिक नामक राजशास्त्रीय ग्रंथांत, पुष्कळसा कल्पनेचा खेळ चालवून, त्याला वाटणारें नमुनेदार राज्य कसें असावें याचें रम्य चित्र रंगविलें आहे. पण तो राज्याचा नमुना बहुधा त्याच्या पुस्तकांतच पडून राहणार! मॅकिव्हेली यानें आपल्या राजाला बोध करण्याकरितां 'प्रिन्स' या पुस्तकांत नमुनेदार राजाची कुटिल राजनीति कशी असावी हें लिहिलें. पण त्या पुस्तकाचा त्या राजाला प्रत्यक्ष उपयोग झाल्याचें कोणी लिहून ठेवलेलें नाहीं.

(७) अनुभवसिद्ध व कल्पनासिद्ध

प्रत्येक शास्त्राप्रमाणें राज्यशास्त्रांतहि पंथ, सांप्रदाय, पीठें, परंपरा आहेतच. आणि राज्यसत्ता हातीं असणारे किंवा हातीं आणूं इच्छिणारे लोक आपल्या सोईला पडेल तोच पंथ प्रायः स्वीकारतात. म्हणजे त्यामुळें मनाच्या आवडीला शास्त्राची जोड सहजच लाभते. पण बिचारें राज्यशास्त्र कुणालाहि कधीं असा आग्रह करीत नाहीं, कीं अमुक एका पद्धतीनेंच तुम्ही राज्य

केलें पाहिजे किंवा करवून घेतलें पाहिजे. आधुनिक राज्यशास्त्र तरी स्वतः-संबंधानें "मीं सर्वस्वीं अनुभवसिद्ध व अनुभवनिष्ठ आहे" असेंच म्हणतें. "अनुभवानें सिद्ध झालेल्या पद्धतीच होतां होईतों घ्याव्या व जरूरीप्रमाणें त्यांत कल्पना चालवून सुधारणा करावी" असेंच तें म्हणतें. स्लेट पाटीवर लिहावयाचें तें सगळेंच्या सगळें, पहिलें पुसून टाकून, नवेंच्या नवें लिहितां येतें. पण कागदावर पेनसिलीनें चित्र काढावयाचें तर, पहिलें काढलेलें सगळें पुसून नवें न रेखाटतां, जुन्यांतल्या रेघा जरूर तितक्या रबरानें घासून घेऊन, त्या जागीं नव्या रेघा काढावयाच्या, असें केल्यानें भागतें व तें करणेंच सोईचें असतें. यामुळें जगांत नवी म्हटली जाणारी अशी कोणतीहि राज्यघटना, राज्यपद्धति घ्या, ती कोणत्या तरी जुन्या नुकत्याच अनुभवांत येऊन गेलेल्या घटनेची पद्धतीची 'प्रत' मुख्यतः असून, फक्त तींत किंचित् कांहीं नवें पदरचें घातलेलें असतें.

(८) राज्य-कर्म-कौशल्य हें स्वयंभू जातिवंत असतें

राज्यकारभार करणाराला, त्याच्या संग्रहीं पढीकपणा असला तर तो उपयोगी पडेल कदाचित्. पण नसला तर त्याविणें कोणाचें फारसें अडून राहणार नाहीं. ज्यानें आपल्या सुखप्रद राज्यानें, 'रामराज्य' हा प्रतिशब्दच, राज्याच्या सर्वोत्तम नमुन्याला मिळवून दिला तो—राजा रामचंद्र—यानें राज्यशास्त्राचें कोणते ग्रंथ वाचले होते? शिवाजी महाराज हे आपलें युद्ध-कौशल्य कोणत्या लष्करी कॉलेजांत जाऊन शिकले होते! किंवा आपल्या मुलकी दिवाणी राज्यव्यवस्थेबद्दल त्यांनीं तज्ज्ञाकडून जे धन्यवाद मिळविले ते मिळण्याला कोणत्या कचेरींत त्यांनीं उमेदवारी केली होती! थोरल्या माधवरावांचीहि तीच गोष्ट. उलट सवाई माधवरावाला शिक्षण देण्याकरितां नाना फडणविसांनीं किती तरी योजना केल्या होत्या; पण त्यांचा कांहीं उपयोग झालेला दिसून आला नाहीं. जगाच्या इतर देशांतहि हाच प्रकार आढळतो. इंग्लंडचे प्रसिद्ध पितापुत्र मुत्सद्दी पिट यांना अल्प वयांतच राज्य-कारभाराचें ज्ञान झालें तें कसें! अलेकझांडर हा अल्पवयांतच राज्यकारभार करूं लागला. कायसर विल्यम यानें अनुभविक प्रौढ मुत्सद्दी प्रिन्स बिसमार्क याला सक्तीनें घरीं बसविलें तेव्हां जगानें त्याला 'अविचाराचें धाडस' असें नांव दिलें. पण त्याच कायसरनें पुढें केवढा आटोप दाखविला!

(९) वयांत आला, सत्पात्र झाला !

हल्लीं आपल्या देशांत प्रत्येक संस्थानांतूनहि तोच प्रकार आढळतो. तो असा कीं, संस्थानिक एकवीस वर्षांचा होतो न होतो तोंच तो राज्यकार-भार चालविण्याला लायख झाला अशा समजुतीनें, सरकार त्याला वस्त्रें व कुलमुखत्यारी देतें. तोहि बिचारा ती कुलमुखत्यारी नको असें कधींच म्हणत नाहीं. पण अशा अल्पवयांत अधिकारसंपन्न झालेल्या राजांतूनच बिकानेरचे महाराज, ग्वालेरचे माधवराव महाराज शिंदे, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड असे राज्यकर्ते निपजले आहेत. दुसरेपक्षीं ब्रिटिश हिंदुस्थानांतील स्वराज्य-संस्थांच्या अधिकाराचीहि तीच गोष्ट आहे. कारण जबाबदारीच्या स्वराज्यांतहि खरा धनी अखेर मतदार हाच समजला जातो. हिंदुस्थानांत अजून खरी जबाबदारी प्रांतिक सरकारपर्यंतहि पोंचली नाहीं म्हणा ! परंतु उद्यां मध्य-वर्तीसरकारहि जबाबदार झालें तरी मतदाराचाच धनीपणा कायम राह-णार व अधिक प्रभावी होणार. पण हा मतदार खरोखर कोण आहे ? तर वयानें २१ वर्षांचा झालेला व अमुक इतका कर सरकाराला देणारा. म्हणजे मग तो ठोंब्या, अशिक्षित, निरक्षर, मूर्ख, व्यसनी, कसाहि असला तरी हरकत नाहीं. उपपत्ति हीच कीं, जो सज्ञान होतांच घरचा कारभार जबाब-दारीनें पाहण्याला–घरचें संसाराचें नफानुकसान करण्याला–लायख होतो तो राज्याच्या कारभारांत लक्ष घालण्यालाहि लायखच होतो.

(१०) करूनच फार येतें, नुसतें शिकून थोडें येतें

खरोखर ही विचारसरणी बरोबर नाहीं असें कोण म्हणेल ? नव्या होत-करू राजाला किंवा मतदाराला राज्यशास्त्र शिकवून तयार करावयाचा म्हटलें तरी त्याला कोणचें शास्त्र, कोणती उपपत्ति, कोणता ग्रंथ शिकवा-वयाचा ! किंवा केव्हांहि, अडीअडचणीच्या कसल्याहि प्रसंगीं, कशाहि प्रकारचा कूट प्रश्न उपस्थित झाला असतां, त्याचें बिनचूक हुकमी उत्तर आगाऊच पढवून ठेवून, आपल्या शिष्याच्या पदरांत अविनाशी पाथेय किंवा ताजी शिधोरी बांधून ठेवून देईल असा गुरु तरी कोण भेटणार ? तो आजवर कोणालाहि लाभलेला नाहीं व पुढेंहि केव्हां लाभेल असें वाटत नाहीं. याचें कारण असें कीं, राजकारणांत प्रत्यक्ष अनुभवासारखा गुरु नाहीं.

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा

श्रीराम वाचनालय, सातारा

अनुभवानंतरचा महत्त्वाचा गुरू म्हणजे स्वतः त्याची प्रज्ञा किंवा प्रतिभा. आणि त्यानंतर तिसऱ्या दर्जाचा महत्त्वाचा गुरु म्हणजे ग्रंथ किंवा पढिक विद्या हा होय. राज्य करूं इच्छिणाऱ्या राजानें, अधिकाऱ्यानें किंवा प्रजेनें या विद्येचा म्हणजे अशा ग्रंथांचाहि संग्रह केलाच पाहिजे. कारण अनुभव घेतां घेतां त्याबरोबर, व प्रसंग पडेल, जरूरी उत्पन्न होईल त्याप्रमाणें, राज्यशास्त्र-बोधक ग्रंथांचा उपयोग केल्यास त्यांचेंहि साहाय्य होण्यासारखें असतें. तात्पर्य, राज्यशास्त्राला महत्त्व आहे, पण तें कमी दर्जाचें!

(११) एकच मुक्काम पण अनेक वाटा

राज्यशास्त्र हें ' अनुभवसिद्ध ' व ' कल्पनासिद्ध ' अशा दोन्ही प्रकारचें असतें. पण कोणतेंहि दोन प्रकार म्हटले म्हणजे वाद आलाच. कारण एकेरी प्रश्न व एकेरी उत्तर यांची मोहनी लोकांच्या मनावर फार असते. आणि राज्यशास्त्रासंबंधानें हे दोन प्रकार सांगितले म्हणजे पुष्कळ लोक असें विचारणार कीं–" दोन प्रकार सांगणें म्हणजे दुटप्पी बोलण्यासारखें आहे. श्रीकृष्णासारखा समजून सांगणारा गुरु व अर्जुनासारखा ज्ञानी समजूतदार शिष्य–असें असूनहि, श्रीकृष्ण गीता सांगत असतां, अर्जुनाला वरचेवर म्हणावें लागलेलें आढळतें कीं, ' तदेकं वद निश्चित्य ' ! ज्याचें चरित्र लिहावयास घ्यावें त्याची योग्यता स्वर्गाला नेऊन भिडवावी हा चरित्र-काराचा अभिनिवेश झाला. पण अनेक चरित्रें दृष्टीस पडल्यानें मन घोटा-ळ्यांत पडतें. कारण हाच एक चरित्रनायक जर सर्वोत्तम पुरुष, तर मग बाकीचे ह्याच्यापेक्षां कमी प्रतीचें हें उघडच ठरलें. उत्तम या शब्दाचा अर्थच हा आहे. उत्तम म्हणजे तुलनेनें सर्वोत्तम. मग बाकीच्यांची चरित्रें लिहा तरी कशाला! चरित्रें लिहावयाचीं तीं लोकांनीं त्यांचें अनुकरण करावें म्हणून. पण एकाचेंच चरित्र सर्वोत्तम ठरलें तर, अनुकरण करणारा-नें त्याचेंच अनुकरण करावें म्हणजे काम संपलें. कारण दुय्यम प्रतीच्या मनुष्याच्या चरित्राचें अनुकरण करावयाचें म्हटलें तरी तें अनुकरण पूर्ण व यशस्वी होतें काय! होत नाहीं. आणि कोणाचाहि अनुकरणाचा प्रयत्न जर इतका अपुरा व अयशस्वीच नसला तरी अल्पयशस्वी होणार, तर उत्तम पुरुषाचेंच अनुकरण करावें. मग त्यांतूनच कांहीं फायदा झाला तर होवो. "

(१२) गीताशास्त्राचा दाखला

श्रीकृष्णानें अर्जुनाला क्रमानें सांख्ययोग, ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग वगैरे मोक्षप्राप्तीचे मार्ग म्हणून सांगितले. पहिला मार्ग सांगितला तेव्हां अर्जुनाला वाटलें असेल, " चला ! एक मार्ग डोळ्यापुढें उभा राहिला तेव्हां आपलें त्यानेंच जावें म्हणजे मोक्षाला पोंचूं." पण श्रीकृष्णानें हळूच सांख्य ज्ञानांतून कर्मयोगांत प्रवेश केला. तेव्हां दोन वाटा फुटलेल्या दिसल्या असतां मनुष्य भांबावून जातो तसें अर्जुनाला झालें. पण रस्त्यांचीं नांवें लिहून त्यांकडे बोटें दाखवून रंगविलेल्या पाटीच्या खांबाप्रमाणें श्रीकृष्ण जवळच होते, व दुसराहि रस्ता पहिल्याप्रमाणेंच मोक्षाला पोंचतो असें श्रीकृष्णानीं सांगितलें. पुढें भक्तिमार्गाचेंहि त्यांनीं असेंच वर्णन केलें. अशा रीतीनें सगळे मार्ग निरनिराळे परंतु एकाच मुक्कामाला जाऊन पोंचणारे असें सांगून, श्रीकृष्णांनीं त्यांची एकवाक्यता केली. मग अर्जुन म्हणाला "आहेत ! तीन मार्ग आहेत ! तें सर्व ठीक आहे. ते वेगळे कोणाकरितां कां केले हेंहि मी समजलों. पण श्रीकृष्णा, आतां चल, तूं नेणार त्याच मार्गानें जातों. मला सर्वच मार्ग सारखे, कारण एकाच मुक्कामाला पोंचविणारे. पण आयती तुझी संगत सोबत कर्मयोगाच्या मार्गावर आहे ती सोडून दुसऱ्या मार्गानें कशाला जाऊं ? खुद्द वाटाड्याचाच हात धरून चालेलें बरें." पुढें कदाचित श्रीकृष्ण व अर्जुन कर्मयोगमार्गानें मुक्कामाला पोंचले तेव्हां तेथें त्यांना इतर मार्गांनीं आलेले प्रवासीहि भेटले असतील. आणि मग " श्रीकृष्णानें तीन मार्ग सांगितले ते बरोबर होते. ज्यानें त्यानें फक्त आपल्या स्वभावाप्रमाणें व हौसेप्रमाणें एक पसंत केला " हें अर्जुनाला दिसून आलेंच असेल. तीनहि मार्गानीं एकालाच एकाच वेळीं जाणें शक्य नसतें. त्याच मुक्कामाला निरनिराळ्या तीन वेळीं जावयाचें असेल तर एखादा प्रवासी कौतुकानें चिकित्सेनें एकदां हा, एकदां तो दुसरा, व एकदां तो तिसरा अशा तीन मार्गांनीं प्रवास करील. दुर्दैवानें एकदां मनुष्य मोक्षाला पोंचला म्हणजे मग पुनर्जन्म नाहीं ! आणि मग मनांत आलें तरी दुसऱ्या मार्गानें प्रवास करण्याची हौस फेडून घेण्याकरितां मागें परत येणें शक्य नाहीं हा भाग वेगळा ! पण या तीनहि मार्गांची उपयुक्तता व

फलद्रूपता अर्जुनाला कळली व पटली असेल यांत शंका नाहीं; व " तदेकं वद निश्चित्य " असें आपण उगीच म्हणालों असें त्याला वाटलें असेल !

(१३) दोन राजमार्गांमधली पाउलवाट

हा मर्मसूचक दाखला सोडून आतां आपण राज्यशास्त्राकडे वळूं. ज्ञानाचा परिणाम मोक्ष आहे असें म्हटलें तरी केवळ राज्यशास्त्राच्या ज्ञानानें त्या शास्त्रांतला मोक्ष मिळत नाहीं. त्या ज्ञानानें मनुष्याला किंवा समाजाला फार तर उपमोक्षापर्यंत पोंचल्यासारखें होतें. म्हणून पुनर्जन्म प्राप्त होतो. आणि म्हणूनच श्रीकृष्णार्जुनाच्या उदाहरणांत जें घडलें नाहीं तें राज्यशास्त्र-ज्ञानाच्या संबंधानें घडूं शकतें. म्हणजे कोणत्याहि एका पद्धतीनें (उदाहरणार्थ अनुभवपद्धतीनें) राज्यशास्त्राचें ज्ञान मिळविलें तर त्यानें सुराज्याचा मोक्ष लोकांच्या पदरीं पडलेला दिसत नाहीं. त्याला परत येऊन पुनः दुसऱ्या म्हणजे कल्पना मार्गानें राज्यशास्त्राचें ज्ञान मिळवावें लागतें. कोणत्याहि एका मार्गानें गेलें असतां, मनुष्य फक्त मोक्षाजवळ जवळ जातो. प्रत्यक्ष मोक्षाला जाऊन भिडत नाहीं. यामुळें अनुभवाचा ज्ञानमार्ग, व कल्पनेचा ज्ञानमार्ग, हे दोनहि त्याला आलटून पालटून चोखाळावे लागतात. सुदैवानें राज्यशास्त्रावर आज शेंकडो ग्रंथकारांनीं दोनहि मार्गांनीं जाऊन लिहिलेले, म्हणजे अनुभव व कल्पना यांच्या साह्यानें राज्यशास्त्राचें संशोधन व परीक्षण केलेले ग्रंथ उपलब्ध आहेत. यामुळें नवीन ग्रंथ रचणाराला दोनहि पद्धति सारख्याच प्रमाण वाटूं लागतात. मात्र तो मनाशीं असें म्हणतों कीं "दोन राजमार्ग दोहोंकडून जातात. पण त्या दोहोंमधून एक पाऊलवाटहि मळलेली अशी दिसते कीं, त्या पाऊल वाटेनें मी गेलों असतां, दोनहि मार्गांच्या जवळून मी प्रवास करीत राहीन. आणि जेथें मला पाऊलवाट अडचणींची वाटेल तेथें, तिचा तितका भाग टाकून, केव्हां अनुभवाच्या डाव्या हाताच्या राजमार्गानें तर केव्हां कल्पनेच्या उजव्या हाताच्या राजमार्गानें मीं प्रवास करीन. मीं दोन मार्गांपैकीं कोणाएकाचाच गुलाम कां व्हावें ? कदाचित माझी मला तिसरीच वाट काढतां येईल ! आणि तिनें जातांना जरूर तेव्हां दोनहि राजमार्गांचा फायदाहि मला मिळेल."

(१४) राज्यशास्त्र हा समाजशास्त्राचा भाग आहे

इतका विस्तार करून लिहिण्याचें कारण असें कीं, पूर्वी एक वेळ राज्यशास्त्र हें नुसतें अनुभवसिद्ध असा आग्रह धरणारे, व उलट तें शास्त्र केवळ कल्पनासिद्ध आहे असा आग्रह धरणारे, दोनहि प्रकारचे लेखक होऊन गेले. पण आतां जे ग्रंथकार राज्यशास्त्राविषयीं लिहितात तें अनुभव व कल्पना या दोहोंच्या साहाय्यानें, पण त्यांतल्यात्यांत अनुभवाला अधिक महत्त्व देऊन आपले सिद्धान्त मांडतात. मात्र क्वचित त्यांतल्या एकाविषयीं त्यांचा पक्षपात थोडासा दिसून आला तरी, दुसरी पद्धति सर्वस्वीं टाकाऊ आहे असें ते म्हणत नाहींत. राज्यशास्त्राला इतिहासाच्या शास्त्रांत घालावें कीं, समाजशास्त्रांत घालावें, किंवा तें स्वतंत्र कल्पनेनें रचावें, असा जो वाद होता तोहि आतां नाहींसा झालेला आहे. तो असा कीं, समाजशास्त्र हें आतां " सर्व शास्त्रांवर व्याप्ति करून शिल्लक उरणारें शास्त्र " असें मानतात. आणि या व्यापक शास्त्रांत, इतिहासशास्त्रच काय पण मानसशास्त्र देखील समाविष्ट होतें असेंहि मानतात. राज्यशास्त्र हेंहि समाजासंबंधीं असल्यामुळें, तें एकंदर समाजशास्त्राखालींच पडणार हें उघड आहे. पण त्यांतूनहि मानसशास्त्र व इतिहासशास्त्र या दोहोंचाहि त्याला आधार आहे असें देखील मानलें जातें. राज्यशास्त्र लिहावयाला बसावें व सर्व इतिहास विसरावा, आणि मग मनाला विचारावें कीं, " मीं अशी कोणती नवी कल्पना सुचविणार कीं, जिला इतिहास-ज्ञानाचा आधार नाहीं ? कारण माझ्याच स्वतःच्या कल्पनेंतून जरी मी नवा म्हणून सिद्धान्त काढावयाला बसलों तरी, माझी कल्पना ही अगदीं स्वतंत्र अशी आहे कोठें ? अगदीं नवी म्हणून कल्पना काढावी व पृथक्करण करून पाहावें तों, तिचा प्रत्येक भाग पूर्वीच्या अनुभवाचाच आहे असें आढळतें."

(१५) भूत हेंच खरें अद्भुत

अगदीं अद्भुत म्हणून कल्पना चालविली तर अजूनहि एखादा नवा देव उत्पन्न करितां येईल. पण दहा तोंडांचा रावण, हजार हातांचा सहस्रार्जुन, घोडतोंडया तुंबरू, अर्धमनुष्य अर्धपशु असला अवतारी नरसिंह, हीं चित्रें घेतलीं तरी त्यांत आपणाला पूर्वी माहिती असलेले अनुभवसिद्ध

प्रास्ता[illegible] वाचनालय, लिं.

असेच निरनिराळे अवयव एकत्र जोडलेले आढळतात कीं नाहीं ! गणपती हा प्रथम झाला तेव्हां नवा. पण मनुष्य देह व हत्तीची सोंड यांपैकीं नवें कांहींच नव्हतें ! तसेंच हौसेनें, अभिरुचीनें, वैचित्र्यबुद्धीनें कमाल केली तरी पांच पन्नास निरनिराळ्या परिचित वाहनावर बसलेले किंवा निरनिराळ्या स्थितींतले व पोशाखांतले, गणपति दाखवितां येतील इतकेंच. तसेच, व्याकरणांतील सकर्मक क्रियापदाचें वाक्य म्हटलें म्हणजे कर्ता, कर्म व क्रियापद हीं तीनहि त्यांत स्पष्ट किंवा अध्याहृत आलींच पाहिजेत, मग कोणी कर्त्यापासून, कोणी कर्मापासून, कोणी क्रियापदापासून वाक्याचा प्रारंभ करो; किंवा कोणी क्रियेवर, कोणी कर्त्यावर, कोणी कर्मावर विशेष जोर देवो. राज्यशास्त्रांतील संस्थांचें व सिद्धान्तांचें असेंच आहे.

(१६) कल्पना व अनुभव परस्परोपकारीच होत

राज्यसंस्था म्हटली म्हणजे हुकूम करणारा असा कोणी तरी सत्ताधारी पाहिजे. ज्याला उद्देशून हुकूम केला, ज्यानें तो हुकूम मानावा अशी अपेक्षा व ज्यानें तो हुकूम मानला नाहीं तर त्याला शिक्षा करूं असा सत्ताधाऱ्याचा अभिनिवेश असेल असा कोणी तरी प्रजाजन पाहिजे. निश्चित हुकूम पाहिजे. आणि तो अमान्य केल्यास तो बजावून घेण्याची व शिक्षा करण्याची शक्ति पाहिजे. या चार गोष्टी असल्याशिवाय राज्यसंस्थेची बनावट किंवा कल्पनाहि होऊं शकत नाहीं. या चारहि गोष्टींच्या प्रकारांचें ज्ञान मनुष्याला इतिहासावरूनच झालेलें आहे. हल्लींचे जे राज्यसंस्थेचे प्रकार अंमलांत आहेत ते कांहीं वळणावळणांनीं जुन्या बीजसंस्थांतूनच रूपांतर होत होत परिणत झालेले आहेत. आणि भावी राज्यसंस्था अमुक एक प्रकारच्या असाव्या व त्याच इष्ट होत असें वर्णन किंवा शिफारस कोणाला करावयाची असेल तरी, या जुन्या अनुभवाचींच कसोटी घेऊन (व्याकरणांतील वाक्याच्या दाखल्याप्रमाणें) त्याचें निरनिराळ्या पद्धतीनें मिश्रण करून, किंवा त्यांना निरनिराळे स्थान देऊन, किंवा त्यांना निरनिराळे महत्त्व देऊन, ती कल्पना किंवा बनावट सिद्ध केली पाहिजे. म्हणजे अर्थात् अनुभव व कल्पना यांचा सरमिसळच उपयोग केला पाहिजे; त्यांतील कोणतेंहि एक वगळूंच असें म्हटलें तर चालणार नाहीं.

(१७) विशेषतः समाजशास्त्रांत

समाजशास्त्राला भौतिक शास्त्राचा दाखला अर्थातच देतां येत नाहीं. कारण भौतिक पदार्थांचे गुणधर्म निश्चित स्वरूपाच असून त्यांचा हुकमी प्रयोग करून पाहतां येतो, त्याप्रमाणें समाजशास्त्रांत असे हुकमी प्रयोग करून पाहतां येत नाहींत. पण भौतिक शास्त्रांतहि जुने अनुभव लक्षांत घेऊन व पुढें कांहीं तरी कल्पना मनांत बसवून (अनुभवाच्या साहाय्यानेंच पण थोडेसें अनमानधपक्यानेंच) शास्त्रज्ञानी लोक प्रयोग करतात. समाज-शास्त्रांत व त्यांतील अंगभूत राज्यशास्त्रांतहि याच रीतीनें जुना इतिहास आधाराला घ्यावा लागतो, व मग अनुभवानें एखादी नवी कल्पना रचून अनुभवसिद्ध मार्गांनीं ती अंमलांत आणण्याचा प्रयोग करावा लागतो. पण तो साधेलच अशी जामिनकी कोणी मागत नाहीं व कोणी देत नाहीं. अशी जामिनकी मिळती तर सुराज्याचा प्रश्न हटकून सुटून सगळें जग सुखी व संतुष्ट झालें असतें. पण " वांझोटी रडे, एकपुती रडे व सातपुती रडे " या म्हणीप्रमाणें, मात्र ती प्रत्येक वेगवेगळ्या कारणांकरितां रडते या न्यायानें, जगांतील कोणताहि समाज आज कमी अधिक असंतुष्टच आहे.

(१८) रोज नवा शिधा, नवा स्वयंपाक

कोणी जुन्या सुवर्णयुगांतील सुटसुटीत अल्पप्रमाण राज्यसंस्थांचा लोप झाला म्हणून ! कोणाचा खरा विश्वास एकतंत्री राजसत्तेच्या यशावरच आहे पण ती सत्ता आज लोपली म्हणून ! आणि कोणी नवी लोकाधीन राजसत्ता अस्ति-त्वांत आहे पण ज्याच्या हातीं ती सत्ता ते लोकच अपात्र नादान ठरूं पाहातात म्हणून ! मिळून कोणाचेंहि समाधान नाहीं. मात्र सर्व गुण पूर्ण अशा राजसंस्थेचा शोध सुरूच आहे, प्रयोग होतच आहे, उलथापालथ होतच आहे. ताजव्याचें पारडें वरखालीं ढळतच आहे. आणि एकंदरीनें असा प्रकार चाललेला आहे कीं, अंधाऱ्या खोलींत लोकांना डोळे बांधून सोन्याचा गोळा हुडकून काढून हस्तगत करण्याकरितां सोडून दिलें आहे, पण कोणा दुष्टानें हळूच सोन्याचा गोळा तेवढा तेथून काढून लांबविला आहे. असें असून, शोध धांगडधिंगा, बदाबदी, गर्दी, गोंधळ, मारामारी सुरूच आहे. पण हें सर्व आहे म्हणून शास्त्रविचार करण्याचा मोह कांहीं कोणाचा सुटलेला नाहीं.

ज्ञानाची इच्छा आणि जगण्याची इच्छा या दोनहि वरोबरच वाट चालतात. राज्यसंस्था कितीहि प्रयत्न केला तरी यशस्वी होत नाहीं असें पाहूनहि राज्यसंस्थाच मुळीं नको असें कोणी आज म्हणत नाहीं. "कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस !" आणि यंत्रें जशीं एकच हेतू सिद्ध करण्याकरितां शेंकडों निरनिराळ्या प्रकारचीं बनत आहेत, त्याप्रमाणें राजकीय सुखाकरितां व नमुनेदार सुराज्य व्यवस्थेकरितां प्रयत्न करण्याचें कोणी सोडलें नाहीं. इतिहास इतका जुना झाला असला तरी जी नवी पिढी येते तिला सर्वच नवें असतें. दूर दिसणाऱ्या क्षितिजाच्या रेघेपर्यंत आपण प्रवास करून पोंचलों म्हणजे तितक्या दूर अंतरावर पुनः दिसणाऱ्या क्षितिजाची रेघ उमटूं लागते. आणि तेथपर्यंत पोंचण्याचा मार्गहि पूर्वीप्रमाणेंच चालून गेलें पाहिजे असें दिसून येतें. रोज नवा मुक्काम, रोज नवा शिधा, रोज नवा स्वयंपाक, त्याचप्रमाणें रोज नवे वाचक व रोज नवे लेखक. राज्यघटनांची व राज्यशास्त्रावरील ग्रंथांचीहि गोष्ट तशीच आहे.

(१९) राज्य-शास्त्राचा इतर शास्त्रांशीं संबंध

राज्यशास्त्र हें कल्पनासिद्ध किंवा अनुभवसिद्ध यांपैकीं कसेंहि मानलें तरी, इतर अनेक शास्त्रांशीं त्याचा त्या त्या रीतीनें संबंध येतो. हीं अनेक शास्त्रें म्हणजे समाजशास्त्राशीं चिटकून असलेलीं शास्त्रें. मात्र शुद्ध बौद्धिक शास्त्रें नव्हेत. उदाहरणार्थ, जमाखर्ची हिशेब ठेवणें हें राज्यकारभारांत अवश्य असल्यामुळें व्यवहारापुरतें गणित त्याला लागतें; म्हणून कांहीं गणितशास्त्राशीं राज्यशास्त्राचा संबंध आहे असें म्हणतां येणार नाहीं. राज्यातलीं घडयाळें बरोबर वेळ देणारीं अशीं लावितां यावीं याकरितां राज्यांत एखादी वेधशाळा हवी; म्हणून कांहीं ज्योतिषशास्त्राशीं राज्यशास्त्राचा संबंध आहे असें म्हणतां येत नाहीं. भौतिक शास्त्रांच्या, म्हणजे पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र यांच्या, परिणतीवर राज्यकारभाराला अवश्य असणाऱ्या सैन्याची सुस्थिति व युद्धपात्रता अवलंबून असते; तरी पण राज्यशास्त्राचा व भौतिक शास्त्रांचा प्रत्यक्ष संबंध आहे असें म्हणतां येत नाहीं. याच रीतीनें आणखी असेंहि दाखवितां येईल कीं, इतर अनेक शास्त्रांच्या शोधांचा व प्राक्रियेचा उपयोग राज्यकारभाराच्या निरनिराळ्या खात्यांकरितां

करून घ्यावा लागतो, व तज्ज्ञांच्याद्वारें तो करूनहि घेतला जातो. पण राज्य-शास्त्राचे सिद्धांत या इतर शास्त्रांवर अवलंबून आहेत असें म्हणतां येत नाहीं.

(२०) राज्य-शास्त्र व धर्मशास्त्र

आतां धर्मशास्त्र व नीतिशास्त्र हीं घेऊं. यांचा राज्यशास्त्राशीं प्रत्यक्ष फारसा संबंध पोचत नाहीं. पूर्वी एकेकाळीं राजसत्ता व धर्मसत्ता ही एकाच ठिकाणीं संघटित झालीं असल्यानें त्यांचा संबंध उघड होता. परंतु दिवसे-दिवस या दोन सत्ता वेगवेगळ्या होऊं लागल्या आहेत; व राज्यसत्ता ही शिरजोर होऊन तिनें धर्मसत्तेचा उच्छेद करण्याचा सपाटा चालविला आहे. यामुळें धर्मसत्तेचा सामान्य समाजसत्तेंत अंतर्भाव होऊन येथेंहि धर्माला सत्ता म्हणून कांहीं उरणार नाहीं असा संभव वाटतो. आर्य हिंदु लोकांच्या जुन्या संस्कृतींत राज्यशास्त्र हें सगळेंच्या सगळें धर्मशास्त्रांत अंतर्भूत झालेलें होतें. राजधर्म, राजनीति हा धर्मग्रंथांतलाच एक अध्याय असे. आणि राजा हा विष्णूचा अवतार ही भावना असल्यामुळें, राजाचे अधिकार व त्यांचीं कर्तव्यें याना धर्मसिद्धांतांचें स्वरूप प्राप्त झालें होतें. पण त्याबरोबर प्रजाधर्मालाहि धर्मसिद्धांताचें स्वरूप असून, स्वधर्मानुसार वागणाऱ्या प्रजेला स्वातंत्र्याचा हक्क होता, व त्यापुरता राजा हा प्रजेच्या हुकुमांची अंमलबजावणी करणारा मुख्य अधिकारी सेवक असें त्याचें नातें होतें. पण या नव्या मनूंत ते जुने सिद्धांत सर्व मार्गें पडून जगांतील इतर राष्ट्र-समाजाप्रमाणें राजधर्म व प्रजाधर्म याना निवळ व्यावहारिक व कायदेबाज-पणाचें स्वरूप येऊं लागलें आहे.

(२१) राज्य-शास्त्र व अर्थशास्त्र

दुसरें पक्षीं इतर कांहीं शास्त्रांचें तसें नाहीं. उदाहरणार्थ, अर्थशास्त्र. अर्थशास्त्रांतील मुख्य तत्व असें आहे कीं, मनुष्य व मनुष्यसमाज हा स्वार्थी असून द्रव्यसंपादनार्थ तो हरएकप्रकारच्या खटपटी करीत असतो. या सर्व खटपटींच्या विचारांचें संशोधनाचें शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र. तसेंच देशाच्या सांपत्तिक स्थितीवर राज्यकारभाराची सुस्थिति, व उलट देशांतील राज्य-कारभारावर त्यांतील लोकांची सांपत्तिक सुस्थिति ही अवलंबून असल्या-

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
प्रस्तावित ... सातारा
आराम वाचनालय, ...

मुळें, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र यांचा अत्यंत निकट संबंध येतो. राज्यांतल्या फडणिशी व व्यापारी खात्यांचा कारभार चांगला किंवा वाईट होणें, आणि त्यामुळें प्रजेला सुख किंवा दुःख होणें हें, त्या दोन खात्यांत अर्थशास्त्र जाणणारे निष्णात लोक अधिकारांच्या जागांवर असण्यावरच अवलंबून आहे. हल्लींचें हिंदुस्थान सरकार हें परकी आहे, व स्वदेशांतील म्हणजे विलायतेंतील लोकांचें कल्याण हिंदुस्थानच्या संपत्तीनें करणारें आहे असा प्रवाद प्रसिद्ध व सर्वसंमत आहेच कीं नाहीं ? स्वदेशी बहिष्काराच्या चळवळी प्रथम त्यामुळेंच निघाल्या. आणि हिंदुस्थानच्या लोकांना आर्थिक स्वातंत्र्य मिळालें तरच खरें स्वराज्य मिळालें असें जें म्हणण्यांत येतें तेंहि याच कारणामुळें.

(२२) अर्थशास्त्राचें वाढतें महत्त्व

पण याहिपलीकडे जाऊन अर्थशास्त्र व राज्यशास्त्र यांचा संबंध दाखवितां येतो. तो असा कीं, हिंदुस्थानांत सरकार परकी असो, पण इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी, अमेरिका या देशांतून तरी तें स्वकीयांचेंच आहे कीं नाहीं ? मग त्या देशांतल्या लोकांचें आर्थिक कल्याण व सरकारचें धोरण यांचा बेबनाव झाल्याची जी ओरड कित्येक वेळां आपण ऐकतों ती कां ? तर त्याचें कारण हें कीं, प्रधानमंडळ स्वकीय ऋणानुबंधी व देशप्रेमी लोकांचेंच असलें तरी, स्वकीयांचेंहि आर्थिक कल्याण साधण्याच्या मार्गासंबंधानें स्वकीयांतच मतभेद होऊं शकतो, व या मतभेदावर प्रधानमंडळाची उलथापालथहि होते. उदाहरणार्थ, देशांत भांडवलशाही वरचढ असावी किंवा कामकरी वर्ग वरचढ असावा, व्यापार खुला असावा कीं बंदिस्त असावा, देशांतले कारखाने किंवा उद्योगधंदे हे सरकारच्या मालकीचे असावें कीं खासगी मालकीचे असावे, चलनपद्धति कशी असावी, इत्यादि अनेक अर्थ-शास्त्रविषयक बाबी या प्रत्यक्ष राज्यकारभाराच्या धोरणांत समाविष्ट होऊं शकतात. आणि बोल्शेव्हिजम किंवा कम्यूनिझमच्या अर्थशास्त्रीय उपपत्तीला तर राजकारणांत हल्लीं इतकें स्थान आलें आहे कीं, तिच्या पायीं रशियांत राज्यक्रांती होऊन बादशाहि तर नष्ट झालीच, पण भांडवलशाहीहि

नष्ट होऊन राष्ट्राचें सैन्य हें या नव्या सिद्धांतिक अर्थशास्त्रीय मतप्रसाराचा दूतगण असें स्वरूप त्याला आलें आहे.

(२३) राज्य-शास्त्र व इतिहासशास्त्र

अशा रीतीनें इतर अनेक शास्त्रांचा उल्लेख केला असतां आम्हीं इतिहासशास्त्र मात्र अद्यापि वगळलें. पण त्याचें कारण हेंच कीं इतिहासशास्त्र व राज्यशास्त्र यांचा संबंध आम्हीं इतका निकट मानतों कीं त्या दोहोंची जवळ जवळ समान व्याप्तीच होते. विशेषतः जे लोक राज्यशास्त्र हें मुख्यतः अनुभवसिद्ध शास्त्र आहे असें मानतात, त्यांना इतिहास व राज्यशास्त्र यांची समव्याप्ति मानल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. इतिहासाला सामाजिक हेंहि एक अंग असतें, व इतिहासशास्त्र हें समाजशास्त्र या व्यापक सदराखालीं पडतें. पण राज्यशास्त्र हेंहि समाजशास्त्राचेंच मुख्य अंग मानावें लागतें. यामुळें इतिहासशास्त्र व राज्यशास्त्र यांची समव्याप्ति मानण्यास कांहींच प्रत्यवाय येत नाहीं. जगाचा इतिहास म्हणजे मनुष्यस्वभावाचा इतिहास. राज्यशास्त्र परिणत होण्याला जो अनुभव लागतो तो सर्व, ज्याला आपण 'इतिहास' म्हणतों त्यांतच, ग्रथित झालेला आहे. किंबहुना इतिहासांत राज्यसंस्थांच्या हकीकतीला जितकें महत्त्व दिलेलें आढळतें तितकें समाजाच्या इतर अंगांच्या हकीकतीला दिलेलें आढळत नाहीं. यावरूनहि इतिहास व राज्यशास्त्र हीं किती एकजीव आहेत हें दिसून येईल. राज्यकारभारांतून इतिहासवृक्षाचीं बीजें निर्माण होतात व फिरून त्या इतिहास-वृक्षाला राज्यसंस्थारूपी फळें येतात.

(२४) इतिहास हा मुख्यतः राज्यसंस्थांचाच इतिहास !

कोणताहि इतिहास घेऊन पहा. त्यांत राज्यसंस्थांच्या पूर्वकालीन किंवा तत्कालीन घडामोडींचीच हकीकत मुख्यतः दिलेली असते. जुन्या काळीं स्वतंत्र वागणारे जुलमी सत्ताधीश राजे होते, तेव्हां इतिहासाचा मुख्य विषय त्या राजांनीं व्यक्तिशः किंवा त्यांच्या घराण्यानीं केलेले पराक्रम, युद्धें कीर्तिलाभाच्या इतर गोष्टी, सुखलालसेनें केलेले खेळ, चोचले, व्यवस्था, प्रधानमंडळें सेनापति यांच्या अदलाबदली, बंडें, क्रांत्या, उत्पात, धाडसाचे किंवा लोकोपयोगार्थ किंवा धर्मसाधनार्थ केलेले उद्योग, शास्त्रकलादिकांचा

घेतलेला परामर्ष, विद्यावृद्धीचे प्रयत्न–इत्यादि विविध पण राजे लोकांनीं केलेल्या गोष्टींच्या वर्णनाचा असे. रोमच्या राज्यासारख्या राज्याचा इतिहास घेतला तर त्यांत आलटूनपालटून प्रथम रांजे, मग मुलतानी पद्धतीनें व अधिकारानें वागणारे लोकप्रतिनिधी, व मग खुद्द जुलमी बादशहा कसकसे झाले याची, व या सर्वांच्या कारकीर्दींत घडलेल्या राज्यकारभाराची हकीकत वाचावयास मिळते. अथवा अमेरिका स्विट्झरलंडसारख्या राष्ट्रांचा इतिहास घेतला तर लोकशाही राज्यकारभाराची हकीकत वाचावयास मिळते. पण नुसता 'इतिहास' म्हटला म्हणजे तो राज्य–संस्थांचा इतिहास हाच अर्थ कोठेंहि आढळतो. राजकीय इतिहास हेंच 'राज्यशास्त्रा'चें प्रधान अंग होय.

(२५) भविष्यपुराण इतिहास नव्हे

तथापि प्रस्तुत पुस्तकांत कोणत्याहि एका किंवा अनेक देशांचा राजकीय इतिहास समग्र किंवा संक्षिप्त असाहि सांगण्याचा आमचा हेतु नाहीं. इतिहासाचें महत्त्व राज्यशास्त्राच्या या प्रस्तावनेंत उल्लेखिण्याचें मुख्य कारण इतकेंच कीं, पूर्वी सांगितल्याप्रमाणें राज्यशास्त्र हें प्रायः अनुभवसिद्ध असें शास्त्र आहे व हा अनुभव इतिहासांतच सांपडतो. मग तो इतिहास लेखी गद्य ग्रंथ, काव्यें, पवाडे, प्रशस्त्या, दंतकथा किंबहुना अर्धवट अद्भुत वर्णनात्मक आधिदैविक संस्कृतीचीं पुराणें–कोणत्याहि स्वरूपांत असो. मात्र इतिहासाचा विषय भविष्य वर्णन करण्याचा नसतो. पूर्वेतिहासाच्या ज्ञानानें पुढील काळच्या स्थितीविषयीं अनुमान करितां येण्यासारखें असतें; आणि अनुमान व भविष्य यांत म्हणण्यासारखा फरक नाहीं. भविष्य या शब्दांत कांहीं दैवी चमत्काराच्या सामर्थ्याचा अंश असल्याविषयीं लोकभ्रम आहे. परंतु पद्धतशीर केलेलीं, म्हणजे अनुभवावरून सिद्ध झालेले पक्के नियम लावून बनविलेलीं अनुमानें हीं 'भविष्या'इतकीच खरीं ठरूं शकतात. राज्यशास्त्राहून इतर शास्त्रांनाहि इतिहासग्रथित अनुभव हाच मुख्य पाया आहे. पण त्याला नुसतें 'इतिहास' हें नांव नसून त्या त्या विषयाचें नांव त्या शब्दाच्या मागें जोडावें लागतें. उदाहरणार्थ, चित्रकलेचा इतिहास, वैद्यकशास्त्राचा इतिहास, प्राणिशास्त्राचा इतिहास इत्यादि.

(२६) इतिहासज्ञान व शहाणपण

जें फल इतिहासाच्या अध्ययनानें तेंच राज्यशास्त्राच्या अध्ययनानें मिळेल. इतिहासावरून राजकीय शहाणपण शिकण्याचें मनुष्य मनांत आणील तर तें त्याला शिकतां येईल. पण मनुष्यानें इतिहास हा जर केवळ मनोरंजक वाङ्मय म्हणूनच वाचला, त्यांतील अद्भुत कथा वाचण्यापुरतीच त्यानें आस्था ठेवली, त्यांतील चटकदार गोष्टी हाच काय तो मनुष्यस्वभावाचा खरा किंवा संपूर्ण नमुना मानला, किंवा मन याहून थोडें मोठें करून का होईना, ऐतिहासिक मानवचरित्रांतल्या आनंदायक प्रसंगांनीं आनंद व दुःखदायक प्रसंगानीं दुःख मानलें, व अशारीतीनें सहानुभवच घेतला, तरी तेवढ्यामुळें मनुष्यानें इतिहासाचा खरा उपयोग करून घेतला असें होत नाहीं. कारण हे उपयोग वरवरचे आहेत. अंतरंगस्पर्शी नाहींत. भोळ्या श्रद्धाळू लोकांनीं अद्भुत रसपोषक भाग उचलला, सात्विकानीं सहानुभूतीचा भाग उचलला, आणि वाङ्मयप्रेमी लोकांनीं इतिहासाच्या भाषेंतील वक्तृत्वाचा आनंदरस लुटला, तरी इतिहासाच्या गाभ्यांत अंतरंगांत बोध, शहाणपणाची शिकवण, ही कांहीं बाकी उरतेच. पण त्या दृष्टीनें इतिहास वाचील त्यालाच ती लाभेल. पंचांगभर सण लिहिले आहेत. पण अभागी कपाळकरंट्याला त्यांतला एकहि वाट्याला येत नाहीं. शकुनवंतीत अशुभ शकुनाइतकेच शुभ शकून असतात. पण दुर्दैवी मनुष्याला अशुभ शकुनावरच सुपारी ठेवण्याची बुद्धि होते त्याला काय करणार !

(२७) इतिहासांत पुनरुक्ति पण वैचित्र्य असतें

अशारीतीनें इतिहासांतून अनेकांनीं आपापल्या अभिरुचीप्रमाणें पात्रतेप्रमाणें अनेक भाग उचलले म्हणजे जें सत्व खालीं तळाशीं उरतें तेंच राज्यशास्त्राचें मुख्य घटकद्रव्य होय. विद्यमान सर्व देशांतील राज्यसंस्था पाहिल्या असतां त्या, याच ऐतिहासिक सत्वानें, मात्र पुटावर पुटें बसून व संस्कारावर संस्कार होऊन बनलेल्या आहेत असेंच आढळून येईल. इतिहास हा त्याच त्या प्रसंगानीं पुनरुक्त झालेला आहे असें दिसतें. त्याचें कारण मनुष्यस्वभाव अनेक युगांतरें झालीं तरी फारसा बदललेला नाहीं. परंतु या पुनरुक्त प्रसंगांतहि बारिक नजरेला हें आढळून येईल कीं एक-

सारखा तंतोतंत सोळा आणे प्रसंग दुसरा असत नाहीं. त्यांत फरक असतोच. सर्व मनुष्यें ही एकच जाति असतां, एकाच घराण्यांत काय, पण एकाच आईबापांच्या पोटींहि आलेल्या मुलांचे चेहरे सर्व हुबेहुब सारखे नसतात. एकत्वांत अनेकत्व, सामान्यांत विशेषत्व, व एकजिनसीपणांत वैचित्र्य हीच खरी ईश्वरी किंवा निसर्गकृत लीला होय. आणि जगांत आज शेपन्नास लहानमोठ्या व कमीअधिक स्वतंत्र अशा देशांत ज्या राज्यसंस्था अमलांत आहेत, त्यांतील वैचित्र्य पाहून याच ईश्वरी किंवा निसर्गकृत लीलेचा प्रत्यय येतो. राज्यशास्त्राच्या मूल तत्वांच्या वर्णनांत त्या संस्थांचा उपयोग उदाहरणादाखल फार होणारा आहे.

(२८) राज्यशास्त्राची फलश्रुति

राज्यशास्त्राला ' शास्त्र ' हें नांव दिलें म्हणजे, जुन्या हिंदी पद्धतीप्रमाणें, त्याची फलश्रुतिंहि सांगितली पाहिजे. ती अशी आहे. या शास्त्राचा मूळ प्रणेता ईश्वर होय; कारण त्यानेंच मनुष्यस्वभाव उत्पन्न केला; आणि मनुष्यस्वभावानेंच राज्यसंस्था उत्पन्न केली. म्हणून राज्यशास्त्राचें अध्ययन करणाराला ईश्वरोपासनेचें पुण्य लाभतें. ती ईश्वराचीच एकप्रकारची सगुणोपासना होय. मनुष्यस्वभावांत त्रैगुण्य आहे. परंतु त्यापैकीं सत्वगुणाचा अनुभव देणारे घेणारे लोक थोडेच असतात. मुख्य खेळ रजोगुणाचा असतो. तामस गुण हाहि अपवाद स्वरूपाचाच समजावा. कारण मनुष्यमात्राचे हेतु किंवा चतुर्वर्ग (धर्मअर्थकाममोक्ष) केवळ सत्वगुणपालनानें साधत नाहींत; उलट रजोगुणपालनानें जोंपर्यंत त्याचें कार्य साधतें तोंपर्यंत तामसगुणाचा अंगीकार तो करीत नाहीं. रजोगुणांत स्वार्थ व स्वातंत्र्यबुद्धि हीं प्रमुख आहेत. या दोहोंचाहि लाभ मनुष्याला राज्यसंस्थेपासून मिळूं शकतो. राज्यशास्त्राच्या अध्ययनापासून अदृष्टफल काय मिळेल हें सांगणें कठिण; कारण तें अदृष्टच. पण धन, धान्य, संपत्ति, यश, कीर्ति, अखंड राष्ट्रीय संततिपरंपरा, परोपकारादि मनुष्यसेवादि मानीव ऐहिक पुण्यमार्गाची प्राप्ती, इत्यादि हीं राज्यशास्त्राध्ययनाची दृष्ट फलें होत.

राज्यशास्त्र भाग २

राज्यसंस्थांचा उगम व आधार

(२९) मनुष्याचें व्यक्तित्व व सामुदायिकत्व

मनुष्याचा जीवात्मा आणि त्याच्या देहाला मिळालेलें व्यक्तिनाम व व्यक्तिरूप एवढीच काय ती मनुष्यप्राण्याची या जगांत खास मालकीची अशी मत्ता आहे. बाकी हवा, पाणी, भूमि यांपासून तों त्याच्या देशांतल्या राज्यसंस्थेच्या मालकीच्या संपत्तीपर्यंत सर्वांमध्यें तो यथांश सहभागी असला तरी, त्याची त्यांवर स्वतंत्र मालकी नाहीं. त्याला इतर अनेक भागीदार आहेत. व्यक्तिनामाच्या पलीकडे जाऊन त्याला आईचें किंवा बापाचें नांव लावावयाचें झालें तरी, आपलीं भावंडेंहि तींच नांवें लावतात, व हक्कानें आणि न्यायानें लावतात, असें त्याला आढळतें. स्वातंत्र्यबुद्धि-प्रधान मनुष्य प्राण्याच्या पारतंत्र्याला, वरील उपाधीच्या त्याच्या बंधनाला, येथून प्रारंभ होतो. पण या उपाधीला कंटाळून तो आपण होऊन वनवास एकांतवास पतकरीत नाहीं. इतकेंच काय पण आश्रयाकरितां, रक्षणाकरितां, सुखवृद्धीकरितां, आनंदवर्धनाकरितां, भागीदारीच्या तत्वानें दुःखभार हलका होण्याकरितां, तो होऊन इतरांची संगती स्वेच्छेनें पत्करितो. मनुष्य हें समाजाचें मूलच आहे. आणि मुलें जशीं आईच्या कुशींत शिरतात, किंवा तिच्या पाठोपाठ तिला चिकटून वावरत असतात, त्याचप्रमाणें मनुष्य हा समाजाला सहसा सोडून जात नाहीं व केव्हां केव्हां तर त्याला तो अगदीं बिलगून चिकटून राहतो.

(३०) सामुदायिक संबंधाचा नफातोटा

उपयोगामुळें किंवा कृतज्ञतेमुळें ममत्व वाटतें व वाढतें. त्याप्रमाणें प्रथम सर्वांत जवळच्या उपयोगाचें म्हणून आपलें कुटुंब म्हणजे आई बाप

भावंडें, व तेढ्या नात्याचेहि कांही कांहीं आत, हे आपलेसे वाटतात. त्यांच्याविषयीं ममत्व व अभिमान वाटतो, व त्यांच्या करितां थोडास स्वार्थत्याग करण्यालाहि मनुष्य प्रसंगविशेषीं तयार होतो. मग एकाहून दुसरा अधिक लांब, त्याहून तिसरा कोणी अधिक लांब,या क्रमानें देशाच्या सरकारापर्यंत कमी अधिक ऋणानुबंधी अशा सामाजिक घटकांची साखळी लागते. आपला परका, जवळचा लांबचा, ही भावना सापेक्ष व तुलनात्मक अशीच असते. सर्वात्मतेनें किंवा निखालस आपला व निखालस परका असें कोणालाहि म्हणतां येतच नाहीं. विरोध दर्शविण्याला, म्हणजे व्यवच्छेदकत्वाचें ज्ञान करून देण्याला, केव्हां या साखळींतला हा दुवा तर केव्हां तो दुवा उपयोगी पडेल इतकेंच. व्यक्तिनाम, पितृनाम, कुटुंबनाम, कुलनाम, गोत्रनाम, जातिनाम, ग्रामनाम, प्रांतनाम, देशनाम या सर्वांचा उपयोग आपलेपणा दाखविण्याप्रमाणें परकीपणा दाखविण्यालाहि यथाप्रसंग उपयोगी पडतो. पण यापैकीं कोणालाहि कारणपरत्वें तो आपला म्हणो किंवा परका म्हणो, त्या सर्वांचा व त्याचा संबंध न तुटण्यासारखा जोडलेला असतो. गोताचा रक्तसंबंध तोडणें अशक्यच आहे. आणि देशांतील सरकाराचा राग आला तरी देशत्याग केल्याशिवाय सरकारचा संबंध तुटू शकत नाहीं.

(३१) मनुष्यदेह व राज्यसंस्था यांचें रूपक

प्रस्तुत राज्यशास्त्राच्या पुस्तकांत आपणाला कुटुंब किंवा जातिधर्म यांविषयीं फारसा विचार करावयाचा नाहीं. तर एका टोकाला मनुष्यव्यक्ति, व दुसऱ्या टोकाला तो ज्या देशांत राष्ट्रांत राज्यांत राहतो तद्विषयक राज्यसंस्था, यापुरताच विचार करावयाचा आहे. आतां व्यक्ति घेतली तरी तेंहि वास्तविक एक राज्यच आहे. कारण व्यक्तिचरित्र पूर्ण होण्याला राज्याप्रमाणेंच व्यक्तीलाहि घटना व चालकशक्ति असावी लागते, ती असते व ती राज्ययंत्राप्रमाणें राज्यतंत्राप्रमाणें कार्यहि करिते. कोणी तत्वज्ञानी इंद्रियांना रथाचे घोडे म्हणतो, व त्यांचा सारथी मन अशी कल्पना करून जीवयात्रा व रथयात्रा यांची सांगड बसण्यासारखें रूपक बनवितो. कोणी मनाला राजा अशी संज्ञा देऊन इंद्रियांना त्याची प्रजा ठरवितो, आणि मन व

इंद्रियें यांच्या परस्पर संबंधाला राज्यकारभाराचें स्वरूप देतो. कोणी म्हणतो शरीर हें वाफेचें यंत्र असून मन हा त्या यंत्रांतला 'गव्हर्नर' आहे. मिळून काय एकचें. तीनहि रूपकांत एक स्वतंत्र सत्ताधीश, व इतर त्याची आज्ञा पालन करणारी प्रजा, हींच गोष्ट मानलेली दिसून येते. पण प्रस्तुत आपणाला मनुष्य-व्यक्तिरूप राज्यसंस्थेचाहि विचार करावयाचा नाहीं. तें काम प्राणिशास्त्रवेत्ते व मानसशास्त्रवेत्ते यांजवरच सोंपविलें पाहिजे.

(३२) राज्यसंस्था म्हणजेच राष्ट्रपुरुष

मनुष्यप्राण्याविषयीं ज्याप्रमाणें "तेंहि एक राज्य आहे" असें म्हणतां येतें त्याप्रमाणें उलट, राज्यसंस्था घेतली तरी तो मनुष्यासारखाच प्राणी आहे, असें त्याविषयीं म्हणतां येईल. त्याला समष्टि हें रूप, व राज्यसंस्था हें नांव असलें तरी प्राण्याप्रमाणेंच जगणें, चलनवलनादि करणें, इच्छा आकांक्षा तृप्त करणें, आत्मरक्षण करणें, इत्यादि सर्व गोष्टी प्राण्याप्रमाणेंच राज्यालाहि करावयाच्या असतात. म्हणून राज्यसंस्था हा एक राष्ट्रपुरुष असा कल्पून, त्याचें चरित्र तदनुरूप शारीरशास्त्र व मानसशास्त्र यांच्या साहाय्यानें पाहिलें तपासलें पाहिजे. व्यक्तिऐवजीं संघटित समाज हा गणनेतील मूळांक असें मानावयाचें इतकाच फरक. मनुष्यप्राण्याचीं मृत शरीरें चिरून फाडून आंत पाहून शारीरशास्त्र्यांनीं आपलें शास्त्र बनविलेलें आहे. आणि जिवंत मनुष्याचे गुणधर्म पाहून प्राणशास्त्र रचलें गेलें आहे. त्याचप्रमाणें राज्यशास्त्राचीहि गोष्ट होय. हें शास्त्र तयार करणारांना मृत राज्यसंस्थांचा इतिहास तर उपयोगी पडतोच, पण जिवंत राज्यसंस्थाहि या कामीं त्याना बिनमोल साहाय्य देतात. जिवंत मनुष्यप्राण्याचें अंतरंग अपारदर्शक अशा चामड्यानें मढविलेलें असल्यामुळें, आंतल्या प्राणात्मक क्रिया निरीक्षकाला दिसत नाहींत. पण राष्ट्रपुरुषाचें शरीर अंतर्बाह्य दृष्टीस पडत असतें. चारी अंगांनीं कांचा लावून बनविलेल्या एखाद्या घडयाळांतल्या चक्राप्रमाणेंच जिवंत राज्यसंस्थाच्या अंगांतील सर्व भागांचीं कामें दूर बसून स्वस्थपणें पाहतां येतात.

(३३) रूपकाचा खुलासा

आतां राष्ट्रपुरुष म्हटला म्हणजे तें रूपक शक्य तितक्या अंगांनीं

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

पुरें करणें आलें. पण तें तसें पुरें करण्यांत हानि नसून ज्ञान व स्वारस्य यांची वृद्धीच होण्यासारखी आहे. राष्ट्रपुरुषाला शरीर देह म्हणून कांहीं मुलूख किंवा भूमिप्रांत पाहिजे. त्या देहांत रक्तपिंडांप्रमाणें कांहीं लोकसंख्या पाहिजे. या लोकसंख्येचा परस्पर संबंध जोडणाऱ्या शिरा, धमन्या, स्नायू, संवेदनाशील तंतु ही सामग्री हवीच; व ती राज्यसंस्थांतर्गत उपसंस्थांनीं बनविली जाते. रक्तपिंड समृद्ध ठेवण्याला पौष्टिकरस लागतो त्याप्रमाणें राष्ट्रपुरुषाच्या शरीरसंवर्धनाला द्रव्य धन संपत्ती हीं लागतात. शरीराच्या एका भागाचा संदेश निरोप दुसऱ्या भागाला पोचविण्याला ज्ञानतंतूंचें जाळें लागतें त्याप्रमाणें राष्ट्रपुरुषाच्याशरीराला पोष्ट तार हीं खातीं किंवा दूतगण लागतात. ज्ञानतंतूवर हुकमत चालवून त्यांच्या साहाय्यानें ज्ञानेंद्रियांकडून कामें घेण्याचें काम राष्ट्रशरीरांत करण्याला अधिकाऱ्यांचीं मंडळें असतात. देहसंरक्षणाला जसे हातपाय पुढें सरसावतात त्याप्रमाणें राष्ट्रसंरक्षणाला पोलीस व सैन्य हें असावें लागतें. आणि राष्ट्रशरीर निरोगी तेजस्वी राहण्याकरितां, सुसंस्कृत शुद्ध मेंदूप्रमाणें, राज्यसंस्थेला न्यायखातें धर्मखातें शिक्षणखातें इत्यादि लागतात व असतातहि.

(३४) राष्ट्रसृष्टींतील भीम व वालखिल्य

आम्हीं राज्यसंस्थेला ' राष्ट्रपुरुष ' हें नांव दिलें आहे. परंतु त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं मनुष्यसृष्टींत माणसें म्हटलीं म्हणजे तीं सर्व सारख्या आकाराचीं उंचीचीं वजनामापाचीं स्वभावाची व गुणावगुणांचीं असतात असें नाहीं. त्याप्रमाणें राज्यसंस्था झाल्या म्हणून त्या कांहीं सगळ्या सारख्याच असत नाहींत. वृकोदर भीम हा मनुष्य होता, तसेंच वालखिल्य ऋषी हीं देखील माणसेंच होतीं. पण कोणीकडे तो एकाचा पर्वतप्राय देह, व प्रचंड वृक्ष उपटून खांद्यावर घेऊन त्यांनीं दुसऱ्यांना तडाखे देण्याची शक्ति ! आणि कोणीकडे तीं मानवनामधारी, पण गाईच्या खुरानें पडलेल्या खळग्यांत गटंगळ्या खाणारीं, अंगुष्टमात्र देहधारी वालखिलयें ! कोणीकडे आधुनिक सँडो गामा ! आणि कोणीकडे सर्कशींत विनोदाकरितां खेळावयास बाहेर काढलेले ठेंगू बटुवामन विदूषक ! असें असतां या सर्वांना ' मनुष्य ' हें एकच नांव दिलें जातें, किंबहुना त्या नांवावर

त्या सर्वांना सारखाच हक्क सांगतांहि येतो. तसेंच मुंगी आणि हत्ती हे दोघेहि 'प्राणि' या एका सदराखालींच घालावे लागतात. त्याचप्रमाणें राज्यसंस्थांचीहि गोष्ट आहे. अंकगणितांत (१) या आंकड्याला गणिताच्या दृष्टीनें कोठेंहि सारखीच किंमत. मग तो 'एक' म्हणजे रत्नांचा हार असो किंवा बजरबट्टू असो; राजा असो किंवा रंक असो; गरूड असो किंवा गांधिल असो! त्याचप्रमाणें राज्यसंस्था म्हटली म्हणजे तिला अंकगणितांतील 'एकीएके एक' ही किंमत आलीच. आकार, क्षेत्रफळ, लोकसंख्या, उत्पन्न, खर्च, भांडवल, संपत्ती, विद्यासंपन्नता, लष्करी बलाढ्यता, इत्यादि बाबतींत एक राज्यसंस्था किंवा संस्थान दुसऱ्याहून कितीही मोठें असो, त्याची गणति एकाच सदरांत करावी लागते. स्वतंत्रता, स्वाधीनता, अधिकारपूर्णता या गोष्टी दोघांनाहि समान होत.

(३५) कांहीं उदाहरणें

आम्ही म्हणतो हें खरें कसें ठरतें हें दाखविण्याकरितां दोन टोकांचीं अशीं कांहीं उदाहरणें देतों. क्षेत्रफळानें रशिया, संपत्तीनें अमेरिका, अखंडित परंपरेनें व साम्राज्यवैभवानें इंग्लंड, कर्तृत्वानें जर्मनी, इत्यादि राज्यें पहिल्या प्रतीचीं मोठीं आहेत. पण त्यांच्या जोडीला 'आइल ऑफ मॅन' किंवा 'मोनॅको' हीं संस्थानें राज्यें किंवा राज्यसंस्था बसविणें म्हणजे हास्यास्पदतेचा कळस होतो असें कोणासहि वाटेल. पण तें अनिर्वाह्य ठरतें. कसें तें पहा. मोनॅको या संस्थानाचें क्षेत्रफळ फक्त आठ चौरस मैल आहे. एकंदर लोकसंख्या पंचवीस हजारांच्या आंत आहे. तिची वांटणी अवघ्या तीन शहरांत मिळून झालेली आहे. त्यांतलें सर्वांत मोठें शहर अकरा हजार वस्तीचें असून राजधानीची लोकसंख्या दोन हजार आहे. या राज्याचें मुख्य उत्पन्न जुगारीच्या अड्यांपासून आहे, व तें जास्तींत जास्त एक लक्ष पौंडांपर्यंत असतें. हें संस्थान पोलीस न्यायाधीश विद्याधिकारी वगैरे अधिकारी ठेवीत असेल कीं नाहीं, किंवा ठेवीत असेल तर ते कोणत्या दर्जाचे ठेवीत असेल, त्याची कल्पना कोणीही सहजच करावी. प्रसंग पडल्यास हें संस्थान शत्रूपासून आत्मरक्षण कितपत करू शकेल याचीहि कल्पना सहज होईल. तथापि, स्वतंत्र राजाच्या

अनियंत्रित अंमलाखालीं असलेल्या अशा ॲबीसीनिया, मोरोक्को, इराण, रशिया, तुर्कस्तान, अफगाणिस्तान वगैरे राज्यांच्या जोडीला या मोनॅकोच्या राज्याला बसवून राज्यशास्त्रवेत्त्याला त्याची गणति व वर्गवारीनें उल्लेख त्या इतरांच्या बरोबरीनें करावा लागतो.

(३६) कांहीं गमतीचे प्रकार

मोनॅकोच्या छोट्या बंदरांत कस्टम खात्याचे अधिकारी कचेरीचा थाट मांडून बसतात, व मोठ्यामोठ्या युरोपियन राष्ट्रांच्या ऐटीनें परदेशी मालावरील जकात सक्तीनें वसूल करितात, हें पाहिलें म्हणजे कोणाला कौतुक वाटणार नाहीं ? तसेंच या संस्थानचे शेपन्नास शिपाई, ज्यांचें नेहमीचें काम जुगारी टेबलांच्या आसपास घिरट्या घालून एखादेवेळीं एखाद्या दारुड्या बदफैली भामट्याला अटक करण्याचें असावयाचें, तेच एखादवेळीं लष्करी थाटाचा पोषाख करून, एखाद्या प्रतिष्ठित पाहुण्याचा ' गार्ड ऑफ ऑनर ' म्हणून सत्कार करितांना, व लगेच ' लष्करी फौज ' म्हणून परेडीच्या मैदानावर सलामी देतांना घेतांना पाहून किती मौज वाटेल ? पण हा सर्व अधिकारस्वातंत्र्याचा गुण होय. दुसरें उदाहरण इंग्लंडजवळील ' आइल ऑफ मॅन ' या बेटाचें. या संस्थानचें ऐन उत्पन्न सुमारें दोनतीन लक्ष पौंड इतकेंच आहे. यांत एकच मोठें शहर सुमारें वीस हजार लोकसंख्येचें, व हजार दोन हजार लोकसंख्येची दुसरीं एकदोन आहेत. यांत त्रेचाळीस प्राथमिक शाळा, दोन हायस्कुलें व पोलीससंख्या पासष्ट जवान असें असतां, एरवीचें ऐश्वर्य इतकें कीं, एक गव्हर्नर, एक ॲटर्नी जनरल, एक मुख्य कायदेकौन्सिल, एक दुय्यम कायदेकौन्सिल, व स्त्रीपुरुष मिळून सुमारें अडतीस हजार मतदार आहेत. पण ब्रिटिश साम्राज्यांत खुद्द इंग्लंडच्या खालोखाल याचा नंबर लागतो. कारण या बेटाचे कायदे सर्वस्वी या बेटांतील कायदेमंडळाकडूनच केले जातात.

(३७) जार्सी बेटाचें उदाहरण

अशाच रीतीनें ब्रिटिश साम्राज्यांतील दुसऱ्या एका बेटाला, म्हणजे ' जार्सी ' या छोटेखानी बेटाला, स्वातंत्र्य किती आहे याचा एक गमतीदार उल्लेख लॉर्ड हॉलडेन यांच्या चरित्रांत आम्हाला नुकताच वाचावयास

नगर वाचनालय सातारा
दाखल नं. ग्रंथानुक्रमांक
किंमत — पाने

मिळाला. या बेटाचें क्षेत्रफळ अवघें अठ्ठावीस हजार एकर, व लोकसंख्या पन्नास हजारांच्या आंत आहे. त्याचें उत्पन्न अडीच लक्ष पौंडांच्या आंत भरेल. तथापि कायद्याच्या दृष्टीनें हें राज्य स्वतंत्र आहे तें असें कीं, ब्रिटिश पार्लमेंटचे कायदे या संस्थानला लागूं होऊं शकत नाहींत. त्याविषयीं लॉर्ड हॉलडेन यानें आपल्या बॅरिस्टरीच्या अनुभवांतील एक अनुभव म्हणून खालील हकीकत दिली आहेः—" जार्सी बेटांत कांहीं दिवस राहत असलेल्या एका फ्रेंच स्त्रीला, बेटांतील कायद्याविरुद्ध घडलेल्या कांहीं एका गुन्ह्याबद्दल, मुख्य न्यायाधिशानें फांशीची शिक्षा दिली. हें ऐकून फ्रान्सच्या सरकारानें इंग्लंडला लिहिलें कीं " या बाईचा गुन्हा पोलिसांनीं खटला भरून फार तर दंड होण्याइतका हलका आहे. तेव्हां हा ' न्यायापवाद ' तुम्ही कसेंहि करून होऊं न द्यावा " ! तेव्हां इंग्लंडच्या परराष्ट्रीय मंत्र्यानें जार्सी बेटाच्या अधिकाऱ्यांना तसें लिहिलें. पण ते दाद देईनात. तेव्हां सगळ्यांत मोठा हुकूम म्हणून, खुद्द राजाज्ञा काढवून ब्रिटिश प्रधानमंडळानें त्या फ्रेंच स्त्रीला परस्पर माफी जाहीर केली ! पण जार्सी बेटाच्या कायद्याप्रमाणें, इंग्लंडच्या राजाचाहि हुकूम का होईना पण तो जार्सी राज्याच्या पार्लमेंटच्या दप्तरीं मंजूर व नमूद झाल्याशिवाय त्याचा अंमल होऊं शकत नाहीं. आणि योग तर असा आला कीं, या पार्लमेंटची एक बैठक पूर्वीच खलास झालेली असून दुसऱ्या बैठकीची तारीख या बाईच्या फांशीच्या शिक्षेच्या अंमलबजावणी तारखेच्या नंतर ठरली होती. तेव्हां कायदेशीर असा कांहीं इलाज चालत नाहीं असें पाहून, शेवटीं इंग्लंडच्या प्रधानमंडळानें राजरोसपणें आडमार्ग स्वीकारला ! तो असा कीं ब्रिटिश आरमारांतील एक छोटें लढाऊ जहाज जार्सी बेटाकडे पाठविण्यांत आलें; फांशीच्या शिक्षेची बाई ज्या तुरुंगांत होती तो समुद्रकांठीं असल्यामुळें लढाऊ जहाजांतील सशस्त्र खलाशी किनाऱ्यावर उतरले; बेधडक तुरुंगांत शिरले; त्यांनीं त्या बाईला उचलून जहाजावर आणलें; आणि अशा रीतीनें तिला जार्सी सरकारच्या हद्दींतून पळवून लावल्यामुळें बेटाच्या अधिकाऱ्यांना अधिक कांहीं करितां आलें नाहीं ! या भानगडीमुळें इंग्लंडचे न्यायाधिकारी व जार्सीचे न्यायाधिकारी यांचें मोठेंच रण जुंपलें. या मुद्याच्या हजारो कागदपत्रांचीं अनेक जाड फायलें झालीं. मुख्य प्रधान लॉर्ड रोजबरी यांच्या पुढें हाउस ऑफ लॉर्डस्

मध्यें मुकदमा चालला. जार्सी बेटातर्फे वकीलपत्र घेणाऱ्या लॉर्ड हॉलडेन याला मुकदम्याची प्रास्ताविक सुनावणी करण्यासच दोन दिवस लागले ! आणि शेवटीं निकाल इंग्लंडविरुद्ध झाला ! बिचारी फ्रेंच बाई मृत्यूच्या शिक्षेंतून बचावली. पण तिचा जीव घेणें न घेणें हा या वादांत मुख्य मुद्दा नसल्यानें, 'फॅक्टम व्हॅलेट' म्हणजे 'वस्तुसिद्धि' (झालें गेलें सशास्त्र ठरलें) या तत्त्वाचा आधार घेऊन हें शिक्षेचें प्रकरण पुढें कोणी धसाला लावलें नाहीं !

(३८) सांगली दरबार व गणपति संस्थान !

असेंच एक गमतीचें उदाहरण केवळ तत्त्वदृष्ट्या आमच्या इंकडीलहि सांगतां येण्यासारखें आहे. तें एका दक्षिणी संस्थानिकाचें आहे. सांगली संस्थानचे अधिपति पटवर्धन हे गणेशभक्त असून, त्यांनीं आपल्या राज्यांतून उत्पन्न तोडून देऊन संस्थानच्या पोटांतलेंच पण स्वतंत्र संस्थान म्हणून 'गणपति संस्थान' या नांवाचें राज्य उत्पन्न केलें. या नव्या संस्थानांत फौजदारी असा अधिकारी नाहीं, पण गणपति संस्थान हे मुलकी व जमाखर्चाच्या दृष्टीनें पूर्ण स्वतंत्र आहे. तो अधिकार सांगली संस्थानच्या दरबारकारभाऱ्याच्या हातीं असतो; पण स्वतः या संस्थानिकांनाच वहिवाटदार म्हणून कांहीं ठराविक पगार आहे. जुन्या अमदानींत एकदां तात्यासाहेब सांगलीकर यांनीं आपल्या प्रेमांतले दरबार कारभारी आण्णासाहेब पटवर्धन यांना गणपति संस्थानचे मुख्याधिकारी नेमले. पुढें गणपति संस्थानचे वहिवाटदार म्हणून आपणाला जो पगार मिळत असे तो वाढविला जावा अशी इच्छा संस्थानिक तात्यासाहेब यांना झाली ! ही इच्छा अर्थात् दरिद्रीच होती ! पण ती सफळ होण्याकरितां संस्थानिकाला (गणपति संस्थानचा वहिवाटदार म्हणून) दरबार–कारभाऱ्याकडे अर्ज करावा लागला ! पण त्यानें तो नामंजूर केला !! आतां तात्यासाहेब संस्थानिक व आण्णासाहेब दरबारकारभारी हे प्रेमानें गळ्यांत गळा घालणारे, व श्रीमंतांनीं अण्णाला "आण्णा मला पगार वाढीव कीं रे !" असें म्हणण्याच्या परस्पर संबंधांतलेच होते ही गोष्ट वेगळी. पण या गमतीदार उदाहरणानें मोनॅको किंवा जार्सी या संस्थानांच्या म्हणजे राज्यांच्या उदाहरणाप्रमाणेंच, एक मोठेंच तत्त्व

प्रस्थापित होतें. तें असें कीं कोणत्याहि राज्यसंस्थेचा मोठेपणा तिला अंतिम अधिकाराचें स्वातंत्र्य किती आहे यावरून ठरवावयाचा व ओळखावयाचा असतो.

(३९) आमचीं देशी संस्थानें

हिंदुस्थानचे बादशहा व हिंदुस्थानांतील देशी संस्थानें यांचीं परस्पर नातींहि या दृष्टीनेंच बोधप्रद आहेत. फांशीच्या शिक्षेपर्यंत ज्या संस्थानिकांना स्वतंत्र अधिकारानें गुन्हेगारांना संस्थानाच्या न्यायकोर्टांत शिक्षा देतां येते असे संस्थानिक हिंदुस्थानांत आज पुष्कळ आहेत. आणि जार्सी किंवा आइल ऑफ मॅन यांप्रमाणें तत्त्वतः आमच्या या देशी संस्थानांना खुद्द ब्रिटिश पार्लमेंटचेहि कायदे बंधनकारक होत नाहींत! फांशी देण्याच्या अधिकाराप्रमाणें संस्थानच्या प्रजेकरितां कायदे करण्याचा स्वतंत्र अधिकार कांहीं छोट्या संस्थानिकांनाहि आहे; व तो इतका कीं त्यांच्या राज्यांत कायदेकौन्सिलें नसल्यास, पार्लमेंटचे कायदे खुद्द इंग्लंडच्या राजावर जितके बंधनकारक आहेत तितकेहि ते या संस्थानिकांवर नाहींत! म्हणजे ते आपल्या मर्जीनें तोंडानें बोलतील तो व हातानें लिहितील तो कायदा होऊं शकतो. अशा संस्थानिकांनीं, आपलीं राज्यें स्वतंत्र आहेत व आपण त्या स्वतंत्र राज्यांचे अनियंत्रित राजे आहों, असें म्हटल्यास कायद्याच्या दृष्टीनें त्याला हरकत कोणती? हे संस्थानिक व इंग्लंडचे राजे यांचे मित्रभावाचे करार व मित्रभावाचे तह झाले असले तरी, इतर स्वतंत्र राष्ट्रांतील परस्पर तहाइतकेच त्यांना त्यांचें बंधन आहे. म्हणजे "आम्ही हे तह यापुढें मानणार नाहीं असें एकानें दुसऱ्यास म्हटलें" तरी तत्त्वतः चालण्यासारखें असतें.

(४०) श्वा युवा मघवा!

आतां हीं संस्थानें झालीं काय, मोनॅको झालें काय, जार्सी झालें काय, हीं मुठींत मावतील एवढीं राज्यें. परराष्ट्रांनीं किंवा इंग्लंडनें चिरडून टाकावयाचें मनांत आणल्यास त्यांना काय उशीर? येऊन जाऊन राष्ट्रसंघासारख्या त्रयस्थ न्यायाधीशाकडे रडगाणें गावयाचें. पण त्याचा तरी उपयोग कितपत होऊं शकतो हें हल्लींच्या चीन व जपान यांच्या प्रकरणावरून दिसलेंच आहे. हीं लहान राज्यें जगतातच कशीं? असा कोणी प्रश्न केल्यास त्याचें उत्तर

खरें असें आहे कीं, तीं बुडविण्यापासून शेजारच्या मोठ्या राष्ट्रांचा म्हणण्यासारखा कांहीं प्रत्यक्ष फायदा नाहीं म्हणून ! किंवा मोठ्यामोठ्या राष्ट्रांच्या स्पर्धेंत हीं सांपडल्यानें आयताच परस्पर त्यांचा बचाव होतो. किंवा हिंदुस्थानांतल्या संस्थानांप्रमाणें, तीं खालसा झाल्यापेक्षां स्वतंत्र राहूनच अधिराजाला अधिक उपयोगी पडतात. पण यांतलें कोणतेंहि उत्तर खरें म्हटलें तरी तीं राज्यें स्वतंत्र आहेत म्हणून जगतात असें म्हणण्यापेक्षां, अद्यापि नाश पावलीं नाहींत म्हणून स्वतंत्र आहेत व जोंपर्यंत तीं स्वतंत्र आहेत तोंपर्यंत "श्वानं युवानं मघवानमाह" या पाणिनीच्या सूत्राप्रमाणें कां होईना, तीं राष्ट्रमालिकेंत इतर राष्ट्रांच्या बरोबरीनें बसूं पाहतात व बसूं शकतात हें कांहीं खोटें नाहीं. तात्पर्य, तात्त्विकदृष्ट्या पाहिलें तर एकाद्या राज्यसंस्थेला राज्य म्हणावयाला किंवा त्यांतील सर्वाधिकाऱ्याला राजा म्हणावयाला स्वतंत्र व संपूर्ण अधिकाराशिवाय दुसरें गमकच नाहीं. इतर गोष्टी गौण होत त्या निर्णायक नव्हत.

(४१) मूलभूत मानवी कुटुंब

उत्क्रांतिवादाचें सर्वच तत्त्वज्ञान खरें नसेल, पण मूळचा सृष्ट जीव हा अणुपरिमाण असून, त्यांतूनच पुढें सर्व विविध जीवसृष्टी परिणत होत गेली ही उपपत्ति बरीचशी खरी वाटते. त्याचप्रमाणें राज्यसंस्था ही मूळ ईन मीन साडे तीन मनुष्यप्राण्यांच्या कुटुंबापासून निघून, आजच्या जगड्व्याळ अशा साम्राज्यांपर्यंत क्रमानें परिणत होत आली आहे हीच उपपत्ति इतिहासावरून सिद्ध होते. पण राज्यसंस्थेचे जे अनिर्वाह्य गुणधर्म तेच बीजरूपानें व वृक्षरूपानें अवतरतात. राज्याला कमीत कमी जें लागतें तेंच बाप आई व मुलें मिळून बनणाऱ्या मानवी कुटुंबाला लागतें. साडेतीन माणसांच्या कुटुंबाला निदान सात पावलांनीं आक्रमणारी इतकी भूमि लागतेच. मग ती डोंगराच्या कपारींत सापडो, किंवा छपरी बंदिस्त बांधीव घरांत सापडो. या अणुपरिमाण राज्यांतली प्रजा म्हणजे तीच साडेतीन माणसें; किंवा त्यांतला बाप हा राजा म्हणून वगळलाच, तर अडीच माणसें. या तीन साडेतीन माणसांचे हितसंबंध एकजीव झालेले असतात. तीं वेळ पडल्यास सर्व मिळून परक्याशीं भांडतात झगडतात. या तीन माणसांपैकीं बाप हा

प्रबळ म्हणून सत्ताधारी असतो. तो हुकूम करितो ते इतरांना आज्ञाधारकपणें मानावे लागतात; व कोणी न मानिले तर तो आपल्या अधिकारानें त्यांना शिक्षा सांगून अमलांतहि आणूं शकतो. जे पिंडीं तेंच ब्रह्मांडीं.

(४२) कुटुंबाचीच नगर संघामध्यें परिणति

पुढें कुटुंबाची वाढ होऊन त्याच्याजागीं एकजीव असें कुळ किंवा घराणें आलें. पूर्वीचा जनक बाप म्हणून जो राजा होता तोच आतां कुलपति म्हणून राजा झाला. कुटुंबावर त्याची जी सत्ता तीच या कुळावर किंवा घराण्यावर चालू लागली. पशूचा जसा कळप असतो व त्या कळपाचा एक म्होरक्या असतो, तसेंच माणसाच्या घराण्याचें. या घराण्याचें पुढें मोठें घराणें म्हणजे गोत्र बनतें. पण हळू हळू या घराण्याचा इतर घराण्यांशीं हितसंबंध व स्नेहसंबंध जडतो. यामुळें रक्तसंबंधाहून वेगळा म्हणजे स्थलसंबंध हाहि सहजीवित्वाचा आधार होतो. गरजा वाढतात, व त्या एकाच कुळांतील लोकांच्या बुद्धीनें व प्रयत्नानें पुऱ्या पडत नाहींत. इतर अनेकांच्या बुद्धीची व श्रमाची सहकारिता हवीशी वाटते व ती मिळू शकते. देवाण घेवाण सुरू होते. वस्तुविनिमय वस्तुव्यापार वाढतो. शिकारी पेशानंतर स्थायिक शेतकरीपेशा आला म्हणजे जी सहकारिता दूरदूर राहून मिळते व घ्यावी लागते, तीच उद्योगधंदे कलाकौशल्य वाढलें म्हणजे एकाच चतुःसीमेंतील नगरांत राहून मिळू लागते. आणि कुटुंबाची परिणति अशारीतीनें नागरिक समूहांत झाली म्हणजे मग त्या व्यापाच्या मानानें संघटना व व्यवस्था हीं ओघानेंच प्राप्त होतात.

(४३) कुटुंब–राज्यांतला राजा

ज्या प्राचीन काळापासून इतिहास म्हणून उपलब्ध आहे त्या काळीं मानवी सहवासाची सहकारितेची परिणती ग्रामसंस्थेपर्यंत आलेली होती. आणि अशा काळांतहि उदाहरणार्थ रोमच्या राज्यांत, जर बापाची सत्ता मुलांवर व बायकांवर अमर्याद होती असें आढळतें तर त्याहून प्राचीनकाळीं, म्हणजे इतिहास–पूर्वकालीं कुलपति किंवा कुटुंबांतला बाप यालाहि ती अनियंत्रित अबाधित सत्ता असावी असें अनुमान सहजच करितां येते. दरवेशी लोक माकडावानरांचें कुटुंब बरोबर फिरवून त्याचे खेळ करीत

असतात. त्यांतला बाप माकडीवानरीशीं व पिलांशीं कसा वागतो हें आपण पाहतोंच. त्याचा वचक इतरांना फार असतो. त्यानें इतरांवर रागवावयाचें; त्यांनीं त्याच्यावर रागावावयाचें नाहीं. वेळीं हवा तर इतरांच्या तोंडांत देण्याचा अधिकार त्याला ! या वानरकुटुंबांतल्या धन्याला 'देवजी धसाड्या' म्हणतात. आणि म्हटलें तर वाईट दिसेल, पण खरोखर राजा-बादशहा झार सुलतान अध्यक्ष कोणीहि घेतला तरी तो या 'देवजी धसाड्याचा'च लहानमोठा अवतार होय. माकडावानरांच्या खेळांत प्रजेचें बंड व राज्यक्रांति झालेली दिसत नाहीं. पण मानवी कुटुंबांत ती केव्हां केव्हां होत असते, व राज्यांत तर ती झालेली आपण नित्य पाहतोंच.

(४४) ग्रामसंस्था हें प्राथमिक राज्य

उसांचा रस काहिलींत किंवा साखर करण्याच्या भांड्यांत घालून खूप तापविला, म्हणजे मग त्या रसांतील पाण्याचा अंश कमी होत जाऊन गुळा-साखरेचे कण बनू लागतात. आणि ते मग इतर कणांशीं मिळून त्यांचा संवटित दाणेदार रवा बनलेला डोळ्याला दिसूं लागतो. त्याप्रमाणें इतिहासांत प्रथम राज्यसंस्थेचें जें स्वरूप दृग्गोचर होतें तें ग्रामसंस्थांतून. या ग्रामसंस्था आपल्यापुरत्या सर्वाधिकारपूर्ण असून त्यांत, प्राथमिक राज्यापासून तों अगदीं आजच्या सुधारलेल्या राज्यसंस्थापर्यंत मुख्य लक्षणें दिसून येतात, त्यांतलीं कोणतीहि कमी नव्हतीं. गांवच्या सुधराई सफाईपासून तों परक्या ग्रामसमाजाशीं किंवा ग्रामसंघाशीं युद्धतह करण्यापर्यंतचा कारभार ग्रामसंस्था आपला आपण करीत. राज्यसंस्थेच्या उपपत्ति अनेक तत्त्ववेत्त्यांनीं अनेक प्रकारच्या वसविल्या आहेत. कोणी म्हणतो राज्य हें निवळ जुलमी सत्तेवर अधिष्ठित असतें. कोणी म्हणतो कौटुंबिक प्रेमावर असतें. कोणी म्हणतो परस्परोपयोगित्वावर असतें. कोणी म्हणतो परस्पर करारावर असतें. कोणी म्हणतो आर्थिक गरजेवर असतें. कोणी म्हणतो स्वार्थसामान्यावर असतें. कोणी म्हणतो आध्यात्मिक सहानुभावांवर असतें. पण यापैकीं प्रत्येक उपपत्तीला आधारभूत अशी एक ना एक ग्रामसंस्था इतिहास दाखवूं शकेल.

(४५) ग्रामसंघ हें मुख्य अनुभवक्षेत्र

गांव आणि राव यांचा मेळ नुसत्या यमकानें घातलेला नाहीं तर प्रत्यक्ष अनुभवानें. कारण संघटित ग्रामसंस्थेचें बळ राजालाहि भारी होऊं शकते. म्हणूनच म्हण पडली कीं, "गांव करील तें राव करणार नाहीं." ग्रामसंस्थांतून प्रबळदुर्बळांचे नित्य संबंध, विभूतिपूजा, चढाईबढाईचें यश-अपयश, अधिकारविभागणीचें तत्त्व, समतोलपणाची साम्यावस्था, उत्कट स्वार्थ, उत्कट परोपकारभावना, गुणदुर्गुणांचीं द्वंद्वें—तात्पर्य, त्रिगुणात्मक मनुष्य-स्वभावाचे सर्व खेळ सर्व लीला पहावयास सांपडत. दोन हजार वर्षांपूर्वीचा काळ घेतला तर युरोपांतील ग्रीस देशांत व आशिया खंडांतील हिंदुस्थानांत ग्रामसंस्थाच सर्वत्र आढळून येत. याचें कारण दळणवळण जवळच्या जवळ संपत असे. सामाजिक गरजा थोड्या असत. व्यक्तिविषयक ऐष-आरामाच्या ख्यालीखुशालीच्या कल्पना मोजक्या व मर्यादित विषयांपुरत्या असत. ग्रामांतरचा व्यापार वेताचा असे. पण अशाहि स्थितींत खरोखर आजच्या चवचाल काळाइतकेंच मनुष्याला सुख मिळण्यासारखें असल्या-मुळें, तो ग्रामसंस्थेच्या राज्यकारभारावर संतुष्ट असून, तिचा अभिमान आजच्या राष्ट्रप्रेमी देशभक्ताइतकाच मानी व त्याकरितां स्वार्थत्याग कर-ण्यासहि तयार असे.

(४६) सर्व उपपत्ति तेथें तपासून घ्याव्या

वर सांगितल्याप्रमाणें राज्यसंस्थेच्या उत्पत्तीविषयक प्रत्येक उपपत्तीचें उदाहरण प्राचीन ग्रामसंस्थेंत सांपडण्यासारखें आहे. इतकेंच काय पण हीं निरनिराळीं उपपत्तिमूलक तत्त्वें एकाच ग्रामसंस्थेंत बहुधा एकाच वेळीं आढळण्यासारखीं होतीं. कोणतीहि ग्रामसंस्था त्यांतल्या एकाद्या पण एकट्या एक तत्त्वावर पूर्वापार रचलेली किंवा कारभार करणारी अशी आढळली नसती. ग्रामसंस्थेचा पुढारी पाटील जितकी सत्ता चालवी तित-केंच तो गांवच्या लोकांचे ऐकेहि. स्वार्थाला जपणाऱ्या व्यक्तींप्रमाणें परा-र्थाला झटणाऱ्याहि व्यक्ति ग्रामसंस्थेंत आढळत. एकानें दुसऱ्याचा हक्क संभाळण्याचें व सर्वांनीं मिळून सर्वांशीं जणूं कांहीं एखादा करार असल्या-प्रमाणें वागण्याचें ठरविल्याशिवाय ग्रामसंस्था टिकणेंच शक्य नव्हतें. कायद्या-

संबंधानें ग्रामसंस्थांतील समाज तर आजच्यापेक्षां अधिक सुरक्षित व सुप्रतिष्ठित असे. कारण या संस्था स्वतःचे कायदे करण्यापेक्षां परंपरागत आलेले कायदे म्हणजे चालीरीती, दाखले, निवाडे मानण्यावरच अधिक भिस्त ठेवीत. यामुळें आजच्या राज्यसंस्थाप्रमाणें तेव्हां बेसुमार नव्या कायद्याचें पीक पिकत नसे, व रद्दी कायद्यांच्या वाळलेल्या कडब्याचे पाल्यापाचोळ्याचे ढीग सांचत नसत. मात्र सनातनत्वाच्या वृक्षावर नवी पालवी केव्हां फुटते व जुनी पानें केव्हां गळतात हें जवळ जवळ लक्षांतहि येण्यासारखें नसतें.

(४७) राज्य म्हणजे अनेक इच्छाशक्तींचा मेळ

कुटुंबापासून साम्राज्यापर्यंत कोणतीहि राज्यसंस्था घेतली तरी तींत तत्त्वतः एकाच इच्छाशक्तीनें सर्व कारभार चालतो हें जरी खरें, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत अनेक इच्छाशक्तींचा मिश्र खेळ एकसारखा सुरू असतो हेंहि कांहीं खोटें नाहीं. कुटुंबांत बाप हा सत्ताधीश असला म्हणून नेहमीं त्याचीच इच्छा प्रभावी होईल असें नाहीं. त्याची स्त्री व मुलें यांनाहि स्वतःची इच्छाशक्ति असतेच, व आपणांस अनुकूल अशा साधनांनीं ती इच्छाशक्ति प्रभावी करण्याचा तींहि आपापल्या परीनें प्रयत्न करीत असतात. एखाद्या कुटुंबांत बाप दुबळा असून आई हीच तेजस्वी, प्रबळ असूं शकते. अशा स्थितींत तीच नवऱ्याला बाजूला बसवून आपल्या मनचें करील. बरें, स्त्री जबरदस्त नसून गरीब असली तर कदाचित् आपल्या गुणांनींच ती पतिप्रेम साध्य करून पतीला वश करूं शकेल. आणि मुलें हीं तर काय आई व बाप या दोघांनाहि प्रिय. त्यांच्याखातर तीं दोघें स्वार्थत्यागहि करितात. हट्ट करून आपलें मनोगत साधणें हा मुलांचा हक्कच आहे. त्यांतून मुलें सद्गुणी व तेजस्वी निघालीं तर बाप त्यांच्या मताला बहुमान देतो, व आपल्या अधिकारांत त्यांना अंशभागी करितो; आणि ही गोष्ट आधुनिक काळाप्रमाणें प्राचीन काळींहि घडत असली पाहिजे. आज आईबाप मुलांना विकूं शकत नाहींत, किंवा देवाला बळी देऊं शकत नाहींत. जुन्या काळीं तो हक्क कायदेशीर रीतीनें त्यांना होता. म्हणून कांहीं तेव्हांहि अपत्यवत्सलता जगांत नव्हती असें नाहीं.

(४८) इच्छाशक्ती परस्परांना मान देतात

जी गोष्ट कुटुंबाला लागू तीच समाजांतील इतर घटकांनाहि. म्हणजे आपलेपणा परकेपणा या भावना तीक्ष्ण असतांहि जुन्याकाळीं परस्परोपकारित्वाची जाणीव मुळींच नव्हती, किंवा कृतज्ञतेनें, भूतदयेनें एक इच्छाशक्ति दुसऱ्या इच्छाशक्तीला कधींच मान देत नव्हती असें नाहीं. राजा म्हटला म्हणजे तो आपला नेहमींच ताठलेला रागावलेला, हातांत दंड सरसावलेला असा असे ही कल्पना चुकीची आहे. त्यालाहि प्रजेचें प्रेम व भीति हीं असतेच. रोमच्या इतिहासांत पॅट्रिशिअन्स म्हणजे श्रेष्ठवर्गीय व प्लीबिअन्स म्हणजे हीनवर्गीय लोक होते. प्रथम प्रथम त्यांच्यामध्यें फार भांडणें व वेळीं युद्धें होत. आज सनातनी हिंदु व अस्पृश्यवर्गांतहि नाहीं का अशींच भांडणें सुरू ! पण पुढें पुढें हे कलह मिटले. हीनवर्णीयांची छाप उच्च वर्णीयांवर पडूं लागली. दोघेहि वर्ग देशाच्या सेवेला उपयोगी पडतात हेंहि दिसून येऊं लागलें. तेव्हां (आज सनातनी स्पृश्यांपैकींच कांहीं जसे अस्पृश्यांचे पुरस्कर्ते झाले आहेत त्याप्रमाणें) अधिकारसंपन्न पॅट्रिशिअन असेहि कांहीं पुढारी प्लीबियन लोकांकरितां स्वकीयांशीं भांडूं लागले. यामुळें राष्ट्रांत एकजीवता उत्पन्न होऊन सत्तेचा तोल संभाळला जाऊं लागला.

(४९) विभूतिपूजा राज्यांत आहेच

राज्यसंस्थेंत मनुष्याच्या विभूतिपूजाप्रियत्वाचा प्रत्यय नेहमीं येतो. घटना कशीहि असो, कोणाहि व्यक्तींत किंवा वर्गांत विभूतिमत्व, श्रीमत्त्व किंवा ऊर्जितत्व, दिसून आल्यास तें फुकट जात नसतें. आपला हिंदु धर्म वर्णव्यवस्थेचा पुरस्कर्ता व वर्णांमध्यें उच्च नीच भेद मानणारा असतांहि, अनेक हीनवर्णीय लोक उच्चवर्णीय ब्राह्मणांच्या आदराला व पूजेला पात्र झाले याचें कारण, ते साधुत्वाच्या कोटीला जाऊन पोचले होते. येथें विभूतिपूजेचें तत्त्वच सिद्ध होतें. त्याप्रमाणें राज्यसंस्थेंतहि केव्हां प्रधान, केव्हां सेनापति, केव्हां एखादा सैनिक, केव्हां एखादा व्यापारी, केव्हां एखादा धर्मोपदेशक, किंवा साधा प्रजाजनहि आपल्या गुणांनीं पुढारीपण पावून, राज्यक्रांतीच नसली तरी सत्तेचें संक्रमण एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत करितो. अशा वेळीं राज्यघटना नुसत्याच टणक असल्या तर मोडतात व लवचिक

असल्या तर तितक्यापुरती उशी खातात किंवा दबतात, व कांहीं वेळानें पुन्हां पूर्ववत् शांततेची घडी बसवून देतात. तात्पर्य, स्वार्थाची स्वाभाविक चढाओढ असतेच; पण तिच्या जोडीला विभूतिगुणांचा उत्कर्ष व मनुष्याच्या उच्च भावना याहि राज्यसंस्थेच्या परिणतीला उपयोगी पडतात.

(५०) मुख्य सत्ताधारी हा राज्याचा आत्मा

असो. अशा रीतीनें राज्यसत्तेची वाटणी निरनिराळ्या वर्गांमध्यें कशीहि होवो किंवा न होवो, पण राज्यसंस्था म्हटली म्हणजे तत्त्वतः कोणी तरी एक मुख्य सत्ताधारी म्हणून आज्ञा करणारा असावा लागतो; आणि आपल्या आज्ञा लोकांनीं पाळाव्या अशाविषयीं त्यांजवर सक्ती करण्याची किंवा कोणी आज्ञा मोडील तर त्याला शिक्षा करण्याची पात्रता त्याच्यामध्यें असावी लागते. त्याशिवाय ती राज्यसंस्था या नांवाला पात्र होऊं शकत नाहीं. राज्यसंस्थेचा म्हणून जो मुलूख असेल त्या मुलखाच्या सर्व भागांतील लोकांवर ती आज्ञा सारखीच प्रभावी व्हावी लागते. मग ती आज्ञा त्यांना आवडो वा न आवडो; किंवा न्यायाची असो वा अन्यायाची असो. ही आज्ञा म्हणजे दरएक वेळीं वेगवेगळा काढण्याचा हुकूम असा अर्थ नाहीं, तर राज्यसंस्था-विषयक सर्वच कायदेकानूंचा त्यांत समावेश होतो. या आज्ञापालनाला अपवाद करून ठेवले असतील, तर ते स्वतः त्या कायद्यांनींच करून ठेवले असले पाहिजेत. मोबदला ठरविला असला तरी तो कायद्यानेंच ठरविला असला पाहिजे. तो अपवाद किंवा तो मोबदला व्यक्तिमात्र-प्रजाजनाला आपल्यापुरता किंवा आयत्या वेळीं निर्माण करितां येत नाहीं. राजाच्या या अंतिम अधिकाराचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा मेळ बसूं शकतो. पण ईश्वरीसंकेत आणि जीवात्म्याचें कर्मस्वातंत्र्य यांचा मेळ तत्त्वज्ञानी घालूं शकतात त्याच तत्त्वावर या मुद्याचें विवेचन पुढें सविस्तर करण्यांत येईल.

(५१) जुन्याकाळच्या राजाचें धर्मगुरुत्व

सुधारणायुगाचा प्रारंभ केव्हां झाला हें नक्की ठरवितांच येत नाहीं. तथापि या सुधारणायुगापूर्वी राज्यसंस्था या कुटुंब कुलगोत्र अशा मर्यादित स्वरूपांत होत्या. त्या स्वरूपांतील राज्यसंस्थामध्यें बाप किंवा कुलपति हा तरी राजा होता, किंवा धर्मगुरु हा राजा होता. धर्माच्या

कारभाराला त्या काळीं हल्लींच्या राज्याच्या कारभाराइतकें महत्त्व होतें. आधिदैविक संस्कृतीच्या काळांत धर्ममंत्र, धर्मतंत्र, देवदेवस्की, यज्ञयाग, बलिदान, कौल लावून देवाचे हुकूम घेऊन नंतर कार्योपक्रम करणें या पलीकडे त्या लहान समाजांचा कारभारच फारसा जात नसे. इंग्रजींत अशा राज्यसंस्थेला Theocratic State म्हणतात. आधिदैविक संस्कृति अगदीं पूर्वीच्या स्वरूपांत नाहीशी झाल्याला पुष्कळ दिवस झाले हें खरें. तथापि खिस्ती धर्मगुरू जो पोप त्याच्या अधिकारांत व बादशहा व सुलतान यांच्या अधिकारांत एकवेळीं फारसा फरक नव्हता हें अगदीं आधुनिक इतिहास सांगतो. पोप महाराजांची अनुग्रहाची लहर लागली असतां, ते आपल्या राजशिष्यांत सर्व जगाच्या मुलखाची वाटणी करून देत; व निग्रह किंवा शिक्षा करण्याची लहर लागली असतां ते ऐहिकच काय पण पारलौकिकहि शिक्षा देत. या शिक्षेंतून मुक्त होण्याला द्रव्यदान पुरें होत असे ही गोष्ट निराळी! पण दृष्टादृष्ट फलांची सांगड घालण्याची ही सत्ता राजसत्तेहूनहि मोठीच म्हटली पाहिजे नव्हे काय !

(५२) राजाला सद्धर्मपालक म्हणण्याची रीत

पुढें पुढें पोपमहाराजांनाहि वाईट दिवस आले. पृथ्वीवरचे राजे पोपांसारखेच उन्मत्त होऊन पोपमहाराजांच्या आज्ञा जुमानीतनासे झाले. या राजांनीं धर्माधिकार पोपमहाराजाकडून काढून आपणाकडे घेतला. पण ते अदृष्ट फलाच्या भानगडींत मात्र पडेनातसे झाले ! पापी अपराध्याला स्वर्गाऐवजीं नरकांत पाठविण्याचा व तेथून सोडविण्याचा पराक्रम करण्याचा पोपचा बहाणा राजांनीं चालू ठेवला नाहीं. फक्त धर्मसंरक्षक ही पदवी त्यांनीं आपल्या बिरुदावळींत सामील करून घेतली. अजूनहि इंग्लंडच्या राजाला Defender of the Faith ही पदवी आहे. इतकेच नव्हे तर इंग्लंडच्या राज्यकारभारांत धर्माचें म्हणून एक खातें अद्यापि आहे. आणि त्यांतील धर्माधिकाऱ्यांच्या नेमणुका राजाच करितो. शिवाजी महाराजांना गोब्राह्मणप्रतिपालक, सद्धर्मप्रतिपालक ही पदवी याच अर्थानें होती. पण युरोपीयन राष्ट्रांच्या पूर्वीच धर्म व राजकारण यांची फारकत आपल्या इकडे झाली होती. धर्मगुरु हा स्वतंत्र असून राजानेंहि त्याला मान लववावयाची,

पण धर्मगुरूनें राजकारणांत कांहीं अधिकार सांगावयाचा नाहीं, किंवा ढवळाढवळ करावयाची नाहीं, अशी पद्धति आमच्याकडे कृत-त्रेतयुगांपासूनच चालू आहे.

(५३) आधुनिक राज्यांतून धर्माची हकालपट्टी

इस्लामी राज्य हें तर मूळ धर्माच्या पायावरच सर्वस्वीं रचलें गेलें. सातव्या शतकांत या धर्मभावनेनेंच अरबस्थानांतील टोळ्यांना एकजीव व बळकट केलें. तें इतकें कीं, या भावनेच्या स्फूर्तीवर त्यांनीं नवीं शहरें, नवीं राज्यें, नवी संस्कृति स्थापिली, व जुनीं साम्राज्यैंहि मोडून टाकलीं. ज्यू लोकांचें जें राज्य म्हणून स्थापलें गेलें, तें या धर्मभावनेच्या बळावरच. जर्मनींत धर्माधिकाऱ्यांच्या पाठबळावरच टिकाऊ अशा राज्यसंस्था प्रथम स्थापल्या गेल्या. क्लोव्हिसनें फ्रँकिश साम्राज्य याच बळावर स्थापलें, व तें एकदां मोडल्यावर पेपिन यानें त्याच बळावर त्याला पुन्हां जिवंत केलें. कालांतरानें ही स्थिति पालटली. लोकसमाज नास्तिक (!) बनत चालला हा आक्षेप जरी खरा नाहीं, तरी धर्मगुरूंवरील श्रद्धा कमी होत चालली हें खरें आहे. आणि हल्लीं तर, धर्मरक्षण करणें हें ईश्वर व मनुष्यसमाज यांचें काम आहे, त्यांत राज्याधिकाराची लुडबुड उपयोगी नाहीं, हा सिद्धांत लोकसमाजाला अधिकाधिक पटू लागला आहे. धर्मभावनेनें ज्या समाजांत आपलीं मुळें सर्वांत अधिक खोल रुजविलीं होतीं अशा रशियन व तुर्की समाजांतहि धर्माचें बंड मोडून, राज्यांचें रक्षण आपण करितो असें म्हणणाऱ्या धर्माला राज्यांकडून रक्षणहि मिळेनासें झालें आहे ! खिलाफत व तुर्की सुलतान यांची फारकत झाली; व आज अंगोरा येथील तुर्की प्रजासत्ताक राज्यांत खुद्द धर्मावरच बहिष्कार पडला आहे.

(५४) राज्याचें नवें गमक—सामुदायिक उपयुक्तता

अशा रीतीनें प्राचीनकाळीं प्रेम, ममता, गोत, कुळाचा ऋणानुबंध व धर्मभावना यांच्या आधारावर कुटुंब, गोत्र व धर्मगुरूचें राज्य या संस्था रचल्या गेल्या व टिकल्या. पण पुढें हें तीनहि हेतू मागें पडून सार्वजनिक उपयुक्तता हा हेतु राज्यसंस्थांच्या घडामोडींत प्रभावी होऊं लागला. याचें कारण राज्यसंस्थांची स्थलमर्यादा व त्यांत समाविष्ट होणाऱ्या लोकांची संख्या

या गोष्टी वाढल्या. एका कुटुंबांतले, एका गोतांतले, किंवा एका धर्मपंथांतले अशा लोकांहून अन्य, म्हणजे विजातीय परधर्मीय परभाषा बोलणारे असेहि लोक राज्यसंस्थेच्या कक्षेंत येऊं लागले. याचें कारण केवळ आत्मरक्षणात्मक धोरण सुटून त्या ठिकाणीं आक्रमणाचें धोरण विजिगीषा हीं येऊं लागलीं.

(५५) राज्याधिकाराचा तात्त्विक एकसूत्रीपणा

राज्यसंस्थेचें मुख्य लक्षण हें कीं, त्यांतील 'कायदेशीर' अंतिम राजसत्ता म्हणजे शासनाधिकार कोणा तरी एका उपसंस्थेच्या किंवा एका व्यक्तीच्या हातीं असला पाहिजे. आणि उलट ती सत्ता त्या राज्यांत असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर 'तत्त्वतः' तरी चालली पाहिजे. 'कायदेशीर' किंवा 'तत्त्वतः' हें म्हणण्याचें कारण असें कीं, कायदेशीर तात्त्विक राजसत्ता एकाच्या हातीं नांवाला असून वास्तविक सत्ता खरोखर जो राज्याधिकारी नाहीं अशाहि कोणा एकाद्याच्या हातीं असते. पण त्या गोष्टीनें मुख्य शास्त्र-सिद्धान्ताला बाध येत नाहीं. आपण एखाद्या राजाचें उदाहरण घेऊं. राजे लोक छांदिष्ट, लहरी, अहंमन्य, मनोमनस्वी असतात तसेच ते मूर्ख परप्रत्ययनेय असेहि असल्याचें अनुभवाला येतें. कित्येक राजे स्त्रैण म्हणून बायकोच्या आधीन, कित्येक श्रद्धाळू म्हणून धर्मगुरूच्या आधीन, कित्येक बेअकली म्हणून कदाचित सत्-सल्लागाराप्रमाणें बद-सल्लागारांच्या आधीन, कित्येक ग्राम्यस्त्रीपुरुषसंगतीचे प्रेमी म्हणून आपल्या रखेल्या किंवा पैलवान किंवा खुषमस्कऱ्ये यांचे आधीन असतात. आणि त्या त्या ठिकाणीं राजा हा कळसूत्री बाहुलीप्रमाणें पडद्याबाहेर आज्ञा सोडीत असल्यासारखा दिसला तरी, पडद्याआड कळ फिरविणारा म्हणून खरा सत्ताधारी असा दुसराच कोणी असतो. पण दरवेशानें किंवा रिंग मास्तरानें गुप्त सूचना केली तरी खेळ केला तो अस्वलानें किंवा घोड्यानें असेंच म्हणावें लागतें !

(५६) कळसूत्री बाहुलीचा प्रकार

आतां राजा ही एक व्यक्तीच मुख्य राज्यसत्ताधारी असली तर हा गुप्त 'सूत्रधार' हा पत्त्यांच्या डावांतला 'चोर' हुडकून काढणें सोपें असतें. पण

ती सत्ता राज्याच्या कायदेशीर घटनेनेंच अनेक उपसंस्थांतून वाटून गेली असली म्हणजे मग तो हुडकून काढण्याचें काम सहजच कठिण होऊन बसतें. 'लंडन टाईम्स' पत्र हें सर्व वर्तमनापत्रांत वजनदार, पण त्याचा संपादक खरा कोण हें बाहेर लोकांना कधींच माहीत होत नाहीं असें म्हणतात. त्याचप्रमाणें विलायतचें प्रधानमंडळ हें प्रसिद्ध असतें. पण प्रधानमंडळांतल्या व्यक्ति पुष्कळ वेळां अज्ञ अननुभवी असल्यामुळें त्यांना सल्ला देणारे कायमचे खातेवारीचे मुख्याधिकारी हेच मंडळाचें धोरण ठरवून देतात, म्हणून त्यांनाच 'वास्तविक' सत्ताधारी म्हणतां येईल. रॅम्से मॅक्डोनाल्ड हे गेल्या उलथापालथींत वाईटपणाचे धनी ठरून त्यांना मजूरपक्षानें शिव्य दिल्या. पण राष्ट्रावरील ज्या आर्थिक संकटामुळें मॅक्डोनाल्ड यांनीं स्वकीयांना नाखूष नाराज करून जुन्या प्रतिपक्षीयांच्या हातांत हात घालून निवडणुकीच्या महापुरांत उडी घेतली, त्या संकटाची कल्पना आणून देऊन त्याच्या परिहाराची तोड सुचविणाऱ्या तज्ज्ञ अर्थशास्त्रपंडित सल्लागारांपैकीं कित्येकांचीं नांवेंहि शेंकडा पंचाण्णव मतदारांना माहीत नसतील. तथापि कायदेशीर सत्ता चालविली प्रधानमंडळानें म्हणजे मुख्य प्रधानानेंच !

(५७) पण तो फार वेळ टिकत नाहीं

इतिहासांत कळसूत्री राजांचीं अनेक उदाहरणें आहेत. अशा प्रकारांत असें दिसून येतें कीं, हा कळसूत्री खेळ फार दिवस चालला म्हणजे तो आपोआप उघडकीला येतो. आणि पत्त्यांच्या एका डावांत ज्याप्रमाणें चोर जरी लपून बसला तरी, शेवटीं कोणाच्या हातांत तो सांपडतो आणि बाकीचे सगळे खेळिये त्यावर तुटून पडतात, त्याप्रमाणें राज्यांतहि प्रजा या खेळानें प्रथम गोंधळून गेली तरी, पुढें मागें राज्यसत्तेची कळ फिरविणारी व्यक्ति उघडी पडते आणि मग सर्व लोकाचें हात तिच्यावर पडून तिचा खून तरी होतो किंवा तिच्यावर खटला होऊन ती तुरुंगांत पडते किंवा बडतर्फी हद्दपारी होऊन ती नामशेष होते व आपला कुटिल कारभार पुढें चालविण्याला असमर्थ होते. जगांत राजे लोकांच्या हस्तकांपैकीं शेंकडा नव्वद लोकांना हें प्रायश्चित्त भोगावें लागलें आहे. पहिल्या चार्लस राजाच्या प्रधानाचा इनसाफ होऊन त्याचा शिरच्छेद झाला. राणी मेरी स्टुअर्ट इचा प्यारा सारंगीवाला डेव्हिड रिझिओ

याचा तिच्याच दिवाणखान्यांत खून झाला. संभाजीमहाराचांचा नाश होण्यापूर्वीच त्यांचा बदसल्लागार कलुषा कवजी हा प्रधानमंडळानें व प्रजेनें हुडकून हेरून काढला होता. आपल्या आधुनिक देशी संस्थानिकांच्या दरबारींहि असले खेळ पुष्कळ चालतात, व वर सांगितल्याप्रमाणें अखेर मोडतात हें प्रसिद्धच आहे.

(५८) कनिष्ठ हा वरिष्ठाचा प्रतिनिधी

राजसत्तेची योग्य मार्गांनीं व अवश्य तितकी विभागणी झाली असतां, कनिष्ठ अशा कोणत्याहि उपसंस्थांनीं अगर अधिकाऱ्यांनीं हुकूम काढल तरी ते वरिष्ठ राजसत्तेचेच ठरतात. म्हणून कायदेशीर प्रश्न निघाला असतां त्या हुकमांना थेट राजाज्ञेइतकाच मान द्यावा लागतो. आणि न्यायकोर्टें तो देतातहि. पण अधिकारविभागणी ही एकसूत्रतेला बाधक नसते, व योग्य अधिकारविभागणीनें वाटून गेलेल्या सत्तेला कळसूत्री म्हणत नाहींत. प्राचीन काळीं राज्यें विस्तारानें व कारभाराच्या व्यापानें लहान होतीं तेव्हां राजाला माहित नाहीं अशा स्थितींत त्याचा हुकूम निघणें शक्यच नव्हतें. पण राज्याचा विस्तार वाढला म्हणजे मग, स्वतः एकट्या राजाला सर्व आज्ञा लिहून नव्हेच पण वाचूनहि सह्या करितां येत नाहींत असें होतें. आणि मोठमोठ्या राज्यांत तर, राजाचे खातेवार सेक्रेटरी व शिक्केनवीस नेमलेले असतात. त्यांचें कामच हें कीं, राजाज्ञेचा म्हणून शिक्का त्यांनींच आज्ञेच्या कागदावर उठवावा. कोणत्याहि मोठ्या कारभारांत मग तो राज्याचा नसला तरी असेंच होतें. मग राज्यांत होईल यांत नवल काय! सुमारें पंधरा वर्षांपूर्वी मुंबई गव्हर्नरच्या एका हिंदी एक्झिक्युटिव्ह कौंसिलराशीं कांहीं कामानिमित्त माझें बोलणें झालें. तेव्हां मुंबई सरकारच्या नांवानें निघालेल्या एका ठरावाचा मीं उल्लेख केला. त्यांना तो माहित नव्हता असें दिसलें. मी विचारलें कीं, " तुमच्यापुढें प्रत्यक्ष कामाची तपशिलवार सुनावणी न होवो, पण मुंबई सरकारचे म्हणून जे बटहुकूम निघतात, ते तरी प्रसिद्ध होण्यापूर्वी तुम्हांला पाहण्याची संधि असतेच कीं नाहीं! " त्यावर ते हंसून इतकेंच म्हणाले कीं, " तुमच्या वर्तमानपत्रांत छापून गेलेली अशी

एखादी बातमी किंवा लेख मी सहज काढून दाखवूं शकेन कीं, जो मजकूर तुम्ही संपादक असतांहि कधीं वाचला अगर पाहिला नव्हता ! ”

(५९) अधिकारविभागणी ही स्वाभाविक

हें त्यांचें उत्तर मला थोडेंसें पटलें. कारण पुष्कळ वेळां संपादक जाग्यावर हजर नसतां, त्याचे जागीं काम करणारे जबाबदार दुय्यम सर्व व्यवस्था करून त्याच्या नांवचा अंक नेहमींप्रमाणें काढतात. एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर मला पुढें म्हणाले, “ गव्हर्नर–इन्–कौन्सिल यांच्या आज्ञेनें ठराव निघाला अशी भाषा ठरावांत वापरली असली तरी केव्हां केव्हां खुद्द माझ्या खात्याचे वटहुकूम किंवा ठराव, आपल्या अखत्यारीनें खात्याचा सेक्रेटरी काढतो; व तें करण्यांत त्याला आपण कांहीं कपट करितों किंवा मला फसवितों असें वाटण्याचें कारण नसतें. कारण अधिकार–विभागणी–तत्त्वाप्रमाणें या गोष्टी घडत असतात. राजाची दखलगिरी ही दहा हजार रुपयांच्या चलनी नोटेसारखी आहे. खुद्द तेवढया मोठया रकमेच्या नोटेची देवघेव व्हावयाची तेव्हां ती नोट बँकेच्या किंवा पेढीच्या मुख्य अधिकाऱ्याच्या दखलगिरीनें दिली घेतली जाईल. पण दहा हजारांच्या नोटेच्या पोटीं जितकें चलन–विभाग आहेत तितक्या सर्वांच्या किंमतीच्या नोटा, नाणीं, परचुरण खुर्दा यांचा व्यवहार बँक किंवा पेढी यांच्या दुय्यम व्यवस्थापकांपासून तो खालीं सराफांपर्यंत बँकेचे अधिकारीच करितात. हिंदुस्थानसरकारच्या नांवानें या देशांत जो जगड्व्याळ व्यवहार चालतो तो सर्व खडान्खडा स्वतः गव्हर्नर जनरलला माहिती असणें शक्यच नसतें. तथापि तात्त्विक किंवा कायदेशीर दृष्ट्या तो सर्व अधिकार स्वतः त्यानें बजाविल्याइतकाच प्रजेवर बंधनकारक होतो.

(६०) अधिकाऱ्यांचा गंज अवश्य असतो

तात्पर्य, राज्यसंस्थेचा विस्तार होऊन एखाद्या वृक्षाप्रमाणें त्याला मोठ्या फांद्या फुटाव्या, त्यांना पानें फुटावीं, फुलें यावीं, व फळें येऊन त्यांत भावी वृक्षाचें बीज तयार व्हावें हें सर्व स्वाभाविक नव्हे तर अवश्यच आहे. या शाखापल्लवविस्तारानें, वृक्षाच्या मूळ बीजाचें कार्य विफल होत नसून उलट

सफलच होतें. तसेंच राज्यकारभाराचेंहि आहे. खुद्द राजा हा आपल्या राजवाडयांतील दिवाणखान्यांत एकांतांत बसला व देशाच्या अगदीं टोंकाला वावरणारी प्रजा आपल्या घरीं बसली तरी तो त्या प्रजेचा राजा व ती त्या राजाची प्रजा हा संबंध सिद्धच होणारा आहे. नखाला लागलेली जिव्हाळी मेंदूंत संवेदना उत्पन्न करते ती या दरम्यान पसरणाऱ्या शरीरवृक्षाच्या असंख्य शाखा–पल्लवामुळेंच होय. आणि काळजापासून शुद्ध रक्त बाहेर पोंचविण्याला व बाहेरचें अशुद्ध रक्त शुद्ध करण्याकरितां काळजाला नेऊन पोंचविणाऱ्या शिरा व धमन्या नसतील, व वाटेंत स्नायू, अस्थि, चर्म, ज्ञानतंतू वगैरेंची ठाणीं किंवा टपालहापिसें नसतील तर हें सुस्थिर चाललेलें रुधिराभिसरणाचें कार्य होऊं शकणार नाहीं. म्हणून गव्हर्नर जनरलपासून तों तहत गांवचा पाटील, पटवारी, तराळ येथपर्यंत दरम्यान हजारों अधिकाऱ्यांचा गंज सारखा लागलेला असतो.

(६१) हिंदुस्थानचें उदाहरण

हिंदुस्थानचा कारभार पार्लमेंटच्या संमतीनें होतो म्हणून, पार्लमेंटनें असे कांहीं स्थूल कायदे केले आहेत कीं, ज्यांत या हिंदुस्थानांतील कारभाराच्या कायदेशीरपणाचीं बीजें साठविलेलीं आहेत. पण हीं बीजरूपीं कायद्याचीं कलमें फारच थोडीं असतात. हिंदुस्थानांत कायदेकौंसिल अमुक एक प्रकारचें व त्या कायदेकौंसिलनें केलेल्या कायद्यांना आपल्या इच्छेस येईल तर गव्हर्नर जनरल यांनीं आपल्या कौंसिलच्या विचारानें संमति द्यावी किंवा न द्यावी एवढ्या लहानशा मंत्रानें अधिकारविभागणीचें उदक पार्लमेंटमध्यें सुटतें. पण गंगोत्री–यमुनोत्री यांच्या उगमांतून निघणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाना पुढें नद्या व नद यांचें प्रचंड स्वरूप यावें त्याप्रमाणें, कायद्याच्या या मंत्रोदकाचे पुढें प्रचंड प्रवाह होतात, व अधिकारदानांतून अधिकारदान, फिरून अधिकारदानांतून अधिकारदान, अशा क्रमानें अगदीं खालपर्यंत पेंड पोंचतो. याचें एक प्रत्यक्ष उदाहरण आपण घेऊं. शेतकरी चावडीवर जाऊन जो चार आठ आणे सारा भरतो तो अद्यापि विलायतेंतल्या स्टेट सेक्रेटरीच्या नांवानें हिशेबी जमा होत असतो. आणि उलट वर्षांतून एकदां चावडी सारवण्याला पाटलाच्या सादिलवारांतून जर एका आण्याचें शेण

श्री. छ. प्रतापसिंह महाविद्यालय (थोरले)

खर्ची पडलें तर तो खर्च विलायतेंतल्या स्टेट सेक्रेटरीच्याच नांवें जमा झालेल्या पैशांतून व त्याच्या हुकमानें झाला असेंच कायदेशीर दृष्टीनें मानलें जातें. आणि फिरून स्टेट सेक्रेटरीचा अधिकार हा स्वतंत्र नव्हे तर तो खुद्द राजाचाच! कारण राजाचा अधिकार स्टेट सेक्रेटरींनीं बजवावा अशा विषयीं पार्लमेंटच्या कायद्याचा किंवा निदान अलिकडच्या राज्यघटनेच्या एका कलमाचा आधार आहे.

(६२) 'संमतार्थे अनुज्ञा'

इंग्रजींत ज्याला सॉव्हरेंटी म्हणतात त्या संकीर्ण, सर्वंकश व बीजभूत वरिष्ठ राजसत्तेचें हें वरील उदाहरण म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. हें उदाहरण अर्थात् राजानें केलेल्या कायद्याचें झालें. पण राजानें न केलेलें असेहि कांहीं कायदे राज्यांत चालूं शकतात व राजसत्तेला प्रजा संमति देते म्हणून राजसत्ता चालते असा जो राजशास्त्रांत एक सिद्धान्त गृहीत धेऊन चालतात त्याचाच पूरक सिद्धान्त असा कीं, राजानें न करितां प्रजेनें केलेल्या कांहीं कायद्यांना म्हणजे तिच्या प्रजासत्तेला राजाहि संमति देतो म्हणून राज्यसंस्था चालते. प्रजासत्तेनें निर्माण केलेल्या कायद्याचें उदाहरण म्हणजे, आज हिंदुस्थानांत चालू असलेल्या कित्येक वर्गांना लागणारा 'पर्सनल लॉ' म्हणजे त्या त्या वर्गाचे व्यवहारधर्मशास्त्र. हिंदु लोकांच्या व मुसलमान लोकांच्या धर्मशास्त्राचा उगम त्यांच्या सनातन चालीरीतींत आहे. याला 'कस्टमरी लॉ' असें म्हणतात. हिंदुसमाजाला आधारभूत असे धर्मसंस्कार किंवा विवाह, दत्तविधान, दायभागाची वाटणी, स्त्रीधन वगैरे व्यवहार कसे व्हावे हें कोणत्याहि पार्लमेंटनें झालेल्या कायद्यानें ठरविलेलें नाहीं. व इंग्रजांनीं हिंदुस्थान जिंकून किंवा इतर रीतींनीं स्वाधीन करून घेऊन, आपलें राज्य विलायतेंतला राजा किंवा पार्लमेंट यांच्या कायद्याच्या आधारावर स्थापलें असलें तरी, 'हिंदुधर्मशास्त्र' हें त्यांच्या हिंदु प्रजेनेंच स्वतः बनविलेलें आहे. आणि प्रत्यक्ष हायकोर्टें, प्रिव्ही कौंसिल हीं न्यायपीठें देखील त्यांच्या चालीरीतींच्या कायद्याची अंमलबजावणी करतात. त्याला कोणत्याहि विलायती कायद्याचा आधार घेत नाहींत.

(६३) दंड हाच सत्तेचा खरा आधार

असो; " जग कसें चालतें ? कशानें चालतें ? " असा प्रश्न शंभर माणसांना करा. नव्वद तरी एकच उत्तर देतील.'जग ना! ईश्वरी सत्तेनें चालतें.' बरें, जग चालावयाला ईश्वराला सत्ता लागते तसें शहाणपणहि लागतें कीं नाहीं ? आणि सत्ता व शहाणपण हीं दोन्हीं असलीं तरी, अंतःकरणांत जगाविषयीं प्रेम असल्याशिवाय त्याचा उपयोग ईश्वर तरी कां करील ? प्रेमाशिवाय, ममतेशिवाय एवढी उठाठेव, एवढा उपद्व्याप कोण करतो ! असले प्रश्न विचारून त्याला आणखी थोडें खोलांत नेलेंच तर मग माणूस कबूल करील कीं, जग हें ईश्वराच्या सत्तेप्रमाणें त्याच्या शहाणपणामुळें, प्रेमामुळें, ममतेमुळें चालतें. पण या दुसऱ्या प्रश्नांचीं उत्तरें त्याला सुचवावीं तेव्हांच तीं तो देईल. एरवीं नुसतें मोघम विचारा 'जग कसें चालतें कशानें चालतें!' त्याचें तावडतोब ठरीव उत्तर तो देणार–"जग ईश्वराच्या सत्तेनें चालतें." जग चालवावें अशी 'इच्छा' ईश्वराला कोणत्याहि कारणानें होवो. पण त्याला ' सत्ता ' आहे म्हणूनच ती इच्छा सफळ होते !

(६४) दंडाचें सर्वव्यापित्व

कुटुंबांतील ' आई ' हें नांव व 'प्रेम' यांचें अर्थातच अखंड साहचर्य असतें. पण बापाची गोष्ट तशी नाहीं. मुलांना बापाच्या प्रेमापेक्षां, निदान प्रेमाच्या बरोबरीनें तरी, त्याच्या सत्तेचा दरारा जाणवत असतो. शाळेंत पंतोजी शिक्षण देण्याकरितां असतो, पण विद्यार्थ्यांच्या डोळ्यांपुढें त्याची मूर्तिमंत छडी जशी उभी असते तशी त्याची अमूर्त बुद्धि किंवा कळकळ ही कशी असणार ! आपली जात संघटित प्रयत्नानें जातीला उपकारक असे कांहीं उद्योग करील या आशेपेक्षां, आपण जातीची चालरीत सोडून कांहीं केलें तर आपणाला वाळीत पडावें लागेल, आपलें हुक्कापाणी बंद होईल, लग्नाला मुली, मुलगे मिळणार नाहींत ही भीतिच अधीक प्रतीत होते. पोलीस चोरी उमगून देतात व रात्रीं गस्त घालून रक्षण करतात. पण पोलीस म्हटला कीं त्याजकडून अधिकारानें अनधिकारानें होणाऱ्या छळाची, जुलमाचीच आठवण होते. आणि राजाची

अब्रू तर बोलावयासच नको. कारण राजा या शब्दाबरोबर 'दंड' हा शब्द जोडलेला जितका आढळतो तितका दुसरा कोणताहि आढळत नाहीं.

(६५) वाटून गेली तरी सत्ता शिल्लकच

जी साऱ्या जगाची गोष्ट तीच कोणत्याहि संघटित समाजाची पण आहे असें समजावें. मग तो समाज, कुटुंब, ज्ञाति, नगर, उपराष्ट्र, राष्ट्र किंवा राष्ट्र-संघ—म्हणजे कोणत्याहि आकाराचा किंवा स्वरूपाचा असो. अशा संघटित समाजांत सत्ता मुख्यतः कोणा एकाच्या हातीं असली, तरी ती अंतिम-स्वरूपांत सूक्ष्मरूपानें इतरामध्येंहि कांहीं कांहीं अंशांनीं वाटली जावी लागतेच हें खरें. तथापि स्थूलरूपानें बोलावयाचें असतां एकंदर विश्वाप्रमाणें, जगाप्रमाणें, जगांतला कोणताहि संघटित **समाज सत्तेच्या बळावर चालतो** असेंच ठळकपणें दिसतें हें कांहीं खोटें नाहीं. ही सत्ता सर्वत्र सर्वस्वी बळ-जोरीनेंच मिळविलेली किंवा बळजोरीनेंच टिकविलेली असते असेंहि नाहीं. प्रेम, आदर, कृतज्ञता, श्रेष्ठकनिष्ठ भावनेची जाणीव, स्वार्थबुद्धि, आवश्यकता किंवा साधी सोय, इत्यादि गोष्टींनीं सत्तेला मान्यता मिळू शकते. पण 'सत्ता म्हणजे सत्ता' ही गोष्ट अखेर खरी असें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

(६६) अवमानली गेली तरी ती राजाज्ञाच

तात्पर्य, सर्वांत वरिष्ठ राज्यसत्ता ज्या कोणाच्या हातीं आहे त्यांच्याच नांवानें व त्यांच्याच हातून हुकूम सुटला म्हणजे तो राजाचा हुकूम झाला. मग तो वास्तविक स्वरूपांत इतर कोणाच्या इच्छेचा परिणाम आहे हें पाहण्याचें कारण नाहीं. उदाहरणार्थ, विलायतच्या पार्लमेंटनें कायदा केला; पण राजानें त्याला संमति दिली नाहीं तर तो कायदेशीर कायदा म्हणजे राजाज्ञा नव्हे. उलट राजाच्या मनांत नसतांहि त्यानें मुख्य प्रधानाच्या धाकानें, भिडेनें, मोहब्बतीनें, कशीहि त्याला संमति दिली म्हणजे तो कायदा झाला. दुसरे पक्षीं अशा रीतीनें राजाज्ञा निघाली तर ती कोणी अवमानणार नाहीं असेंहि नाहीं. ज्या लोकांनीं तुरुंग गजबजलेले दिसतात ते सर्व राजाज्ञा उल्लंघिलेलेच लोक असतात. ज्याला राजसत्तेच्या कायद्यांचें स्वरूप प्राप्त झालेलें नाहीं असा शिष्टाचार किंवा नियम मोडल्याबद्दल

कोणावर खटला होत नाहीं किंवा कोणाला तुरुंगांत जावें लागत नाहीं. पण तुरुंगात गेलेल्या लोकांपैकीं कांहीं असे म्हणणारे असतात कीं आम्हीं राजाज्ञा मोडण्याचें कृत्यच केलें नाहीं; तर दुसरे कांहीं असें म्हणणारे असतात कीं, आरोपित कृत्य आम्हीं केलें; पण त्याविषयीं तशी राजाज्ञा नसल्यानें तो गुन्हाच होत नाहीं. फक्त सत्याग्रही हा मात्र मुद्दाम गुन्हा करतो व शिक्षा भोगतो. पण त्यामुळें त्यानें मोडली अवमानिली ती मूळ राजाज्ञा नव्हे असें होत नाहीं. कुटुंबापासून साम्राज्यापर्यंत राज्यसंस्थांची धारणा मध्यवर्ती स्वतंत्र सत्तेवरच होते.

भाग (३)

राज्यसंस्थांच्या घटना व वर्गीकरण

(६७) राज्यघटना म्हणजे राज्याचें व्याकरण

राज्यसंस्थांचा उगम व आधार यांचा विचार झाल्यानंतर त्याच्या स्थितीचा म्हणजे जीवयात्रेचा विचार ओघानेंच येतो. स्थिति या शब्दांत दोन गोष्टी येतात. १ अस्तित्व किंवा जिवंतपणा, आणि २ कार्यक्षमता. या दोहोंची धारणा एकाच आधारावर होऊ शकते. आणि तो आधार म्हणजे राज्याची कायदेशीर घटना. घटनेची कल्पना ही मनामध्यें सुप्रतिष्ठित होण्याला, व तिचें मर्म समजून तिची अंमलबजावणी व्हावी असा आग्रह धरण्याला, लोकांची, प्रजाजनांची मनःसंस्कृती बरीच परिणत व्हावी लागते. घटनेसंबंधीं कायदेशीर भाषा सुरू होण्याच्या आधीं पुष्कळ काळ ती घटना अस्तित्वांत असते, व तिचा व्यवहारहि होत असतो. भाषाव्यवहार सुरू झाल्यानंतर फार काळानें व्याकरण उत्पन्न होतें; व तें उत्पन्न झाल्यावरहि व्याकरण न समजतां लहान मुलेंच काय, मोठे प्रौढ वयाचे लोकहि, शुद्ध भाषा बोलत असतात. याचें कारण परंपरागत ज्ञान (पढिक किंवा अभ्यासानें प्राप्त करून घेतलेलें नव्हे). त्याचप्रमाणें राज्यांतील अधिकारी व प्रजाजन हेहि आपापल्या हक्कांचें व्याकरण समजल्याशिवाय ते हक्क परस्परांविरुद्ध बजावीत असतात, याचें कारण उभयपक्षांची उभयपक्षाना परंपरागत संमति ! राजकीय हक्क कोणते हे, सामाजिक चालीरीतींप्रमाणें, प्रथम कसे केव्हां जन्माला आलें हें कोण सांगूं शकणार ! रानांतील पाऊलवाटेची उत्पत्ति कोणी नक्की सांगितली आहे काय ! पण त्याची माहिती नसतां मळलेल्या पाऊलवाटेनें लोक चालतच असतात.

(६८) हक्कांच्या विरोधांत घटनेचा जन्म

मळलेल्या पाऊलवाटेनें चालत असतांहि त्या वाटेनें चालण्याचा हक्क आपणाला आहे अशी जाणीव लोकांना नसते. पण समजा कीं, ती वाट

मध्येंच कोणी बुजविली किंवा बंद केली तर मग लोकांना चालू वहिवाटीच्या हक्काची जाणीव उत्पन्न होते, ती कोणी बुजविली बंद केली याची चौकशी सुरू होते, अपराधी सांपडला तर त्याचें पारिपत्य होतें, आणि या भांडणांत दुतर्फी हक्कांचा संबंध आला तर मग पंचायतीनें किंवा न्यायकोर्टाच्या सहाय्यानें त्याचा निर्णय लावून घेण्यांत येतो. पण हें करितांना, व पुढील बंदोबस्ताकरितां, वादग्रस्त हक्काच्या लेखी विधानाची आवश्यकता उत्पन्न होते. राज्यघटना देखील सर्व राष्ट्रांतून प्रथम अशाच अलिखित होत्या. लेखाशिवाय व्यवहार करण्याची जुन्याकाळीं रीतच होती. आणि लेखांशिवायहि तो नीट होत असे. मग व्यवहाराची गुंतागुंत थोडी म्हणा, किंवा त्यांची स्मरणशक्ती आधुनिकांपेक्षां अधिक धड व तीक्ष्ण होती म्हणा, किंवा शब्द थोडे पण इमानदारी, विश्वास पुष्कळ होता म्हणा, किंवा शब्द-छलाला लागणारी कुटिल नीति, कुटिल बुद्धि तेव्हां नव्हती म्हणा—कारण कोणतेंहि असो, जुन्याकाळीं राजे व प्रजा दोन्ही असता, लेखी राज्यघटना नव्हत्या ही गोष्ट मात्र खरी आहे. पण पुढें समाजस्थिति बदलून लेख हाच इतर अनेक व्यवहारांचा मुख्य आधार होऊन बसला तसाच तो राजकीय व्यवहारांत राज्यघटनेसंबंधीहि मुख्य आधार होऊन बसला.

(६९) गेल्या दोन तीन शतकांतच जगांतील सर्व लेखी राज्यघटनांना लेखांचें स्वरूप आलें आहे. त्याचीं कारणें दोन तीन प्रकारचीं घडलीं. फ्रान्समध्यें राज्यक्रांती होऊन प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्यांत आलें व राजा नामशेष झाला. मग तेथें जुनी परंपरागत घटना कशी उपयोगी पडणार? जुन्या घटनेंत तरी राजानें प्रजेवर जुलूम करावा असें तत्व कोठें होतें? "त्यांचा संतोष हेंच आमचें सुख" ही राजे लोकांची भाषा कायम ठशांनीं छापल्यासारखी जगाच्या प्रारंभापासून सुरूच आहे! पण "मिजास साधूची व वागणुक सैतानाची" ही म्हण फ्रान्समध्यें लोकांच्या अनुभवाला येऊं लागलीं तेव्हां बंड व क्रांती झाली. राजाच गेला तेव्हां घटनेतली निम्मी कलमें आपोआपच नाहीशीं झालीं. तथापि, लोकांच्या हातीं आलेलें राज्य तरी पुढें कोणत्या पद्धतीनें चालावें हा प्रश्न विचाराचाच होता. "दुधानें तोंड भाजलें तेव्हां ताकहि फुंकून प्यावें" असें लोकांना वाटू लागलें. नवी घटना सुचविणें हा प्रजापक्षांतील सुपीक मेंदूना एक उद्योगच होऊन

श्रीमंत प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

बसला. 'आबे सार्इस' नांवाचा एक क्रांतिकारक रोज रात्रीं बसून एक नवी राज्यघटना तयार करून ती आपल्या क्रांतिबांधवापुढें मांडी. तात्पर्य नवी राज्यघटना हवी, व ती लेखीच असावी, असें ठरून त्याप्रमाणें घटना मंजूर करण्यांत आली. स्वातंत्र्यवादी क्रांतिकारकांनीं आपल्याच उरांत मारून घेण्याकरितां सोन्याची सुरी बनविली ! कारण घटना म्हणजे बंधन व नियंत्रण !

(७०) अमेरिकेतल्या राज्यघटना

अमेरिकेंत याच शतकात लेखी राज्यघटना बनविण्यांत आली. तिला तर फ्रान्सपेक्षांहि अधिक सयुक्तिक कारण घडलें. फ्रान्समध्यें राजा गेला तरी बाकी जुनी परंपरा चालण्यासारखी होती. पण अमेरिकेनें इंग्लंडचें स्वामित्व झुगारून दिलें, व अगदीं कोऱ्या कागदावर मनाला वाटेल तो मजकूर लिहिण्याच्या भावनेनें घटनेला हात घातला. शिवाय फ्रान्सचें राष्ट्र पूर्वीप्रमाणें एकच अखंडच राहिलें; पण अमेरिकेंत स्वातंत्र्ययुद्धांत सामील होऊन स्वातंत्र्य मिळविलेलीं अनेक संस्थानें म्हणजे उपराष्ट्रें होतीं, त्या सर्वांना आपण आपापसांत देखील स्वतंत्र राहावें अशी इच्छा सहजच उत्पन्न झाली. अर्थात् स्वातंत्र्य हें सर्वांना समान असलें तरी संयुक्त घटना करणें अवश्य होतें. म्हणून लेखी घटना करणें प्राप्त झालें; व या लेखी घटनेंत त्यांनीं आपापल्यापुरतें अंतर्गत कारभाराचें स्वातंत्र्य ठरवून घेऊन सर्वांकरितां म्हणून जी घटना केली ती निरगाठीसारखी घट्ट व न सुटण्यासारखी केली. संयुक्त राष्ट्राचें एकच पार्लमेंट, संयुक्त राष्ट्राचें सर्वाधिकारी एकच वरिष्ठ न्यायकोर्ट, सर्वांचा एकच मुख्याधिकारी अध्यक्ष, व परराष्ट्रीय राजकीय संबंधांत सर्वांचें एकच द्वार व मुख अशी ती घटना झाली. आणि पुढें एकोणिसाव्या शतकांत कांहीं संस्थानें या निरगाठींतून सुटून जाण्यास पाहूं लागलीं तेव्हां युद्ध होऊन ती निरगाठ अधिकच घट्ट झाली.

(७१) महायुद्धानंतरच्या राज्यघटना

नव्या लेखी राज्यघटना तिसऱ्याहि एका कारणानें युरोप खंडांत झाल्या. तें कारण, महायुद्धानंतर स्वयंनिर्णयाचें तत्त्व लाऊन विजयी राष्ट्रानीं आपल्या

हिताकरितां पण परार्थाचा बहाणा करून, नवीं राज्यें निर्माण केलीं हें होय. नवीं राज्यें निर्माण केलीं याचा अर्थ, नवा मुलूख हुडकून काढून, नवे लोक बाहेरून आणून, नव्या वसाहती करून त्यांचीं नवीं राज्यें स्थापलीं असा नव्हे. तर या नव्या राज्यांतले लोक पूर्वी ज्या सरकारच्या अमलाखालीं होते त्यांच्या अमलाखालून त्यांना सोडवून, स्वतः त्यांची त्यांच्या पुरतीं स्वतंत्र राज्यें स्थापून सर्वाधिकार त्यांचा त्यांना दिला. तात्पर्य, राज्यच नवें म्हटलें म्हणजे घटनाहि नवी आलीच; व त्याप्रमाणें ती करण्यांतहि आली. या नव्या राज्यांची रचना करितांना त्यांतील सर्व प्रजेला एकसारखीच संमत होईल अशी व्यवस्था अर्थातच झालेली नाहीं. एकाचें बरें करावयास जावें तर दुसऱ्याचें वाईट व्हावें हा अनुभव आला, व या नव्या राज्यांत कांहीं लोक जुन्या सरकारचे अभिमानी तर पुष्कळसे जुन्या सरकारचा द्वेष करणारे असे सर्व एकाच राज्यांत कोंबले गेले. यामुळें हितविरोध शिल्लक उरलाच. आणि अल्पसंख्य बहुसंख्य हा प्रश्न उत्पन्न झाला. म्हणून त्याची व्यवस्था लावण्याकरितांहि नवी लेखी राज्यघटना करावी लागली.

(७२) इंग्लंडची राज्यघटना

याच्या उलट इंग्लंड देश घेतला तर त्याच्या घटनेचा कांहीं भाग अलिखित कांहीं लिखित असें तें मिश्रण आहे. (१) अलिखित भागांत 'कॉमन लॉ' म्हणजे परंपरागत कायदेशीर चालीरीति यांचा समावेश होतो. या रूढिस्वरूपी कायद्यावर अनेक ग्रंथकारांनीं टीका लिहिल्या असून, न्यायकोर्टें तो कायदा जणूकांहीं लिखित असावा त्याप्रमाणें मानून त्यावर सर्रास निर्णय देतात, व हे निर्णय फिरून या अलिखित कायद्यांचें जीवित व कार्यक्षेत्र वाढवितात. फक्त त्या कायद्यांचें प्रत्यक्ष लेखी 'कोड' (संग्रह) सरकारी कायदेमंडळानें बनविलेलें नाहीं. (२) अलिखित कायद्यांच्या जोडीला अलिखित संकेत हेहि राज्यघटनेंत अढळपद मिळवून बसले आहेत. हे संकेत राजा व पार्लमेंट यांच्या वाढत्या व बदलत गेलेल्या संबंधात निर्माण झालेले आहेत. उदाहरणार्थ, प्रधानमंडळ हें कोणत्याहि घटनेच्या कलमान्वयें अस्तित्वांत आलेलें नाहीं. पण तो आतां घटनेचा भागच झाला आहे. (३) याशिवाय लिखित राज्यघटनेंत पूर्वीचे चार्टर

(सनदा) व स्वतः पार्लमेंटनें केलेलें घटनाविषयक कायदे (ॲक्ट, स्टॅटयूट) यांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, मॅग्नाचार्टा (स. १२१५), बिल ऑफ राइट्स (१६८९), ॲक्ट ऑफ सेटलमेंट (१७०१) आणि १८३२, १८६७, १८८५ इत्यादि सालचे मतदारी वाढविण्यासंबंधाचे स्टॅटयूट. हे सर्व लिखित राज्यघटनेचे भाग होत.

(७३) ही मुख्यतः अलिखितच आहे

तथापि एकंदरीनें इंग्लंडची राज्यघटना लिखितापेक्षां अलिखितच अधिक भरेल. त्या घटनेचें मुख्य तत्त्व प्रजास्वातंत्र्याचे हक्क प्रस्थापित करणें हेंच आहे. आणि अलिखित घटनेच्या कलमांचें उल्लंघन झालें तरी तें उल्लंघनच होय. 'घटने'चें उल्लंघन म्हणजे 'कायद्या'चें उल्लंघन असें मात्र नाहीं. उदाहरणार्थ, पार्लमेंटमध्यें मुख्य प्रधानावर किंवा प्रधानमंडळावर 'अविश्वासाचा ठराव' मंजूर झाला तरी तो आपण मानू नये असें त्यांनीं ठरविलें व आपल्या जागांचे ताबडतोब राजीनामे दिले नाहींत तर त्याकरितां कोर्टांत फिर्याद चालूं शकत नाहीं. कारण 'कॉमनलॉ' मध्यें प्रधानमंडळ येत नाहीं, व प्रत्यक्ष कायदा म्हणावा तर प्रधानमंडळासंबंधीं स्टॅटयूट नाहीं. येऊन जाऊन संकेत आहे! तो दोनशें वर्षें अमलांतहि आहे, तथापि त्याच्या आधारावर कोणाला न्यायकोर्टांत फिर्याद करून प्रधानमंडळाला हाकून लावितां येत नाहीं. त्यांना मूळ नेमणाऱ्या राजानेंच त्यांना बडतर्फ केलें पाहिजे. पण ज्या इतर देशांत प्रधानमंडळाच्या कारभारासंबंधीं प्रत्यक्ष कायदा आहे तेथें न्यायकोर्टांत जाऊन त्याची बडतर्फी मिळवितां येतें. उद्यां हिंदुस्थानांत स्वराज्यघटनेचा कायदा झाल्यास त्यांत प्रधानमंडळासंबंधानें स्पष्ट कलमच घालावें लागेल. त्या संबंधानें पूर्वीची रूढी किंवा संकेत नाहीं.

(७४) राज्यघटना व मनुष्यदेह

राज्य म्हटलें म्हणजे त्याला शरीर आहे, प्रकृती आहे. कोणत्याहि भौतिक शरीराप्रमाणें राज्याच्याहि शरीराची रचना सामान्यतः ठरल्यासारखीच असते. नुसता मानवअस्थींचा सापळा समग्र जोडून उभा केला असतां, तो

नगर वाचनालय सातारा
दाखल नं ग्रंथानुक्रमांक
किंमत — पाने

मूळचा मनुष्य, देहधारी व जिवंत असा, जगांतल्या कोणत्या देशाचा होता हें सांगणें कठीण. डोकें, तोंड, जबडा, नाक वगैरेंच्या मोजमापावरून अलीकडे शास्त्रज्ञांनीं मानवकुळ ओळखण्याचे कांहीं नियम बांधलेले असून, मनुष्य कोणत्या देशांतील असावा याविषयीं कल्पना चालविण्यास त्यांपासून अगदीं स्थूलपणानें मदत होते. परंतु, खरोखर नक्की असें कांहींच सांगतां येत नाहीं. याचा अर्थ मनुष्यदेह हा मुळांत सर्व जगभर रचनेच्या दृष्टीनें सारखाच आहे. सर्व अवयवांची ठेवण एकच, तशीच त्यांची संख्या. पण या मूळच्या सांगाड्यावर मांस, स्नायू, रुधिर, त्वचा वगैरेंचे थर पसरत गेले म्हणजे हळुहळु विषमता प्रगट होऊं लागते. आणि शेवटीं तोंडाकडील भागाची रचना पूर्ण झाली म्हणजे तर स्पष्टीकरण इतकें होतें, भिन्नता व विषमता इतक्या परमावधीला जाऊन पोंचतात, कीं जगांतील कोट्यवधी माणसांत एक व्यक्ति तंतोतंत दुसऱ्यासारखी आढळणें अशक्य होतें. एकाच आईच्या उदरांतून आलेल्या दोन जुळ्या भावंडांचें चेहरेहि हुबेहुब एकासारखे एक नसतात. मग जगांतील दूरदूरच्या भागांतील माणसांचे चेहरे एकसारखे कसे असणार ! (१) सगळ्या मानव जातीचा मूळचा हाडांचा सापळा एकाच प्रकारचा, पण (२) शेवटीं एका व्यक्तीसारखी दुसरी व्यक्ति असूं शकत नाहीं—या दोन गोष्टी एकत्र केल्या असतां विधात्याचें सृष्टिचातुर्य लक्ष्यांत येतें. आणि समता संभाळून पृथक्पणाची ओळख पटण्याइतकी विषमता उत्पन्न करणें, हाच त्या सृष्टिचातुर्यांतील मुख्य भाग होय असें मनाला वाटू लागतें.

(७५) घटनेचा लिंगदेह

राज्यघटनेला मनुष्यदेहाचा दाखला दिला असतां, वरील गोष्टीचें मर्म राज्यघटना या वस्तूला कसें लावतां येईल याची कल्पना सहज होते. आणि ती अशी कीं, जगांतील कोणत्याहि राष्ट्रांत राजा व प्रजा यांची मूलभूत कल्पना, तसेंच त्या दोघांमधील संबंधाची मूलभूत कल्पना, एकच आहे. पण प्रत्यक्ष तपासणीच करूं लागल्यास असा अनुभव येतो कीं परिस्थितीप्रमाणें राजधर्म व प्रजाधर्म यांचें स्वरूप राज्यकारभाराच्या द्वारें इतकें कांहीं वेगवेगळें बनलेलें असतें कीं, कोणत्याहि एका राष्ट्रांतील

राज्यघटना दुसऱ्या राष्ट्रांतील राज्यघटनेशीं तंतोतंत मिळू शकत नाहीं. नुसती ओठाची ठेवण किंवा डोळ्याचा रंग एवढ्यावरून मनुष्याचा स्वभाव वेगवेगळा ओळखतां येतो त्याप्रमाणें, प्रत्येक राष्ट्राच्या राज्यघटनेमध्यें अशी कांहींना कांहीं तरी विलक्षणपणाची बाब असतेच कीं, तिच्या योगानें त्या घटनेचा स्वभाव व प्रकार इतरापासून वेगळा दिसून यावा. इंग्रजींत 'स्पिरिट' किंवा 'जीनियस' याचा वाचक म्हणून लिंगदेह हा संस्कृत शब्द घेतला तर असें म्हणतां येईल कीं, प्रत्येक राष्ट्रांतील राजकीय समाजाचा लिंगदेह वेगवेगळां आहे. समग्र राज्यघटनेला समर्पक असा पारिभाषिक शब्द संस्कृतांत बनलेला नाहीं. तो आतां नवीन बनवून रूढ करावयाचा आहे. इंग्रजींत राज्यघटनेला कॉन्स्टिट्यूशन हा शब्द लावतां येतो. पण त्या शब्दाचा अर्थ कालांतरानें खुद्द इंग्लंडांतच बदललेला असून, निरनिराळ्या देशांत तर त्या शब्दाला निरनिराळेच अर्थ आहेत.

(७६) घटना शब्दाचे रूढार्थ

राज्यघटनेला मनुष्यदेहाची जी उपमा वर दिली आहे ती अगदीं आधुनिक आहे असें नाहीं. कारण दोन हजार वर्षांपूर्वी सिसेरो या रोमन राज्यशास्त्रविशारदानें राज्यघटनेला 'कान्स्टिट्यूशिओ' हा शब्द लावलेला होता; व तोच शब्द मनुष्याच्या शरीराला व राज्यघटनेला अशा दोहींनाहि रोमन भाषेंत लावला जातो. पुढें खुद्द रोममध्येंच त्या शब्दाचा अर्थ वरिष्ठ राजसत्तेनें केलेल्या एकंदर कायदेकानूंचा भारा किंवा गाठोळें असा होऊं लागला. म्हणजे हल्लीं 'कोड' हा शब्द इंग्रजी व फ्रेंच या भाषेंतून वापरला जातो त्या अर्थानें कॉन्स्टिट्यूशन हा शब्द रोममध्यें वापरला जाई. इंग्रजी कायदेपंडितांनीं तोच शब्द पुढें घेतला. मात्र त्यांच्याकडून त्याचा अनेक रीतीनें उपयोग करण्यांत आला. बाराव्या शतकांतील कॉन्स्टिट्यूशन्स ऑफ क्लॅरेंडन याचा अर्थ "पूर्वी आलिखित असलेल्या कायदेकानूंचा राजानें करविलेला अधिकारयुक्त संग्रह" असा आहे. इंग्रजींतील 'असाईज' 'चार्टर' 'स्टॅट्यूट' 'ऑर्डिनन्स' हे शब्दहि असेच संग्रहवाचक आहेत.

(७७) घटनेला महत्त्व येण्याचीं कारणें

पुढें अठराव्या शतकांत कॉन्स्टिट्यूशन या शब्दाला विशेष महत्त्व प्राप्त झालें. कारण इंग्लंडखेरीज इतर सर्व राष्ट्रांतील प्रजेनें बंडें करून, दंगाधोपा करून, किंवा इतर रीतीनें राजावर चढाई व मात करून, राजधर्म व प्रजाधर्म यांचे पूर्वी जे अलिखित असे कायदे होते ते लिहून काढून जाहीर करण्याला राजे लोकांना भाग पाडलें. आणि अशा रीतीनें लिहून काढवून जाहीर केलेल्या कायद्यांत प्रजेच्या हक्कासंबंधींचे जे नियम होते त्यांचाच विशेषतः उल्लेख होता. याचें कारण उघडच आहे. तें असें कीं, राजा हा अनादि कालापासून सर्व अधिकारांचें व हक्कांचें उगमस्थान असून, त्यांतून जेवढें काढून व तोडून राजा प्रजेला देईल तेवढेच हक्क प्रजेचे अशी समजूत होती. यामुळें राज्यघटना लेखी नसली तरी राजाचें कांहींच विघडत नसे. कारण त्यामुळें राजानें कसें वागावें याला कांहींच धरबंध पडत नव्हता. पण आपले अधिकार व हक्क प्रजेला लेखी सनदांनीं मिळवितां आले तर त्या आधारावर मात्र प्रजेला राजाशीं सनदशीर रीतीनें भांडतां झगडतां येई. विशेषतः राज्यांतील वरिष्ठ न्यायकोर्टांचे व न्यायदानाचे अधिकार राजा मानीत असला तर ती सनद न्यायकोर्टापुढें दाखल करून, राजानें केलेली अमुक एक गोष्ट ही न्यायाची आहे कीं अन्यायाची आहे सांगा! असा निर्णय प्रजेला लावून घेतां येतो. यामुळें लेखी हक्कांच्या सनदेबद्दल (म्हणजे कॉन्स्टिट्यूशनबद्दल) युरोपखंडांतील प्रजेनें चळवळ केली; व पूर्वी एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें, सन १८४८ च्या सुमारास बहुतेक राष्ट्रांत राजांनीं जुन्या अलिखित सनदा तरी लेखी करून दिल्या, किंवा जुन्या सनदा लेखी असल्या तर त्या वाढवून दुरुस्त करून दिल्या. खुद्द इंग्लंडमध्यें राजाच्या अधिकाराला नियंत्रण घालण्याची चळवळ झाली पण त्यांत नवीन लेखी कॉन्स्टिट्यूशन किंवा राज्यघटना करून देण्याची मागणी नव्हती. लोकांचें म्हणणें असें होतें कीं, "राज्यघटना नवीन लेखीच करून पाहिजे असें नाहीं; परंतु पूर्वपरंपरेनें जे हक्क आम्हाला मिळालेले आहेत असें आम्हीं समजतों त्यांचा उपमर्द राजाकडून होतो तो न व्हावा." कसेंहि असलें तरी कॉन्स्टिट्यूशन या शब्दाचा अर्थ, इंग्लंडांत इतका

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
राज्यसंस्थांच्या घटना व वर्गीकरण वाचनालय, सातारा

अनिश्चित होता किंवा आहे कीं, खालीं दिलेली अगदीं परस्परविरोधी अशीं दोन विधानें या मुद्यावर आढळतात. १७व्या शतकांत लॉर्ड चेस्टरफिल्ड यांनें असें लिहिलें आहे कीं, "England is the only monarchy in the world, that properly can be said to have a constitution." पण यानंतर १०० वर्षांनीं डी टोकेव्हिली या फ्रेंच राज्यशास्त्रविशारदानें इंग्लंडच्या राज्यघटनेविषयीं लिहितांना असें म्हटलें आहे कीं, "England was the only country which had got *no* constitution at all." पण अशा रीतीनें 'constitution' या शब्दाची फजिती झाली तरी वरील दोन्हीं विधानें आपापल्यापरीनें खरीं असून त्यांचा समन्वय करितां येतो.

(७८) इतक्या वैचित्र्याचें कारण

जगांत राज्यघटना पूर्वी कधीं अगदीं सोळाआणे एकाच नमुन्याच्या नव्हत्या व हल्लीं तर नाहींतच नाहींत. असलाच तर त्यांच्यांत पूर्वीच्या काळींच अधिक सारखवटपणा होता. याचें कारण समाजाची शारीरिक व मानसिक रचना पूर्वीच्या काळीं हल्लींहून अधिक सोपी साधी होती. राज्यांत सत्ताधारक एकच, व आज्ञाधारकांचीहि संख्या थोडी, कारण राज्याचा मुलूख थोडा. हल्लीं राज्यांचा स्थलविस्तार बेसुमार वाढला आहे. तसाच त्यातील लोकसंख्येचाहि. यामुळें त्यांत राज्यांचे उपराज्यांचे नमुने फार निरनिराळे. पृथ्वीचें क्षेत्रफळ ५२३ लक्ष चौरस मैल आहे. पण त्यांतल्या ११५ वर ब्रिटिश साम्राज्य, ८६ वर रशियन साम्राज्य, ४२ वर चिनी साम्राज्य व ३५ वर अमेरिकन साम्राज्य पसरलें आहे. म्हणजे अवघ्या चारच राज्यांत मिळून या ५२३ पैकीं २७८ लक्ष चौरसमैल खर्ची पडले आहेत. एवढ्या मोठ्या राज्यांचे नमुने बाहेर दिसायला किंवा आंतल्या कारभाराला सर्व सारखे असणें शक्यच नाहीं. अगदीं अंगठीच्या खडयाएवढें राज्य ही कविकल्पनेची अतिशयोक्ति झाली! पण "चार वेशींच्या आंतले व एकाच अखंड तटबंदीच्या प्राकारांतलें" असें वर्णन करण्यासारखीं राज्यें प्राचीनकाळीं होतीं तरी त्यांतहि एकच नमुना फार काळ टिकला नाहीं, तर मग वरच्यासारख्या मोठ्या राज्यांत तो कोठून टिकणार!

(७९) जो पहावा तो वेगळाच नमुना

राज्यांच्या उत्पत्तीच्या कल्पना व प्रकार जर एकाच नमुन्याचे नाहींत, तर त्यांच्या प्रौढ दशेच्या व तारुण्याच्या म्हणजे सुस्थितीच्या व भरभराटीच्या काळांतले नमुने एकाच प्रकारचे कसे राहतील ? दिसण्यांत सत्ताधारी एक असला तरी त्याचे अंशभागी कितीतरी निरनिराळ्या स्वभावाचे व निरनिराळ्या पात्रतेचे असतात ! तसेंच दिसण्यांत आज्ञाधारक अशी एकच प्रजा एखाद्या राज्यांत दिसली तरी, सत्तेचा शक्य तेवढा मोठा अंश आपल्या हातीं यावा ही त्या प्रजेतल्या विविध वर्गांची आकांक्षा असल्यामुळें त्यांचा सतत प्रयत्न त्या दिशेनें सुरू असतो. अर्थात् राज्यसत्तेच्या शरीरांत कोठें खळगे पडलेले तर कोठें टेंगळें उठलेलीं दिसतात. याचा अर्थ नमुना बिघडत असतो, बदलत असतो. पत्र्याचीं भांडीं किंवा शाङ्कूचे गणपति एकाच दाबांतून व छापांतून काढतां येतात. तरी त्यांत कोण वैचित्र्य ? गणपतींच्या चित्रांचें प्रदर्शन पहा म्हणजे कळून येईल ! तसेंच मोटारींचे नमुने पन्नास, तर त्यांच्या इंजिनाच्या तोंडाशीं पाण्याचे नळांवर बसविलेल्या झाकणाचे नमुने दहा हजार तरी असतील ! राज्यें हीं जिवंत माणसें आपल्या सुखाकरितां बनवितात. तेव्हां इच्छा व अभिरुची यांच्या चळवळींतून वळवळींतून अनेक नमुने निघणारच !

(८०) वर्गवारीचीं नावें थोडीं व ठराविक असणार

राज्यसंस्थाचें वर्गीकरण आपण करितों तें केवळ लहानमोठेपणावरून न करितां मुख्यतः त्याच्या बाह्यस्वरूपावरूनच म्हणजे घटनेवरून करितों व तसें करण्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. हें बाह्यस्वरूप जोंपर्यंत टिकून असतें तोंपर्यंत त्याला ठराविक वर्गवारीचें नांव द्यावें लागतें. बाह्य स्वरूप कायम राहून आंतल्या व्यवस्थेंत सत्ता आज एकाच्या हातीं अधिक तर उद्यां दुसऱ्याच्या हातीं अधिक असें होत असतें. पण त्यामुळें नांव बदलतां येत नाहीं. शिवाय हे फरक केव्हां इतके सूक्ष्म तर केव्हां इतके अस्थिर असतात कीं कदाचित् दर शेपन्नास वर्षांनीं तत्सितिदर्शक वेगळें नांव हुडकून बनवून द्यावें लागेल. पण इतकी वर्गवारीचीं नांवें तरी कोठून आणावयाचीं ? विमानांत "हवेहून जड व हवेहून हलकीं" या नावानेंच

मुख्य वर्गवारी केली जाते. पण या प्रत्येक वर्गात इतर कितीतरी वर्ग आहेत, जसें एकपंखी, दुपंखी, सीप्लेन, सेलप्लेन, बायप्लेन, ग्लाइडर, इत्यादि. मोटारींची अंतर्रचना किती वेगवेगळी आहे. पण नुसत्या मोटार बनविणाऱ्या कंपन्यांच्या नांवानेंच त्यांची वर्गवारी बनते. त्यांच्या रचनेंतील फरक एका शब्दानें, एका शब्दसमूहानें, सांगतां येत नाहीं तर त्याकरितां वर्णनात्मक वाक्यांच्या वाक्यें छेदकच्या छेदक खर्ची घालावें लागतात! आगबोटींचेंहि तसेंच. स्क्रू टरबाईन असल्या दोन चार पारिभाषिक शब्दानीं त्यांची वर्गवारी संपते.

(८१) उचित परिभाषेचें दारिद्र्य

राज्यसंस्थेची वर्गवारी दर्शविणारे दहा पांच सुटसुटीत शब्द तरी इंग्रजी भाषेंत आहेत. मराठींत तेहि नाहींत. कारण त्या विषयाची मराठींत शास्त्रीय चर्चाच अद्यापि नाहीं. इंग्रजी भाषेतले हे शब्द देखील पुष्कळसे जुन्या ग्रीक भाषेवरून घेतलेले आहेत. डेस्पॉटसी, मॉनर्की, ॲरिस्टॉक्रसी, ऑलिगार्की, डेमॉक्रसी, टिमॉक्रसी, ब्युरॉक्रसी, थिऑक्रसी, रिपब्लिक, इ० पण यांपैकीं बरेचसे शब्द आज उपयोगांतून गेलेले असून मॉनर्की, डेमॉक्रसी हेच काय ते दोन शब्द व दोन वर्ग मुख्य असून पोटभेद सर्व कांहींना कांहीं विशेषण लावूनच बनवावे लागतात. जसें राजा उग्रबल असला तर नुसता मॉनर्की किंवा डेस्पॉटसी हा शब्द लावावयाचा. आणि राजा हीनबल असून प्रजा उग्रबल असेल तर लिमिटेड हें विशेषण 'मॉनर्की'च्या मागें लावावयाचें. राज्याचा विस्तार मोठा व त्याचे घटक निरनिराळ्या दर्जाचे असले तर त्यांचा संयोग दाखविणारा शब्द फेडरल हें विशेषण आणि एकतंत्रीपणा दाखविणारा शब्द युनिटरी हेंहि विशेषणच आहे. त्याच्यापुढें गव्हर्नमेंट हें नाम लावावें तेव्हां शब्द खरा पुरा झाला. प्रजासत्तेचा उत्कर्ष दाखविणारा शब्द डेमॉक्रसी. पण यानें राजा मुळींच नाहीं असा बोध हटकून होत नाहीं, म्हणून त्याकरितां रिपब्लिक हा शब्द योजतात. इंग्लंडांत डेमॉक्रसी आहे पण रिपब्लिक नाहीं.

(८२) नावें व वस्तुस्थिति यांत फरक असतो

पूर्वीच्या काळीं राज्याधिकाराची वाटणी निरनिराळ्या विभागांत हल्लीं इतकी झालेली नसे. तथापि होते तेच भेद निखालस स्पष्ट व तुटक होते. ॲरिस्टॉटलच्या वेळीं पर्शिया व मॅसिडोनिया हीं राजशासित राज्यें अशीं होतीं कीं, तेथें खरोखरच ' राजा बोले दळ हाले ' ही म्हण अक्षरशः खरी ठरे. ग्रीसमध्यें 'एकलेशिया' हा नगरसंघ इतका प्रबळ होता कीं एकट्या दुकट्या लहानसान नगरसंस्थानानें त्या संघाविरुद्ध तोंडांतून ब्र काढण्याची छाती नव्हती. याच्या उलट इंग्रज राष्ट्र घ्या. त्यांतून अमेरिका आयर्लंड हीं तुटून निघालीं व स्कॉटलंड जोडले गेलें असलें तरी (ऑलिव्हर क्रॉमवेलची वीस वर्षांची कारकीर्द वगळली असतां) इंग्लंडचें राज्य हें राजशासित आहे. कारण राज्याचा राजा कधींहि नाहींसा झाला नाहीं. त्याच्या जोडीला आज निदान आठशे वर्षें पार्लमेंट सभा आहे. आणि असें एकहि शतक गेलें नाहीं कीं त्यांत केव्हां राजानें, केव्हां उमरावसभेनें, तर केव्हां लोकांनीं डोकें मध्येंच एकदम वर काढून सत्ताविभागणीच्या ताजव्याला जोराचा धक्का देऊन तो उलथापालथा करण्याच्या बेतांत आणिला नाहीं. पण आठशे वर्षें इंग्लंडचें राज्य मॉनर्की, फार तर लिमिटेड मॉनर्की, या सदराखालींच पडत आहे. विधवेच्या कपाळाचें कुंकू प्रत्यक्ष पुसलें जाईपर्यंत ती सधवाच. नवरा नापत्ता झाला असला तरी ती सुवासिनीच !

(८३) याविषयीं कांहीं उदाहरणें

जर्मनी पोर्तुगाल स्पेन ऑस्ट्रिया इत्यादि कांहीं राष्ट्रें थोड्याच वर्षांपूर्वी मॉनर्की (राजशासित) या सदरांत पडत होतीं. आतां तीं लोकशासित (रिपब्लिक्स) झालीं आहेत. पण त्यांच्या अंतर्व्यवस्थेंत अधिकाराची वाटणी सर्वस्वी वरील नव्या नांवाला शोभण्यासारखी नाहीं. आणि फ्रान्स व अमेरिका या नमुनेदार समजल्या जाणाऱ्या रिपब्लिक्समध्यें लोकसभेच्या मानानें सेनेट (वरिष्ठ) सभा थोड्या लोकांची असून, स्वतः दोहो राज्यांचे अध्यक्ष तर इतके मोठे सत्ताधारी आहेत कीं राजशासित म्हटल्या जाणाऱ्या इंग्लंडच्या बिचाऱ्या दुबळ्या राजापेक्षांहि त्यांना अधिक प्रभावी सत्ता आहे. तशीच अमेरिकन सेनेटला इंग्लंडच्या हाऊस ऑफ लॉर्ड्सपेक्षां अधिक

सत्ता आहे. इटालींत राजा आहे आणि पार्लमेंटहि आहे. पण प्रत्यक्ष सत्ता एकट्या मुख्य प्रधानाच्या हातीं आहे. कारण 'राजा व्हिक्टर एमॅन्युअल बोले दळ हाले' असें नसून 'प्रधान (टिक्टेटर) मुसोलिनी बोले दळ हाले' हे शब्द इटालींत आज खरे आहेत. मुसोलिनीच्या फॅसिस्ट पंथाच्या लोकांना निवडणुकींत चारशे उमेदवार उभे करितां येतात व मतदारांनीं यांतील निम्याहून अधिक पसंत न केले तर एक महिन्यानें फेर निवडणुकी व्हाव्या लागतात.

(८४) नवें स्थूल, फरक सूक्ष्म

राज्यसंस्थांचें वर्गीकरण इतकें अवघड होऊन बसण्याचें कारण त्या संस्था सजीव प्राण्याप्रमाणें, विकारक्षम, प्रगतिक्षम, परिवर्तनक्षम आहेत. निर्जीव पदार्थांचें वर्गीकरण सोपें असतें. पण राज्यसंस्था ही जर जिवंत माणसांचीच केव्हांहि असणार तर तीहि स्वतः जिवंत म्हणण्याला काय हरकत किंवा असली तर काय आश्चर्य? व्यक्तींची समष्टि बनली असतां व्यक्तिगुण तर नष्ट होत नाहींतच, पण कदाचित् समष्टीचे म्हणून कांहीं नवीन गुण तिजमध्यें प्रगट होत असू शकतील. नवीन गुण प्रगट होऊन फिरून समष्टीच्या स्वरूपांत फेरफार झाला म्हणजे तत्त्वतः फिरून वर्गीकरण बदलतें. पण लगेच नवें नांव कोठून आणावयाचें? म्हणून मग जुनेच शब्द वापरावयाचे. पण अर्थात् ते तंतोतंत जुन्या अर्थानें नाहीं; तर बदलेल्या लाक्षणिक अशा नव्या अर्थानें. शास्त्रांतील चमत्कारांच्या किंवा पदार्थांच्या मानानें शास्त्रपरिभाषेचे शब्द कोणत्याहि भाषेंत अपुरेच पडतात. बरें राज्यांतल्या एका घटकाची थोडीशी सत्ता गेली व दुसऱ्या घटकाला थोडी अधिक मिळाली, तर तो सूक्ष्मभेद दाखविणारीं, स्टेशनावरील माल जोखणारासारखीं शेर अच्छेरहि फरक दाखविणारीं यंत्रें कोठें मिळणार? तात्पर्य वर्गीकरण व नामकरण हें ज्ञानाचें साधन असलें तरी स्थूल शब्दांनींच निर्वाह करून घेणें प्राप्त आहे.

(८५) वर्गीकरणापुरती समानता

राज्यशास्त्रांत वर्गीकरण करितांना ज्याप्रमाणें मोठ्या राज्यांबरोबर अगदीं लहान अशा राज्यांचा परामर्ष घ्यावा लागतो म्हणून मागें सांगितलें

त्याचप्रमाणें सुधारलेल्या राज्याबरोबर अगदीं मागासलेल्या, प्राथमिक स्थितींतल्या, किंवा रानटी राज्यांचाहि परामर्ष घ्यावा लागतो. कारण राज्य म्हणजे राज्य. त्याची श्रीमंती गरीबी सुधारणा कुधारणा ही त्याची त्याला व त्यांतल्या प्रजेला! राज्य–शास्त्र्याला त्याचें काय होय? गरीब व कुरूप झाला तरी तो, श्रीमंताप्रमाणें व सुस्वरूपांप्रमाणें मनुष्यच. त्याला मान कमी असेल व त्याचें अनुकरण कोणीहि करणार नाहीं. परंतु खानेसुमारींत, न्यायकोर्टांत, व कायद्याच्या दृष्टीनें सर्व माणसें सारखींच. शरीराची ठेवण लहानमोठी असली तरी इंद्रियें तींच व तितकींच असणार. राज्यसंस्था कशा असाव्या असलें तात्त्विक विवेचन करणें व उत्कृष्ट तेवढेच नमुने कल्पनेनें सुचविणें हाच राज्यशास्त्राचा हेतु मानला तर, त्या शास्त्रांत असल्या लहान मागासलेल्या रानटी राज्यसंस्थांना जागा मिळणार नाहीं. पण समाजशास्त्र म्हटलें म्हणजे समाजांत माणसें आहेत तशीं घेऊनच चाललें पाहिजे. माणसें देवदूतासारखी किंवा देवासारखीं सर्वगुणसंपन्न असावीं असें म्हटलें तरी ते गुण कोणते हें सांगणें सोपें आहे. पण त्याचा काय उपयोग? मानवी जग म्हणजे बोलून चालून अपूर्णावस्थेंतल्या माणसांचें जग.

(८६) घटनेवरून वर्गीकरणाचीं उदाहरणें.

[अ] केवळ अनियंत्र राजसत्ता चालते अशी राज्यें.

(१) अबिसिनिया (२) अफगाणिस्थान (३) मोनॅको (४) मोरोक्को (५) ओमान (६) हिंदी संस्थानें इ०.

[आ] संमिश्र—राजसत्ताक व प्रजासत्ताक (प्रकार १ ला.)

(१) बेल्जियम (२) बल्गेरिया (३) डेन्मार्क (४) इटाली (५) जपान (६) नेदरलँड्स (७) नॉर्वे (८) रुमेनिया (९) स्वीडन (१०) युनाइटेड किंग्डम म्हणजे इंग्लंड, स्कॉटलंड, उत्तर आयर्लंड (११) ऑस्ट्रेलिया (१२) कॅनडा इ०. वरील सर्व राष्ट्रांत पार्लमेंटसभा आहेत.

[इ] संमिश्र—राजसत्ताक व प्रजासत्ताक (प्रकार २ रा.)

(१) लक्सेंबर्ग (२) मॉन्टिनीग्रो (३) सयाम (४) सर्विया इ०.

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
राज्यसंस्थांच्या घटना-सर्वोकालय, सातारा

वरील राष्ट्रांत पार्लमेंट नाहीं, पण राजानें प्रजेला सनद (कॉन्स्टिटयूशन) देऊन स्वतःवर बंधन घालून घेतलें आहे.

[ई] पूर्ण प्रजासत्ताक (रिपब्लिक).

(१) रशिया (२) टर्की (३) ग्रीस (४) पोर्तुगाल (५) स्पेन (६) जर्मनी व प्रशिया (७) ऑस्ट्रिया (८) फ्रान्स (९) चीन (१०) स्विट्झरलंड (११) बोलिव्हिआ (१२) चिली (१३) कोलंबिआ (१४) कोस्टारिका (१५) क्यूबा (१६) इक्वेडोर (१७) ग्यूएटेमला (१८) हयाटी (१९) होंडूरास (२०) लिबेरिया (२१) निकारागुआ (२२) पनामा (२३) पॅराग्वे (२४) पेरू (२५) सालवाडोर (२६) सँटो डोमिंगो (२७) युराग्वे (२८) आरजेंटिना (२९) ब्राझिल मेक्सिको (३०) व्हेनिझुअेला (३१) युनाइटेड स्टेट्स (अमेरिका) इ०.

वरील राष्ट्रांत पार्लमेंटें आहेत व त्यांचे अध्यक्ष हेच मुख्याधिकारी आहेत.

आज बहुतेक सर्व राज्यांत (अ वर्गांतील राज्यें वगळून) घटनेदाखल लेखी सनदा किंवा पार्लमेंटनें मंजूर केलेले कायदे आहेत. त्या सनदांप्रमाणें किंवा कायद्याप्रमाणें अमल होत असतो. पण जेव्हां उत्पात क्रांति वगैरे होते तेव्हां राजा किंवा अध्यक्ष हा ती सनद किंवा तो कायदा बाजूला गुंडाळून ठेवून एकतंत्री अमल चालवितो, अथवा बंड होऊन प्रजा किंवा लष्करी अधिकारी हे राजा किंवा अध्यक्ष यांना गुंडाळून ठेवून नव्या निवडणुकी किंवा घटना बनवितात.

वरीलप्रमाणें कांहीं उदाहरणें केवळ स्पष्टीकरणाकरितां घेतलीं आहेत. पण एकंदर जगांतील राज्यांच्या घटनांचे सामुदायिक स्वरूप लक्षांत यावें म्हणून एक सबंधच्यासबंध कोष्टकच खालीं देतों म्हणजे त्यावरून राज्यघटनांचे कोणते प्रकार आज विद्यमान आहेत हें लक्षांत येईल.

निरनिराळ्या राष्ट्रांतील राज्यांच्या

राष्ट्र	राजधानी	क्षेत्रफळ चौ. मै. (हजार)	लोकवस्ती लक्षसंख्या	राजा किंवा मुख्य सत्ताधीश
अल्बेनिया	तिराना	१७·३	८·३	प्रेसिडेंट
अर्जेंटिना	ब्यूनॉस,आयर्स	११५३	१०३	प्रेसिडेंट
ऑस्ट्रेलिया	कॅन्बेरा	३०६५	६१	गव्हर्नर-जनरल
ऑस्ट्रिया	व्हाएन्ना	३२	६५	प्रेसिडेंट
बेल्जियम्	ब्रुसेल्स	१२	७८	राजा
बोलिव्हिया	सुक्रेलापाज्	५१४	२९	प्रेसिडेंट
ब्राझिल	रियोडिजानिरो	३२८५	३६८	प्रेसिडेंट
बल्गेरिया	सोफाया	३९	५४	राजा
कॅनडा	ओटावा	३७९७	९५	गव्हर्नर-जनरल
चिली	सॅन्टिआग्रो	९०	४२	प्रेसिडेंट
चीन	पेकिन	४२७८	४४४६	सेनापति
चीन	नानकिन			पोलिटिकल कौन्सिल (कोमिन्टन)
कोलंबिया	बोगोटा	४४०	६६	प्रेसिडेंट
कोस्टारिका	सान्जोसे	२३	५	प्रेसिडेंट
क्यूबा	हॅव्हना	४४	३४	प्रेसिडेंट

घटनांची माहिती.

लोकसभा (वरिष्ठ)		लोकसभा (कनिष्ठ)		राजकीयपक्षांचीं नांवें
निवडलेले	नेमलेले	निवडलेले	नेमलेले	
१२	६	६०	०	एकच सरकारी पक्ष
३०	०	१५८	०	(१) कॉंझर्वेटिव्ह, (२) रॅडिकल, (३) सोशिॲलिस्ट
३६	०	७५	०	(१) नॅशनॅलिस्ट, (२)मजूर,(३)देशी
५०	०	१६५	०	(१) खिश्चन सोशिॲलिस्ट (२)सोशल डेमोक्रॅट, (३) किसान वर्ग
१५३	०	१८७	०	(१) कॅथोलिक, (२) सोशिॲलिस्ट (३) लिबरल
२८	०	७२	०	(१) लिबरल, (२) युनिआनिस्ट (३) रिपब्लिकन
६३	०	२१२	०	(१) कॉन्झर्व्हेटिव्ह रिपब्लिकन, (२) डेमोक्रॅटिक.
२७३	०	वेगळी सभा नाहीं		(१) डेमोक्रॅटिक, (२) शेतकरी, (३) नॅशनल लिबरल.
०	९६	२४५	०	(१) कॉन्झर्व्हेटिव्ह, (२) लिबरल, (३) प्रोग्रेसिव्ह.
४५	०	१३५	०	(१) रॅडिकल्, (२) कॉन्झर्व्हेटिव्ह, (३) लिबरल.
०	०	०	०	
०	५२	वेगळी सभा नाहीं		(१) शांततावादी, (२) सुधारणावादी (३) कम्युनिस्ट.
६८	०	११२	०	(१) कॉन्झर्व्हेटिव्ह, (२) लिबरल.
४३	०	वेगळी सभा नाहीं		(१) नॅशनॅलिस्ट, (२) रिपब्लिकन.
२४	०	१२७	०	(१) कॉन्झर्व्हेटिव्ह, (२) लिबरल्.

निरनिराळ्या राष्ट्रांतील राज्यांच्या

राष्ट्र	राजधानी	क्षेत्रफळ चौ. मै. (हजार)	लोकवस्ती लक्षसंख्या	राजा किंवा मुख्य सत्ताधीश
चेकोस्लोव्हाकिया	प्राग	५४	१४३	प्रेसिडेंट
डेन्मार्क	कोपेनहेगेन	१६	३४	राजा
डोमिनिका	सॅन्तोडोमिंगो	१९	१०	प्रेसिडेंट
इक्वेडोर	किटो	११६	१५	प्रेसिडेंट
इजिप्त	केरो	३८३	१४१	राजा
एस्टोनिया	टॅलिन्	१८	११	प्रेसिडेंट
फिनलंड	हेल्सिंगफोर्स	१४९	३५	प्रेसिडेंट
फ्रान्स	पॅरिस	२१२	४०७	प्रेसिडेंट
जर्मनी	बर्लिन	१८१	६३१	प्रेसिडेंट
ग्रेटब्रिटन	लंडन			राजा
ग्रीस	अथेन्स	५०	७०	प्रेसिडेंट
ग्वायटेमाल	ग्वायटेमाल	४८	२०	प्रेसिडेंट
हायाती	पोर्टऑप्रिंस	१०	२०	प्रेसिडेंट
होंडुरास	तेग्युसीगाल्पा	४६	७	प्रेसिडेंट

घटनांची माहिती.

लोकसभा (वरिष्ठ)		लोकसभा (कनिष्ठ)		राजकीयपक्षांचीं नांवें
निवडलेले	नेमलेले	निवडलेले	नेमलेले	
१५०	०	३००	०	सात आठ राजकीय पक्ष आहेत. (मुख्य पक्ष शेतकरी) दुसरा कम्युनिस्ट.
७६	०	१४९	०	(१) लिबरल, (२) सोशल डेमॉक्रॅट, (३) कॉन्झरव्हेटिव्ह.
१२	०	३२	०	(१) नॅशनल, (२) प्रोग्रेसिव्ह.
३२	०	४८	०	(१) लिबरल, (२) कॉन्झरव्हेटिव्ह.
१२१	०	२१०	०	(१) वफाद, (२) लिबरल.
१००	०	वेगळी सभा नाहीं		(१) शेतकरी, (२) सोशिॲलिस्ट, (३) वसाहती.
२००	०	वेगळी सभा नाहीं		(१) सोशल डेमोक्रॅट, (२) शेतकरी, (३) स्वीडिश, (४) युनियन, (५) मजूर.
३१४	०	५६५	०	(१) रॅडिकल, (२) रिपब्लिकन व इतर तीन.
४९३	०	वेगळी सभा नाहीं		(१) सोशल डेमोक्रॅट, (२) राष्ट्रीय, (३) कम्युनिस्ट, इतर दोन तीन.
०	७४०	६१५	०	(१) कॉन्झरव्हेटिव्ह, (२) लिबरल, (३) मजूर.
२८७	०	वेगळी सभा नाहीं		(१) रेपब्लिकन, (२) रॉयलिस्ट, (३) नेमस्त, (४) कम्युनिस्ट.
६९	०	वेगळी सभा नाहीं		(१) डेमोक्रॅट, (२) प्रोग्रेसिव्ह, (३) युनियनिस्ट.
२१	०	वेगळी सभा नाहीं		पक्षभेद नाहीं.
४६	०	वेगळी सभा नाहीं		(१) नॅशनल, (२) लिबरल.

निरनिराळ्या राष्ट्रांतील राज्यांच्या

राष्ट्र	राजधानी	क्षेत्रफळ चौ. मै. (हजार)	लोकवस्ती लक्षसंख्या	राजा किंवा मुख्य सत्ताधीश
हंगेरी	बुडापेस्त	३५	८३	रीजंट
हिंदुस्थान	दिल्ली	१८०५	३१८९	बादशहा
आयर्लंड	डब्लिन	२६	२९	गव्हर्नर-जनरल
इटाली	रोम	११९	४०५	राजा
जपान	टोकियो	२६०	८३४	बादशहा
जुगोस्लेव्हिया	बेलग्रेड	९६	१२०	राजा
लॅट्व्हिया	रिगा	२५	१८	प्रेसिडेंट
लिबेरिया	मॉनरोव्हिया	४३	१५	प्रेसिडेंट
लिथ्यूॲनिया	कॉव्हनो	२१	२२	प्रेसिडेंट
मेक्झिको	मेक्झिको	७६७	१४२	प्रेसिडेंट
नेदरलँड्स्	आमस्टरडॅम् (हेग)	१२	७४	राणी
न्यूफाउंडलंड	सेंटजॉन	१६२	२	गव्हर्नर
न्यूझीलंड	वेलिंग्टन	१०३	१४	गव्हर्नर-जनरल

लोकसभा (वरिष्ठ)		लोकसभा (कनिष्ठ)		राजकीयपक्षांचीं नांवें
निवडलेले	नेमलेले	निवडलेले	नेमलेले	
१५२	९८	२४५	०	(१) युनियन,(२) खिश्चन नॅशनॅलिस्ट (३) सोशल डेमोक्रॅट.
३४	२६	१०३	४१	(१) नॅशनॅलिस्ट, (२) इन्डिपेन्डंट (३) युरोपियन, (४) मुसलमान
६०	०	१५२	०	(१) सरकारी, (२) पूर्णस्वराज्यवादी, (३) मजूर, (४) स्वतंत्र.
०	४३०	३९६	०	(१) लिबरल, (२) कॅथोलिक, (३) सोशिॲलिस्ट, (४) कम्युनिस्ट.
२२०	१८७	४६४	०	(१) मिनेसिटो, (२) सायुकाय, (३) कूराबू, (४) स्वतंत्र.
३१५	०	वेगळी सभा नाहीं		(१) रॅडिकल्, (२) क्रोट शेतकरी, (३) डेमोक्रॅटिक, (४) स्वतंत्र, (५) मुसलमान.
२००	०	वेगळी सभा नाहीं		(१) सोशल डेमोक्रॅटिक मजूर; (२) शेतकरी.
१०	०	२२	०	(१) व्हिग, (२) लोकपक्ष.
८५	०	वेगळी सभा नाहीं		(१) सोशल, (२) डेमोक्रॅट, (३) खिश्चन डेमोक्रॅट, (४) शेतकरी
५८	०	२७१	०	तत्वनिष्ठ पक्ष नाहीं.
५०	०	१००	०	(१) कॅथॉलिक, (२)सोशल डेमोक्रॅट (३) कॅलव्हिनिस्ट, (४) खिश्चन
०	२१	३६	०	(१) कॉन्झरव्हेटिव्ह, (२) लिबरल.
०	४२	८०	०	(१) सुधारणापक्ष (२) मजूर, (३) नॅशनॅलिस्ट.

निरनिराळ्या राष्ट्रांतील राज्यांच्या

राष्ट्र	राजधानी	क्षेत्रफळ चौ. मै. (हजार)	लोकवस्ती लक्षसंख्या	राजा किंवा मुख्य सत्ताधीश
निकारागुवा	मॅनॅग्युवा	५१	६	प्रेसिडेंट
नॉर्वे	ऑसलो	१२४	२६	राजा
पानामा	पानामा	३२	४	प्रेसिडेंट
पॅरॅग्वे	असन्शिअन्	६१	१०	प्रेसिडेंट
पर्शिया	तेहरान	६२८	१००	राजा (लोकनियुक्त)
पेरू	लिमा	५३२	५५	प्रेसिडेंट
पोलंड	वारसा	१४९	२९२	प्रेसिडेंट
पोर्तुगॉल	लिस्बन	३५	६०	सेनापति
रुमानिया	बुखारेस्ट	१२२	१७५	राजा
रशिया	मॉस्को	८१८७	१४६३	संयुक्त-अध्यक्ष मंडळ
साल्व्हाडोर	साल्व्हाडोर	१३	१६	प्रेसिडेंट
सायाम	बँगकॉक्	२००	९८	राजा
दक्षिण-आफ्रिका	प्रिटोरिया	४७१	७६	गव्हर्नर जनरल
स्पेन	माद्रिड	१९०	२२१	प्रेसिडेंट
स्वीडन	स्टॉक-होम	१७३	६०	राजा

घटनांची माहिती.

लोकसभा (वरिष्ठ)		लोकसभा (कनिष्ठ)		राजकीयपक्षांचीं नांवें
निवडलेले	नेमलेले	निवडलेले	नेमलेले	
२४	०	४३	०	(१) कॉन्झरव्हेटिव्ह, (२) लिबरल, (३) रिपब्लिकन.
१५०	०	वेगळी सभा नाहीं		(१) मजूर, (२) रॅडिकल्, (३) कॉन्झरव्हेटिव्ह, (४) शेतकरी.
४६	०	वेगळी सभा नाहीं		(१) लिबरल, (२) कॉन्झरव्हेटिव्ह.
२०	०	४०	०	(१) लिबरल, (२) रेपब्लिकन.
१३६	०	वेगळी सभा नाहीं		निवडणुकीच्या आयत्यावेळीं बनतील ते पक्ष.
३५	०	११०	०	(१) डेमोक्रॅटिक, (२) कॉन्स्टिटयूशनल
२११	०	४४४	०	(१) लोकपक्ष, (२) ज्यूइश्, (३) शेतकरी (४) ख्रिश्चन (याशिवाय अनंत पक्ष आहेत.
७०	०	१६१	०	(१) मॉडरेट, (२) नॅशनॅलिस्ट. (३) इन्डिपेन्डंट, (४) राजपक्ष.
२१९	०	३८६	०	(१) नॅशनल लिबरल, (२) शेतकरी, (३) हंगेरियन, (४) जर्मन.
४५०	०	१३५	०	(१) कम्युनिस्ट.
४२	०	वेगळी सभा नाहीं		तत्वनिष्ठ पक्ष नाहीं.
पात्रांचें राजमंडळ		प्रीव्ही कौन्सिल		राजकीय पक्ष नाहीं.
४०	०	१३५	०	(१) नॅशनॅलिस्ट, (२) दक्षिण आफ्रिकन, (३) मजूर.
१५०	०	२३०	०	(१) सोशल डेमोक्रॅट, (२) कॉन्झरव्हेटिव्ह, (३) स्वतंत्र, (४) शेतकरी.

निरनिराळ्या राष्ट्रांतील राज्यांच्या

राष्ट्र	राजधानी	क्षेत्रफळ चौ. मै. (हजार)	लोकवस्ती लक्षसंख्या	राजा किंवा मुख्य सत्ताधीश
स्वित्झर्लंड	बर्न	१५	३९	प्रेसिडेंट
तुर्कस्थान	अंगोरा	४९४	१३६	प्रेसिडेंट
यूरुग्वे	मॉंटेव्हिडियो	७२	१६	प्रेसिडेंट
व्हेनिझुएला	कॅव्हॅकस	३९३	३०	प्रेसिडेंट

टीप—एकट्या इंग्रजी साम्राज्यांतीलच वैचित्र्य पहा

इंग्रजी साम्राज्याच्या घटनेचें उदाहरण घेतल्यास त्यासंबंधीं खालील गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. हें साम्राज्य क्षेत्रविस्तारानें खुद्द इंग्लंडपेक्षां एक्याणव पट मोठे आहे. इंग्लंड हा त्याचा $\frac{१}{९०}$ अंश आहे! या साम्राज्याची लोकसंख्या बेचाळीस कोटी आहे. यांतील अवघे साडेपांच कोटी लोक वंशानें युरोपियन आहेत. साम्राज्याच्या घटकांचे सहा मुख्य गट होतात. (१) युरोपमधील—इंग्लंड, स्कॉटलंड, आईल ऑफ मॅन, चॅनल आयलंड्स, जिब्राल्टर, माल्टा, सायप्रस. (२) उत्तर अमेरिकेंतील कॅनाडा, न्यूफाउंडलंड, लाब्राडोर, ब्रिटिश ग्वायाना, होंडूरास, फॉकलंड बेटें, व बरम्यूडा. (३) आस्ट्रेलियांतील—ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, फिजी-

घटनांची माहिती.

लोकसभा (वरिष्ठ)		लोकसभा (कनिष्ठ)		राजकीयपक्षांचीं नांवें
निवडलेले	नेमलेले	निवडलेले	नेमलेले	
४४	०	१९८	०	(१) रॅडिकल डेमोक्रॅट, (२) सोशल डेमोक्रॅट (३) कॅथॉलिक (४)शेतकरी.
३१६	०	वेगळी स	भा नाहीं	लोकपक्षाशिवाय दुसरा पक्ष नाहीं.
१९	०	१२३	०	(१) भांडवलवाला, (२) कोलोरेडो.
४०	०	६८	०	मुख्य लष्करी सत्ता, पक्षभेद नाहीं.

न्यूग्वायना (४) आफ्रिकेंतील—नाताल, ट्रान्सवाल, केप कॉलनी, ऑरेंज-रिव्हर स्टेट, न्होडेशिया, नायजेरिया, सेंट हेलिना, मॉरिशिअस, व संरक्षित संस्थानें इ० (५) आशिया खंडांतील—हिंदुस्थान, सिलोन, हाँगकाँग, स्ट्रेट सेटलमेंट्स, मलाया संस्थानें, लॅन्युअन, बोर्निओ, सारावाक. (६) वेस्टइंडिआ बेटें—जमेका, बहामा, बारबेडॉस, त्रिनिदाद, टोबॅगो, विंडवर्ड व लीवर्ड बेटें इ० अशा या प्रचंड साम्राज्याच्या घटकांचे वर्गीकरण करणें फार कठीण आहे. पण त्याचे चार गट होतात. (१) जबाबदारीचें स्वराज्य मिळालेल्या वसाहती (२) अद्यापि तसलें स्वराज्य नसलेल्या पण कायदे कौन्सिलें असलेल्या (३) वसाहतमंत्र्याच्या अमलाखालच्या. (४) बादशहाच्या सत्तेखालचें पण कायदेकौंसिलें असलेलें हिंदुस्थान.

(८८) वैचित्र्यावरून बोध

निरनिराळ्या राष्ट्रांतील राज्यांच्या घटनांच्या माहितीचा हा तक्ता निरनिराळ्या पुस्तकांच्या आधारानें तयार करून दिला आहे. तो बारीक दृष्टीनें पहाणाराला फार बोधप्रद होईल असा भरंवसा आहे. कोठें क्षेत्रफळ पुष्कळच पुष्कळ व त्या मानानें लोकवस्ती फार कमी, तर कोठें क्षेत्रफळ बेताचें असून त्यांतील लोकवस्ती खूप दाट. राज्यांतील मुख्य सत्तेसंबंधानें असें दिसून येईल कीं आजच्या घटकेला फक्त बेलजिअम्, बल्गेरिया, डेन्मार्क, इजिप्त, ग्रेट ब्रिटन, इटाली, जुगोस्लेव्हिया, नेदरलँड्स, नॉर्वे, रुमानिया, सयाम व स्वीडन इतक्या राष्ट्रांत राजा हा मुख्य व अर्धनियंत्रित सत्ताधारी आहे. पर्शियाचा राजा हा अनियंत्रित सत्ताधारी असला तरी तो लोकनियुक्त आहे. ज्या देशांवर बादशहा राज्य करतो असे फक्त दोनच. एक हिंदुस्थान व दुसरा जपान. तथापि या दृष्टीनें या दोन देशांत सारखेपणा दिसला तरी जपानचा बादशहा हा सर्वस्वीं स्वकीय व राष्ट्रीय असा आहे. हिंदुस्थानचा बादशहा हा केवळ नांवाचा व परकी बादशहा असून सर्व कारभार त्याच्या नांवानें संयुक्त प्रधानमंडळ व प्रधानमंडळाच्या नांवानें खास हिंदुस्थानाकरितां नेमलेला एक स्टेट सेक्रेटरी करितो. वरील कोष्टकांत गव्हर्नर-जनरल असलेले असे देश पांच आहेत. त्या इंग्लंडच्या वसाहती होत. (न्यू फाउंडलँड हीहि एक वसाहतच आहे. पण तेथील सत्ताधाऱ्याला गव्हर्नर म्हणतात). हिंदुस्थानांतील मुख्य सत्ताधाऱ्यालाहि गव्हर्नर-जनरलच म्हणतात; पण हिंदुस्थान हें बादशहाच्या अमलाखालील असल्यामुळें येथील गव्हर्नर-जनरला व्हाइसरॉय म्हणजे राजप्रतिनिधि अशीहि पदवी आहे. वरील देश वगळले असतां बाकी सर्व देशांत आज लोकसत्ताक राज्यें आहेत; व त्यांच्या अध्यक्षांच्या जागीं 'सिव्हिलियन' अध्यक्ष आहेत. परंतु स्पेन, पोर्तुगॉल, चीन वगैरेसारख्या राज्यांत अजून लोकसत्ता स्थिर झालेली नसल्यामुळें तेथील अध्यक्ष हे लष्करी असतात व ते अध्यक्षपदाबरोबर सेनापतिपदाचा अधिकार गाजवितात. रशियामध्यें अर्थात् सर्व लोकसत्ताक राज्येंच आहेत. पण मुख्य राज्य निरनिराळ्या लोकसत्ताक राज्यांचें संयुक्तमंडळ असून वरिष्ठ राजकीयसत्ताहि संयुक्त अध्यक्षमंडळाच्या हातीं आहे.

त्याचप्रमाणें चीनमध्येंहि दोन राजधान्या व दोन प्रजासत्ताक राज्यें असून मुख्य राजसत्ता पोलिटिकल कौन्सिलच्या हातीं आहे.

(८९) वैचित्र्याचा तपशील

कार्यकारी अधिकाऱ्यांसंबंधानें असें दिसतें कीं, प्रायः एक मुख्य प्रधान व त्याच्याबरोबर काम करणारे इतर कांहीं प्रधान मिळून संयुक्त प्रधान-मंडळ असतें. जेथें मुख्य सत्ताधीश राजा असतो तेथें निरनिराळ्या प्रधानांची नेमणूक राजा करितो व जेथें लोकसत्ताक राज्य असल्यामुळें ती सत्ता प्रेसिडेंटच्या हातीं असते तेथें त्या नेमणुकी प्रेसिडेंट करतो. तथापि कांहीं ठिकाणीं तरी हा नेमणुकीचा अधिकार केवळ औपचारिक रीत्याच बजावला जात असून, एकंदर राज्यकारभाराची जबाबदारी मुख्य प्रधानावर असल्यामुळें, त्याला आपले सहकारी मंत्री पसंत करण्याचा अधिकार असतो. तो ज्यांचीं नांवें पुढें करील त्यांना राजा किंवा प्रेसिडेंट नेमतो; सहसा हरकत घेत नाहीं. क्वचित् एखाद्या ठिकाणीं मुख्य प्रधान, राजा किंवा प्रेसिडेंट यांचा एखाद्या व्यक्तीसंबंधानें मतभेद झाला तर त्याचा निकाल परिस्थितीप्रमाणें, म्हणजे जो कोणी प्रबळ असेल त्याच्यासारखा होतो. प्रधानमंडळांत प्रधान किती असावेत याची संख्या अर्थातच ठरलेली नसते. राज्य लहान मोठें असेल त्याप्रमाणें खातीं कमी किंवा पुष्कळ असतात व त्या मानानें प्रधानांची संख्या असते. सर्वच प्रधानांना कायदे-मंडळांत स्थान असतें किंवा प्रत्येक प्रधान हा कोणत्या तरी एखाद्या खात्याचा मुख्य असतोच असें नाहीं. विलायतेंत दोन्ही प्रकार आढळतात. म्हणजे प्रधानमंडळांत समावेश असूनहि विवक्षित खात्याचें काम त्याजकडे नसतें. उलट खात्याचें काम जरी एखाद्या प्रधानाकडे सोपविलेलें असते तरी प्रधानमंडळाच्या सभेंत त्याला खुर्ची असतेच असें नाहीं.

(९०) कायदेमंडळाची बाब

बहुधा प्रत्येक राष्ट्रांत पार्लमेंट किंवा लोकसभा ह्या दोन असतात. तथापि वरील तत्त्वांत एकच लोकसभा असणारीं राष्ट्रें कांहीं आहेत. तीं अशीं बल्गेरिया, चीन, कोस्टारिका, एस्टोनिया, फिनलंड, जर्मनी, ग्रीस, ग्वायटे-

माल, हयाती, होन्डुरास, जुगुस्लेव्हिया, लटेव्हिया, लिथ्यूॲनिया, नॉर्वे, पनामा, पर्शिया, साल्व्हाडोर, तुर्कस्थान. दोन लोकसभा असणाऱ्या राष्ट्रांची संख्या मात्र पुष्कळ आहे. दोन वेगळ्या लोकसभा करण्याचे मुख्य दोन हेतु असतात. प्रजाजनामध्यें सर्व लोक एकाच दर्जाचे किंवा हितसंबंधाचे असत नाहींत. यामुळें वरिष्ठ सामाजिक दर्जाचे प्रतिनिधि सामान्य जनतेच्या प्रतिनिधीपासून वेगळे बसावे हा एक हेतु. दुसरा हेतु हा कीं जर खालच्या लोकसभेंत उतावळेपणानें किंवा अविचारामुळें एकदम कांहीं गोष्टी घडल्या तर त्यांचा फेरविचार होऊन त्या बदलण्याला संधि मिळावी. खालच्या सभेंतील काम वरच्या सभेंत तयार होऊन जाईपर्यंत सहजच कांहीं वेळ जातो. या अवधींत खालच्या सभेंत अविचार किंवा चूक झाली असेल तर ती बाहेर पडते. तीच अवधि देशांतील सर्वसामान्य लोकमत प्रगट होण्याला उपयोगीं पडते, आणि तें लोकमत लक्षांत घेऊन झालेली चूक किंवा अविचार वरिष्ठ सभेला दुरुस्त करितां येतो.

(९१) कायदेमंडळाचें द्विदळ

हा अर्थात् केवळ चांगल्या दृष्टीचा खुलासा झाला. पण त्यालाच एक वाईटहि दृष्टि असूं शकते. ती अशी कीं वरिष्ठ सामाजिक दर्जाच्या लोकांना कोणच्याहि गोष्टींत एकदम फेरबदल व्हावा अशी इच्छा नसते. जें आहे तें तसेंच राहण्यांत प्रायः त्यांचें हित असतें. वरिष्ठ सभेंतले लोक कांहीं कांहीं ठिकाणीं स्वतः राजा किंवा प्रेसिडेंट नेमतो. यामुळें त्यांची इच्छा व लोकमत यांत विरोध उत्पन्न झाला असतां वरिष्ठ सभांतले लोक हाताशीं धरून त्यांना आपलें काम करून घेतां येतें. किंवा वरिष्ठ सभेचे लोक राजानें न सांगतां त्याची इच्छा काय असावी हें तर्कानें जाणूनहि अमलांत आणतात. ज्या वरिष्ठ सभांतून सगळे सभासद लोकांनीं निवडून दिलेलेच असतात तेथें ही वाईट दृष्टि लावण्याचें कारण नाहीं. तेथें पहिली म्हणजे भलेपणाची दृष्टि लावणेंच बरोबर होईल. पण जेथें वरिष्ठ सभेंतील सभासद राजा नेमतो तेथें त्या सभेच्या हेतूकडे वाईट दृष्टीनें पाहिलें असतां फारशी चूक होणार नाहीं. हिंदुस्थानांतील वरिष्ठ व कनिष्ठ लोकसभांमध्यें अद्यापि सरकार बरेच सभासद नेमते. मग ते प्रत्यक्ष त्यांचे पगारी नोकर व अधिकारी

असोत, किंवा बिनपगारी बिनअधिकारी असोत. ही संख्या इतरांच्या मानानें थोडी असली तरी ती फार वजनदार व महत्त्वाची ठरते; व या थोड्यांवर सरकाराला पुष्कळ काम करून घेतां येतें. विलायतच्या पार्लमेंटचे दोन भाग असून त्यांतील वरिष्ठ सभेचा प्रत्येक सभासद स्वतः राजानें नेमलेला असो, किंवा पूर्वकाळीं राजानें नेमलेल्या लोकांचे वंशज वंशपरंपरेच्या हक्कानें त्या सभेंत बसणारे असोत. या सभेंतील कांहीं उमराव लोक दहा दहा, वीस वीस पिढ्यांचे आहेत. जसें लॉर्ड सॅलिस्बरी. कांहीं सभासद मात्र अंगीं योग्यता असतांहि, इतर कारणांनीं, कनिष्ठसभेच्या निवडणुकीस उभे न राहणारे असे असतात. पण व्यक्तिशः त्यांचा सन्मान करावा किंवा त्यांच्या अनुभवाचा फायदा घेतां यावा म्हणून त्यांना उमराव बनवून वरिष्ठ सभेंत स्थान दिलेलें असतें. उदाहरणार्थ, लॉर्ड मोर्ले, लॉर्ड स्नोडन. या लोकांची नेमणूक राजानें केली म्हणून ते कांहीं राजाला खूष करण्याकरितां हवें तसें मत देतील अशी कोणाची समजूत नसते. ते पूर्वीच्या आपल्या राजकीय पक्षाचीं मतें घेऊनच वरिष्ठ लोकसभेंत जातात; व त्यांचें नांव उमरावपटांत दाखल झालें म्हणून कांहीं ते दिलानें मिजासखोर किंवा सरदारी थाटाचे बनत नाहींत.

(९२) वरिष्ठ सभा नष्ट होणार?

पण असल्या सभासदांचें प्रमाण एकंदर संख्येशीं थोडें असल्यामुळें विलायतेंतील ही वरिष्ठ सभा अजूनहि पुराणमतवादी किंवा राजपक्षपाती किंवा जनताहितविरोधी असल्याचें अनुभवाला येतें. वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन्ही सभांची संमति मिळाल्याशिवाय कोणताहि कायदा पास होऊं शकत नाहीं. म्हणजे कोणतीहि सुधारणा होऊं शकत नाहीं. आणि वरिष्ठसभेंतील बहुमत पहावें तर तें नेहमीं वर दर्शविल्याप्रकारचें. यामुळें ही वरिष्ठ सभा, तिला सरकारी जमाखर्चासंबंधीं कोणताहि अधिकार नाहीं तरी, अशी कांहीं एक अडचण होऊन बसलेली आहे कीं, ती मोडून टाकावी असें लोकमत प्रगट होऊं लागलें आहे. पण ती मोडून टाकणें म्हणजे राज्याचा एक जिव्हाळ्याचा मोठा अवयव कापून टाकण्यासारखें अवघड होऊन बसतें. ही अडचण भागविण्याची एक युक्ति अशी आहे कीं, हल्लींच्या लोक-

नगर वाचनालय सातारा
दाखल नं. 1999 ग्रंथानुक्रमांक २१ · २४४४
किंमत — पाने २५०

सत्तेच्या दिवसांत जबाबदार मुख्य प्रधानाचें राजाला ऐकावेंच लागतें, मग तें त्याला आवडो वा न आवडो. त्याप्रमाणें मुख्य प्रधानानें शिफारस केल्यास राजा नवीन उमराव बनवून त्यांना वरिष्ठ सभेंत स्थान देतो. पण मुळांतच वरिष्ठ सभेची सभासदसंख्या इतकी मोठी आहे कीं, अशा आयत्या वेळीं नेमलेल्या उमरावांनीं बहुमताचा पाडाव होणें जवळ जवळ अशक्य असतें. शेवटीं या त्रासाला कंटाळून सन १९११ सालीं ॲस्क्विथसाहेब हे मुख्य मंत्री असतां, कनिष्ठ सभेनें असा कायदा केला कीं, कनिष्ठ सभेनें कोणताहि कायदा एकाच वर्षांत लागोपाठ तीन वेळां मंजूर केला तर मग त्याला वरिष्ठसभेच्या संमतीची जरुरी नाहीं. अर्थात् असे प्रसंग थोडेच येणार. कारण वरिष्ठ सभा अलीकडे लोकमताला भिऊन कनिष्ठसभेचें मन अधिकाधिक संभाळूं लागली आहे. पण अजूनहि एखादे वेळीं खटका उडतोच.

(९३) वैचित्र्याची मीमांसा

विद्यमान राष्ट्रांतील कोणत्याहि एका राष्ट्राची घटना दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राच्या घटनेसारखी तंतोतंत नाहीं. यामुळें तुलनाच करावयास बसल्यास बारकाव्याचा तपशील किती तरी निघेल. आणि त्या पलीकडे गेलें असतां प्रत्येक राष्ट्राच्या घटनेचा इतिहासहि असाच वेगवेगळा आढळेल. यांतील मुख्य राष्ट्रांच्या घटनेसंबंधानें, स्वतंत्र असे, मोठमोठे ग्रंथच झालेले आहेत. आम्हांला प्रस्तुत ग्रंथांत हा इतिहास पाहण्याचें तर कारण नाहींच, पण वर दर्शविलेला भेददर्शक तपशिलाचा सगळा बारकावाहि पाहण्याचें कारण नाहीं. राज्यघटनांचा तौलनिक अभ्यास करणें हा एक स्वतंत्र अभ्यासाचाच विषय होतो. पण राज्यशास्त्राच्या केवळ मूलतत्त्वांच्या दृष्टीनें पाहावयाचें तर इतक्या तपशिलांत किंवा बारकाव्यांत शिरण्याचें कारण नाहीं. त्यांतल्या त्यांत लक्षांत घेण्यासारख्या ज्या थोड्या बाबी आहेत त्यांचा समावेश वरील कोष्टकांत झालाच आहे. प्रत्येक राष्ट्राची राज्यघटना एकाच वेळीं बनलेली नाहीं. किंवा मूळ एकाच नमुन्याबरहुकूम सर्वांनीं बनविलेली नाहीं. त्या घटना बनत बनतच बनलेल्या आहेत. आणि त्यांतील प्रत्येक घटनेंत त्या त्या राष्ट्राचा राजकीय इतिहास, विद्यमान राजकीय परिस्थिति, व समाजाच्या संस्कृतीचें

वैशिष्ट्य, यांचा सुगावा लागण्यासारखा आहे. या तीन गोष्टींचें मिळून फळ म्हणजे ती विशिष्ट घटना होय. यालाच इंग्रजींत राष्ट्राची 'जीनिअस' असें म्हणतात. बंगालचे पुढारी दासबाबू हे हिंदुस्थानाला स्वराज्य मागत तेव्हां नेहमीं असें एक वाक्य म्हणत असत कीं, "हिंदुस्थानाला स्वराज्य तर पाहिजेच. पण त्याचें निश्चित स्वरूप काय असावें हें हिंदुस्थानाच्या 'जीनिअस'ला म्हणजे विशिष्ट स्वभावाला अनुरूप असेंच असलें पाहिजे." ह्या त्यांच्या म्हणण्यांत पुष्कळच स्वारस्य होतें. कारण हिंदुस्थानचें स्वराज्य विलायतच्या स्वराज्याच्या नमुन्यावर सहजच बनविलें जावयाचें, पण विलायतेंत जी पार्लमेंटची पद्धति अमलांत आहे, तीच सर्वस्वीं हिंदुस्थानाला उपयोगी पडेल असें नाहीं. परिस्थितीप्रमाणें त्यांत अवश्य फेरबदल करावा लागेल.

(९४) मनाला मानेल ती घटना !

इंग्लंडची राज्यघटना आज आठशें वर्षें अमलांत असतां तिला कायदेशीर स्वरूप देणारा असा कोणताहि एक कायदा नाहीं कीं ज्यांत त्या घटनेचीं सर्व अंगें विधिनियमांच्या रूपानें लिहिलेलीं सांपडतील. हिंदुस्थानांत पहावें तों अलीकडचा राजकीय घटनेचा इतिहास परक्यांनीं आपल्या दृष्टीनें व आपल्या सत्तेनें हवा तसा बनविलेला आहे. त्यांनीं ना धड विलायतेची घटना इकडे अमलांत आणली, वा ना धड इकडच्या राज्यव्यवस्थेचे जुने नमुने पाहून त्याप्रमाणें ती बनविली. हिंदुस्थानचा इतिहास वेगळा, पूर्व परंपरा वेगळी, संस्कृति वेगळी, अनुभव वेगळा, फार काय पण रहाणी-सवरणी, उद्योगधंदे व एकंदर परिस्थिति वेगळी आहे. अर्थात् येट विलायतचा नमुना इकडील स्वराज्यघटनेला उपयोगी पडण्यासारखा नाहीं. खुद्द ब्रिटिश साम्राज्यांत एक दोन शतकें अंगीं मुरलेल्या इंग्रजी संस्कृतीचा पगडा मनावर असलेल्या, व स्वराज्याच्या मार्गावर पहिलीं चार पावलें इंग्रज मुत्सद्यांचा हात धरून टाकणाऱ्या हिंदुस्थानची जर ही स्थिति तर इतर खंडांतील स्वतंत्र राष्ट्रांची स्थिति राज्यघटनेसंबंधानें कशी काय असेल हें सांगावयासच नको. म्हटलें तर जगांत जें चांगलें दिसेल त्यांचें अनुकरण करण्याची बुद्धि सर्वांना सहजच असते. पण हें अनुकरण करतांना

कोणी कोणाचा बांधलेला नसल्यामुळें प्रत्येक राष्ट्रानें आपली स्वराज्यघटना आपल्या मनासारखी बनवावी हें अगदीं सरळ आहे.

(९५) पण, मूळ तत्व एकच

पण रुचिस्वातंत्र्य कोणी कितीहि ठेवलें तरी वैचित्र्याला मर्यादा ही असणारच. याचें कारण वर सांगिल्याप्रमाणें अनुकरणबुद्धि हें एक असून, शिवाय मनुष्यस्वभाव बहुधा जगभर सारखाच असतो हें त्याहून विशेष कारण होय. अर्थशास्त्रांत ज्याप्रमाणें स्वार्थी बुद्धीचा मनुष्य घेऊनच पुढें विचारास सुरुवात होते, त्याप्रमाणें राजकारणांत मनुष्य हा स्वातंत्र्यप्रिय आहे, असें घेऊनच मग पुढें विचार चालवावा लागतो. म्हणून मनुष्य परतंत्रतेच्या जाळ्यांतून निघून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करीत असतां, त्या प्रयत्नांत राज्यघटनेविषयीं सुचणाऱ्या कल्पना बहुधा सर्वांना सारख्याच सुचणार. यामुळें हळूहळू राजतंत्र राज्यपद्धति नष्ट होऊन प्रजातंत्र-पद्धति चहूंकडे स्थापित झालेली आढळून येते. ज्या देशांत अजून एकतंत्री राजा उरला आहे असे देश केवळ अपवाद म्हणूनच उरलेले आहेत; आणि अशीं राष्ट्रें हाताच्या बोटांवर मोजण्याइतकींहि उरलेलीं नाहींत. राजाच्या जागीं प्रेसिडेंट किंवा अध्यक्ष आला म्हणजे तो लोकनियुक्त असतो ह्यांतच त्याच्या एकतंत्री किंवा जुलमीपणाविरुद्ध पहिली जामिनकी मिळते.

(९६) राजा कां नको? अध्यक्ष कां हवा?

तात्त्विकदृष्ट्या अमेरिकन रिपब्लिकच्या अध्यक्षाला कांहीं कांहीं अधिकार टर्कीच्या सुलतानाप्रमाणें अगदीं अमर्याद आहेत असें कदाचित् वकिली पद्धतीनें दाखवून देतां येईल. परंतु प्रत्यक्ष अनुभवाच्या दृष्टीनें हे अमर्याद अधिकार खरे नाहींत. निदान लोकांना इतकें समाधान असतें व पुरतें कीं आपणच निवडून दिलेला मनुष्य, तेव्हां तो अधिकार गाजवील तर बहुधा आपल्याच हिताकरितां गाजवील! त्यानें तो अधिकार गाजविणें हें त्याच्या जुलमाचें लक्षण नसून आपल्या हस्तकाच्या अलौकिक शहाणपणाचें किंवा अलौकिक लोकहितबुद्धीचें लक्षण समजण्यास काय हरकत? जुन्या राजाप्रमाणें त्याच्या ठिकाणीं सत्तेचा अभिलाष दिसला तरी तो स्वार्थमूलक नाहीं.

जुन्या राजांच्या सत्तेचें पर्यवसान त्यांची स्वतःची मिजास, चैन, वैभव, दुर्गुण, व्यसनें, इत्यादिकांमध्यें होत असे, त्याप्रमाणें तरी लोकनियुक्त अध्यक्षाच्या सत्ताभिलाषाचा प्रकार नाहीं असें म्हणणें सयुक्तिक ठरतें. जुने राजे जन्मतः राजे होते, तसे मरतांनाहि आपण रहावे अशी इच्छा त्यांना असे. आपले पूर्वज राजे होते तसेच आपले वंशजहि राजे रहावे अशी त्यांना इच्छा. पण रिपब्लिकचा लोकनियुक्त अध्यक्ष हा काय चार दोन वर्षें स्थानापन्न असेल तेवढाच. ती मुदत संपली म्हणजे तो नदींतील पाण्याच्या बिंदूप्रमाणें पुनः समाजांत मिसळून जावयाचा. सांगण्याचें तात्पर्य असें कीं, राज्यघटनांचा विचार करितांना पहिली बाब लक्षांत घ्यावयाची ती ही कीं, राज्य राजतंत्र आहे कीं प्रजातंत्र आहे; आणि हें पहातांना जन्मसिद्ध राजा जाऊन त्याचे जागीं लोकनियुक्त प्रेसिडेंट किंवा अध्यक्ष आला इतकें दिसलें म्हणजे, तात्त्विक राज्यशास्त्राच्या दृष्टीनें, ह्या अध्यक्षाला अधिकार काय आहेत याची तुलना तपशीलवार करीत बसण्याचें कारण उरत नाहीं.

(९७) एकच प्रमाण सांपडणे कठीण

यानंतरची गोष्ट मंत्रिपदाची. स्वतः अध्यक्षच जर लोकनियुक्त झाला तर प्रधान किंवा प्रधानमंडळ हें लोकांना जबाबदार होणार हें सांगावयास कशाला पाहिजे ? मग पडचाकर हा जसा चाकरानें नेमावा, त्याप्रमाणें प्रधानमंडळ हें लोकांनीं निवडलेलें नसून अध्यक्षानें नेमलेलें असलें तरी त्यांत फारसें कांहीं बिघडत नाहीं. यानंतर पार्लमेंट किंवा विधिमंडळें या-संबंधानें पाहतां, आज जगांतील राष्ट्रांत वरिष्ठ व कनिष्ठ अशीं दोन प्रकारचीं वेगळीं मंडळें किती राष्ट्रांत आहेत, व एकाच विधिमंडळावर किती राष्ट्रांत काम भागवून घेतलें जातें हें वर सांगितलेंच आहे. विधिमंडळांच्या सभासदांची संख्या किती असावी याविषयीं ठराविक प्रमाण असें नाहीं. तर सामान्यतः प्रजेला आपण प्रतिनिधि निवडून दिला ही जाणीव उत्पन्न होण्याइतकें तें प्रमाण असलें म्हणजे झालें. ह्यापलीकडे जाऊन स्वतः मतदाराची लायकी काय असते ह्याचा विचार करावयास गेलों तर मतदाराच्या पात्रतेला ठराविक असें प्रमाण मुळींच आढळणार नाहीं. विलायतेंत आज शेंकडों वर्षे पार्लमेंट हे मतदार लोक निवडून देत असतां अजूनहि

मतदाराची पात्रता, मतदारीचे गट, इत्यादि बाबींसंबंधानें लोक असंतुष्टच आहेत. पण या असंतोषांत फारसें महत्त्व नाहीं. कारण कोणत्याहि पद्धतींत असंतोष राहणारच. यानंतर राष्ट्रांतील राजकीय पक्ष. ह्यांना वास्तविक कोणत्याहि राज्याच्या घटनेंत कायदेशीर असें स्थान नाहीं, किंवा त्यांचा नामनिर्देशहि नाहीं. म्हणजे कायद्यांतून नव्हे तर वस्तुस्थितींतून निर्माण झालेली अशी ती एक संस्था आहे. पण मौज अशी कीं, तीच इतकी प्रबळ ठरते कीं पार्लमेंट, प्रधानमंडळ व प्रेसिडेंट ह्यांच्या निवडणुकी व कांहीं मुदतीपर्यंतचा एकंदर राज्यकारभार ह्या संस्थेच्या करांगुलीवर खेळविला जातो. असो; राज्यघटनांच्या कांहीं अंगांचा विचार स्थूल दृष्टीनें येथें केला आहे. तथापि या अंगांचा विचार पुढेंहि मधून मधून येण्यासारखा आहे व येईल.

भाग (४)

राष्ट्रव्यक्ति व राष्ट्रसंघ

(९८) व्यवहारक्षम राष्ट्र

एका बाजूला एक मनुष्यव्यक्ति व दुसऱ्या बाजूला राष्ट्रसंघ हीं दोन टोकें घेतलीं असतां तीं कल्पनागम्य तर खरींच; पण व्यवहारांत या दोहोंचा फारच थोडा उपयोग होतो. एकटा एक मनुष्य कोठें कोणीं पाहिला आहे काय ? कारण ह्याला पाहिला म्हटलें म्हणजे तेथें पाहणारा कोणी दुसरा आलाच, व तो पाहिल्याचें कोणाला सांगावयाचें म्हटलें म्हणजे तिसराहि आलाच. पण ही काल्पनिक स्थिति आतां मुलांच्या गोष्टींतहि सांगण्यासारखी राहिली नाहीं. सगळें जगच्या जग धुंडाळून निघालेलें आहे. आणि आज दक्षिण अमेरिकेच्या किंवा उत्तर अमेरिकेच्या टोंकाला एखाद्या, कोणीं न धुंडाळलेल्या अशा, निबिड अरण्याच्या कोपऱ्यांत जर नवीन मनुष्यवसती सांपडली तर, ती तेथेंहि कुटुंबाच्या स्वरूपांतच काय पण ग्रामसंस्थेच्या स्वरूपांतहि सांपडण्याचा संभव आहे. टोळ्याटोळ्यांनीं वागणाऱ्या जनावरांच्याहि मागें मनुष्य आतां खास राहिलेला नाहीं. उलटपक्षीं एखादा राष्ट्रसंघ कितपत कार्यक्षम होईल, व त्याचा उपयोग किती थोडया प्रसंगीं होईल, हेंहि आपण पाहतोंच. अशा रीतीनें दोन्ही अव्यवहार्य टोंकें बाजूला ठेवून देऊन त्याच्या अलिकडे, म्हणजे मध्य बिंदूकडे, येत येत आपण पाहूं लागलों म्हणजे, हल्लीं राष्ट्र हीच राज्यसंस्था सर्वांत अधिक व्यवहार्य अशी आढळते. सर्वांत अधिक व्यवहार्य याचा अर्थ असा कीं, राष्ट्र हें आपल्यापुरतें भरीव, आपल्या सर्व गोष्टींच्या गरजा भागविणारें, स्वतःचें पालनपोषण व संरक्षण करणारें, आपलेपणा परकीपणा यांमधील निश्चित रेघ ओढणारे, परराष्ट्रांशीं व्यवहार कोणता ठेवावयाचा, कोणता ठेवावयाचा नाहीं व ठेवावयाचा तो कोणत्या शर्तीवर ठेवावयाचा हें सर्वस्वीं आपल्या इच्छेवर ठरविणारे, आपल्या क्षेत्रमर्यादेंतील प्रजा व्यक्तीला किंवा नागरीक

व्यक्तीला शिस्त लावून त्याच्याशीं निग्रहानुग्रहाचा योग्य तो संबंध ठेवणारें, असें आहे.

(९९) राष्ट्रव्यक्ति

अंकगणितांतील एकाचा आकडा म्हणून मागें सांगितला तो हा होय. ह्याच्या आधारानेंच मूळभूत पूर्णांक गणिताचे सर्व प्रकार म्हणजे बेरीज, वजाबाकी, गुणाकार वगैरे होऊं शकतात. यामुळें राज्यसंस्थेविषयीं जें जें कांहीं बोलावयाचें तें तें राष्ट्र या नांवानें बोललें म्हणजे सार्थ, प्रयोजक व सुसंगत असेंच होईल. राष्ट्र म्हणजे राष्ट्र-पुरुष. म्हणजे समजा कीं, जशी कांहीं एक व्यक्तीच. 'अ' राष्ट्राचा प्रजाजन 'ब' राष्ट्रांत असतां, त्याच्यावर जर अन्याय, जुलूम झाला तर, 'अ' राष्ट्र हें त्या एकट्याएक प्रजाजनाच्या ठिकाणीं स्वतः आपण होतो किंवा आहों अशी कल्पना करून घेतें, व त्या परराष्ट्राविरुद्ध आपले राष्ट्रीयत्वाचे हक्क सांगून, बजावून, नुकसानभरपाई मागून, अपमानाचा प्रतिकार म्हणून माफीची मागणी करून, व या गोष्टी न होतील तर युद्धाला प्रवृत्त होऊन, आपलें राष्ट्र या नात्याचे हक्क बजावून घेतें. सुमारें पाउणशें वर्षांपूर्वी चीन देशावर युरोपियन राष्ट्रांचें अतिक्रमण होत होतें तेव्हां, एका दहा हात लांबीच्या ब्रिटिश होडक्यावरील निशाणाचा अपमान चीननें केला म्हणून (पण पोटांत अफूच्या व्यापाराचा स्वार्थ ठेवून) इंग्लंडनें चीनवर हत्यार कसें उगसलें होतें, याचा मनोरंजक इतिहास जस्टिस मॅकॅर्थी याच्या History of our own Times या पुस्तकांत दिला आहे तो पाहावा. या ठिकाणीं राष्ट्रानें लहानांत लहान स्वरूप स्वीकारलें, म्हणजे एक प्रकारें अणिमासिद्धि सिद्ध करून दाखविली. बरोबर याच्या अगदीं उलट व्यवहार, राष्ट्र हें एखाद्या राष्ट्रसंघाच्या बैठकीला जाऊन बसतें व जगाच्या कारभारांत मत देण्याकरितां आपला हात वर उचलतें तेव्हां घडतो. कारण तेव्हां राष्ट्र हें स्थूलांत स्थूल असें स्वरूप धारण करितें व आपल्या आंगची गरिमा नांवाची सिद्धि दाखविते असें म्हणतां येईल.

(१००) राष्ट्रव्यक्तीचे घटक

व्यवहार्य मनुष्य म्हटला म्हणजे तो योगसाधन करून, शरीर कृश

श्रीराम वाचनालय, लिंब.

करून, पाठीला पोट लावून, अस्थिचर्मरूप असा स्वतःला दाखवितो तेव्हां नव्हे. तसाच शरीरसौंदर्याच्या दक्षिसाकरितां सँडोप्रमाणें तो आपले स्नायू फुगवून आहे त्याच्या दुप्पट शरीर बनवून दाखवितो तेव्हांहि नव्हे. तर नित्य व्यवहारांतला खाता पिता, हिंडता फिरता जो मनुष्य तोच व्यवहार्य मनुष्य. हें जसें आपण घेऊन चालतों तसेंच, कोणत्याही बाजूची अतिशयोक्ति सोडून, नित्य व्यवहारांतील राज्यकारभार करणारें राष्ट्र तेंच 'राष्ट्र' असें म्हणावें लागतें. अशा प्रकारचें हें राष्ट्र घेऊन त्याचे गुणधर्म पाहिले असतां, प्रथमच असें दिसून येतें कीं, प्राचीन ग्रामसंस्था किंवा नगरसंस्था यापेक्षां राष्ट्र हें हल्लीं सर्वच बाजूंनीं फार पुढें गेलें आहे. वस्तु मोजा-मापावयाची, किंवा तिची घनता, तिचें महत्त्व हिशेबानें काढावयाचें, तर तिची लांबी रुंदी व जाडी या अंगांनीं विचार करितात. त्या रीतीनें राष्ट्राचाहि विचार अनेक अंगांनीं करितां येतो. तो असा (१) क्षेत्रविस्तार व रचना, (२) राष्ट्राच्या मर्यादेंतील किंवा राष्ट्राच्या अंमलाखालील लोकसमुदाय म्हणजे प्रजा, (३) राष्ट्राची सांपत्तिक स्थिति किंवा त्याचें आर्थिक सत्त्व, (४) राष्ट्राची संस्कृति किंवा सुधारणा, व राष्ट्राची मनोरचना, आकांक्षा, तत्त्वज्ञान वगैरे. यांतील प्रत्येक बाजू घेऊन पाहूं.

(१०१) क्षेत्ररचना

पूर्वी काय झालें असेल तें असो, पण हल्लीं बहुधा एकहि राष्ट्र असें नाहीं कीं, ज्याचा सर्व मुलूख एकाच चतुःसीमेंत संलग्न व अखंड असा साठविलेला आहे. ग्रेटब्रिटन घेतलें तर जगांतील असा कोणताही भाग नाहीं कीं, ज्यांत इंग्लंडच्या राजाचा, कोणत्याना कोणत्या नात्याचा, अधिकार चालत नाहीं. म्हणूनच कोणी असें म्हटलें आहे कीं, ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं. दुसऱ्या टोकाला आमच्या हिंदुस्थानांतील चिल्लर संस्थानें घेतलीं तरी त्यांचाहि मुलूख असा तुटक असलेलाच आढळेल. एक तालुका येथें तर दुसरा तालुका अनेक मैलावर आणि तालुका तर किती टीचभर! पण एवढ्या राष्ट्राचे अष्टाधिकार त्यांत चालवावयाचे असतात, व यामुळें राजसत्ता केव्हां केव्हां हास्यास्पद होते. पण वस्तुस्थिति तशी आहे खरी. या संस्थानांनीं पुष्कळ वेळां सरकाराला विनवणी करून पाहिलें आहे

कीं, मुलुखाची देवघेव करून आमचें जें काय राष्ट्र असेल तें एकगठ्ठा करण्याला मदत द्या. पण ब्रिटिश सरकार तसें करीत नाहीं. त्यांची अडचण इंग्रज सरकाराला भासत नाहीं! कांहीं तालुक्यांतील एक गांव खालसा तर एक गांव संस्थानी! फौजदारी कायद्याचा अंमल करितांना उठल्या बसल्या अडचणी येतात. पण सरकार हें कांहीं जुमानीत नाहीं, कारण तें पडलें वरिष्ठ. त्याचें कसेंहि भागून जातें. पण संस्थानिक व इंग्रज सरकार दोघांनीं मनांत आणलें तर हीं संस्थानें एकगठ्ठा होणें कठीण नाहीं. इंग्रजी साम्राज्याचें मात्र तसें नाहीं. तेथें समुद्रच्या समुद्र व महासागरच्या महासागर आड येतात. केवळ सोयीच्या दृष्टीनें पाहिलें तर कॅनडा व अमेरिका हीं हद्दीला हद्द लागलेलीं म्हणून तीं एकगठ्ठा व्हावीं. पण तें शक्य नाहीं. अमेरिकेचें राष्ट्र दोन महासागरांत वाटलें गेलें आहे. पूर्वी किंवा हल्लीं नव्या याच राज्यांच्या स्वाभाविक मर्यादा शक्य तेथवर समजल्या जातात. आणि ह्या त्यांनीं मानल्या तर कांहीं व्यवहार सोपा होतो. आज फ्रान्सनें ऱ्हाइन नदी ही आपली एक सरहद्द ठरवून घेतली आहे. पूर्वी मराठ्यांच्या इतिहासांतील तह वाचतांना आपण असें वाचतों कीं, कृष्णा व वारणा या नद्यांमधील मुलूख एकानें घ्यावा, कृष्णा व तुंगभद्रा यांतील मुलूख एकानें घ्यावा वगैरे. पण अशा मर्यादा ठरवून राष्ट्राचें फारसें चालत नाहीं. नदीच्या अलीकडे पलीकडे एकमेकांचा मुलूख असतोच.

(१०२) सांपत्तिक स्थिति

राष्ट्राच्या हद्दींतील लोक एकाच राजाचे हुकूम मानणारे असावे लागतात. आणि केवळ कायद्याच्या जोरावर ती गोष्ट साधतांहि येते. पण कित्येक वेळां राष्ट्रांतील जमीन प्रजेच्या वसतीला किंवा उत्पन्नाला पुरेशी पडत नाहीं. असें झाल्यावर त्या राष्ट्रांतील लोक जगाच्या इतर पडित भागांत सोयीसवलती पाहून वसाहत करतात; व या क्रमानें राज्याचा भूविस्तारहि वाढतो. राज्याच्या भूक्षेत्रांत लोकवस्ती अमुक इतकी दाट किंवा अमुक इतकी पातळ असावी असा नियम सरकार करूं शकत नाहीं. कारण तें शक्यच नसतें. हवा, पाणी, जमिनीची सुपिकता, डोंगर, पर्वत, रानेंवनें वगैरेंमुळें लोकवस्ती दाट किंवा पातळ राहाते. पण राष्ट्राला या गोष्टीची राष्ट्र या नात्यानें अडचण

फारशी वाटत नाहीं. कारण कोठें कालवा खणणें, कोठें अरण्यें तोडून साफ करणें, किंवा कोठें नद्यांना बांध घालणें अशा प्रकारची हवी ती सुधारणा राष्ट्राला करितां येते. आणि आगगाडया वगैरे गेल्यानें राष्ट्रांतील निरनिराळ्या भागांतील उच्चनीच भाव व सरसनिरसता हीं सर्वस्वीं नाहीं तरी पुकष्ळ अंशांनीं दूर करितां येतात. राष्ट्र हें राज्याधिकारानें स्वतःपूर्ण असेल. पण सांपत्तिक दृष्टया तें तसें असूं शकत नाहीं. म्हणजे कांहीं राष्ट्रें कृषिप्रधान असतात. कांहीं उद्योगप्रधान असतात. कांहींचा समाज मुख्यतः व्यापार व दलाली यांवर अवलंबून असतो. आणि जगांत व्यापाराची उलाढाल चालते ती इतकी कीं, कोणत्याहि राष्ट्रांतील एखाद्या श्रीमंत नागरिकाच्या घरीं गेलों तर, तेथें जगांतील प्रत्येक राष्ट्रामधील व्यापारउदीमाच्या, उद्योगाच्या, कलाकौशल्यांच्या वस्तूंचें संग्रहालयच आपल्या दृष्टीस पडेल. याचा अर्थ असा कीं, राज्याधिकारानें स्वयंपूर्ण असणारीं राष्ट्रें अर्थशास्त्रदृष्टया अत्यंत परावलंबी असूं शकतात. जगांतील व्यापार होतो तो राष्ट्रें आपलीं स्वतःची दुकानें, व्यापारी पेढ्या, किंवा कारखाने काढून करितात असें नाहीं. तो व्यापार सर्व राष्ट्रांतील प्रजाच करिते. तथापि सामुदायिक रीतीनें त्या व्यापाराच्या नफ्यातोट्यांत राष्ट्रांतील सरकारचा कांहीं अंश असतोच. तसेंच एका राष्ट्रांतील भांडवल दुसऱ्या राष्ट्रांतील लोक उद्योगधंद्याकरितां कर्जाऊ घेतात. हुंडयांचा व्यापार राष्ट्रांच्या समायिक पद्धतीनें चालतो. उद्योगधंद्यांना लागणारें कच्चें द्रव्य तर एका राष्ट्रांतून दुसऱ्या राष्ट्रांत गेल्याशिवाय भागतच नाहीं. तसेंच केव्हां केव्हां अनेक राष्ट्रांतील लोक मिळून तिसऱ्याच एका राष्ट्रांत समायिक भांडवलाच्या कंपन्या काढून व्यापार करितात, किंवा खनिज पदार्थांचे कारखाने काढतात. पुष्कळ वेळां असेंहि घडतें कीं, अमुक एक माल आपल्या राष्ट्रांत फायदेशीर रीतीनें होणार नाहीं, पण दुसऱ्या राष्ट्रांत तो होतो व तेथून आपल्याला हवा तितका मिळूं शकतो, म्हणून तो माल आपल्या राष्ट्रांत काढण्याचें कारण नाहीं असें अपेक्षेनें ठरवून, लोक स्वेछेनें परावलंबी बनतात. याच्या अगदीं उलट, पुढें मागें तो माल आपल्या राष्ट्रांत हटकून चांगला तयार होईल असें वाटल्यास, तो माल परराष्ट्रांतून येत असल्यास त्यावर जकात बसवितात. म्हणजे त्या मालाची कांहीं दिवस मुद्दाम महागाई करून नंतर मग आपल्या इकडे तो माल स्वस्त करूं पाहतात. तात्पर्य हें

कीं, आज जगांतील कोणतेंहि राष्ट्र परराष्ट्रांशीं व्यापारी अगर राजकीय संबंध कायमचा तोडून राहूं म्हणेल तर तें त्याला मुळींच शक्य नाहीं.

(१०३) भाषा व संस्कृति

पूर्वीप्रमाणें एका राज्यसंस्थेंत एकच भाषा बोलणारे लोक असणें यापुढें फारसें शक्य नाहीं. दळणवळणाचे मार्ग वाढल्यापासून एका ठिकाणचे लोक उठून धंद्याकरितां दुसरे ठिकाणीं जातात. लोकसंख्येची ही हालचाल किती प्रमाणावर होते हें खानेसुमारीचे तक्ते पाहिलें असतां कळून येतें. कित्येक प्रांतांतूनच काय पण, जिल्ह्यांतूनहि निरनिराळ्या भाषा बोलणारांची इतकी संख्या एखाद्या वेळीं असते कीं, त्यांत दोन्ही भाषा बोलणाऱ्या लोकांच्या शिक्षणाची सोय लोकलबोर्डें व म्युनिसिपॅलिट्या यांना करावी लागते. सरहद्दीच्या जिल्ह्यामध्यें तर ही अडचण फार भासते. उदाहरणार्थ, गुजराथ व महाराष्ट्र यांच्या सरहद्दीवरील ठाणें व सबरबन जिल्हा आणि महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या हद्दीवरील बेळगांव जिल्हा. आणि दोन भाषा बोलणारी लोकसंख्या झाली असतां कांहीं लोकांना, म्हणजे अर्थात् अल्पसंख्यांकांना, मातृभाषेंतून शिक्षण मिळण्याला अंतरावें तरी लागतें, किंवा लोकलबोर्डें व म्युनिसिपॅलिट्या यांना दुहेरी खर्च करावा लागतो. राष्ट्रांत भाषा जशी मिश्र तशीच धर्मसंस्कृतिहि मिश्र असते. आज हिंदुस्थानांतील प्रत्येक भागांतील प्रत्येक जिल्ह्यांत हिंदु, मुसलमान व ख्रिस्ति या धर्मांचे लोक कांहीं कांहीं गांवांत, मोहोल्ल्याला मोहोल्लाच नव्हे पण, घराला घर लागून राहिलेले आढळतील. याशिवाय हल्ली प्रवासाची हौस पुष्कळ वाढलेली असून, परदेशीं जाऊन येणारे लोक चैनीच्या वस्तूच काय, पण चालीरीति व क्वचित् बायकाहि परदेशीय आणतात. यामुळें मिश्र संस्कृतीचा देखावा दिसतो; आणि या राष्ट्राची हीच संस्कृति असें निखालस म्हणतां येत नाहीं. एकच संस्कृति, एकच भाषा आमच्या राष्ट्रांत नांदावी, अशी राष्ट्रीय भावनेनें प्रेरित झालेल्या लोकांची तळमळ मनांतून असते; परंतु तें घडून येणें दिवसेंदिवस फार कठीण झालें आहे. बंगालप्रांत घेतला तर त्यांत बंगाली ही मातृभाषा आहे असें वाटतें. पण धर्मान्तर केलेले मुसलमान लोक हे मूळ बंगाली भाषा बोलणारे असले तरी, केवळ धर्मांतरा-

मुळें नव्हे, पण अलीकडील विशेष प्रकारच्या चळवळीमुळें त्यांची प्रवृत्ति बंगालीवर बहिष्कार घालून ऊर्दू बोलण्याकडे होत आहे. पण या मुसलमानांचें ऊर्दूहि तितपतच असल्यामुळें, तिसरीच एक म्हणजे अशुद्ध हिंदी भाषा बोलणारे लोक कलकत्त्यांत जितके आढळतात तितके इतर कोणत्याहि शहरीं आढळत नाहींत.

(१०४) मनोगुण व मतें

मनोगुणांच्या दृष्टीनेंहि राष्ट्रांतील सर्व लोकांचे मनोगुण एरवीहि एकसारखे आढळत नव्हतेच, व अलिकडे तर सुधारणा अनेक अंगांनीं मनुष्यमात्राच्या मनावर आघात करीत असल्यामुळें मनोगुणांत विशेष वैचित्र्य आढळून येऊं लागलें आहे. कायमचे मनोगुण म्हटले म्हणजे संघ करून राहण्याची आवड, विषयासक्ति, भांडखोरपणा, लोभबुद्धि, भय, इत्यादि—म्हणजे प्राथमिक स्वरूपाचा मनुष्यस्वभाव एवढाच कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांत समान आढळतो. पण "पांच पुरभय्ये आणि सहा चौके" या म्हणीप्रमाणें, सामाजिक व राजकीय दोन्ही प्रकारच्या मतांमध्यें बेसुमार वैचित्र्य उत्पन्न होऊं लागलें आहे. याचें कारण ज्ञान अनुभव हीं दोन्हीं वाढलीं; आणि मतस्वातंत्र्याला फारसें नियंत्रण राहिलें नाहीं. "मी अमुक एक मत प्रगट केलें तर समाजांतील लोक मला काय म्हणतील" ही पूर्वीच्या काळीं जी भीति मनुष्याला वाटत असे ती आतां वाटत नाहींशी झाली आहे. परमतसहिष्णुताहि वाढली. यामुळें सार्वजनिक विषयांतील मतांचे पंथहि वाढले. राष्ट्रांत यामुळें अधिक चळवळी निर्माण झाल्या. तात्पर्य, या सर्व गोष्टी लक्षांत घेतां राष्ट्रांतील एकजिनसीपणा घालविण्याला त्या दिवसेदिवस अधिकाधिक कारणीभूत होत आहेत. आणि राष्ट्रांत एकीकरण कशाचें उरलें असेल तर मुख्यतः राजसत्तेचें व तदनुषंगानें राष्ट्रीय सांपत्तिक स्वार्थाचें, एवढेंच फार तर म्हणतां येईल.

(१०५) राष्ट्रहिताची भावना

अजूनहि राष्ट्रसंघटनेची बुद्धि जगांतून गेलेली नाहीं. विश्वबंधुता हें काव्यांतून रमणीय भाषेनें गाण्याचें ध्येय इतकीच त्याची आज योग्यता आहे. 'हें

विश्वचि माझें घर ' असें गाणारा मनुष्य आज वेडयांत काढला जाईल. कारण एका राष्ट्रांतील लोक एकभावनेनें वागले तरच कांहीं निभाव लागेल असें लोकांना वाटतें. आतां जगाचें कल्याण तें राष्ट्राचें हटकून अकल्याण असेंच कांहीं कोणी म्हणत नाहीं. परंतु आधीं आमच्या राष्ट्राचें हित पाहून मग जगाचेंहि साधलें तर साधूं कीं, असें म्हणण्याची प्रवृत्ति आहे. आणि हें राष्ट्राचें हित मुख्यतः एकीकृत राज्यसत्तेच्या बळावरच उगवून घेतां येईल अशी लोकांची भावना आहे. देशाभिमान याचा अर्थ आपल्या राष्ट्रांतील राज्यसत्तेचा अभिमान असाच होतो. मात्र तो अभिमान देशांत स्वकीयांचें राज्य म्हणजे खरें स्वराज्य असेल तरच. कारण जेथें ' राजकीय ' सत्ता परकीय लोकांचे हातीं असते, तेथें ही ' राजनिष्ठा ' असूंच शकत नाहीं. राष्ट्रीयत्व व राजनिष्ठा यांचा सहजच बेबनाव होतो. आणि हा नुसता भावनेचा खेळ इतकेंच नसून, अशा राज्यांत खरोखरच राष्ट्रांतील राज्यसत्तेचें हित व प्रजेचें हित यांच्या दिशा वेगवेगळ्या असतात. किंबहुना असा सिद्धान्तच बनून जातो कीं, ज्या कोणत्याहि गोष्टींनीं परकीय राज्यसत्तेचें हित होईल त्या गोष्टींनीं देशी प्रजेचें अनहितच व्हावयाचें. उलट जी कोणतीहि गोष्ट देशी प्रजेला हितकारक व तेजोवर्धक होईल तिनें राजसत्तेवर तितक्यापुरता आघातच होणार ! परकीय लोकांचें राज्य एखाद्या राष्ट्रांत असलें म्हणजे, राष्ट्रहिताचें वर्तुळ व राजहिताचें वर्तुळ हीं प्रायः एकांत एक मिसळत नाहींत. तीं दोन्ही मिसळून त्यांनीं समानछेद पाडलेला एखादा भाग असेलच तर तो फारच थोडा असणार. पण जगांत असल्या राष्ट्रांची, म्हणजे परकीय सत्ता असलेल्या राष्ट्रांचीं, उदाहरणें सुदैवानें थोडीं आहेत. लोकसत्ताक अमेरिका, फ्रान्स व इंग्लंड यांच्या साम्राज्यांतच असे कांहीं भाग आहेत. त्यांत आपला हिंदुस्थान व अमेरिकन राज्यांतील फिलिपाइन बेटें हीं प्रमुख उदाहरणें होत.

(१०६) अल्पसंख्य व बहुसंख्य

युरोपांत, जुन्या इतिहासाचा अवशेष म्हणून, कांहीं लोकांवर परकीय सत्ता महायुद्धापूर्वीपर्यंत आढळे. परंतु या महायुद्धांत स्वयंनिर्णय या नांवाचें एक तत्त्व पुढें येऊन त्यानें ही स्थिति थोडीबहुत पालटली आहे. म्हणजे विजयी

अशा फ्रान्स व इंग्लंड या राष्ट्रांनीं आपल्याला अनुकूल असे लोक ऑस्ट्रिया जर्मनी वगैरे राष्ट्रांच्या सत्तेखालून सोडविले; व त्यांची जेथल्या तेथें लहान-सहान राष्ट्रें बनविलीं. इंग्लंडांत रिपब्लिक नसेना का, पण अशा नवीन राष्ट्रांना इंग्लंडकडून सरसहा रिपब्लिकचें रूपच देण्यांत आलें. कारण या दिवसांत स्वयंनिर्णयाला उभे राहिलेले लोक प्रथमच, राजा नको व प्रजा-स्वातंत्र्य पाहिजे असें म्हणणार. पण या स्वयंनिर्णयानें इंग्लंड व फ्रान्स यांचा स्वार्थ साधला तरी परकीय सत्तेचा समूळ नाश झाला नाहीं. कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणें, अगदीं एक भाषा बोलणाऱ्या एका संस्कृतीच्या एकाच ऐतिहासिक परंपरेच्या व एकाच्र राष्ट्रीय ध्येयाच्या लोकांचें राष्ट्र बनविणें हें अशक्यप्राय झालें आहे. यामुळें बहुसंख्यावाले व अल्पसंख्यावाले हे परस्परांना विजातीय किंवा परकीय समजत असून, या नवीन राष्ट्रांतील अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधाचें रक्षण करण्याची जामिनकी राष्ट्रसंघानें आपणाकडे घेतली आहे. युरोपांतील चेकोस्लोव्हेकिया, पोलंड, हंगेरी, फिनलंड, लटेव्हिया, जुगोस्लेव्हिया, रुमानिया, अल्बेनिया, आयर्लंड हीं राष्ट्रें स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर बनलेल्या राष्ट्रांचीं ताजीं उदाहरणें म्हणून देतां येतील.

(१०७) भाषावार प्रांतरचना

हिंदुस्थान हा या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावरच स्वराज्य मागत आहे. तें त्याला मिळेल तेव्हां येथेंहि हे उपराष्ट्रीय रचनेचे प्रश्न निघतीलच. हल्लीं राउन्डटेबल कॉन्फरन्सपुढें आलेल्या हिंदुस्थानच्या नव्या घटनेंत, हल्लीचे प्रांत व संस्थानें या सर्वांची मिळून संयुक्त संघटना करण्याची योजना पुढें आली आहे. परंतु या योजनेनुरूप जर हिंदुस्थानला जबाबदारीचें मध्यवर्ती सरकार व आपले कायदे आपणच करणारें पार्लमेंट मिळालें, तर हिंदुस्थानांतहि प्रांतरचनेचा, म्हणजे खरोखरच एका अर्थानें राष्ट्ररचनेचा, प्रश्न निघाल्याशिवाय राहाणार नाहीं. कारण उत्कल, कर्नाटक, आंध्र, वगैरे प्रांतांतील लोक भाषावार प्रांतरचना व्हावी, म्हणजे एक प्रकारें नवीन राष्ट्ररचनाच व्हावी, असें म्हणूं लागले आहेत. आणि तसें झालें तर सर्व मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचें तरी एक राष्ट्र करा अशी मागणी कां न व्हावी! तथापि, या जुन्या व होऊ घातलेल्या नव्या राष्ट्रांतील लोकांना हें पक्कें

माहीत व कबूल आहे कीं, हीं नवीं राष्ट्रें बनलीं तरी एकीकरणाचा मुख्य भर त्यांतील राजसत्ता संघटित करण्याकडेच राहील. राष्ट्रें लहान झालीं असतां व्यापारविषयक वगैरे अडचणी नवीन उपस्थित होतात. परंतु त्यांची अडचण सोसूनहि आपण एक राष्ट्र बनूं, व राष्ट्रीय भावनेच्या जोरावर निभावून जाऊं असें लोकांना वाटतें. साम्राज्यांत नाइलाजानें सांपडलेल्या लोकांचा साम्राज्याशीं अर्थातच उभा दावा आहे;पण राष्ट्रसंघांत सामील झालेल्या राष्ट्रांचा मात्र राष्ट्रसंघाशीं तसा उभा दावा नाहीं. याचें कारण हेंच कीं, साम्राज्य सत्ता ही बोलून चालून स्वार्थी व परकीय असते. पण राष्ट्रसंघ हें कांहीं कोणा एका राष्ट्राचें साम्राज्य दुसऱ्यावर लादलेलें नाहीं. राष्ट्रसंघ हा त्यांतील स्वतंत्र राष्ट्रांनीं आपल्या खुषीनें व सहकारितेनें रचिलेलें एक राज्य–यंत्र, राज्यसंस्था आहे, व त्याचा अमलहि अजून जपून जपूनच चाललेला आहे.

(१०८) राष्ट्रसंघाची घटना

राष्ट्रसंघाची स्थापना होण्यापूर्वी प्रत्येक राष्ट्र हें पूर्णपणें स्वतंत्र मानलें जात असे. आज देखील त्या त्या राष्ट्रांतील प्रजेवर अधिकारासंबंधानें राष्ट्रांतील मुख्य राजसत्ता ही पूर्वीप्रमाणें पूर्ण स्वतंत्र आहे असेंच समजलें जातें. तथापि गेल्या महायुद्धाच्या वेळेपासून जगांतील बहुतेक मोठ्या राष्ट्रांच्या संमतीनें राष्ट्रसंघ नांवाची एक संस्था निर्माण झाली आहे. राज्यसंस्थेच्या संघटनावृक्षाचें हें सर्वांत ताजें फळ होय. ह्या राष्ट्रसंघाचा हेतू राष्ट्रांराष्ट्रांतील कायद्यांना स्थायिक व मूर्त स्वरूप देण्याचा आहे. आजपर्यंत राष्ट्राराष्ट्रांमध्यें कांहीं संकेत होते. पण त्यांना कायदा असें म्हणतां येत नसे. कारण कायद्याच्या शास्त्राप्रमाणें कायदा याचा अर्थ असा कीं, तो सर्वश्रेष्ठ अशा राजसत्तेनें काढलेला हुकूम होय; आणि त्या सत्तेचा अधिकार असा कीं, तो हुकूम जो कोणी अमान्य करील त्याला सत्ताधाऱ्यानें योग्य वाटेल ती शिक्षा करावी ! पण राष्ट्राराष्ट्रांच्या दरम्यान असलेल्या संकेतरूपी कायद्याचा जर कोणी भंग केला तर त्या अपराध्याला शिक्षा कोण करणार ! एरवीं आजपर्यंत एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रांशीं, किंवा कित्येक राष्ट्रांचा एक संघ दुसऱ्या कित्येक राष्ट्रांच्या संघाशीं, युद्ध करीत आलाच आहे. पण हें युद्ध न्यायकोर्टांच्या शिक्षेच्या अंमलबजावणीसारखें नसून, राष्ट्राराष्ट्रांतील ईर्षेचें,लोभ-

बुद्धीचें, किंवा खुनशीपणाचें तें फळ असेंच समजलें जाई. युद्धाला कारण कोणतें तरी एक राष्ट्र मुख्य असे. आणि जीं इतर राष्ट्रें या किंवा त्या बाजूला जाऊन मिळत त्यांचा त्या युद्धांत स्वतःचा असा कांहीं अर्थ किंवा डाव साधावयाचा असे, मग त्यांला वरकरणीं कोणतेंहि सोज्ज्वल स्वरूप तीं देवोत! अशा वेळीं युद्धांत पडणाऱ्या राष्ट्रांना नसतें नैतिक तत्त्व किंवा भूतदया सुचते.

(१०९) राष्ट्रसंघाबद्दल साधकबाधक मतें

पण League of Nations ('लीग ऑफ नेशन्स') ही संस्था इतक्या निरनिराळ्या राष्ट्रांनीं मिळून बनलेली आहे कीं, त्या सर्वांनीं मिळून एखादी गोष्ट ठरविली तर त्या ठरावाला निवळ स्वार्थ हेंच कांहीं कारण सहसा लावतां येईल असें नाहीं. उदाहरणार्थ, ज्या राष्ट्रसंघांत जर्मनी, फ्रान्स, जपान, चीन व इंग्लंड हीं जीं पांच राष्ट्रें सामील आहेत त्या संघानें सर्वानुमतें जर एखादा ठराव केला, तर तो जगांतील शांतता राखण्याच्या हेतूनें केला असावा असें प्रथमदर्शनी घेऊन चालण्यास हरकत नाहीं. कारण या पांच राष्ट्रांच्या गुंतागुंतीच्या व विरोधी हितसंबंधांनीं बनलेला ताजवा हा खोटा किंवा कपटाचा म्हणणें कठीण. आतां हीं राष्ट्रें या संघांत सामील होण्याचें कारण हें खचित असेल कीं, यापुढें आपल्याला आणखी काय लाभ होणार असेल तो न होवो, पण आज आपल्या ताब्यांत असलेला कोणताहि मुलूख किंवा लष्करोपयोगी ठाणीं काढून घेतलीं जाणार नाहींत! आपला तळीराम गार ठेवून परोपदेशे पांडित्य करणाऱ्या या राष्ट्रांनीं राष्ट्रसंघ स्थापून कांहीं दिव्य न्यायबुद्धि किंवा अलौकिक समाधानबुद्धि प्रगट केली असें म्हणतां येत नाहीं! अमेरिकेसारखें राष्ट्र अद्यापि या संघांत सामील होत नाहीं. उलट 'रशिया' या राष्ट्राला जगाचा शत्रू समजून राष्ट्रसंघ आपला सभासद करून घेत नाहीं. यावरून सर्व जगाचें मन या संघासंबंधानें निःशंक झालें आहे असें कोणी म्हणावें? शिवाय राष्ट्रसंघाला खरी कसोटी अद्यापि लागलेली नाहीं. चीन जपान यांच्या चालूं युद्धांत ही कसोटी लागण्याचा प्रसंग दिसतो. काय होईल तें पहावें! परंतु आपण सर्व राष्ट्रांचा नियंता आहों अशा समजुतीनें राष्ट्रसंघ आज वागत असल्याचा देखावा आहे खरा!

(११०) राष्ट्रसंघाची भवितव्यता

स्वतः राष्ट्रसंघाचीं सैन्यें किंवा आरमारें नाहींत. आणि निःशस्त्र हिंदुस्थान आज परराष्ट्रांविरुद्ध जसें बहिष्काराचें शस्त्र जास्तींत जास्त घातक म्हणून परजित आहे, किंवा पूर्वी कोरियानें जपानविरुद्ध आंणि चीननें अनेक युरोपियन राष्ट्रांविरुद्ध पराजिलें होतें, त्याप्रमाणें राष्ट्रसंघाला देखील तूर्त असलींच शस्त्रें उपयोगांत आणून स्वस्थ बसावें लागणार असें दिसतें. आधीं राष्ट्रसंघ सर्वानुमतें ठराव होईल तोच अमलांत आणणार. केवळ बहुमतानें चालणार नाहीं. आणि सर्वानुमतें ठराव झाला तरी राष्ट्रांचीं सैन्यें व आरमारें हीं हलवून अपराधी राष्ट्राला शिक्षा करण्याच्या मोहिमेवर राष्ट्रसंघ निघेल कीं नाहीं हें अद्यापि ठरावयाचें आहे. हल्लींच्या चिनी–जपानी युद्धांत जपाननें राष्ट्रसंघाचा सल्ला मानला नाहीं तर कदाचित् त्याच्या बंदरांच्या आर्थिक नाकेबंदीचा, म्हणजे त्याचा व्यापार बुडवून त्याला ताळ्यावर आणण्याच्या कल्पनेचा, उच्चार झालेला आहे. पुढें मागें कधीं याच्याहि पलिकडे राष्ट्रसंघाची मजल जाईल; नाहीं कोणी म्हणावें ! तसेंच राष्ट्रसंघांतील राजसत्ता ही कोणा एखाद्या व्यक्तीच्या किंवा उपसंस्थेच्या हातीं आहे असा देखावा असला तरी, पडद्यामागें सूत्रचालक वेगळे असतात, व ते ती सत्ता चालवितात, याविषयीं मागें लिहिलेंच आहे. तसाच प्रकार राष्ट्रसंघाच्या संबंधानें होण्याचा संभव नाहीं असें कोणी म्हणावें ! म्हणजे राष्ट्रसंघांतहि पक्ष निर्माण होऊन, भांडणें थराला जाऊन, राष्ट्रसंघ कदाचित् मोडला जाण्याचा संभव आहे. किंवा लांचलुचपतीचा प्रकार व कट होऊन सगळ्या राष्ट्रांची मिळून झुंड उठून, एखाद्या बिचाऱ्या निरपराधी व दुर्बल राष्ट्रावर पडून त्याचा सत्यनाश होण्याचा दुसराहि संभव आहे. पण राज्यसंस्था म्हटली म्हणजे तिच्या घटनेंत असा कांहीं गुण असतो कीं, विशेष प्रसंगीं तिच्या हातून कल्पनातीत भलत्या गोष्टी होणें शक्य असलें तरी, सामान्यतः तिच्या हातून भलतेंसलतें कांहीं होत नाहीं. मनुष्यव्यक्ति व मनुष्य व्यक्तींनीं बनविलेली राज्यसंस्था या दोहोंत संकेताच्या दृष्टीनें जसा फरक आहे तसाच त्यांच्यामध्यें विकारवश होण्याच्या पात्रतेंतहि फरक आहे. मनुष्य व्यक्तीचें माथें फिरलें म्हणजे तो स्वतः उठून काय आगळीक करील, म्हणजे दुसऱ्याची काय खोडी करील व स्वतःचें काय करून घेईल याचा नियम नसतो. पण राज्यसंस्थेचें बूड इतकें जड असतें कीं,

तें हल्लू राज्यसंस्था चालू लागण्याला आधीं बराच काळ जावा लागतो. या दृष्टीनें पाहातां, राष्ट्रसंघाच्या हातून अद्यापि जगाचें विशेष कल्याण झालें नाहीं असें खरें असलें तरी, या नवीन राज्यसंस्थेचा धाक त्यांत सामील झालेल्या राष्ट्रांना वाटूं लागला आहे ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. आणि आपाततः हेंहि सिद्ध होत आहे कीं, संघटित राज्यसंस्थेकडून व्यक्तीच्या बेताल कारभाराला कांहीं प्रतिबंध झाला तरी नैतिकदृष्ट्या त्याला स्वातंत्र्यनाश असें म्हणतां येत नाहीं. सामुदायिक हिताच्या दृष्टीनें राष्ट्रांतील राज्यसत्तेनें केलेले कायदे किंवा घातलेले निर्बंध पाळणें हें, प्रजेंतील एखाद्या व्यक्तीला अन्यायाचें वाटलें तरी, सामुदायिक कारणाकरितां म्हणून ते बंधन सोसणें जसें त्याला भाग आहे, त्याचप्रमाणें जगांतील कांहीं राष्ट्रांनीं एकजुटीनें राष्ट्रसंघ नांवाचें हें एक नवें राज्य स्थापन केलें आहे. त्या राष्ट्रापैकीं एखाद्या राष्ट्राला राष्ट्रसंघाचें बंधन गैरसोयीचें किंवा अन्यायाचें वाटलें तरी तें त्याला पाळावें लागेल.

(१११) स्वतंत्र व परतंत्र राष्ट्रें

बाह्यसंबंधाच्या दृष्टीनें जगांतील राष्ट्रांचे मुख्यतः दोन वर्ग करितात. एक स्वतंत्र राष्ट्र (Sovereign State) व दुसरें म्हणजे स्वतंत्र नसलेलें राष्ट्र (Non-Sovereign State). पैकीं पहिल्या वर्गांत युरोपांतील २९, अमेरिकेंतील २१, एशियाखंडांतील ९ व आफ्रिकेंतील २ राज्यें पडतात. पण कांहीं राष्ट्रें व मुलूख असे आहेत कीं, त्यांतील राज्यसंस्था, ज्या कोणत्या असतील त्या, स्वतंत्र आहेत असें म्हणावें कीं स्वतंत्र नाहींत असें मानावें याविषयीं शास्त्रज्ञांना संशय वाटतो. याचीं कांहीं उदाहरणें अशीं:—

(१) **अंडोरा** हें एक प्रजासत्ताक राज्य आहे. त्याचे दोन अधिराजे. एक फ्रान्स व दुसरा अर्जेलचा बिशप.

(२) **डांझिग** हें शहर. हें राष्ट्रसंघाच्या रक्षणाखालचें आहे. पण त्याच्या परराष्ट्रीय कारभाराचीं सूत्रें चालविण्याचा अधिकार एकट्या पोलंडला आहे.

(३) **रोम** येथील पोपचें राज्य. यांत पोपचा अधिकार रोमच्या उपनगरचा भाग, कांहीं मोठमोठ्या इमारती, वाडे, वाड्या यांतील प्रजेवर

चालतो. पूर्वी इटलीच्या राजानें काढून घेतलेले कांहीं राज्याधिकार पोपला नव्यानें देण्यांत आलेले आहेत, व तो आपला वकील परराष्ट्रांना पाठवितो व त्यांच्याशीं तह करतो. तथापि राष्ट्रसंघांत पोपच्या संस्थानाला थारा नाहीं.

(४) **आइसलँड**—डेन्मार्कच्या ताब्यांतील स्वतंत्र राज्य. याचा परराष्ट्रीयसंबंध डेन्मार्कच्या राजाच्या हातीं आहे.

(५) **आयरिश फ्रीस्टेट**-याला वसाहतीइतकें स्वातंत्र्य मिळालें आहे; तथापि नांवाला तरी आयर्लंडचा राजा इंग्लंडचा राजा असून त्याला आयर्लंडवर गव्हर्नर जनरल नेमण्याचा अधिकार आहे.

(६) **सारबेसिन**—हें संस्थान कोणा एका राष्ट्राच्या ताब्यांत देण्याची गोष्ट चुरशीची व भानगडीची झाली असल्यामुळें त्याचा कारभार राष्ट्रसंघ हें कमिशन नेमून चालवितें.

(७) **सॅन मॅरिनो**—प्रजासत्ताक रिपब्लिक. पण इटलीच्या राजाच्या अंमलाखालीं तें संरक्षणापुरतें आहे.

(८) **कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड, साऊथ आफ्रिकन युनियन** वगैरे वसाहती-यांना पंधरा आणे स्वातंत्र्य पूर्वीच मिळालेलें आहे. आणखी अर्धा पाव आणा स्वातंत्र्य जें व्यवहारांत आहे पण कायद्यांत नाहीं तें लवकरच कायदा करून देऊन टाकण्याचा निश्चय हल्लींच्या प्रधानमंडळानें राजाच्या तोंडून वदविला होता, व वेस्ट मिन्स्टर स्टॅटयूट नांवाचा कायदा नुकताच पास करून तेंहि दिलें आहे. तात्पर्य, उरलें काय तें पावआणा स्वातंत्र्य. वसाहतींना राष्ट्रसंघांत स्वंतंत्र जागा आहे. तथापि या वसाहतींची गणना शास्त्रज्ञ अद्यापि स्वतंत्र राष्ट्रांत करीत नाहींत !

(९) **इजिप्त**—याला स्वतःचा राजा आहे, व त्याचें स्वातंत्र्य इंग्लंडनें १९२२ सालीं जाहीर केलें. तथापि सुडान, सुएझ कॅनॉल वगैरे बाबतींचा व लष्करच्या संरक्षणाचा अद्यापि कायमचा निकाल लागलेला नसल्यामुळें इजिप्तला स्वतंत्र म्हणावें कीं परतंत्र म्हणावें हा शास्त्रज्ञ लोकांना प्रश्नच आहे.

(१०) **भूतान**—स्वतंत्र. पण परराष्ट्रीय संबंध ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत.

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

(११) **मेसापोटेमिया किंवा इराक**—नांवानें स्वतंत्र पण राष्ट्रसंघाच्या ठरावानें इंग्लंडच्या दिमतीला दिलेलें. अजून तेथें इंग्लंडचा एक वरिष्ठ अधिकारी असतो. पण राजा व प्रधानमंडळ हीं नांवानें कां होईना पण स्वतंत्र कारभार करितात.

(१२) **ट्रॅन्स जॉर्डिनिया**—अरेबी अमीर राज्य करतो. पण देखरेख इंग्रजांची !

(१३) **असिल, येमेन, नेझद, हासा, झेबेल, शमार, कावित**—यांचेहि राजे अरबी व स्वतंत्र आहेत. पण आंतून नियंत्रण इंग्रजांचें.

(१४) **युकेन्हाइन, व्हाइट रशिया, जॉर्जिया, रोमानिया, तारतर रिपब्लिक, खिवा, बुखारा**—येथें सर्वाधिकारी अशीं प्रजासत्ताक राज्यें आहेत. तीं रशियाच्या सोव्हिएटशीं संलग्न आहेत.

संशयाच्या स्थितींत असलेलीं वरील सर्व राष्ट्रें नांवानें बरोबरींचीं आहेत. परंतु क्षेत्रफळ, लोकसंख्या, लष्कर, आरमारी सत्ता, सामाजिक, आर्थिक व राजकीय संघटना वगैरे दृष्टींनीं त्यांचा दर्जा मुळींच सारखा नाहीं. हीं लहान सहान राष्ट्रोपराष्ट्रांची गोष्ट झाली. पण मोठ्या राष्ट्रांत समाविष्ट असलेलीं जर्मनी व रशिया यांना देखील पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत गणावें कीं नाहीं याविषयीं राज्यशास्त्रज्ञांचें आज एकमत नाहीं. असो, म्हटलें तर स्वतंत्र पण म्हटलें तर परतंत्र आहेत अशा राष्ट्रांत खालील राष्ट्रांचाहि समावेश होतो.

क्युबा, हयाती, डोमेनिका, निकारागुवा, झांझिबार, युगांडा, मलाया स्टेटस्, ट्युनीस, मोरोक्को व शेवटीं हिंदुस्थानांतील ७०० संस्थानें.

(११२) संकीर्ण संबंध

इतक्या निरानिराळ्या दर्जाच्या व प्रतींच्या राज्यांचे कारभार—अंतर्गत व बाहेरील—हे किती गुंतागुंतीचे असतील याची कल्पना कोणीही करावी. या संस्थानांचे अधिराजे असल्यास त्यांच्याशीं, व निरनिराळ्या परराष्ट्रांशीं, राजकीयसंबंधांचा कारभार चालविणारे अधिकारी यांचे दर्जे १०—२० तरी असतील. हीं सर्व राष्ट्रें आपला अधिकार चालेल तेथवर उघड तह एकमेकाशीं करतात. पण फिरून आंतून कपटतह वगैरे अस-

तातच. विशेष प्रसंगीं निरनिराळ्या मिषांनीं हीं राष्ट्रें आपले वकील गुप्त संभाषणें करण्याकरितां एकमेकांकडे पाठवितात. एकमेकांत विरोध आला म्हणजे प्रत्यक्ष युद्ध सुरू न केलें तरी आपला राग प्रदर्शित करण्याकरितां, परराष्ट्रांच्या दरबारीं ठेवलेले आपले वकील परत बोलावतात. परराष्ट्रांच्या आसपास आपलीं सैन्यें किंवा आरमारें पाठवून देऊन, सरहद्दीच्या अलीकडे आपल्याच राज्यांत सैन्यें जमवून युद्ध पुकारण्याच्या बेतांत असण्याचा देखावा करितात. व्यापारी बहिष्कार पुकारतात. आणि इतक्या सर्वांनीं कार्य झालें नाहीं म्हणजे युद्ध करितात. या युद्धांत तीं सर्व एकेकटीं लढतात किंवा वर सांगितल्याप्रमाणें आपल्या पक्षांत इतर राष्ट्रें सामील करून घेऊन लढतात.

भाग (५)

सेंद्रिय सजीव राज्यसंस्थेचीं अंगें

(११३) राज्यसंस्थेचा विकास

राज्यसंस्था जसजशी विकास पावत जाते तसतसें तिचें कार्यक्षेत्र वाढत जातें. जनावरांच्या कळपाप्रमाणें कुटुंबाएवढेंच लहान राष्ट्र असेल तेव्हां, कुटुंबाकरितां करण्याचीं कामें फार थोडीं असणार. त्यांतील मनुष्य आपली उपजीविका शिकारीवर करितात. बहुधा बाप व मुलगे सगळेच मिळून शिकारीवर निघतात, व मारलेलीं जनावरें घरीं आणल्यावर तें शिजविण्याचें काम जें घरच्या बायकांकडे असतें तें त्या घरबसल्या करितात. पण त्याहि बाहेर पडून काय मिळेल तें भक्ष घेऊन येतातच. अशा या रानटी पेशाच्या वेळीं कांहीं तरी खाऊन भूक भागविणें याहून कुटुंब-कार्य फारसें अधिक राहात नाहीं. नुसतें पोट भरण्याचें काम हातोहात होतें व सोपें असतें. म्हणजे घरीं त्याकरितां कांहीं शिल्लक करून ठेवावी लागत नाहीं. कणंगी भरून ठेवाव्या लागत नाहींत. दाराला कुलूप लावावें लागत नाहीं ! रोज ताजा शिधा, रोज नव्या जागेवर चूल! त्याचप्रमाणें निवाऱ्याकरितां वसती-देखील कोठें तरी डोंगर–कपारींत होऊं शकते, व रानांत मरून पडलेल्या किंवा मारलेल्या जनावराचें कातडेंहि आयतें सांपडतेंच. एका शिकारींत दोन कामें होतात. भूक भागली व वस्त्राची सोय झाली. पण अशा कुटुंबालाहि राज्यसंस्था एवढ्याचकरितां म्हणावयाचें कीं, तिचें आद्यतत्त्व व मुख्य तत्त्व हेंच असतें कीं, हुकूम करणारा एक सत्ताधारी व त्याची आज्ञा पाळणारे इतर सर्व. पुढें विकास होतो तो येथूनच.

(११४) या विकासाचा क्रम

सर्व जगांत हटकून एकाच क्रमानें (म्हणजे उदाहरणार्थ शिकारी, शेतकरी, उदमी, नागरीक, राष्ट्रीय व विश्वबंधु या क्रमानें) मनुष्याचा विकास

झालेला आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं. पण शास्त्रज्ञ लोक 'सामान्यतः' असा क्रम घेऊन चाललेले आहेत खरे. शिकाऱ्याची स्थिति जाऊन शेतकऱ्याचा पेशा मनुष्य पत्करितो तेव्हां, त्याला कुटुंबांतल्याहून अधिक माणसांची गरज लागते. पेरलेलें शेत हें बरोबर हिंडविण्याची वस्तु नसल्यामुळें, त्या जागेला धरून कुटुंबाला राहावें लागतें. आणि एका ऋतूंत फळ आलेलें दिसलें तर तेथेंच मुक्काम वाढवून फिरून तोच उद्योग करण्यावाढविण्याची इच्छा त्याला व्हावी हें स्वाभाविक आहे. शेती म्हटली म्हणजे माणसांच्या बरोबर जनावरांचा उपयोग आलाच. पण रोज नवें नवें जनावर घरून आणतां येत नाहीं. जुंवाखालीं मान देण्याला रोज नव्या जनावराला शिकवावयाचें, त्यापेक्षां हातीं असलेलें जनावरच धान्य पेरलेल्या शेताजवळ खुंट्याला बांधून ठेवलें म्हणजे तेंच हवें तेव्हां उपयोगाला येतें. अशा रीतीनें मनुष्यकुटुंब, त्याचें पाळलेलें जनावर, त्यानें पेरलेलें शेत, यांची सांगड हळूहळू पडत जाते. आणि मनुष्य संगतिप्रिय असतो म्हणून, त्याच्यासारखाच एखादा कोणी दुसरा शेतकरी त्याच्या शेजारीं येऊन राहतो. या क्रमानें प्रथम वाडी व नंतर खेडेगांव वसतें. आणि तसें झालें म्हणजे (राज्यसंस्थेच्या विकासाच्या दुसऱ्या टोंकाला ज्याप्रमाणें राष्ट्रसंघ निर्माण व्हावा लागतो त्याप्रमाणें) या वाडींतला शेतकरी हा व्यक्तिशः एक राष्ट्र आणि तो व इतर सगळे शेतकरी हीं अन्य राष्ट्रें मिळून तो राष्ट्रसंघ, अशी कल्पना किंवा रूपक केलें असतां तत्त्वतः त्यांत फारशी चूक होणार नाहीं. पिंडब्रह्मांड न्यायानें समाजाच्या प्राथमिक घटनेंतच अंतिम घटनेचीं बीजें असतात, आणि प्रतिभासंपन्न मनाला त्या दोहोंचें तादात्म्य सहजच पाहावयास सांपडतें.

(११५) आणखी पुढील क्रम

शिकारीच्या मानानें शेतीचा व्याप अर्थातच मोठा, व त्याला लागणारीं साधनेंहि अधिक. या दृष्टीनें पहातां शेतकऱ्याला हळुहळू आपल्या बुद्धीचा उपयोग सहजच अधिक करावा लागतो, व कामाची वांटणी करून घ्यावी लागते. घरीं रावता गडी ठेवला म्हणजे घरधन्याची राजसत्ता थोडी अधिक वाढली! घरच्या बायकांमुलांवर सत्ता गाजाविण्याचा जो प्रकार असेल

त्यापेक्षां नोकरांवर सत्ता गाजविण्याचा प्रकार थोडासा वेगळा असणारच. यां स्थितींत घरधन्याचें हुकूम सोडण्याचें काम म्हणजे तें राष्ट्रांतील कायदेमंडळाचें काम झालें व राजाचें किंवा अध्यक्षाचें काम झालें. आणि बायकामुलांकडे व चाकरांकडे कामें वांटून नेमून दिलीं म्हणजे ती राष्ट्रांतील अधिकारविभागणी अगर तो खातेवार कारभारच झाला. घरच्या घरींच कोणी गुन्हा केला तर त्याची न्यायमुनसफी करण्याकरितां लांबचे इतर लोक बोलविण्याचें कारण नाहीं. पण वाडीच्या सार्वजनिक जागेंत कोणी करूं नये तें केलें, किंवा एखाद्या कुटुंबाचें नुकसान दुसऱ्या कोणा एखाद्यानें केलें, तर एकटा घरधनी अर्थातच त्याचा निवाडा स्वतः करूं शकत नाहीं. म्हणून एखाद्या झाडाखालीं वाडींतले शेतकरी जमून पंचायत पद्धतीनें, म्हणजे एकमेकांचा सल्ला घेऊन, ग्रामणी जो न्याय करीत असतील तो राष्ट्राराष्ट्रांतील न्यायदानपद्धतीचा प्रकार होय. मात्र त्यांत स्वतंत्र मॅजिस्ट्रेटी, किंवा ॲसेसरपद्धति, ज्युरीपद्धति या सर्वांचा समावेश एकत्र झाल्याचें आढळेल. याच क्रमानें समाजाचा विकास लक्षांत आणला म्हणजे हींच खातेवार कामें व हींच अधिकारविभागणी क्रमानें कशी होत जात असेल हें लक्षांत येईल.

(११६) राज्यसंस्थेतील त्रिमूर्ती

कोणतेंहि सरकार म्हटलें म्हणजे त्याच्या मुख्य कार्यशाखा तीन. (१) कायदा करणारा अधिकारी (२) कायद्याची बजावणी करणारा अधिकारी व (३) न्यायमुनसफी करणारा अधिकारी. एकाच राज्यमूर्तीची हीं तीन तोंडें होत. या त्रिमूर्तीपैकीं कायदे करणें हें आपण ब्रह्मदेवाचें काम समजूं. कारण तेथून सर्व कारभाराची उत्पत्ति होते. कायदा लेखी नसेल तोंडी असेल, किंवा नुसत्या मानेनें अगर खुणेनें दर्शविलेला असेल, किंवा ब्रह्मलिखित म्हणून नवा न करितां जुनाच चालविलेला असेल. तथापि कोणत्याहि कारभाराचा उपक्रम होण्याला कायद्याचें विधान हवें, व तेंच या त्रिमूर्तीतील ब्रह्मदेवाचें उत्पत्तिकार्य. कायद्याची अंमलबजावणी करणें हें विष्णूचें कार्य. म्हणजे समाजस्थितीचें व समाजधारणेचें कार्य. न्यायमुनसफिचें कार्य हें शंकराचें असें मानणें फारसें अनुरूप नसलें तरी, पहिल्या दोहोंहून तें काम अगदीं वेगळें आहे. म्हणजे न्यायदानांत जो सात्त्विक भाव

लागतो तो आपल्या भोळ्या शंकरांत आढळतो; तसेंच न्यायाधिकाऱ्याला कित्येक वेळां कठोर होऊन शिक्षा करण्याची जी तामसवृत्ति लागते तीहि शंकरांतच विशेष आढळते!

(११७) कायद्याची निर्मिति

कायदा हा जरूरीशिवाय उत्पन्न होत नाहीं. आणि आमच्या आधि-दैविक इतिहासांत म्हणजे पुराणांतहि हेंच सांगितलेलें आढळतें कीं, पृथ्वीवर कांहीं संकट आलें व कांहीं नव्या दैवी उपक्रमाची आवश्यकता उत्पन्न झाली, म्हणजे पृथ्वी गाईचें रूप धारण करून ब्रह्मदेवाला शरण जाते, मग तो श्रीविष्णूचा सल्ला घेऊन नवीन उपक्रम होतो. राजा किंवा कायदेमंडळ यांना देखील जर स्वस्थ बसावयास मिळेल व स्वस्थ बसून काम भागेल तर हवेंच असतें. मुद्दाम होऊन कायदा करण्याची उठाठेव कायदेमंडळ करीत नाहीं. राष्ट्रांतील जुनी स्थिति बदलते व कांहीं नवीनच स्थिति उत्पन्न होते, तेव्हां तिला अनुसरून नवीन राजाज्ञा किंवा कायदे करावे लागतात, किंवा जुन्यांची सुधारणा करावी लागते. पण कांहीं झालें तरी कायदेमंडळाचें काम किंवा राजाज्ञेचे हुकूम काढण्याचें प्रत्यक्ष काम वर्षभर कोठेंच चालत नाहीं. बाराहि महिने चालणारीं कामें म्हटलीं म्हणजे (१) जुन्या कायद्यांचीं अंमलबजावणी करणें, (२) नवीन लागणाऱ्या कायद्यांची पूर्व तयारी करणें व (३) न्यायदानाचें काम. हीं तीनहि खातीं एकमेकांपासून भिन्न असलीं तरी त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध मात्र खास आहे.

(११८) अंमलबजावणी खात्याचें महत्त्व

कायदा हा सर्व कारभाराचा मूळ आधार या दृष्टीनें राजा किंवा कायदेमंडळ हें सर्वांत महत्त्वाचें वाटतें. परंतु वस्तुतः सुराज्यव्यवस्था नांदावी व राज्यांत अराजकता उत्पन्न न व्हावी, तर अंमलबजावणीचें व न्यायदानाचें हींच कामें अधिक महत्त्वाचीं ठरतात. त्यांतल्यात्यांतहि अंमलबजावणी खातें हें, जसा गाड्याला कणा तसें, राज्यकारभाराला आधारभूत आहे. जमिनीच्या उदरांत वृक्षाचीं शेंकडों पाळेंमुळें जाऊन बसलेलीं असतात, आणि तेथें तीं वृक्षाला पोषक असें पाणी व भूमिगत द्रव्य शोषण करीत

असतात. म्हणून जमिनीच्या वर दिसणारा वृक्ष उभा राहूं शकतो, नवीन पालवी धरतो, व फुलेंफळें देतो. त्याचप्रमाणें अंमलबजावणी करणारीं खातीं जर जागृत, उद्योगशील व आपापलीं कामें करून, किंबहुना सरकारची बाजू घेऊन, करणारी नसतील तर राष्ट्र समृद्ध, संपन्न व प्रबळ राहावयाचें नाहीं. कायदा कितीहि चांगला असला, नियम कितीहि चांगले असले, तरी त्यांची अंमलबजावणी झाली नाहीं तर लोकांचें व सरकारचें सारखेंच नुकसान होईल. कारण याच विभागांत धनोत्पादक, धनप्रसारक, धनसंरक्षक अशीं सर्व कामें चालतात. अंमलबजावणी करणारे अधिकारी चांगले असतील तर प्रजेला अन्याय न करितांहि त्यांना, राजाचें सरकाराचें अनहित न होईल अशा रीतीनें, कारभार करितां येईल व त्यांच्यापुरतें तरी ते न्यायदानाला काम शिल्लक ठेवूं देणार नाहींत. मग लोक आपापसांत मांडणबखेडे करून न्यायपीठाकडे काय धाव घेतील ती खरी.

(११९) कानूंचे पोट-नियमांचें महत्त्व

कायदेमंडळ किंवा राजा कायदे करतो ते प्रायः शक्य तितक्या थोड्या शब्दांनीं करतो. तेव्हां त्यांचा अर्थ नीट लक्ष्यांत घेऊन, त्यांचा हेतू पूर्ण होईल अशा रीतीनें नियम करणें व पोटनियम करणें हीं कामें सर्वस्वीं अंमलबजावणी खात्याच्या अंमलदाराकडेच राहातात. नियम व पोटनियम यांचें काम इतकें प्रचंड असतें कीं, कायदेमंडळासारखीं १०–२० मंडळें वर्षानुवर्ष बसलीं तरी तें काम त्यांच्या हातून पार पडणार नाहीं. कायदेमंडळें ही काल्पनिकच नसलीं तरी निदान तात्त्विक वातावरणांत आपलीं कामें करीत असतात. तें करितांना त्यांच्या डोळ्यापुढें फक्त नमुनेदार व्यक्ति, नमुनेदार लोकसमूह, नमुनेदार प्रसंग, नमुनेदार कार्यें, नमुनेदार अडचणी, नमुनेदार अधिकारी हेच असतात. परंतु अंमलबजावणीचा कारभार राज्यसंस्थेच्या टोंकापर्यंत व प्रजेंतील व्यक्तीपर्यंत जेव्हां जाऊन पोंचतो तेव्हां व त्या दरम्यान, या प्रत्येक एकेकट्या नमुन्यांतून शेंपन्नास पोटनमुने उत्पन्न होतात. म्हणून या सर्वांची व्यवस्था तर लागावी व मूळ कायद्याचा हेतू तर बिघडूं नये अशा युक्तीनें पोटनियम करावे लागतात. या सर्व कामाकरितां कायदेमंडळाकडे परत येण्याची गरज

नगर वाचनालय सातारा
दाखल नं १११५० ग्रंथानुक्रमांक २१/२१११
किंमत — पाने २५०

नसते, व प्रत्येक वेळीं तसें येऊन चालणारहि नाहीं. वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं व कनिष्ठ अधिकाऱ्यांनीं प्रत्युत्पन्नमतित्वाची, प्रसंगावधनाची, दूरांदेशीपणाची, सावधगिरीची, ताजी शिदोरी मिळवून स्वयंपाक करावा लागतो. प्रजेंतील लोकांचा संबंध मुख्यतः येतो तो या खात्यांतील लोकांशीं, नियमाशीं व पोटनियमाशीं.

(१२०) प्राणिशास्त्राचा दाखला

प्राणरक्षण आणि जीवितसाफल्य यांच्याकरितां प्राणि–देह हा सर्वावयव संपन्न असावा लागतो. कांहीं अवयव किंवा इंद्रियें कमी असलीं तरी प्राणी जगत नाहीं असें नाहीं. परंतु त्याची जीवयात्रा व्हावी तितकी सुखानें किंवा सौष्ठवानें होत नाहीं. सर्व अवयव व इंद्रियें असणारा प्राणीहि केव्हां तरी अंत पावतोच, परंतु त्याच्या नशिबीं लिहिलेला आयुर्दाय असेपर्यंत त्याला सर्व इंद्रियें व अवयव यांची जोड लाभली तर ती गोष्ट इष्ट होय. सामान्यतः प्राण्याला पांच इंद्रियें व तत्संबंधीं अवयव असतात. पण कांहीं प्राण्यांना कांहीं इंद्रियें मुळांतच नसतात, किंवा त्या इंद्रियांचें काम करून देणारे अवयव ठळकपणें दृष्टिगोचर असत नाहींत. याचें कारण ते प्राणी व्हावे तितके परिणत झालेले नसतात. उत्क्रांतीच्या कामांत ते खालच्या पायरीवर असतात. यामुळें त्यांचीं शरीरकार्यें व जीवनकार्यें थोडीं, व तेवढ्यापुरतींच इंद्रियें व अवयव असल्यानें त्यांचें काम भागतें. पण पूर्ण उत्क्रान्ति पावलेल्या प्राण्याच्या जीवनकार्याचें क्षेत्र पुष्कळच विस्तृत असतें, यामुळें त्यांचीं इंद्रियें व अवयव हीं देखील परिणत अवस्थेंतील असतात. एका बाजूला 'अमीबा' नांवाचा लहानांत लहान प्राणी घेतला तर तो केवळ बिंदुमात्र असतो. त्याला ज्ञान कितपत असते हें सांगतां येत नाहीं. परंतु जगण्याची इच्छा, पोषणाचा उद्योग, व आत्मरक्षणाविषयींचा प्रयत्न इत्यादि जीवलक्षणें या अमीबा प्राण्यामध्येंहि असतात; व आपली पुढची पिढी व प्रजा निर्माण करण्याची शक्तीहि त्यांजमध्यें असते. दुसऱ्या टोंकाला असणारा आधुनिक मनुष्य म्हणजे, अत्यन्त सुधारलेला मनुष्य, घेतला तर वरील तीन चारहि लक्षणें त्याजमध्यें असतातच. पण त्याचा मेंदू व अंतःकरण व बुद्धि इतकी कांहीं परिणत झालेलीं असतात कीं, अमीबा व हा

मनुष्य यांच्यामध्यें जमीनअस्मानाची तफावत पडते. या मनुष्याला आहेत हीं इंद्रियें व अवयव हे अपुरे पडतात, यामुळें आहेत त्यांच्याकडूनच भरपूर व विविध काम घेऊन तो आपलें कार्य करितो.

(१२१) उभारणी, संहारणी, विभागणी

राज्यसंस्था हा एक जीव किंवा प्राणी मानला तर त्याचीहि गोष्ट अशीच समजावी. अगदीं रानटी स्थितींतलें कुटुंब किंवा ग्रामसंस्था घेतली तर ती या अमीबा प्राण्यासारखी केवळ बिंदुमात्र असते; आणि तिच्या जीवयात्रेंत निरनिराळ्या इंद्रियाकडून व अवयवांकडून होणाऱ्या कार्यांचीं मूलतत्त्वें सूक्ष्म बुद्धीला दिसून येत असलीं तरी तीं सहज दिसण्याइतकीं ठळक नसतात. अशा संस्थेच्या कार्यांत विविधपणा नसतो, व विस्तार तर नसतोच नसतो. पण अगदीं आधुनिक व सुधारलेलें असें राष्ट्र घेतलें तर त्यांत याच्या उलट सर्व प्रकार आढळून येईल. म्हणजे कार्याचा विस्तार अतिशय विविध आणि विस्तृत. तसेंच कार्याच्या हेतुसिद्धीचीं साधनेंहि त्यामुळें विविध व संख्येनें पुष्कळ. तथापि हीं दोन टोंकें सोडून देऊन मध्यम प्रतीची राज्यसंस्था घेतली तरी तींत कार्यपरत्वें अधिकाराची विभागणी झालेली असून त्या त्या अधिकाराचा योग्य उपयोग करण्याकरितां निरनिराळ्या प्रकारचीं राज्ययंत्रें बनविलेलीं आढळतात. जेथें उभारणी आहे तेथें संहारणी असतेच. एकांतून अनेकाची उत्पत्ति होते, पण ते अनेक मुळापासून विलग नसून एकजीव असतात. एखाद्या शहरांत समान्तर रस्ते जोडण्याकरितां मधून मधून आडवे रस्ते असावे, फिरून ते समान्तर रस्ते शेवटीं जोडणारा असाहि एखादा रस्ता असावा, व या सर्व रस्त्यांचे केन्द्र म्हणून कोठें तरी मुख्य ठिकाणीं असावें, त्याप्रमाणें राज्यसंस्थेच्या विभागणीमुळें उत्पन्न झालेल्या निरनिराळ्या खात्यांची गोष्ट आहे. म्हणजे मूळ अधिकाराचें स्थान एकच. पण त्या स्थानापासून वेगवेगळ्या स्वरूपाची व कमीअधिक मोठ्या अधिकारांचीं खातीं निर्माण होतात, तथापि त्यांचा एकमेकाशीं संबंध अगदींच तुटलेला नसतो. आपापल्यापुरता संपूर्ण अधिकार असेल तो बजावून शिवाय हीं खातीं एकमेकाला मदतगार असतात.

(१२२) परस्पर गुंतागुंतीचा प्रकार

हीं खातीं अनेक असलीं तरी त्यांचें वर्गीकरण पूर्वी सांगितलेल्या तीन सदरांखालीं करितां येतें. (१) कायदेकानू, विधिनियम इ० उत्पन्न करणारें खातें; (२) त्यांची निरनिराळ्या परीनें अंमलबजावणी करणारें खातें; व (३) न्यायखातें. कोणतेंहि खातें घेतलें तरी तें या तिहींपैकीं कोणत्या ना कोणत्या सदरांत पडतें असें दाखवितां येईल. हीं तीन खातीं बहुधा पृथक् असतात. तथापि प्राथमिक स्थितींत तर तीं कमीअधिक एकवटलेलीं आढळतातच, पण परिणत स्थितींतहि त्यांची व्याप्ति थोडीबहुत एकमेकांवर झालेली आढळूं शकते. उदाहरणार्थ, कायदेकौन्सिलांत नुसते कायदे घडण्याचेंच काम होतें असें नाहीं, तर त्यांमध्यें अधिकारी सभासद व इतर सभासद यांच्यामध्यें (अस्तित्वांत असलेल्या किंवा अस्तित्वांत येऊं घातलेल्या) कायदेकानूसंबंधानें चर्चा व विचारविनिमय होतो, सवाल जबाब होतात, ठराव मंजूर नामंजूर होतात, प्रश्नोत्तरांच्या रूपानें मतदारांना व जगाला राज्यकारभाराची माहिती कळविली जाते, जुनीं धोरणें वाईट असतील तर तीं टाकून देण्याचा आग्रह केला जातो, व नवीं चांगलीं धोरणें सुचविलीं जाऊन मान्य करण्यांत येतात, इत्यादि गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे, कायदेकानू करणाऱ्या मंडळांत राज्यकारभाराचें काम म्हणजे अंमलबजावणीखात्याचें कांहीं काम निदान पूर्व तयारीच्या रूपानें केलें जातें हें कबूल करावें लागेल. राष्ट्राचा जमाखर्च पुढें मांडून मंजूर करून घेणें, म्हणजे प्रत्यक्ष कायदा न करतांहि इतर प्रकारच्या संमतीनें मंजूर करून घेणें ही फार महत्वाची गोष्टहि कायदेमंडळांत घडत असते. तात्पर्य, कायदेमंडळ हें दिसण्यांत केवळ कायदे निर्माण करणारें दिसलें तरी त्यांत अंमलबजावणीखात्याचें काम थोडेंबहुत मिसळलें गेलेलें असतें. तसेंच कित्येक कायदे असे बनविले जातात कीं, त्यांमध्यें फक्त मूल तत्त्वाचें दिग्दर्शन केलेलें असतें. पण तीं मूलतत्त्वें संभाळूनच का होईना, प्रत्यक्ष करावयाचें असें अंमलबजावणीचें काम इतकें असतें कीं, त्याकरितां फिरून नियम व उपनियम करावेच लागतात. यांपैकीं कांहींना प्रत्यक्ष कायद्याचेंहि स्वरूप असूं शकतें, व तें स्वरूप स्वतः कायदेमंडळाच्या

अनुज्ञेनेंच प्राप्त होतें. मग सर्व नियम व उपनियम कोण करते ? तर स्वतः कायदेमंडळ तें करीत नाहीं; तें काम सर्वस्वीं अंमलबजावणी खात्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांवर सोंपविलें जातें. मग तें काम संयुक्त कार्यकारी प्रधानमंडळाच्या संमतीनें होवो किंवा एकेक खात्याच्या अधिकाऱ्यांकडून अधिकारपरत्वें तें केलें जावो. उदाहरणार्थ, प्राप्तीवरील कर, अबकारी, जंगलखातें, जमीनमहसूल, रजिस्ट्रेशन वगैरे खात्यांच्या कारभाराला स्थूल व मूलग्राही अशी मान्यता तत्संबंधीं एखादा कायदा कायदामंडळानें करूनच मिळालेली असते. परंतु त्या कायद्यांच्या आधारावर पुढें नियम पोटनियम अपवाद यांचें एवढें मोठें रान माजतें कीं, मूळ कायदा करणाऱ्या लोकांना त्याची जाणीव किंवा दखलगिरीहि नसते. कायदेमंडळांत प्रत्यक्ष न्यायदानाचें काम होत नाहीं. परंतु हाउस ऑफ लॉर्डस्सारख्या एखाद्या कायदेमंडळाच्या एखाद्या भागाला न्यायदानाचेहि कांहीं अधिकार असूं शकतात. आणि कायदेमंडळ हें जरी न्यायाधिकाऱ्यांच्या नेमणुका करीत नाहीं, तरी न्यायकोर्टांची रचना, त्यांचे अधिकार, व क्वचित् न्यायाधिकारी व्यक्तींना न्यायखात्यांतील विशिष्ट जागांवर काम करण्यास लागणारी पात्रता या गोष्टी, आणि न्यायदानाची पद्धत कशी असावी, काम कसें चालावें, पुरावा कसा घ्यावा, न्यायकोर्टांचे निर्णय अंमलांत कसे आणावे इत्यादि गोष्टी मुख्यतः कायदेमंडळच प्रत्यक्ष कायदे करून ठरवून देतें. अशा रीतीनें कायदेमंडळ व न्यायखातें यांचा संबंध निगडित असतो.

(१२३) एकात अनेकांचा समावेश

तसेंच एकाच अधिकाऱ्यांमध्यें निरनिराळ्या खात्याचे अधिकार समाविष्ट होऊं शकतात. उदाहरणार्थ, राजा हा कायदेमंडळाचा मुख्य अधिकारी असल्यामुळें त्या मंडळानें बनविलेल्या कायद्याला मान्यता देणें किंवा मान्यता न देणें हा अधिकार राजाला असतो. न्यायखात्यांतील वरिष्ठ दर्जाचे न्यायाधीश यांची नेमणूक राजाच्या आज्ञेवरूनच होते. इंग्लंडांत सर्वांत वरिष्ठ असलेल्या प्रीव्हि कौन्सिलचा निर्णय राजा प्रायः मानतो ही गोष्ट वेगळी; पण तो न मानण्याचें त्यानें मनांत आणलें तरीहि तो अधिकार त्याला असतोच. अमलबजावणी खात्याचे मुख्य अधिकारी मिळूनच प्रधानमंडळ बनतें; व

हे प्रधान नेमणें, काढून टाकणें, व प्रधानमंडळाचे ठराव वाटल्यास बदलणें या गोष्टी राजा करूं शकतो. राजा हा राष्ट्रांतील मुख्य मॅजिस्ट्रेट. तसेंच तो लष्कर व आरमार यांचाहि मुख्य अधिकारी असतो, व युद्ध पुकारणें तह करणें या गोष्टींना त्याची संमति लागते. यानंतर प्रधानमंडळांतले सभासद घेतले तर असें आढळेल कीं, एकेक प्रधानाच्या हातीं अनेक निरनिराळीं खातीं कारभाराकरितां दिलेलीं असतात. कारण खात्यांचे प्रकार जितके पुष्कळ तितके प्रधान नेमतां येत नाहींत. मग त्यांची संख्या कोठें चार, पाच, कोठें आठ, कोठें फार तर बारा पंधरा येथपर्यंत जाईल. अर्थात् खातेवारीचीं कामें वेगवेगळीं असलीं तरी प्रधान किंवा मंत्री एकच असल्यामुळें एकाच मनानें अनेक खात्यांचा कारभार चालतो हें उघड आहे.

(१२४) कांहीं उदाहरणें

आमच्या इकडे रेव्हेन्यू कामिशनर हा कलेक्टरच्या वरच्या दर्जाचा असतो परंतु त्याच्याकडे न्यायाधिकार कांहींच नसतो. पण त्याच्या हाताखालीं असणारा कलेक्टर हा जिल्ह्यापुरता अनेक खात्यांचा मुख्य अधिकारी असून, शिवाय त्याला जिल्ह्याच्या मुख्य मॅजिस्ट्रेटचे म्हणजे न्यायदानाचेहि अधिकार असतात. वऱ्हाड प्रांतांत परवां परवांपर्यंत एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, म्हणजे इकडचे असिस्टंट कलेक्टर व डेप्युटी कलेक्टर, या दर्जाच्या अधिकाऱ्यांना मुलकीप्रमाणें फौजदारी व दिवाणीहि अधिकार असत. अलीकडेच त्या अधिकारांची विभागणी करण्यांत आली आहे. तसेंच मामलेदार हाहि रेव्हिन्यू अधिकारी असून मॅजिस्ट्रेट असतो. आणि त्याखालीं गांवचा पाटील हा एक प्रकारें रेव्हिन्यू अधिकारी असून त्याला व्हिलेज पोलिस ॲक्टाअन्वयें (अगदीं किमान स्वरूपाचे का होईना पण) मॅजिस्ट्रेटी अधिकार असतात. फक्त तलाठी व कुलकर्णी यांना मात्र रेव्हिन्यूशिवाय दुसरा अधिकार नसतो. तसेंच खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यामध्यें अशा रीतीनें निरनिराळ्या अधिकारांचें मिश्रण असलें तरी तें फक्त त्यांच्यापुरतेंच असतें. म्हणजे त्यांचे दुय्यम किंवा त्याखालचे कारकुनी फडांतील नोकर यांना असे मिश्र अधिकार असत नाहींत. तसेंच फिरून त्रैगुण्याचा

छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

दाखला द्यावयाचा तर असें म्हणतां येईल कीं, राज्यसंस्था चालविणारें सरकार हें त्रिगुणात्मक असतें. त्यांपैकीं तमोगुण लष्कर व पोलिस यांच्या द्वारें प्रगट होतो. रजोगुण कार्यकारी मंडळांतून प्रगट होतो. आणि सत्त्वगुण हा न्यायखात्यांतून प्रगट होतो. वास्तविक हे तिन्ही गुण आपापल्या परीनें उत्कर्षाला पोंचले असतील तरच तें सरकार व ती राज्यसंस्था सुखफलप्रद व ऐश्वर्यसंपन्न होऊं शकेल. पण त्यांतल्या त्यांत न्यायखात्याला जो एक प्रकारचा मान लोक देतात तो इतर कोणत्याहि खात्याला देत नाहींत. कारण कार्यकारी खातें हें स्वार्थी असतें व त्यानें तसें असलेंहि पाहिजे. पण त्यामुळें स्वार्थापोटीं जीं पापें असतात तीं त्या खात्याला चिकटतात. आणि कायदेमंडळ हें कार्यकारी खात्याच्या हातीं बहुधा बाहुलीसारखें असतें. लोकसत्ताक राज्यपद्धतींत असा सिद्धान्तच आहे कीं, जें प्रधानमंडळ कायदेमंडळाला सर्वस्वीं आपल्या हातांत ठेवील तेंच अधिकारावर राहण्याला पात्र आहे. नाहीं तर त्यानें राजीनामा देऊन दूर व्हावें. फार तर आपल्या बरोबर कायदेमंडळहि मोडून टाकून, फिरून नव्या निवडणुकीच्या द्वारें नवें कायदेमंडळ उत्पन्न करून, त्यांत स्वतःला बहुमत मिळवून, फिरून स्वतः प्रधानमंडळाचा अधिकार मिळवावा, व अशा रीतीनें नवी सृष्टि निर्माण करावी.

(१२५) न्यायखात्याचें वैशिष्ट्य व श्रेष्ठत्व

असो. न्यायखात्याकडे सात्त्विकगुण देण्याचें मुख्य कारण असें कीं तें खातें निःस्वार्थी व निःपक्षपाती असतें अशी समजूत आहे, निदान तें तसें असावें अशी अपेक्षा असते. न्यायाधिकाऱ्यांची नेमणूक राजा किंवा मंत्रिमंडळ करीत असलें तरी, ती नेमणूक एकदा झाल्यावर खऱ्या न्यायाधीशाला सर्वस्वीं आपलें स्वातंत्र्य राखावें लागतें. न्यायाधिकाऱ्याचें मुख्य कर्तव्य विद्यमान कायद्यांचा अर्थ बरोबर करून त्याप्रमाणें निग्रहानुग्रहाचें माप आपल्यापुढें येणाऱ्या कोणाच्याहि पदरांत घालणें हेंच असतें. मग तो वाद दोन्ही पक्षी प्रजाजनामधीलच असो, किंवा एका बाजूला प्रजा व दुसऱ्या बाजूला राजा म्हणजे सरकार हें असो. न्यायदानाच्या कामांत पक्षपात, भीडमुर्वत, लाचलुचपत, हीं कांहीं असतां कामा नये. न्याय-

पीठापुढें काटेतोल न्याय मिळणें हा राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क मानला जातो. श्रीमंताविरुद्ध गरीबांना, प्रबळाविरुद्ध दुर्बळांना, अधर्मनिष्ठांविरुद्ध धर्मनिष्ठांना, न्यायाधिकारी ही एकच मोठी व खरी जामिनकी मिळूं शकते. त्यांचें रक्षण करणारी तीच एक ढाल होय. आणि स्वार्थानें उपस्थित केलेल्या या जगांतील युद्धांत ती ढालच त्यांचें संरक्षण करूं शकते. यामुळें कोणत्याहि राष्ट्रांतील न्यायदानाचें काम कसें चालतें यावरच त्यांतील राज्याची खरी अब्रू अवलंबून असते. सरकारानें एक वेळ वाजवीहून थोडे अधिक कर लादले तरी लोक ते देतात; व ते देऊनहि राष्ट्रांत आपलें पद अस्थिर आहे असें प्रजेला वाटत नाहीं. पण न्यायदानाचा झरा गढूळ झाला म्हणजे आपल्या अन्नांत माती कालवली गेली असें प्रजेला सहजच वाटतें. कारण स्वराज्य भोगणाऱ्या राष्ट्रांत तरी प्रधानमंडळानें आज कर थोडे अधिक लादले तर त्याला व त्या कराना उद्यां काढून टाकण्याची शक्यता मनांत धरितां येते. पण न्यायाधिशावर प्रत्यक्ष लांचलुचपतीचा आरोपच खटल्यांत शाबीत होईल तरच तो पदभ्रष्ट होईल. पण अशा तऱ्हेचा आरोप शाबीत होण्याइतकें दुर्वर्तन न्यायाधिकाऱ्याचें डोळ्यावर येणारें नसेल तर त्याला पदभ्रष्ट करणें हें मंत्रिमंडळाला पदभ्रष्ट करण्याहून अधिक अवघड ठरतें. कारण न्यायाधीश एकदा नेमला म्हणजे तो कायमचा नेमला गेला असा संकेत असतो. एकदां नेमलेला न्यायाधीश सरकारानें नालायकीकरितां काढून टाकला असें क्वचितच घडतें. अशा स्थितींत जर का एखादा न्यायाधीश सरकारपक्षपाती बनला तर लोकांना आधार नाहींसा होतो.

(१२६) तोच मुद्दा पुढें चालू

न्यायखात्याला इतरहि कांहीं गोष्टींमुळें विशेष महत्त्व येतें. न्यायाधिकारी हा जसा निःपक्षपाती असावा त्याचप्रमाणें न्यायदानाचें काम फार भानगडीचें होऊं नये, म्हणजे थोडया वेळांत व थोडया खर्चांत योग्य न्याय मिळावा हें ध्येय असतें. आणि असें झालें तरच प्रजेला सुख लाभतें व राज्याची अब्रू वाढते. याशिवाय आणखीहि एक कारण असें कीं कायदेकानू करण्याचें काम हें जरी कायदेमंडळाचें असतें तरी, अप्रत्यक्षरीत्या

न्यायाधिकाऱ्यांनाहि एकप्रकारचा कायदा करण्याचा हक्क प्राप्त होतो. तो असा कीं, मूळ कायदा होतो तेव्हां फक्त कांहीं विवक्षित स्थितिच कायदेमंडळाच्या डोळ्यापुढें असते. पण जगांतील व्यवहार हे अगदीं एकासारखे एक क्वचितच असतात. म्हणजे व्यवहाराव्यवहारांत सूक्ष्म भेद व श्लेष निघतातच. अर्थात् कायद्याच्या मूळ तत्त्वाला धक्का न लावतांहि, त्यांच्या प्रत्यक्ष उपयोगांत, निरनिराळ्या व्यवहारांतील परिस्थितीप्रमाणें, मुरड घालावी लागते. मूल तत्त्वाची मर्यादा किंवा व्याप्ति कोठें वाढवावी लागते तर कोठें ती संकुचित करावी लागते. कोठें तत्त्वाचा कठोरपणा प्रगट करावा लागतो तर कोठें सौम्यपणाचा आभास दाखवावा लागतो. कोठें अशी कल्पना करावी लागते कीं न्यायपीठापुढें आलेला व्यवहार कायदेमंडळाच्या डोळ्यांपुढें नव्हता ही गोष्ट वेगळी, पण असता तर त्याचा परामर्ष घेण्याकरितां जी व्यवस्था करावी लागली असती ती विद्यमान शब्दांतूनच निघू शकण्यासारखी आहे! तात्पर्य, या नाहीं तर त्या कारणामुळें, आपल्या बुद्धीप्रमाणें, न्यायकोर्टाला आपला निर्णय द्यावा लागतो. अर्थात् त्यामुळें कायद्याचे मूळचे शब्द जरी बदलत नसले तरी, न्यायकोर्टाच्या निर्णयानें त्यांतून एक सूक्ष्म असा नवा कायदाच निघतो. आणि मूळचा कायदेमंडळाचा कायदा आणि न्यायकोर्टानें बनविलेला हा कायदा हे दोन्ही जमेस धरून, त्यावर आपलें बुद्धिबल खर्चून वादीप्रतिवादी किंवा त्यांचे वकील यांना आपापल्याकडे कायद्याची ओढाताण करतां येते. न्यायाधिकाऱ्यांनीं आपल्या न्यायदानाच्या कार्यांत आपाततः निर्माण केलेल्या या कायद्याला इंग्रजींत Case law किंवा Judge-made law असें म्हणतात. त्याच्या अंमलबजावणीला बंधन इतकेंच कीं, हा कायदा निर्माण करण्याचा अधिकार राष्ट्रांतील पूर्णाधिकारी अशा एका किंवा अनेक न्यायकोर्टांनाच असतो. निदान अशा कोर्टानें दिलेल्या निर्णयाखेरीज इतर, म्हणजे त्याहून खालच्या दर्जाच्या कोर्टानें दिलेला, निर्णय मानावा असें कोणास आग्रहानें म्हणतां येत नाहीं. हिंदुस्थानचें उदाहरण घेतलें तर असें दिसतें कीं, प्रांतानिहाय निरनिराळीं हायकोर्टें आहेत त्यांपैकीं एका हायकोर्टाचा निकाल दुसऱ्या हायकोर्टानें,आपल्या समर्थनाकरितां आधार म्हणून इच्छेस येईल तर घ्यावा. पण एका हायकोर्टाचा निर्णय दुसऱ्या हायकोर्टावर हटकून बंधनकारक होतो असें

नाहीं.मात्र त्याच हायकोर्टाच्या पूर्वीच्या न्यायाधिशांनीं दिलेला निर्णय,म्हणजे त्यांतून निघणारा कायदा, हा त्यामागून येणाऱ्या न्यायाधिशाला मानावा लागतो. तसेंच या सर्व हायकोर्टांना वरिष्ठ असें जें विलायतेंतील प्रीव्हि कौन्सिल त्याचा निर्णय मात्र प्रत्येक हायकोर्टाला मानावा लागतो. सरकारी खात्यापैकीं न्यायखात्याचें महत्त्व अशा अनेक दृष्टीनीं सिद्ध होतें.

(१२७) कारणपरत्वें श्रेष्ठ-कनिष्ठत्व

कायदेमंडळ, अंमलबजावणी करणारे कार्यकारी, अधिकारीमंडळ, आणि न्यायाधिकारी मंडळ हीं तीन एकाच राज्यसंस्थेचीं अंगें होत, आणि त्यांचा संबंध त्रिमूर्ति देवतांसारखा किंवा एकाच वृक्षाच्या तीन शाखांसारखा आहे हें मागें दर्शविलेंच आहे. त्यावरून हें लक्षांत येईल कीं, मूळ ठिकाणीं त्यांचा संबंध एकत्र असला तरी आपापल्या कार्यांत हीं तीनहि मंडळें पूर्णपणें स्वतंत्र आहेत. त्यांच्या नित्याच्या कार्यांत एकमेक हात घालूं शकत नाहींत. परंतु कोठें कोठें अंतिम स्थितींत त्यांचा एकमेकाशीं जिव्हाळ्याचा संबंध असून, त्यांपैकीं केव्हां एक वरचढ तर केव्हां दुसरें वरचढ असें घडतें. तरी तें कसें हें थोडक्यांत पाहूं. जे कायदे अलिखित असतील त्यांचा कायदेमंडळाशीं संबंध नाहीं. पूर्वपरंपरेचा शिष्टसंमत व सर्वमान्य आचार या नात्यानें त्यांचा अमल न्यायमंडळें करूं शकतात. याला इंग्रजींत Customary law किंवा Common law किंवा Law of usage किंवा Prescriptive law अशीं निरनिराळीं नावें आहेत. हे कायदे अलिखित असल्यामुळें कायदेमंडळाला अर्थातच त्यांत शब्दांची फुटकळ दुरुस्ती करतां येत नाहीं. पण सरकारच्या इच्छेनें किंवा लोकमताच्या जोरावर हा अलिखित कायदा बदलावा असें ठरल्यास कायदेमंडळाला आपल्या स्वतःच्या शब्दांनीं तद्विषयक नवा कायदा करावा लागतो; व असें म्हणावें लागतें कीं, "पूर्वी अमुक अमुक कायदा किंवा चाल रीत किंवा आचार किंवा समजूत असली तरी, यापुढें अमुक अमुक व्हावें. (किंवा न व्हावें.)" आणि अशा शब्दांनीं नवा कायदा बनला म्हणजे मग मात्र न्यायमंडळाला नकी तेच शब्द घेऊन, व त्यांचा मीमांसाशास्त्राप्रमाणें योग्य तो अर्थ करून, न्याय द्यावा लागतो.

श्रीराम वाचनालय, लिंब.

(१२८) एक ठळक उदाहरण

ही अलिखित कायद्यांची गोष्ट झाली. पण कायदेमंडळ जे कायदे स्वतःच्या शब्दांनीं नवे करील ते मात्र अंमलबजावणी मंडळावर व न्यायमंडळावरहि जसेच्या तसे बंधनकारक होतात. आणि लिखित कायद्यासंबंधानें शब्दप्रामाण्य इतकें कठोर असतें कीं, " कायद्याचे शब्द असतील ते खरे, त्यांच्यामागें जाऊन त्याच्या हेतूंची फारशी चिकित्सा करण्याचा न्यायमंडळाला अधिकार नाहीं. तसेंच त्या कायद्याची घडण होत असतां, सरकारतर्फे किंवा इतर कोणी, त्यासंबंधानें कांहीं बोललें असेल तर न्यायमंडळानें ती हकीकत गैरलागू म्हणून अनधिकृत म्हणून सोडून दिली पाहिजे. आणि नुसत्या शब्दांवर विसंबून न्याय दिला पाहिजे." पुष्कळ वेळां न्यायमंडळाच्या लक्षांत हें येतें कीं, " कायद्याचा हेतु एक असतां त्याचे शब्द मात्र चुकून भलते पडले आहेत, किंवा कायद्याच्या अमलबजावणीसंबंधानें ते सुचविणारांनीं (म्हणजे प्रत्यक्ष सरकारानेंहि) आपण कायद्याच्या अंमलाविषयीं अमुक एक धोरण ठेवूं असें आश्वासनहि दिलेलें होतें." पण न्यायनिवाडा करतांना या गोष्टी न्यायाधिकाऱ्यांना लक्षांत घेतां येत नाहींत. त्यांनीं कायद्याच्या शब्दाबरहुकूमच निर्णय द्यावा, व मग अवांतर गोष्टी लक्षांत घेऊन सारासार विचाराच्या योग्य त्या शिफारशी मात्र कराव्या. सरकार त्यांचा विचार वाटेल तर करील किंवा न करील ! किंवा असेंहि घडतें कीं " आपण जो न्यायनिर्णय देतों तो कोणाच्याहि विवेकबुद्धीला पटण्यासारखा नाहीं, तो असंमजसपणाचा किंबहुना मूर्खपणाचाहि आहे. पण काय करावें ? दुर्दैवानें कायदा हा असा आहे खरा " असें म्हणून त्यांना स्वस्थ बसावें लागतें. न्यायकोर्टाच्या शिफारशी किंवा टीका लक्षांत घेऊन कायदेमंडळानें जुना कायदा दुरुस्त केला तर ठीकच, नाहीं तर न्यायकोर्टाला फिरून जुन्या कायद्याचाच अंमल करावा लागतो.

(१२९) आणखी उदाहरणें

न्यायकोर्टानें दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अखेरपर्यंत झाली कीं नाहीं हें पहाण्याचा अधिकार न्यायकोर्टाला कांहीं बाबतींत राहातो, कांहीं बाबतींत राहात नाहीं. उदाहरणार्थ—दिवाणी कोर्टाचे हुकूमनामे कांहीं

दिवाणी कोर्टांच्या अधिकाऱ्यांकडूनच अमलांत यावयाचे असतात. पण कांहीं मुलकी अधिकाऱ्याकडेहि बजावणीला यावयाचे असतात. यापैकीं पहिल्या प्रकारच्या बजावणींत कोर्टाचा हात अखेरपर्यंत चालतो. दुसऱ्यांत तो चालत नाहीं. फौजदारी निवाडयासंबंधानें तर न्यायकोर्टाचे अधिकार निकाल सांगतांच संपतात. म्हणजे शिक्षा झालेला कैदी हा त्यापुढें कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हातीं जातो; व तुरुंगांचा म्हणून एक कायदा आहे त्याप्रमाणें कैद्याची व्यवस्था लागते. शिक्षेच्या मुदतींत कैद्याला कसें वागवावें, त्याला अन्नपाणी कसें द्यावें, त्याजकडून काम किती घ्यावें, त्याला शिक्षा कोणती करावी, इतकेंच काय पण त्याला शिक्षेची मुदत भरण्यापूर्वीहि सरकारच्या मर्जीला आल्यास किती दिवस आधीं सोडावा व उरलेली शिक्षा माफ करावी हा सर्व अधिकार सरकाराकडेच जातो. न्यायकोर्टाकडे रहात नाहीं. न्यायकोर्टानें शिक्षा दिलेल्या कैद्यासंबंधानें सरकाराला फक्त एकच गोष्ट करितां येत नाहीं ती, मूळ दिलेली शिक्षा एका दिवसानेंहि वाढविण्याची ! दंडासंबंधानें पहातां तो केव्हां कसा वसूल करावा हा अधिकारहि न्यायकोर्टाकडे उरत नाहीं, सरकाराकडे जातो, व येथेंहि सरकाराला मूळचा दंड एक पैशानेंहि वाढवितां येत नसला तरी, तो सर्वच्या सर्व दंडहि वाटेल तर माफ करतां येतो.

(१३०) पुन्हा तेंच

उरलेली गोष्ट स्वतः न्यायाधिकाऱ्यांची नेमणूक व बहाली बडतर्फी. या बाबतींत खुद्द हायकोर्ट किंवा प्रीव्ही कौन्सिलपर्यंतचे न्यायाधीश, म्हणजे एकंदरीनें कोणचाहि न्यायाधीश नेमण्याचा अधिकार सरकारचा आहे. तसेंच त्यांची बहाली, बडतर्फी, बदली या सर्व गोष्टी सरकारच्या पोलिटिकल खात्याच्या हातीं राहतात. खालच्या न्यायकोर्टांचें काम तपासण्याचा अधिकार मात्र हायकोर्टाकडे असतो, म्हणून त्या तपासणींत किंवा अपील वगैरेंत खालच्या न्यायाधिकाऱ्यासंबंधानें हायकोर्टाचें जें मत होईल तें त्यांनीं सरकारास कळवावें; पण फक्त शिफारसवजा ! तें मानण्याचा किंवा बाजूला ठेवण्याचा अधिकार सरकारचा आहे. हायकोर्ट किंवा वरिष्ठ कोर्ट यांतील न्यायाधिशांची नेमणूक मात्र खुद्द राजाकडून व्हावयाची असते; यामुळें

बहाली, बडतर्फी ही देखील राजाकडेच राहाते. कोणच्याहि न्यायाधिकाऱ्याला कायदेमंडळांत बसतां येत नाहीं, पण कलेक्टरच्या रँकेपर्यंत रेव्हिन्यू अधिकाऱ्यांना फौजदारी न्यायकोर्टाचे अधिकार देतां येतात. त्यापुढें असिस्टंट जज्जापासून अंमलबजावणीचें व न्यायाचें काम यांची फारकत होते.

(१३१) कायदेमंडळाचें वैशिष्ट्य

कायदेमंडळाचा व बजावणीच्या अधिकाऱ्यांचा वरिष्ठ कनिष्ठ असा संबंध अर्थाअर्थी कांहींच येत नाहीं. या अधिकाऱ्यांनीं कायदे मोडले तर त्याबद्दल कायदेमंडळाला स्वतः कांहीं इलाज करतां येत नाहीं. तसेंच न्यायाधिकाऱ्यांच्या वर्तनासंबंधानेंहि, कोणाला कायदेमंडळाकडे तक्रार करतां येत नाहीं. कायदेमंडळाचें काम फक्त कायदे करण्याचें; म्हणजे कायदे नवे करणें किंवा आहेत ते काढून टाकणें, किंवा त्यांत दुरुस्ती करणें इतकेंच रेखीव, कातीव, मर्यादित, काम कायदेमंडळाकडे असतें. पण बजावणीचे अधिकारी व न्यायाधिकारी यांच्यावर कायदेमंडळाचा कांहीं एक ताबा नसला तरी, खरी तात्त्विक अशी सर्व राजसत्ता कायदेमंडळाच्याच स्वाधीन आहे असें म्हणावें लागतें. कारण सरकारचें झालें तरी कोणतेंहि कृत्य कोणच्या तरी कायद्याखालीं पडतें, कायद्याच्या अनुसार होतें असें जर न दाखवितां आलें, तर ती राजाज्ञाच नव्हे असें समजून प्रजाजनांना ती खुशाल उल्लंघितां येईल. म्हणून सर्व खातेवार कारभाराची रचना कायद्यांच्या आधारावर केलेली असते. मात्र इतकेंच कीं, प्रत्येक अधिकाराची बाब जर न्यायकोर्टांत जाऊं लागली तर अनवस्था प्रसंग येईल म्हणून, खातेवार कारभारासंबंधीं कायद्यांतच असें कलम प्रायः घालून घेण्यांत येतें कीं, त्या खात्याच्या कारभारावर दिवाणी, फौजदारी कोर्टांत फिर्यादच चालूं नये. या बाबी वगळल्या असतां कायद्याला सोडून सरकारानें केलेल्या कोणत्याहि कृत्यासंबंधानें, किंवा इतर सामान्य अपकृत्यांसंबंधानें, कोणाहि प्रजाजनाला सरकारावर फिर्याद करतां येते व नुकसानभरपाई मागतां येते. अधिकाऱ्यांवर फौजदारी खटले करण्यासंबंधानें मात्र कायद्यानें विशेष निर्बंध घातले आहेत. म्हणजे सरकाराची अगाऊ मंजुरी घेतल्याशिवाय खास राज्यकारभारांत

कोणाहि अधिकाऱ्यानें केलेल्या कोणत्याहि कृत्याबद्दल प्रजाजनाला कोर्टांत फौजदारी फिर्याद मांडतां येत नाहीं. अशा रीतीनें कर बसविणें, कर वसूल करणें, कर कमी करणें, व्यापारी जकाती बसविणें, उठविणें, देशांतील चलनी नाण्यांच्या किंमती ठरविणें, सरकारी पेढ्यांचे व खजिन्यांचे कारभार नियमित करणें, सर्व प्रजाजनाला लागू होणारा दिवाणी फौजदारी कायदा बनविणें, खालीं ग्रामपंचायतीपासून वर पोलीस लष्कर आरमार यांच्यापर्यंत कारभारासंबंधीं कायदे करणें, इत्यादि सर्व महत्त्वाच्या बाबतींत कायदे-मंडळांनीं मंजुरी दिल्याशिवाय सरकारचें एकहि पान हलूं शकत नाहीं. याच्या तुलनेनें पाहातां अंमलबजावणी खात्यांचे अधिकार किंबहुना न्याया-धिकारीहि यांचे अधिकार पुष्कळच मर्यादित संकुचित आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

(१३२) सुराज्यव्यवस्थेचें एक मर्म

तीन मंडळांचें हें त्रिदळ एकाच वृक्षावर वाढणारे म्हणून त्या वृक्षाचें संयुक्त अंगच असें असलें तरी, एक गोष्ट निदान तात्त्विक स्वरूपांत खरी असावी, म्हणजे कोणत्याहि एका मंडळाच्या कारभारांत दुसऱ्या मंडळाला हात घालण्यास वाव राहूं नये, असें राज्यशास्त्रज्ञांचें नेहमीं म्हणणें असतें; व सुराज्यव्यवस्थेंत खरी साधण्याची गोष्ट असेल तर ती हीच. असें झालें तर प्रत्येक मंडळावर प्रजेचा विश्वास राहातो. नाहींतर तीं सुराज्यव्यवस्था नव्हे, त्या राज्यांत प्रजास्वातंत्र्य नांदत नाहीं, अशी तक्रार सहजच होते. म्हणजे समजा कीं, हायकोर्टापुढें खटला चालूं असतां पोलिटिकल खात्याचा जो मुख्य असेल त्यानें त्या खटल्याचा निकाल अमुक एक व्हावा असें पत्र लिहिलें, व त्याला अनुसरून हायकोर्टानें निकाल दिला अशी लोकांची समजूत झाली, तर सरकार व हायकोर्ट दोघांसंबंधानेंहि प्रजेचा अविश्वास होणार नाहीं काय ! किंवा समजा हायकोर्ट जजानें कलेक्टर कमिशनर यांना पत्र लिहून कांहीं कामें करवून घेतलीं असतां, त्यांत न्यायकोर्टाचा म्हणून कांहीं संबंध न आला तरी, उभयतांविषयीं लोकांना अविश्वास वाट-णारच. तसेंच कायदेमंडळापुढें एखादा कायदा घडणीच्या क्रमांत असतां जर असें बाहेर आलें कीं, सरकारानें कांहीं सभासदांना लाचलुचपत देऊन

किंवा त्यांच्या लोभबुद्धीला इतर आमिषें दाखवून आपलीं बिलें मंजुर करून घेतलीं तर सरकाराबद्दल व कायदेमंडळाबद्दलहि लोकांना अविश्वासच वाटेल. समष्टिस्वरूपानें संकीर्णस्वरूपानें हीं तीनहि मंडळें एकमेकांच्या कारभारांत हात घालूच शकत नाहींत. कारण तत्त्वतःच त्यांचे अधिकार वाटले विभागलेले असतात. पण त्या मंडळांतील व्यक्तींनीं वरच्यासारख्या कृत्यांनीं उत्पन्न केलेला अविश्वास खुद्द त्या मंडळांना बाधावा यांत काय आश्चर्य ! प्रजेचें जें कांहीं मर्यादित स्वातंत्र्य असतें तें पुष्कळसें या निरनिराळ्या मंडळांवरील विश्वासावरच अवलंबून असतें. आणि तो विश्वास उडाला म्हणजे आपल्याला सुरक्षित उभे राहाण्याला राज्यांत जागाच नाहीं असें प्रजेला वाटतें. आणि ती कुराज्यव्यवस्था होय, सुराज्य व्यवस्था नव्हे, असा तिच्यावर शेरा पडतो.

(१३३) त्रिदळांचें एकच मूळ

तत्त्वतः राजानें या तीनहि मंडळांचे अधिकारी स्वतःच वेगवेगळे नेमून एका खात्याचा दुसऱ्या खात्याशीं संबंध तोडला पाहिजे. पण इंग्लंडसारख्या देशांत जबाबदार प्रधानमंडळाची जी नवी टूम अमलांत आली आहे, तिजमध्यें या तीन मंडळाचें उलट दृढ एकीकरणच होतें. प्रत्येक खातेवार प्रधान किंवा मंत्रि राजानें हवा तेव्हां नेमावा, व तो नालायक ठरेल तेव्हां त्याला काढावें, अशी पद्धत असेल तर हें एकीकरण होणार नाहीं. पण विलायतेंत अलिकडे शें-दोनशें वर्षें पक्षभेदाच्या तत्त्वावर प्रधानमंडळाची रचना अवलंबून असते. यामुळें सर्व खात्यांनीं एकाच मनानें, म्हणजे धोरणाविषयीं एकप्रकारचा कट करून वागावें, एकाचा अपमान तो सर्वांचा मानावा, एक दुखावला कीं सर्वांनीं त्रागा करून उठावें असें घडतें. दिसण्यांत इंग्लंडचा राजा हाच अखेर प्रत्यक प्रधानाची मंत्र्याची नेमणूक करून, त्याच्या हातीं त्याच्या खात्याचा शिक्कामोर्तब स्वाधीन करितो खरा. पण तो निवळ देखावा होय. एका प्रधानमंडळानें राजीनामा दिला म्हणजे नव्या निवडणुकीनें नव्या उपक्रमास सुरवात होते. नैमित्तिक जलप्रलय व संहार होऊन फिरून नव्या सृष्टीची उत्पत्ति सुरू व्हावी तसाच हा प्रकार असतो. जलप्रलयांत वटवृक्षाच्या तरंगत्या पानावर श्रीविष्णु बेदरकार राहावे

त्याप्रमाणें वर स्वतः राजेसाहेब आणि खालीं सर्वच्या सर्व कायम पगारी नोकरांचा तांडा हा शिल्लकच असतो. कोणत्याहि पक्षाचें मंत्रीमंडळ येवो, त्याच्या होमाचा भात शिजवून द्यायला आणि अग्निपूजेची सिद्धता करून देऊन उदक सोडण्याचे वेळीं हाताला हात लावावयाला, ही कायमची घरधनीण सिद्धच असते. इंद्र नवा आला तरी पतिव्रता व अखंडसौभाग्यवति इंद्रायणी कायमच ! तुमचें प्रधानमंडळ तिकडे राजीनामा देवो, नव्या निवडणुकीची दंगल माजो, या अधिकारीमंडळाचा नित्य स्वरूपाचा कारभार सुरूच असतो. त्यांत खळ पडत नाहीं. असो. निवडणुकींत ज्या पक्षाची सरशी होऊन निर्विवाद बहुमत ज्याला लाभलेलें आढळेल त्या पक्षाच्या पुढाऱ्याला बोलावून, त्याला मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें व शिक्कामोर्तब देऊन, आपल्या पसंतीप्रमाणें नवे जुने हवे ते खातेवार प्रधान किंवा मंत्रि उपमंत्रि निवडून घेण्यास राजा सांगतो. आणि मुख्य प्रधानानें पसंत केलेल्या व्यक्तीला प्रधान म्हणून पत्करून त्याच्या खात्याचें शिक्कामोर्तब त्याला द्यावें लागतें. अशा रीतीनें संघटित झालेल्या प्रधानमंडळांत न्यायमंडळाचें मुख्याधिकारीहि (लॉर्ड चानसलर) असतात. सर्व सत्ता या संयुक्त कार्यकारी प्रधानमंडळाकडे येते. व आपल्या बहुमताच्या जोरावर तें मंडळ सर्व प्रकारचा कारभार करते. हें प्रधानमंडळ अधिकारारूढ असतां कायदे करण्याच्या उपक्रमापासून अंमलबजावणीच्या अखेरच्या कृत्यापर्यंत त्याचाच अधिकार चालतो, पण त्याची जबाबदारीहि त्याजवरच राहते. आणि लोकमतांत क्रांति होऊन, उत्पात होऊन, किंवा जुन्या प्रधान मंडळाचा कंटाळा येऊन त्याचा पार्लमेंटांत पराभव होईल तोंपर्यंत हें गाडें असेंच चालतें. या सर्व प्रकारांत ध्यानांत घेण्याची गोष्ट हीच कीं, कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, व न्यायाधिकारीमंडळ हीं स्वतंत्र असावीं असें जें तत्त्व तें साधत नाहीं. पण शेवटीं राज्यकारभारांत लोकांना जें पटलें तेंच बरोबर ! कारण लोकांचें सुख व समाधान तेंच राज्यकारभाराचें ध्येय व साध्य. इंग्लंडचे लोक वाटल्यास उद्यां ही राज्यपद्धति बदलतीलहि ! पण आज हें असें आहे खरें !

भाग (६)

प्रातिनिधिक राज्यपद्धति

(१३४) प्रातिनिधिक तत्त्वाचें सर्वव्यापकत्व

राज्यसंस्थेचा उगम व आधार, तिची घटना व वर्गीकरण, आणि तिचीं ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांचा विचार केल्यावर दुसऱ्या ज्या एकाद्या गोष्टीचा विचार करावा लागतो ती म्हणजे राज्यसंस्थेच्या सर्व व्यवहारांत दिसून येणारें प्रातिनिधिक तत्त्व ही होय. प्रातिनिधिक तत्त्व म्हणजे एकानें दुसऱ्याचा बदली किंवा एजंट किंवा वकील किंवा मुनीम म्हणून तेंच कृत्य अधिकारानें करण्याचें तत्त्व. राज्यसंस्थेच्या कारभारांत हें तत्त्व कसें उपयोगांत येतें हें पाहण्यापूर्वी जगाच्या इतर व्यवहारांत तें कसें कोठें दिसून येतें हें पाहिलें म्हणजे राज्यकारभारातहि तें कसें शिरतें हें समजण्यास कठिण जाणार नाहीं. जगाच्या व्यवहाराचे दोन भाग, एक लौकिक आणि दुसरा पारमार्थिक. आणि पारमार्थिक व्यवहारांत जर हें तत्त्व लागूं पडतें तर लौकिक व्यवहारांत तें लागूं पडेल यांत काय आश्चर्य ! यांत प्रथमच हें दिसून येतें कीं ब्रह्मस्वरूपी ईश्वर हा निराकार व निर्गुण असल्यामुळें त्यानें सगुणरूप घेणें म्हणजे प्रतिनिधीद्वारा प्रगट होणें होय. मग तें रूप तो कोणाच्याहि इच्छेनें व कोणत्याहि कारणाकरितां घेवो. अवतार हे तर बोलूनचालून ईश्वराचे प्रतिनिधीच होत. गीतेंतील विभूतिवर्णनांत व परिगणनेंत ईश्वर आपल्या तोंडानेंच आपले प्रतिनिधि कोण कोण हें सोदाहरण सांगत आहे. अवताराच्या महत्त्वापर्यंत न पोचणाऱ्या देवता याहि ईश्वराच्या प्रतिनिधीच होत. कारण त्या तशा नसत्या तर त्यांची पूजा कोण करील ! त्यांना बळी कोण देईल ! ही पूजा व हें बलिदान घेऊन या देवता, त्यांना तोडून दिलेल्या ईश्वरी अधिकाराच्या खात्यांत, भजकपूजकांवर अनुग्रह करितात तो ईश्वराकरितांच. ईश्वर त्यांचे हे अधिकार काढून घेईल तर मग त्यांची पूजा कोण करील ! या प्रतिनिधींचीं मुखत्यारपत्रें सहीशिक्क्यार्चीं व लेखी असत नाहींत व मनुष्याला

तीं पाहावयास सांपडत नाहींत. पण मनुष्यानें आपण होऊनच तीं मुखत्यारपत्रें मनानें मानलीं तर मग देवतांना तीं दाखविण्याचें काय कारण ? मुखत्यारपत्रें नसतांच देवता कारभार करतील तर ईश्वर त्यांना पाहून घेईल. पण पूजा व भक्ति हीं देऊन उपासकानें आपलें काम करून घेतलें म्हणजे त्यांच्या परस्परांतला तरी व्यवहार मिटला ! उलट बलिदानांत वास्तविक स्वतःचाच बळी द्यावयाचा असतां मनुष्य कोंबडयांबकऱ्यांवर भागवितो व देवता त्यावर भागवून घेतात, तेथें हें कोंबडें बकरें मनुष्याचा प्रतिनिधीच नव्हे काय ? अग्नि हा तर अनेक देवतांचा मिळून प्रतिनिधी आहे. कारण त्याच्याद्वारेंच त्यांना यथोचित हविर्भाग मिळतात. त्याला देवतांचा कलेक्टरजनरल म्हणतां येईल. अशा रीतीनें देवदेवता जर प्रतिनिधिद्वारा व्यवहार करितात तर मनुष्यानेंहि तो केल्यास काय नवल ?

(१३५) धर्मकृत्यातलें प्रातिनिधिकत्व

आपल्या धार्मिक कृत्यांत आपण प्रतिनिधीचा सर्रास उपयोग करतो. काशीरामेश्वरच्या यात्रेहून परत आलेल्या यात्रेकरूच्या पाया पडले म्हणजे पुण्यांश मिळतो; या ठिकाणीं यात्रेकरू हा पूर्वी अयोजित पण पश्चात् स्वीकृत असा प्रतिनिधीच ठरतो. जपानुष्ठानाला प्रायः इतर ब्राह्मण बसवून आपण फक्त त्यांना दक्षिणा दिल्यानें व त्यांचा आशीर्वाद घेतल्यानें अनुष्ठानाचें पुण्य आपण मिळवितों तें प्रतिनिधिद्वाराच होय. ब्राह्मण वेदाधिकारी असूनहि स्वतः करण्याचीं अनेक वैदिक कृत्यें तो ब्राह्मणद्वारा आचार्यद्वारा उपाध्यायद्वारा करितो तें त्याला प्रतिनिधि नेमूनच. मग क्षत्रियवैश्यादि, म्हणजे अन्यप्रधानकार्यव्यापृत लोक, बहुतेक काम प्रतिनिधिद्वारा करवून घेत असल्यास काय नवल ! मुंजींत लंगोटी व जानवें घालावयाचें तें मुंजानें आपलें आपणच घातलें पाहिजे, पण नंतर उपाकर्मप्रसंगीं तो आपले वेदमंत्र संभाळण्यासाठीं उपाध्यायाजवळच देतो. फक्त विवाह व तत्संबंधीं पुढील सर्व कृत्यें ज्याचीं त्यानें करावयाचीं असतात व करावीं लागतात. तीं प्रतिनिधीद्वारा होऊं शकत नाहींत ! धर्मकृत्यांतील मनुष्यव्यक्तीप्रमाणें वस्तूंचीं कार्येंहि प्रतिनिधिद्वारा होऊं शकतात. पूर्वी यज्ञांत जिवंत पशुहत्त्या करावी लागे त्याऐवजीं नव्या कारुणिक जगांत पिंडपशूनें काम भागं

लागलें. मधुपर्काला वत्सतरी न मारली तरी चालू लागून, गोघृत दुग्धानीं मधुपर्क केला असतां पाहुणे त्या प्रतिनिधींची सेवा मान्य करूं लागले. गंधाक्षतांनीं अडचणीच्या वेळीं सर्व पूजोपचारांचें काम करितां येतें. आणि सुपारी तर बोलावयासच नको ! पाटावर बसवून तिला गंधफूल वाहिलें कीं गणपति, किंवा पूजार्ह अन्य हवी ती देवता, किंवा ऋषी यांचें कार्य ती करिते. आणि पत्नी उपलब्ध किंवा उपस्थित नसल्यास तीच सुपारी कनवठीला लाविली असतां पुरुषाला दांपत्यानें धर्मकृत्य केल्याचें फळ लाभतें.

(१३६) लौकिक व्यवहारातलें प्रातिनिधिकत्व

केवळ लौकिक व्यवहारांतील प्रतिनिधिद्वारा कार्य करण्याचीं उदाहरणें देत बसण्याचें फारसें कारण नाहीं. कारण ती गोष्ट लोकांच्या चांगल्या परिचयाची आहे. मुखत्यारपत्र हें एक कायदेशीर साधन असून त्यामुळें प्रतिनिधित्व सिद्ध व सफळ होतें; मात्र कांहीं मुखत्यारपत्रें विशिष्ट कामापुरतींच असतात तर कांहीं कुलमुखत्यारपत्रें म्हणजे कोणत्याहि कामाला चालण्यासारखीं असतात. मुखत्यारपत्र केव्हांहि रद्द करतां येतें. पण तें तसें रद्द होईपर्यंत मुखत्याराला यजमानाचे सर्व हक्क व अधिकार कायदेशीर रीतीनें वापरता येतात. न्याय-मुनसफीच्या कामांत दिलेलें वकीलपत्र हें विशिष्ट कामापुरतें दिलेलें मुखत्यारपत्रच होय. या उसन्या प्रतिनिधीच्या अधिकारानें वकील हा आपल्या कुळाशीं इतका तादात्म्य पावूं शकतो कीं क्षणभर कुळाच्या जागीं आपणच आहों अशी भावना करून घेऊन प्रथमपुरुषी भाषाहि तो वापरतो. पेढीवाल्या सावकाराच्या निरनिराळ्या पेढ्यांच्या गादीवर बसून धन्याकरितां व्यवहार करणारे मुनीम हे अगदीं सरळ अर्थानें प्रतिनिधीच होत. वतनदार लोकांत बदली देण्याची चाल फार आहे. वतन तर सोडावयाचें नाहीं पण त्या वतनासंबंधीं करण्याची चाकरी तुच्छ मानून ती स्वतः करावयाची नाहीं. म्हणून वतन संभाळण्याकरितां बदली कामगार देतात व सरकारहि असे बदली नेमून घेऊन त्यांजकडून काम घेतें. हिंदी संस्थानांतून ही चाल फार पाहावयास सांपडते. तेथें कामगारी नोकरीप्रमाणें मानसन्मानाच्या कामींहि बदली चालतो. सणावारीं किंवा दरबारच्या दिवशीं सरदार दरकदार किंवा दरबारी स्वतः हजर राहूं न

शकेल तर त्यानें आपला मुलगा पाठवावा, व त्यानें पंक्तीचें जेवण वडिलाकरितां जेवावें व अहेरनजराणा वडिलांकरितां करावा अशी अजून रीत आहे. प्रतिनिधित्वाचा दुसरा एक असा प्रकार आहे कीं, एकेक व्यक्तीनें आपापला प्रतिनिधी नेमून देण्याप्रमाणें अनेकांनीं मिळून संयुक्त अधिकारानें प्रतिनिधी देण्याची व्यवस्था आधुनिक काळांत कायद्यानें केलेली आहे. तिला इन्कॉर्पोरेशन् असें म्हणतात. इन्कॉर्पोरेशन् ही पद्धति व तींतून निर्माण झालेली वस्तू कॉर्पोरेशन्. या पद्धतीप्रमाणें अनेक लोक कांहीं विशिष्ट अधिकार प्राप्त करून घेऊन एकत्र येऊन सर्वांची मिळून समाईक कंपनी किंवा संस्था बनवून ती नोंदून (रजिस्टर करून) घेतात. व या नोंदणींत दाखल झालेल्या नियमाप्रमाणें चिटणीस म्हणून जो सर्वाधिकारी नेमण्यांत येतो त्याला, त्या संयुक्त संस्थेकरितां, सर्व कायदेशीर व्यवहार म्हणजे पैशाची देवघेव, करार, फिर्यादी–अर्यादी इत्यादि करतां येतात व त्या संस्थेला व इतरांना बंधनकारक होतात.

(१३७) प्रातिनिधिक तत्त्वाचीं दोन टोकें

वर सांगितलेली पारमार्थिक व लौकिक व्यवहारांतलीं उदाहरणें ध्यानांत घेतलीं म्हणजे जगांत प्रातिनिधिक तत्त्वाला किती महत्त्व आहे हें सहज कळून येईल. तेव्हां आतां तें राज्यसंस्थेला कसें लागूं पडतें हें पाहूं. या संस्थेचें कार्य नेहमीं दुतर्फी असतें. म्हणजे एका अंगीं राजा किंवा अध्यक्ष किंवा जो कोणी मुख्य सत्ताधीश असेल तो आणि दुसऱ्या अंगीं प्रजा. यापैकीं राजा किंवा अध्यक्ष हा शब्द उच्चारला असतां डोळ्यापुढें एक व्यक्ति उभी राहिल्याचा भास होतो, तरी प्रत्यक्ष कार्यांत त्या व्यक्तींत एका समष्टीचाच संक्षेप झालेला असतो. ही समष्टी म्हणजे राजा–अध्यक्षापासून सरकारी म्हणून जें जें काम तें तें करणारी अगदीं शेवटल्या पायरीपर्यंतची अधिकारी व्यक्ति. या समष्टीचें एक टोंक राजा किंवा अध्यक्ष हें असून दुसऱ्या टोंकाला पाटील कुलकर्णी किंबहुना तराळ व वेसकर बेलीफ पटेवाला या अधिकारी व्यक्ती येतात. आणि एक राजा सोडला म्हणजे मुख्य राज्यसत्तेच्या अंगभूत असणारे निरनिराळे अधिकार यथांश धारण करून बजावणारे हे सर्व अधिकारी त्या राजाचे प्रतिनिधीच होत. आणि खुद्द राजा हा देखील

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
सरस्वतीमहाल वाचनालय, सातारा

उच्च राजधर्माच्या दृष्टीनें प्रजेचा प्रतिनिधी असें मानलें म्हणजे प्रातिनिधिक तत्त्वावर एकंदर राज्यसंस्था कशी अधिष्ठित आहे हें ध्यानांत येतें. प्रजा ही राजाचा प्रतियोगी व ती बोलूनचालून समष्टीस्वरूपच आहे. तथापि या दुसऱ्या बाजूलाहि असा चमत्कार दृष्टीस पडतो कीं, राजसत्ता ही जशी अधिकाऱ्यांच्या एका समष्टीवर पसरून अंतिम स्वरूपांत कोणातरी एका अधिकारी व्यक्तीच्या रूपानें मूर्त स्वरूपांत प्रगट होते, त्याचप्रमाणें प्रजा ही मुळांतच समष्टीरूपानें असली तरी तिलाहि कार्यक्षम होण्याकरतां अखेर व्यक्तिरूपानें प्रगट व्हावें लागतें. अगदीं एकतंत्री म्हणजे अनियंत्रित राज्यपद्धति (डेस्पॉटिझम्) असेल तेथें या प्रजाव्यक्तीला कायदेशीर असा हक्क कोणताच नसतो. तिच्या संबंधानें राजा केवळ नैतिकदृष्ट्या राजधर्म स्मरून, आपलें कर्तव्य ओळखून, या प्रजाव्यक्तीचे हक्क काय मानील ते मानील. पण तत्त्वतः ती प्रजाव्यक्ति सजीव असूनहि निर्जीवाप्रमाणें, किंवा मनुष्य असूनहि गोठ्यांतील गुराप्रमाणें, सर्वस्वी पराधीन अशी असते. पण जेथें राजसत्ता नियंत्रित व नियमबद्ध असते तेथें प्रत्येक प्रजाजनव्यक्ति ही राज्यसंस्थेचा प्रतिनिधीच ठरते.

(१३८) राजा व प्रजाजन सारखेच

नियंत्रित राज्यपद्धति ही प्रायः प्रातिनिधिकच असते. कारण राजाचे हक्क मर्यादित केले असतां बाकी उरलेले हक्क प्रजेला मिळतात; व ते प्रजेनें बजवावयाचे तर तिला कोंणी तरी प्रतिनिधि आपला म्हणून नेमून देऊनच बजवावे लागतात. मात्र प्रजेची संख्या पुष्कळ असल्यामुळें तिला सर्वांकरतां म्हणून एकच प्रतिनिधि नेमून भागण्यासारखें नसतें. कारण प्रतिनिधि नेमावयाचा तो कांहीं व्यक्तिशः आवडीमुळें, विश्वासामुळें, व पात्रता पटल्यामुळें नेमण्यांत येतो. आणि सर्व प्रजेसंबंधानें हे सर्व गुण एका कोणाहि व्यक्तींत असणें शक्य नाहीं म्हणून प्रतिनिधींची संख्याहि स्थानपरत्वें हितपरत्वें पुष्कळच मोठी असावी लागते. एका अंगाला तत्त्वतः सर्वाधिकारसंपन्न राजा किंवा अध्यक्ष असला तरी, दुसऱ्या अंगाला प्रजा प्रतिनिधि (म्हणजे मतदार) हा, अंशाधिकारी असूनहि, आपली मिजास राजाच्या किंवा अध्यक्षाच्या बरोबरीची समजूं शकेल. कारण एकटें एक मतहि मतदारसंघाच्या

निवडणुकींत काय किंवा कायदेमंडळाच्या बैठकींत काय सर्व पारडें फिरवूं शकतें! व्यक्तिशः मतदार प्रजाजनाच्या तात्त्विक अहंकारासंबंधानें एक मौजेची गोष्ट एके ठिकाणीं वाचण्यांत आली ती अशी. अमेरिकेच्या राजधानीच्या शहरीं एकदां अमेरिकन रिपब्लिकचा अध्यक्ष रस्त्यानें चालत जात असतां एक अमेरिकन नागरिक रस्ता ओलंडतांना त्याच्या आड आला. तेव्हां जवळच्या एका जाणत्या गृहस्थानें त्या नागरिकाला किंचित् दटावून म्हटलें, "अरे जरा बाजूला हो, आपल्या रिपब्लिकच्या अध्यक्षाची वाट अडते ना!" तेव्हां त्या नागरिकानें उलट आढ्यतेनें उत्तर दिलें व म्हणाला, "मी बाजूला होत नाहीं. त्यानेंच वाटेल तर दुसऱ्या बाजूनें जावें. तो रिपब्लिकचा अध्यक्ष असेल, पण मी मतदार प्रजाजन म्हणजे मूर्तिमान रिपाब्लिकच आहे." या गोष्टीचें मर्म सहजच लक्षांत येण्यासारखें आहे.

(१३९) नियमांची आवश्यकता

पूर्वी एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, हल्लींच्या काळांत आतां सर्वस्वीं अनियंत्रित व अनियमबद्ध अशा राज्यसंस्था फारशा उरलेल्या नाहींत. यामुळें प्रातिनिधिक तत्त्वाचा अंमल जवळजवळ जगभर दिसून येतो. हें तत्त्व कार्यक्षम होणार तर अर्थात् फिरून निरनिराळ्या तत्त्वांवर मतदारांचे संघ किंवा गट बनवावे लागतात. मतदारीची पात्रता ठरवावी लागते, मतदानाच्या कार्याचे नियम बनवावे लागतात. मतदारांनीं निवडून देण्याच्या कायदेमंडळांत प्रतिनिधींच्या जागांची संख्या ठरवावी लागते. या प्रतिनिधींनीं तेथें कार्य कसें करावयाचें याविषयीं नियम बनवावे लागतात. आणि शेवटीं या प्रतिनिधींनीं निवडून दिलेलें किंवा इतर रीतीनें अस्तित्वांत आलेलें प्रधानमंडळ किंवा कार्यकारी मंडळ यांच्या हातून काम कसें घ्यावें, व त्या कामाला तें मंडळ पुढें अपात्र ठरलें किंवा त्याच्या हातून चुका किंवा अपराध घडले तर त्याला जबाबदारी जाणवून कामावरून दूर करून दुसरें एकादें मंडळ त्यांच्या जागीं कसें नेमावें, याचेहि नियम करावे लागतात. पण या नियमांत स्थानपरत्वें लोकपरत्वें इतकें वैचित्र्य असतें कीं, तुलनात्मक अभ्यास करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्येक राष्ट्रासंबंधानें असणारा हा नियमसंग्रह हातीं घेऊन त्याचा सूक्ष्म अभ्यासच करावा लागेल. म्हणून

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
प्रातिनिधिक राज्यपद्धतीवर वाचनालय, सातारा

प्रस्तुतसारख्या लहानशा पुस्तकांत तें सर्वस्वीं अशक्य होय. मात्र प्रातिनिधिक राज्यपद्धतीची सर्वसंमत म्हणून स्थूल अशीं कांहीं तत्त्वें आहेत तींच याखालीं अगदीं संक्षेपानें दिलीं आहेत.

(१४०) धनी-प्रतिनिधि म्हणजे बिंब-प्रतिबिंब

प्रातिनिधिक पद्धतीची गरज कबूल केल्यानंतर धनी व प्रतिनिधी यांचे संबंध कसे असावे हा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. धनी म्हणजे यजमान. किंवा प्रतिनिधी नेमून देणारा मुख्य हक्कदार किंवा अधिकारी. धनी हा शब्द मुख्यार्थदर्शक असून सोपा व सुटसुटीत असल्यामुळें तोच आम्ही योजिला आहे. असो. धनी व प्रतिनिधी यांचा संबंध कसा असावा याचें उत्तर एका वाक्यांत असें देतां येईल कीं त्यांचा संबंध बिंब–प्रतिबिंबासारखा असावा. त्यासंबंधाचे याहून अधिक समर्पक वर्णन करणें जवळ जवळ शक्यच नाहीं. धनी हें बिंब व प्रतिनिधी हे प्रतिबिंब. पण नुसते आरशांत तोंड पाहून प्रतिबिंब निर्माण करतां येते तसा धन्याला प्रतिनिधी निर्माण करतां येत नाहीं. फार तर आपल्या प्रतिनिधीचे गुण काय असावेत हें लक्षांत आणून मनाच्या आरशांत त्याचें चित्र पाहून प्रतिनिधीची निवड केली जाते किंवा केली जावी असें म्हणतां येईल. किंवा हे गुण ठरविणें देखील कठीण आहे. गुणांनीं प्रतिनिधी हा धन्याच्या मानानें कनिष्ठ असेल किंवा बरोबरीचा असेल किंवा श्रेष्ठ असेल. पैकीं कनिष्ठ गुणांचा प्रतिनिधी धन्याकडून सहसा वर्ज्यच मानिला जाईल. पण एकाद्या अपवादभूत प्रसंगीं समानगुण किंवा श्रेष्ठगुण न मिळेल तर कनिष्ठ गुणहि पत्करावा लागेल. समजा निवडणूक उभी आहे. स्वतःला तर तिला उभे राहातां येत नाहीं, आणि समान किंवा श्रेष्ठगुण असा दुसराहि कोणी उमेदवार उभा राहात नाहीं, तर मिळेल तसा प्रतिनिधी स्वीकारावा लागतो. समानगुण प्रतिनिधी नेमण्यांत आनंद वाटेल. श्रेष्ठगुण मनुष्य आपला प्रतिनिधी होण्याला मिळेल तर त्या आनंदांत बहुमानाची भर पडेल.

(१४१) चांगल्या प्रतिनिधींचा तुटवडा

हल्लींच्या दिवसांत इतक्या निरनिराळ्या जागा निवडणुकीकरितां उपस्थित होतात कीं त्यांतील फार तर एकाद्या जागेकरतां मनुष्य उमेदवार

म्हणून स्वतः उभा राहील. अर्थात् बाकीच्या सर्व जागांकरतां आपलें मत देऊन त्याला प्रतिनिधी नेमूनच काम करून घ्यावें लागतें. उलटपक्षी त्यानें निवडणुकीला स्वतः एकाद्या जागेकरतां उभें राहावयाचें ठरविलें तरी निवडणूक हें काम अनेक दृष्टींनीं कठिण असल्यामुळें, तो या फंदांत पडणें बरें नव्हे असें म्हणून अंग काढून घेतो. जे लोक निवडणुकींत प्रतिनिधी म्हणून निवडून येतात त्यांच्यापेक्षां अधिक चांगले लोक एकंदर प्रजाजनांत नसतात हें म्हणणें उघडच धाडसाचें आहे. पण अधिक चांगले लोक उपलब्ध असतां ते निवडणुकीस उभे न राहाण्याचें कारण असें असूं शकतें कीं, त्यांना अहंकार असल्यामुळें लोकाकडे जाऊन मतें मागणें हें त्यांना कमीपणाचें वाटतें. किंवा ते गुणी असले तरी लोकप्रिय नसतात. किंवा त्यांचा स्वभाव भिडस्त असतो. किंवा इतर कामांतच त्यांना अधिक आनंद वाटतो. किंवा निवडणूक यशस्वी करण्याला लागणारें मनुष्यबळ व द्रव्यबळ त्यांना नसतें. अशा अनेक कारणांनीं चांगले लोक प्रतिनिधी होण्याला पुढें येत नाहींत. यामुळें वर सांगितलेले दोष किंवा वैगुण्यें ज्यांच्यामध्यें असतात अशा उमेदवारांतूनच धन्याला प्रतिनिधी निवडावे लागतात.

(१४२) नियमांचें वैचित्र्य

स्वतः धनी म्हणून पुढें कोणीं यावें, किंवा प्रतिनिधी म्हणून कोणीं कोणास निवडून द्यावें हा अर्थात् प्रजाजनांतील ज्या त्या व्यक्तीचा खाजगी विचार होय. पण सर्वसाधारणरीत्या प्रजेचे प्रतिनिधी किती निवडून घ्यावे व ते कसे घ्यावे हें ठरविणें प्रत्येक राष्ट्रांतील अधिकाऱ्यांचे (म्हणजे ज्या राष्ट्रांत प्रातिनिधिक पद्धती मान्य झाली आहे) एक मुख्य काम असतें. तें काम कांहीं नियमांनींच करावें लागतें. पण पूर्वी दर्शविल्याप्रमाणें या नियमांत इतकें पुष्कळ वैचित्र्य असतें कीं, एका राष्ट्रांतील नियमांशीं दुसऱ्या राष्ट्रांतील नियमांचा मेळ घालूं पाहाणें हा जवळजवळ कालापव्यय ठरतो. कारण हें वैचित्र्य निरनिराळ्या राष्ट्रांच्या नियमांतच आढळून येते असें नाहीं, तर एकाच राष्ट्रांतील निरनिराळ्या भागांतील नियमामध्येंहि तें दिसून येतें. पण या वैचित्र्याचें कारण रुचि–भेद तर खराच, पण तें सर्वस्वी नुसत्या लहरीचें प्रदर्शन असेंच केवळ म्हणता येत नाहीं. तर तें वैचित्र्य

परिस्थितीच्या सूक्ष्म अवलोकनाचें, न्यायबुद्धीचें, व सूक्ष्म विवेकाचें आणि उत्कृष्ट तारतम्याचेंहि फळ असूं शकतें.

(१४३) प्रतिनिधी निवडण्याचे कांहीं मुख्य नियम

प्रातिनिधिक तत्त्वाची इतकी विचक्षणा करून आतां या पद्धतींतील नियमांच्या मुळाशीं जीं सर्वसाधारण तत्त्वें असतात त्यांचा थोडासा निर्देश करितों. धनी जसा आपला प्रतिनिधी गुणांनीं व मतांनीं प्रतिबिंबरूप असावा असें मानतो, त्याप्रमाणें एकंदर प्रजेच्या वतीनें येणाऱ्या प्रतिनिधींचें मंडळ हेंहि त्या प्रजेच्या मताचें शक्य तितकें बरोबर प्रतिबिंब असावें असाच हेतू तद्विषयक योजना करणाऱ्या अधिकाऱ्यांचा असतो. मात्र त्यांतल्या-त्यांत या गोष्टींतील प्राथमिक कार्य अधिकाऱ्यांच्याच हातीं असल्यामुळें शक्य तेथें ते नियमांना आपल्या आवडीच्या धोरणाचें वळण लावतात. पण अशी गोष्ट असली तरी खालीं दिलेले नियम म्हणजे अर्थात् तत्त्वें हीं प्रायः अबाधित असतात असें धेऊन चालण्यास हरकत नाहीं. (१) कायदेमंडळें व लोकसभा यांतील सभासदांची संख्या फार थोडी असूं नये, व उगाच फार वाढविलेलीहि असूं नये. अगदीं थोडी संख्या असेल तर लोकमत व्हावें तसें प्रतिबिंबित होत नाहीं; आणि ही संख्या अवजड झाली तर काम चांगलें होत नाहीं. म्हणून राष्ट्राच्या मानानें म्हणजे एकंदर राष्ट्रांतील मतदारसंख्येच्या मानानें प्रतिनिधींची संख्या असावी. (२) अशा कायदेमंडळांतील किंवा सभांतील निर्णय अल्पमत बहुमत मोजूनच करावयाचे असतात; यामुळें प्रजेनें निवडलेले प्रतिनिधी सरकारानें नेमलेल्या प्रतिनिधींपेक्षां पुष्कळच अधिक असले पाहिजेत. असें झाल्यानें सत्तेचें पारडें एका बाजूलाच कायमचें झुकलेलें राहून हा राज्यसंस्थेचा ताजवा खोटा व कुचकामाचा ठरेल असें सकृद्दर्शनीं वाटतें. परंतु सरकारानें नेमलेल्या प्रतिनिधींची संख्या थोडी असली तरी, त्यांचे हातीं कांहीं जादा व विशेष अधिकार असल्यामुळें हे दोन्ही पक्ष जवळ जवळ तुल्यबलच होतात. आणि त्यांतूनहि लोकपक्षाचें पारडें थोडेसें जड असलें तर तें इष्टच असतें. कारण राज्यसत्तेचा मूळ उगम सरकार नसून लोक हेच होत. साध्या बाजारांतहि घेवाऱ्याचें पारडें दुकानदाराच्या पारड्यापेक्षां थोडेंसें तरी खालीं जाईल तेव्हांच सौदा पुरा होतो. (३)

प्रजाजनांकडून निवडून येणाऱ्या प्रतिनिधीमध्यें देशांतील सर्व पक्षोपपक्ष व हिताहितसंबंध यांचा परामर्ष घेतला जावा. समानता संभाळूनहि गुणोत्कर्षाला अधिक किंमत देणें व निराश्रितांचें संरक्षण करणें या दोन्ही गोष्टी न्याय्य समजल्या जातात. (४) सर्व प्रजानन हे तत्त्वतः एक गट्ठा मानण्यांत आल्यामुळें, राष्ट्रांतील कोणताहि प्रजानन कोणत्याहि भागांतील इतर प्रजाजनांचा प्रतिनिधी होण्यांत फारसें कांहीं बिघडत नाहीं. तथापि निवडून येणारा व निवडून देणारे यांच्या मध्यें अधिकांत अधिक जिव्हाळ्याचा संबंध असावा. व तो ज्या भागांतला रहिवासी त्याच भागांत निवडून आलेला एकंदरीनें अधिक बरा. कदाचित् सर्वश्रेष्ठ अशा प्रातिनिधिक संस्थेला हा नियम लावू नये. पण जसजसें खालीं उतरत जावें तसतसा हा नियम अधिकाधिक योग्य ठरतो. (५) निवडणुकी शक्य तितक्या एकाच पद्धतीनें व एकाच वेळीं व्हाव्या. याकरितां सोईचे व व्यवहारक्षम असेच मतदारांचे गट बनवावे. (६) मतदारसंघांतील घटकभूत जो व्यक्तिशः मतदार त्याच्या पात्रतेविषयीं कांहीं नियम असावेत. त्यांतील मुख्य म्हटले म्हणजे ती व्यक्ती सज्ञान असावी, किंबहुना अमुक एक (उदाहरणार्थ पंचवीस वर्षें) वयाची तरी निदान असावी. या खालींहि वयाची मर्यादा जाणें अशक्य नाहीं; व शेवटली मर्यादा म्हटली म्हणजे सज्ञान होण्याचें वय अर्थात् १८ किंवा २१ वर्षें ही मानली जाते. (७) वयाच्या पात्रतेप्रमाणेंच दुसरी पात्रता म्हणजे मुख्यतः सरकारदेण्याची पात्रता. म्हणजे मतदार होण्याची इच्छा असेल त्यानीं सरकाराला किंवा स्थानिक स्वराज्यसंस्थेला कोणत्याहि रूपानें प्रतिवर्षी कमींत कमी कांहीं ठरीव रक्कम देत असलें पाहिजे. किंवा शिक्षण, जाहीर मान्यता, किंवा संपत्तिमत्ता इत्यादि विशेष गुण मतदार होणाऱ्याच्या अंगीं असले पाहिजेत. (८) पण वरील नियमांतील पात्रता असूनहि कांहीं विशेष कारणाकरितां मतदार होण्याल मनुष्य अपात्र ठरूं शकेल. उदाहरणार्थ, वेडेपणा, नादारी, विशिष्ट प्रकारची गुन्हेगारी, सरकारी नोकरीचा संबंध इत्यादि. (९) प्रतिनिधि हें मतदारांचें प्रतिबिंब मानल्यास उमेदवार हा मतदारसंघापैकींच असावा असा नियम सामान्यतः योग्य ठरतो. पण त्याला अपवादहि असूं शकतील. याचा अर्थ सर्वसाधारण पात्रतेच्या व विशेष प्रकारच्या अपात्रतेच्या बाबी

जशा मतदारांना तशाच त्या उमेदवारांनाहि लागूं पडतात. (१०) कमींत कमी पात्रतेच्या गुणांची अट मतदाराला पुरी पाडता आली म्हणजे त्याला जो मताधिकार, तोच त्याच अंगांनीं अधिक संपन्नता असणाऱ्या प्रजाजनालाहि असावा. संपन्नता अधिक म्हणून मताधिकार अधिक नसावा. (११) एका मतदाराला होतांहोईतों एकच मत असावें, व त्याला तें कोठल्या तरी मतदारसंघांत एकदां नोंदण्यापेक्षां अधिक संधी किंवा सवलत असूं नये. (१२) मतदारसंघ लहान मोठा असेल त्या मानानें प्रतिनिधींच्या जागांची संख्या असावी. (१३) सत्पात्र ठरलेल्या मतदारांची यादी निवडणुकीच्यापूर्वी कांहीं काल तरी निश्चित ठरावी. ती ठरेपर्यंत उलट-सुलट तक्रारी ऐकून निर्णय होण्याला संधी मिळावी; पण ती मुदत टळल्या-वर मतदारांच्या यादीला कुलूप लागलें असें समजावें, व तींत नंतर ढवळाढवळ करण्याचा अधिकार कोणालाहि राहूं नये. (१४) अशा यादींच्या आधारेंच निवडणुकी व्हाव्या व त्या होण्याचें स्थल, काल, वेळ, मतपत्रिकांचें स्वरूप, मतदानाचा प्रकार, निवडणुकीचे अधिकारी, मतांची मोजदाद करून जाहीर करण्याचा निर्णय, कोणाची कांहीं रीतसर तक्रार असेल तर तिचा विचार करून देण्याचा न्यायनिवाडा व त्याचे अधिकारी, या सर्वां-विषयीं लेखी निश्चित नियम असावे. (१५) प्रतिनिधी होऊं इच्छिणारानें मतदारांची मर्जी वाटेल तशी संपादन करावी. तथापि कांहीं गोष्टी त्यानें करण्याच्या नाहींत. उदाहरणार्थ, प्रतिपक्षावर बदनामी होण्यासारखे खोटे जाहीर आक्षेप घेऊं नयेत. खोटी निंदा नालस्ती करूं नये. मतदारांना पैसे देऊं नयेत किंवा देण्याची आश्वासनें देऊं नयेत.त्यांच्यावर जुलूम जबरदस्ती करूं नये. धाक दाखवूं नये. जोखीम घालूं नये. त्यांना मेजवान्या देऊं नयेत किंवा खाद्यपेयाचें आमिष दाखवूं नये. एकाच्या जागीं भलता कोणी मतदार म्हणून नेऊं नये. भाड्याचीं वाहानें ठेऊं नये. स्वतःचा खर्चहि कांहीं ठराविक मर्यादेपलीकडे करूं नये, व तो ठराविक मुदतींत योग्य अधिकाऱ्याला दाख-विल्याशिवाय राहूं नये. इत्यादि वरील नियम लक्षांत घेतल्यास हें दिसून येईल कीं, त्यांचा हेतू मतदानपद्धती शक्य तितकी निर्दोष करण्याचा आहे. आणि यांतील मुख्य दोष म्हटला म्हणजे मतदानपद्धतीचा उपयोग अप्रामाणिकपणें करणें हा होय. अप्रामाणिकपणानें ज्याचा तो दोषी होतोच;

पण इतरहि त्यामुळें फसले जातात. यामुळें प्रतिनिधीची नेमणूक ज्या खुल्या दिलानें व सहज भावनेनें व केवळ पात्रापात्रतेवर लक्ष ठेऊन व्हावी तशी होत नाहीं. आणि हें साधण्याकरतां मतदानपद्धतींत एक नियम प्रायः कोठेंहि असतो तो हा कीं, बाहेर उमेदवार व मतदार कांहींहि करो, परंतु मतदारानें प्रत्यक्ष मत कोणाला दिलें हें बाहेर कोणाला कळूं नये म्हणून मत देण्याची जागा इतकी गुप्त ठेवतात कीं, तींत मतदाराशिवाय दुसरा कोणी एकाच वेळीं असूं नये. मतदार हा एरवी उमेदवाराच्या पाशांत कितीहि सांपडला असला तरी, अखेरचा महत्त्वाचा व मुद्द्याचा जो एक क्षण म्हणजे प्रत्यक्ष मत देण्याचा, त्यावेळीं तरी तो सर्व पाशमुक्त राहावा, व त्यानें तेथें काय केलें हें कोणास कळूं नये. इतकी सुरक्षितता केल्यावर मग सरकार झालें तरी अधिक काय करणार !

(१४४) नियम असूनहि असमाधान राहतेंच

असो. याहून अधिक बारकाव्यांत शिरलें असतां संयुक्त मतदारसंघ, जातवार मतदारसंघ, परस्पर–विरोधी हितसंबंधांचें संरक्षण करण्याच्या योजना, इत्यादि पुष्कळ गोष्टींचा विचार करावा लागेल. परंतु त्या एकेक मुद्द्यावर एकेक किंवा अनेकहि ग्रंथ होऊं शकतात व आहेतहि. हिंदुस्थानांत निवडणुकीचें तत्त्व प्रविष्ट झाल्यास फारच थोडा काळ लोटलेला आहे. पण इतर देशांतून प्रातिनिधिक राज्यपद्धति पुष्कळ दिवसांची असतां, अजूनहि तिच्या स्थानिक गुणदोषासंबंधानें आतां कोणाचें कांहीं म्हणणें राहिलेलें नाहीं अशी पावती पटलेली नाहीं. एक तर, प्रातिनिधिक राज्यपद्धती नांवानें सुरूं असली तरी तिच्या अंमलबजावणींत अथपासून इतिपर्यंत सत्तालोलुप अशा राजाधिकाऱ्यांचा हात वावरत असल्यामुळें, एकेक झाड तोडून जंगल साफ करावें त्याप्रमाणें लोकसत्तेला पदोपदीं झगडा करावा लागला आहे. पण राजसत्ताधिकाऱ्यांचा संपर्क नाहींसा झाला तरी, निरनिराळे राजकीय पक्ष व उपपक्ष यांच्यांतील परस्पर–हितविरोधहि कांहीं कमी जिकीरीचा ठरत नाहीं. ब्रिटिश पार्लमेंटचा इतिहास या दृष्टीनें निदान तीन–चारशें वर्षांचा असला तरी, अजून विलायतेंतील मतदानपद्धति सदोष आहे असें विशिष्ट पक्षाकडून म्हटल्याचें ऐकिवांत येतें. आहे तें ठीक आहे

असें मि. वाल्डविन यांचा कॉझरवेटिव्ह पक्ष म्हणत असतो. लिबरल पक्षाचे अध्वर्यु लॉइड जॉर्ज हें मतदानपद्धती व प्रतिनिधींची वाटणी निर्दोष होण्याकरतां अजूनहि नवे नियम सुचवीतच आहेत. आणि मजूर पक्षाचें समाधान तर होण्याला फारच अवकाश आहे! कारण अमीर-उमरावांची वरिष्ठ सभा आधी मोडून टाकावी, व देशांत मजूर पक्षाच्या मतदारांची संख्या अधिक असतां प्रत्यक्ष पार्लमेंटमध्यें आपल्याला अबाधित असें बहुमत मिळत नाहीं, अशी मजूर पक्षाची तक्रार आहे. तात्पर्य, प्रातिनिधिक राज्यपद्धतींत सुधारणा होण्याला अंत नाहीं असेंच म्हणावें लागतें. जनतेला कोठेंहि राज्याधिकारांत प्रतिनिधिद्वारा पडलेलें आपलें प्रतिबिंब पाहावें असें फार वाटतें. पण तें प्रतिबिंब पाहाण्याला अवश्य तो आरसा मिळत नाहीं; व मिळाला तरी त्याच्यावरचा मळ ओरखाडे हें नाहींसे होत नाहींत. इतर इतक्या बाबींत मनुष्यप्राणी अपूर्णावस्थेंत आहे, मग राज्यसंस्थेंतील प्रातिनिधिक पद्धतींतच तो पूर्णावस्थेला कसा पोचणार!

(१४५) पण लोकसत्तेकडेच एकंदरीनें पारडें झुकत आहे

प्रातिनिधिक राज्यसंस्थेंत निवडणुकीला महत्त्व आहेच, तरी कित्येक राष्ट्रांत निवडलेल्या प्रतिनिधींच्या लोकसभेच्या जोडीला दुसरी एक सभा असते. तिच्यांतले सभासद निवडले जात नाहींत तर सरकाराकडून नेमले जातात. इंग्लंडांतील हाउस ऑफ कॉमन्स हें पहिल्या प्रकारच्या सभेचें व हाउस ऑफ लॉर्डस् हे दुसऱ्या प्रकारच्या सभेचें उदाहरण होय. पहिल्या प्रकारच्या प्रतिनिधींना 'रेप्रेझेंटेटिव्ह' व दुसऱ्या प्रकारच्या सभासदांना 'प्रेझेंटेटिव्ह' असा शब्द लावतात. दोहोंतील फरक हा कीं, हे पहिल्या प्रकारचे सभासद राजाकडून नांवानें व्यक्तिशः बोलावले जात नाहींत. ज्या त्या मतदारसंघांतील शेरिफ नांवाच्या अधिकाऱ्यांना राजाकडून हुकूम सुटतो कीं, "तुम्ही गांवचे लोक बोलवा, आणि त्यांना म्हणावें कीं, तुमच्यातर्फे कोण प्रतिनिधी येणार असतील ते निवडून द्या, म्हणजे मग त्यांना तुमच्याकरतां म्हणून सभेला बोलावूं." पण हाउस ऑफ लॉर्ड्सच्या सभासदांना खुद्द जातीनें त्यांचें त्यांच्याकरितांच निमंत्रण असतें. अमक्या-

तर्फे या असें नसतें. म्हणून 'प्रेझेंटेटिव्ह' याचा अर्थ राजाला भेटविण्याला व राजानें बोलावण्याला योग्य अशा व्यक्ती. राजा व प्रजा यांच्या सत्तेंतील आणेवारीची वांटणी करण्याला ठराविक साधन नाहीं. (१) पूर्वी सर्व सोळा आणे सत्ता आपल्या एकट्याच्या हातीं आहे असें म्हणणारे राजे होऊन गेले. (२) त्यापुढें कांहीं राजांनीं असा सामोपचाराचा झोंक दाखविला कीं रुपयांतले आठ आणे तुमचे आठ आणे माझे. आणि (३) यानंतरची स्थिती अशी कीं राजाचे हातीं फक्त आणा–दोन आणे सत्ता राहिली व बाकीची लोकांकडे गेली. पहिल्या स्थितींत लोकसभाच नसणार हें उघड आहे. आणि त्याचीं उदाहरणें शेकडों हिंदी संस्थानांतून आज ठळक दिसून येतात. लोकसभा व उमरावसभा यांची जोडी हें दुसऱ्या स्थितीचें दर्शक होय. आणि दोरीवर उभा राहून कसरत करणारा मनुष्य ज्याप्रमाणें एकदां इकडे व एकदां तिकडे झोके घेतो त्याप्रमणें, राज्यसत्ता बनेल त्याप्रमाणें एकदां या जोडीपैकीं लोकसभेवर आधारते व एकदां उमरावसभेवर आधारते. पण हे झोके घेणें फार वेळ टिकत नाहीं. मुद्राराक्षस नाटकांत म्हटल्याप्रमाणें राज्यसत्ता ही " सा स्त्री स्वभावात् असहा भरस्य तयोर्द्वयोरेकतरम् जहाति " म्हणजे दोघांच्या खांद्यावर हात ठेऊन उभी राहण्यांत ती भारावते, आणि मग त्यापैकीं कोणातरी एकाला सोडून देते व दुसऱ्याच्या खांद्यावर दोन्ही हात ठेऊन विश्रांति घेते. त्याप्रमाणें राज्यसत्तेनें गेल्या शें–पन्नास वर्षांत हळूं हळूं उमरावसभेवर भर देण्याचें टाकून, ती लोकसभेवरच अवलंबून राहूं लागली आहे. कारण देशांतील इच्छाशक्ती व लोकमत हें लोकसभेच्या बाजूला बहुधा सगळेंच्या सगळें झुकूं लागल्यामुळें, पुष्कळ राष्ट्रांतून उमरावसभा नष्ट झाल्या आहेत, व लोकसभाच तेवढ्या शिल्लक राहून त्यांतील सर्व सभासद लोकांनीं निवडलेले असतात. लोकप्रतिनिधींनीं सर्व जागा व्यापल्यामुळें राजप्रतिनिधींना थारा नाहीं असें होत चाललें आहे.

(१४६) गणितानें प्रतिनिधित्व खोटें पडतें

पण राजा व प्रजा यांच्यांतील वादाचा असा निकाल लागला तरी, म्हणजे सर्वाधिकार लोक-सभेकडे आणि लोकसभांतील सर्व सभासद निवडलेले अशी स्थिती आली तरी, या निवडलेल्या सभासदांना तरी खरें प्रातिनिधि-

कत्व कोणाचें आहे, कितपत आहे, व तें किती वेळ टिकूं शकेल हे प्रश्न शिल्लक राहातातच; व त्यांचीं उत्तरें देणें हें काम फार कठीण आहे. कसें ते पाहूं. निवडणूक उभी राहिली, पण एकटा एक उमेदवार निवडणुकीला पुढें आला; व तो इतका बलाढ्य किंवा शिरजोर आहे कीं त्याच्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं म्हणून दुसरा कोणीच उमेदवार उभा राहात नाहीं. तसें झालें म्हणजे ठरल्या तारखेला निवडणुकीच्या अधिकाऱ्याला जाहीर करावें लागतें कीं एकच उमेदवार होता म्हणून निवडणुकीचें कारण नाहीं. याचा अर्थ निवडणुकीशिवाय प्रतिनिधि निवडून आला! आणि या विरोधाच्या शब्दांतच खरें शंकास्थान आहे. हा निवडलेला उमेदवार बलाढ्य होता म्हणजे तो इतर उमेदवारांना कुस्तींत भारी ठरला असा अर्थ. पण त्यामुळें तो गांवच्या मतदारांना आवडला असें मात्र ठरत नाहीं! इतर उमेदवारांच्या अभावामुळें, म्हणजे स्वतः मतदारसंघाच्या दुबळेपणामुळें, तो त्यांच्यावर लादला गेला. राक्षस किंवा पैशाच विवाहांतील पति हा जसा स्त्रीचा खरा धर्मपति होऊं शकत नाहीं, तसांच हा बलाढ्य उमेदवार त्या गांवच्या जनतेचा खरा प्रतिनिधी होऊं शकत नाहीं. असें असतां तो लोकसभेंत जाऊन बसणार आणि गांवाकरितां म्हणून मत देणार! मग यांत खरें प्रतिनिधित्व कुठचें आलें? यानंतर एक दुसरें उदाहरण घेऊं. त्यांत कल्पना करूं कीं, एकाच जागेकरितां दोन किंवा अधिक उमेदवार उभे राहिले, आणि निवडणूक झाली तींत सर्वांत अधिक मतें मिळालेलाच उमेदवार निवडून आला. तरी वस्तुतः कदाचित् असें आढळेल कीं, गांवची लोकसंख्या दहा हजार, त्यांतल्या सात हजारांचें नांव मतदार म्हणून यादींत दाखल झालें, पण त्यांतलेहि चारच हजार लोक मतें देण्याला गेले, आणि निवडणुकीला उमेदवार चार उभे होते त्यांना मतें पडलीं तीं अशीं—पहिल्याला १२ शें, दुसऱ्याला १ हजार, तिसऱ्याला ९५०, व चवथ्याला साडेआठशें. म्हणजे दहा हजार वस्तीपैकीं अवघ्या बाराशें लोकांनीं ज्याला निवडलें तो दहा हजारांचा प्रतिनिधी ठरला! चार हजारांपैकीं १२शें लोक हा हवा म्हणणारे निघाले, पण उरलेले २८ शें लोक हा नको म्हणणारे निघाले हें उघड होत नाहीं काय!

(१४७) बिंब-प्रतिबिंबाला गंडांतरें

याहून पुढें आणखी अडचणी आहेत. १२ शें लोकांच्या मतांनीं उमेदवार निवडला खरा; पण त्यानें निवडणुकीच्या वेळीं वचन आश्वासन दिलें असेल तर तें फक्त एकाददुसऱ्या महत्त्वाच्या व त्या वेळीं वादग्रस्त ठरलेल्या मुद्यांवर. पण इतर मुद्यांवर मतें देण्याची वेळ आली तर हा प्रतिनिधी आधीं हजर राहील कीं नाहीं ? हजर राहिला तर मत देईल कीं त्रयस्थपणाचा आव घालून जागा धरून बसेल ? आणि मत दिलें तरी कबूल केल्याप्रमाणें देईल कीं नाहीं ? पण तसें न देतां त्यानें वचनभंग केला तर लोक त्याचें काय करणार ? हा वचनभंग दोन्ही प्रकारचा म्हणजे सकारण किंवा अकारण असूं शकेल. तो सकारण असेल तर फार तर ईश्वराघरीं रुजू होईल. पण मतदारांचें काम, गांवचें काम बिघडलेंच कीं नाहीं ? गांवचें लोकमत निश्चित असतां फुकट गेलें व प्रातिनिधिक तत्त्व खोटें ठरलें त्याची वाट काय ? आणि तो वचनभंग अकारण असेल, म्हणजे अप्रामाणिकपणाचा, लोभबुद्धीचा, स्वार्थाचा असेल तर मग बोलावयासच नको. प्रातिनिधिक तत्त्वाची ती फटफजीतीच झाली ! वचनभंग सकारण असेल तर तो गांवीं जाऊन लोकांशीं युक्तिवाद करील; व त्यांत यश न आलें तर त्याला शेवटीं म्हणावें लागेल कीं, " माझ्या विवेकबुद्धीप्रमाणें मीं केलें. मीं आपली बुद्धी गहाण टाकून निवडणूक जिंकली नाहीं. माझी विवेकशीलता लक्षांत घेऊनच तुम्हीं मला निवडून दिलें. मग मीं आपली विवेकशक्ती चालविली यांत विश्वासघात काय झाला ? " पण त्याला असेंहि म्हणतां येईल कीं " निवडणुकीच्या वेळीं माझ्याकडून अमुक एक प्रकारें मत देईन असें वचन घेतलें होतेंत व मीं दिलें होतें. पण तें दिलें तेव्हां सगळ्या बाजू तुम्हांला व मला कळल्या नव्हत्या. लोकसभेंत जाऊन बसल्यावर पूर्वपक्ष उत्तरपक्ष होऊन वाद झाला. चर्चा झाली. नवी लेखी तोंडी माहिती पुढें आली. तेव्हां केवळ वचन दिलें म्हणूनच तसें मत दिलें असतें तर मी मूर्ख ठरलों नसतो काय ? पण मी मूर्ख म्हणवून घेण्यालाहि भिणार नाहीं; तथापि तुमचें धडधडीत नुकसान होणार असें दिसलें तें उघड्या डोळ्यानें कसें करूं ? मी गांवचा ना ! " तात्पर्य मी गांवचा व आपला

श्री छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

म्हणजे एका अर्थानें प्रतिनिधीच असें तर तोंडानें म्हणतों, आणि गांवाविरुद्ध मत देऊन प्रतिनिधित्व बुडवितों याचा मेळ कसा घालावयाचा ? तर त्याचें उत्तर हेंच कीं, प्रातिनिधिक तत्त्व हें खरें व चांगलें असलें तरी तें प्रत्येक बाबींत खरें ठरणें, किंवा कसोटीला उतरणें, किंवा गांवांतील प्रत्येक मनुष्याचें समाधान त्यानें होणें, ही गोष्ट अशक्य कोटींतली म्हणून सोडून दिली पाहिजे. तत्त्व म्हटलें तरी व्यवहारांत त्याला मर्यादा पडणारच.

(१४८) निवडणूक म्हणजे लग्नाची गाठ

वरील विवेचन निवडून दिलेल्या सुजाण माणसाविषयीं झालें.पण या निवडणुकींच्या द्वारानें देशभर स्वार्थी व नाठाळ अशा किती तरी प्रतिनिधी म्हणविणारांची जनतेशीं गांठ पडते ! आणि तसें झालें म्हणजे निवडणूक किंवा प्रातिनिधिकत्व हा करार नाहीं, तर हिंदू विवाहाप्रमाणें संस्कार आहे, असें आढळून येईल. शेरीफनें निवडणुकीचा निकाल दिला म्हणजे या लग्नाची टाळी पडली. मग पुढें ठरलें असेल त्याप्रमाणें तीन किंवा पांच वर्षेपर्यंत प्रतिनिधी हा नवरा व मतदार जनता ही बायको असें नातें जडून राहातें ! कांहीं जातींत घटस्फोट तरी होऊं शशतो. पण निवडणुकीच्या मुदतींत मतदाराला प्रतिनिधीपासून घटस्फोट मिळूं शकत नाहीं. या प्रतिनिधीच्या निंदेचे जाहीरनामे रोज गांवभर लागले, किंवा सगळ्या गांवानें रोज एकदां जमून निंदाव्यंजक ठराव पास केले, तरी ' लोकसभेंत मी गांवचा प्रतिनिधी ' म्हणून तो मिरवणार, सोडणार नाहीं. सुप्रसिद्ध मुत्सद्दी एडमंड बर्क खुद्द याच्या संबंधांतच अशी गोष्ट घडली. तेव्हां त्यानें आपल्या मतदारांना जें पत्र लिहिलें तें वाचण्यासारखें आहे. कारण त्यांत प्रातिनिधिक पद्धतीचें खरें रहस्य व मर्यादा एका प्रामाणिक राजकीय तत्त्ववेत्त्यानें सांगितलेलीं आहेत. व्यवहारांतील इतर प्रतिनिधींचें प्रतिनिधित्व चुटकीसरशी काढून घेतां येते.मुनिमाची नेमणूक, मुखत्यारानें मुखत्यारपत्र,वकिलानें वकीलपत्र, या गोष्टी रद्द करण्याला क्षणहि लागत नाहीं. पण निवडलेला प्रतिनिधी कांहीं मुदतीपर्यंत रद्द होत नाहीं. मग दरम्यान लोकसभा बरखास्त होण्यासारखा एकाद्या शुभ अपघातच झाला तर गोष्ट वेगळी ! सरकार आपल्या नोकरींत जेव्हां नोकर लोक नेमतें तेव्हां त्यांना प्रतिनिधी समजूनच

नेमतें. पण धनी व नोकर यांच्या संबंधामुळें या प्रतिनिधीला सरकाराला वाटेल तेव्हां बडतर्फ तरी करतां येते. स्टेट सेक्रेटरी हा राजाच्या आज्ञेनें व्हाइसरॉयालाहि क्षणांत परत बोलावूं शकेल. आणि एकादा एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर किंवा हायकोर्ट जज्ज अनिष्ट ठरला तर त्या प्रतिनिधीला सरकार क्षणांत बडतर्फ करूं शकते. पण कायदेशीर विधिमंडळाची गोष्ट जरा वेगळी आहे. त्यांत 'नेमून दिलेला' प्रतिनिधी अप्रिय किंवा अनिष्ट ठरल्यास तो काढून टाकणें ही गोष्ट लोकसभेंत 'निवडून दिलेला' प्रतिनिधी काढून टाकण्यापेक्षां अधिक सोपी खरी; पण तेथेंहि अपवाद होऊं शकतो. कायदेमंडळांत सरकारनें 'नेमून दिलेला' सभासद नोकर या नात्यानें नेमलेला असेल तर त्याचा राजिनामा हुकमी मागतां येतो. कारण समजा त्यानें तो न दिला तर त्याला नोकरीवरूनच काढलें म्हणजे त्याचे कायदेमंडळांतलेंहि अधिष्ठान गेलेंच. पण समजा कीं, सरकारानें नेमलेला सभासद हा खाजगी गृहस्थ आहे. आणि सरकारशीं बेबनाव झाला असतांहि जर तो म्हणेल कीं "मी मुदत भरेपर्यंत येथली जागा सोडणार नाहीं" तर सरकार पश्चात्ताप पावो पण त्या प्रतिनिधीचें मात्र चालूं शकेल. अशा रीतीनें प्रतिनिधित्वाच्या अडचणी लोकाप्रमाणें राजालाहि असूं शकतात. प्रतिनिधी आंत घेण्याचें यंत्र 'निवडणूक' हें आज बनून राहिलें आहे. तें दिवसेंदिवस सुधारलें जात आहे, व कालांतरानें बरेचसें निर्दोष होईलहि. परंतु निवडणुकीनें आंत घेतलेला प्रतिनिधी हुकमी बाहेर घालविण्याचें यंत्र अद्यापि निघालेलें नाहीं!

(१४९) एक साधारण समजूत

कोणचेंहि राज्य झालें तरी तें लोकमतावरच अवलंबून असतें, अशी एक सर्वसाधारण म्हण किंवा समजूत आहे पण सकृद्दर्शनीं तितकीशी खरी वाटत नाहीं. कारण लोकमत प्रतिकूल असतांहि तें अनेक कारणांनीं, पुष्कळ वेळपर्यंत किंवा कदाचित् केव्हांहि, प्रभावी होऊं शकत नाहीं. पण म्हणून तोंपर्यंत चाललेलें राज्य लोकमतानेंच चाललें आहे असें म्हणणें बरोबर नाहीं! असंतोष हा या काळांत प्रजेच्या मनांत धुमसत असतो, व त्यामुळें तिचें मन पिचत असतें. परंतु भडका होऊन त्यांत अप्रिय अशा राज्यकर्त्यांची आहुति पडणें किंवा न पडणें हें इतर अनेक गोष्टींवर अव-

लंबून राहतें. तें घडून येईपर्यंत गुप्त किंवा निष्क्रिय राहाणाऱ्या 'असंतोषाला' 'संमति' असें नांव देणें म्हणजे 'संमतोर्थ मौनं' या म्हणीचा दाखला घेऊन अतिशयोक्ति करण्यासारखेंच आहे. मात्र मनांत असंतोष किंवा नापसंती असतां ती प्रगट किंवा प्रभावी न करणें हा कांहीं म्हटलें तरी अखेर प्रजेचाच दोष किंवा अपराध ठरतो, यास्तव त्याबद्दल तिचा नाजूक निषेध करण्याकरितां म्हणून 'तिच्या संमतीनेंच राज्य चालतें' असें हवें तर म्हणावें! आणि हातून जोंपर्यंत इष्ट प्रतिक्रियेचा पराक्रम घडत नाहीं, तोंपर्यंत मनुष्यानें हा निषेध व ही निंदा सोसून मुकाट्यानें बसणेंच प्राप्त आहे. पण अशा लोकांचा अशा शब्दांनीं निषेध करावा कीं नाहीं हा खरोखर मुख्य प्रश्न नसून, प्रश्न आहे तो असा कीं, अप्रिय जुलमी राज्यें केवळ प्रत्यक्ष उलथून पडत नाहींत म्हणून तीं लोकांच्या (प्रजेच्या) संमतीनेंच चालतात हें म्हणणें तत्त्वदृष्ट्या बरोबर होईल काय? व त्याचें उत्तर 'नाहीं' असेंच द्यावयास पाहिजे.

(१५०) जशी पात्रता तसा लाभ

जुलमानें गांजलेले व परिस्थितीनें नाडलेले लोक आपण सोडून देऊ. पण ज्यांना लोकमत प्रकट करण्याचें साधन हातीं मिळालेलें आहे, आणि असें असतांहि जे लोक त्या साधनांचा उपयोग भरपूर करून घेत नाहींत व आपलें मत प्रभावी करीत नाहींत, त्यांना मात्र 'संमतार्थे मौनं' हा न्याय लावणें अन्यायाचें होणार नाहीं. राष्ट्र स्वतंत्र आहे व अमुक एक गोष्ट हवी तर घडवून आणणें व नको तर हाणून पाडणें याविषयीं त्यांना अधिकार व सत्ता आहे; असें असतांहि जर लोक योग्य ती खटपट न करितां उगीचच नुसती ओरड किंवा तक्रार करीत बसतील तर A free nation gets the government it deserves असें म्हणून त्यांना खिजविण्यांत कांहींच चूक नाहीं! झारशाहींत बिचारा रशियन शेतकरी जुलमाखालीं चिरडला जात होता, तेव्हां वरील न्याय लावून त्याला खिजावेणें अधमपणाचें ठरलें असतें. कारण त्यावेळीं तो स्वतंत्र नव्हता. पण आज रशियामध्यें जिकडेतिकडे लोकसत्ताक संस्थानेंच स्थापलीं गेलीं असतां, आज जर कोणी रशियन लोक म्हणूं लागतील कीं, "हल्लींचा

राज्यकारभार आमच्या संमतीशिवाय चालतो" तर मात्र त्यांचें म्हणणें कोणी ऐकणार नाहीं. तीच गोष्ट इंग्लंडसारख्या राष्ट्राची. कारण तेथें सर्व कारभार लोकतंत्र आहे. बिचारा राजा स्वतः कांहींच करूं शकत नाहीं. म्हणून एखाद्या गोष्टीबद्दल किंवा प्रधानमंडळाबद्दल स्वत राजानेंच एकवेळ कुरकूर केली, व माझ्या संमतीशिवाय ती गोष्ट घडते असें म्हटलें, तर तें एक वेळ शोभेल. पण मताधिकारसंपन्न अशा इंग्लंडांतील स्वतंत्र लोकांना तें म्हणणें शोभणार नाहीं.

(१५१) यांचीं उदाहरणें

या संमति–असंमतींतील सूक्ष्म भेद दाखविण्याला हिंदुस्थानचें उदाहरण घेतलें तर तें चांगलें उपयोगी पडेल. कारण संमति–असंमतीचे खरे खोटे सर्व प्रकार येथें आजच्या स्थितींत पहावयास सापडतात. आपण वरिष्ठ कायदे-कौन्सिलाचेंच उदाहरण घेऊं. कोणताहि कायदा पास करणें न करणें याचा निदान प्राथमिक तरी अधिकार या कायदे-कौन्सिलाला आज आहे. या कायदेमंडळांत लोकनियुक्त सभासदांचें बहुमत आहे असें मंडळांतील सभासदांच्या संख्येवरून म्हणणें प्राप्त आहे. कारण एकंदर १४०–१४५ सभासदांपैकीं निदान १०० लोकांनीं निवडून दिलेले असतात. असें असतां खालीं लिहिलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या गोष्टी या कायदेमंडळांत हल्लीं संभवतात. (१) सरकारानें बिल पुढें आणलें व कायदेमंडळानें तें मंजूर केलें. म्हणजे त्यांतल्या १०० लोकनियुक्त सभासदांपैकीं निदान बहुमत बिल मंजूर करण्याला अनुकूल पडलें. या ठिकाणीं मूळ बिल सरकारानें पुढें आणलें असलें तरी तें मंजूर होण्याचा कारभार लोकांचा लोकांनींच केला, व याप्रमाणें राज्यकारभार हिंदी राष्ट्रांतील लोकांच्याच संमतीनें झाला असें म्हणावें लागेल. कारण लोकनियुक्त शंभर सभासदांपैकीं एकाव्वन अनुकूल व एकूणपन्नास प्रतिकूल अशीं मतें बिलावर पडलीं, म्हणजे अवघ्या दोनच अधिक मतांनीं बिल मंजूर झालें, तरी तें लोकांनींच मंजूर केलें. कारण लोकसत्ताक राज्यपद्धति झाली म्हणजे लोकालोकांतहि मतभेद संभवतो; पण अशा वेळीं बहुमताचा निर्णय तोच एकंदर जनतेचा निर्णय म्हणणें ही परिभाषा लोकसत्ताक राज्यपद्धतींत सर्वमान्य झालेली आहे. आणि असा कांहींतरी

नियम केल्याशिवाय गत्यन्तरच नाहीं. (२) सरकारानें बिल पुढें आणलें व तें कायदेमंडळानें नामंजूर केलें, ही गोष्ट कांहीं थोडे लोकनियुक्त सभासद बिलाला अनुकूल मत देणारे असले तरी घडू शकेल. उलट कांहीं सरकारनियुक्त सभासद तटस्थ राहिल्यानें किंवा त्यांनीं प्रतिकूल मत दिल्यानें बिल नामंजूर झालें तरी, त्याबद्दल सरकार तक्रार करूं शकत नाहीं व राष्ट्रानें तें बिल नामंजूर केलें असेंच त्यांनाहि म्हणावें लागतें. पण अशा नामंजूर झालेल्या बिलाचेहि पुढें दोन प्रकार होऊं शकतील. एक असा कीं सरकार ती नामंजुरी स्वीकारून गप्प बसेल. या ठिकाणीं बिल नामंजूर होऊन घडणारा राज्यकारभार हा लोकमतानेंच घडला हें म्हणणें यथार्थ ठरेल. पण याचाच दुसरा प्रकार असा होईल कीं गव्हर्नर जनरल आपल्या अधिकारांत तें नामंजूर झालेलेंहि बिल सर्टिफाय करून कौन्सिल ऑफ् स्टेटकडून मंजूर करवून घेईल, किंवा तेथेंहि तें नामंजूर झालें तर ऑर्डिनन्सच्या रूपानें अमलांत आणील. या ठिकाणीं जर कोणी असें म्हणेल कीं देशांतील वरिष्ठ कायदेमंडळ हें लोकनियुक्त असल्यामुळें झाला हा कारभार लोकमतानेंच झाला तर तें म्हणणें अन्यायाचें होईल. कारण कायदेमंडळापुढें आलेल्या बिलाला अखेर कायद्याचें स्वरूप आलें खरें, पण तें लोकमतानें नव्हे तर लोकमत विरुद्ध पडलें असतांहि ! (३) पण तिसराहि एक प्रकार घडू शकतो व तो मात्र थोडा गमतीचा आहे. तो असा कीं, सरकारानें एखादें अनिष्ट बिल पुढें आणलें त्यावर मतें घेतांना अधिकारी तटस्थ राहिले; फक्त लोकनियुक्त सभासदांचीं मतें घेतलीं गेलीं; पण त्यांतल्या कांहीं लोकांनीं सरकारच्या लोभाला किंवा आमिषाला बळी पडून किंवा जातिद्वेषानें बिलाला अनुकूल मत दिल्यानें तें पास झालें. तर येथें तें लोकमतानेंच पास झालें असें म्हणावें लागेल. मग त्यावर जर कोणी असें म्हणेल कीं "छे ! ही गोष्ट लोकमतानें घडली नाहीं. कारण कांहीं लोकनियुक्त सभासदांनीं स्वार्थबुद्धीनें किंवा द्वेषानें अनुकूल मतें दिलीं म्हणून असें घडलें !" तर त्याला असें उत्तर देतां येईल कीं तुमचे थोडे तरी लोकनियुक्त सभासद बेइमान का झाले ? अर्थात् A nation gets the government it deserves फार तर यांतील गव्हर्नमेंट या शब्दाच्याऐवजीं laws असा शब्द बदलून घालतां येईल. परंतु झालेल्या

प्रकाराला लोकमताचा पाठिंबा आहे हा अपवाद कांहीं केल्या टळूं शकणार नाहीं! आणि बहुमत होईल इतके प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिला असतांहि सरकारी लोभाला स्वार्थाला बळी पडणाऱ्या यांच्याहून अधिक चांगले प्रतिनिधी मिळाले नाहींत तर लोकच नादान किंवा अपात्र कां न म्हणावे? त्यांनीं दुसऱ्या कोणाला बोल कां लावावा ? राष्ट्रांतील लोकांना मताधिकार दिला व हें करून सरकारानें आपलें कर्तव्य बजावलें ! पण लोकांनीं निवडून दिलेले प्रतिनिधि जर स्वार्थी दुबळे निघाले तर ते तसे निघूं नयेत याचीहि जामिनकी सरकारानेंच घ्यावयाची कीं काय ? तात्पर्य, या तिसऱ्या प्रकारांत घडला तो प्रकार राष्ट्रांतील सुज्ञ समंजस लोकांना आवडण्यासारखा नसला तरी, तो राज्यकारभार लोकसंमतीनेंच झाला किंवा होतो असें त्यांना कबूल करावें लागेल.

(१५२) स्थानिक स्वराज्याचें उदाहरण

पण या प्रकाराचीं, मनावर अधिक ठसा उमटविणारीं, उदाहरणें हल्लीं आमचीं लोकलबोर्डें व म्युनिसिपालिट्या यांच्या कारभारांत दिसून येतात. आज मुंबई इलाख्यांतील बहुतेक म्युनिसिपालिट्यांतून लोकनियुक्त सभासदांचें बरेंच मोठें बहुमत असतें. उदाहरणार्थ, पुण्याच्या म्युनिसिपालिटींत एकंदर पन्नास सभासदांपैकीं पंचेचाळीस इतके सभासद लोकांनीं निवडून दिलेले आहेत. अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी मंडळें हीं लोकनियुक्तच असतात. त्यांच्या निवडणुकींत सरकारचा हात कायदेशीर रीतीनें फारसा कोठें शिरकत नाहीं. या संस्थेच्या नियमांना अखेर मंजुरी सरकारची लागत असली तरी, अमुक एकच नियम अमलांत ठेवा अशी सक्ति सरकाराला करितां येत नाहीं. म्हणजे सरकाराला नियमांच्या बाबतींत विधायक सत्ता नाहीं. या संस्थेचे सर्व अधिकारी नेमणें, काढून टाकणें ही तिच्या पूर्ण अखत्यारींतील गोष्ट आहे. आणि अशा या संस्थेला सुमारें चार चौरस मैल क्षेत्रांत बारा तेरा लाख रुपयांचें उत्पन्न असून त्यांतील प्रत्येक पै सर्वस्वीं म्युनिसिपालिटीला हवीतशी खर्चतां येते. म्हणजे अल्पप्रमाणांत खालच्या दर्जाचें का होईना पण शहर म्युनिसिपालिटी हें नागरिकांना संपूर्ण स्वराज्य लाभलेलें आहे. मग त्या संस्थेचा जो कारभार चालतो तो शह-

रच्या लोकमतानें चालतो असें म्हणावयाचें कीं नाहीं ? अर्थात् ही गोष्ट कोणासहि तत्त्वतः नाकबूल करतां येणार नाहीं. तथापि, जेथें ऐकावें तेथें म्युनिसिपालिटीला दिलेल्या शिव्याच कानीं पडतील. तिचे गुण घेतलेले किंवा आभार मानलेले सहसा कानीं यावयाचें नाहीं. पण संस्थेंतील तीन चतुर्थांश किंवा चार पंचमांश सभासद प्रत्यक्ष लोकांनीं निवडून दिलेले असतां लोकांनीं जर म्युनिसिपालिटीला शिव्या दिल्या तर त्यांनीं त्या स्वतः-लाच दिल्या असें होत नाहीं काय ? व संस्थेचा कारभार लोकमतानें चालत नाहीं असें त्यांना कोणत्या तोंडानें म्हणतां येईल ! यावर कोणी कदाचित् असें म्हणेल कीं मतदारांची संख्या अजून पुरेशी नाहीं. तीं आणखी वाढावयास हवी. स्वराज्यसंस्थेंत गरीब व श्रीमंत यांतें मुळींच भेद राहूं नये, विषमता उरूं नये, या अन्तिम व उज्वल ध्येयाच्या दृष्टीनें या म्हणण्यांत कदाचित् थोडेंसें तथ्य असेल. परंतु आजपर्यंतच्या अनुभवा-वरून पाहतां मतदारांची संख्या आणखी वाढली तरी ती फक्त भरींत भर पडली इतकेंच होईल. त्यामुळें कारभार सुधारेल किंवा संस्थेच्या शिव्या वाचतील असें खात्रीनें म्हणवत नाहीं.

(१५३) लोकमत प्रभावी होण्याचा मार्ग

मतदारांची संख्या वाढविल्यानें खालच्या वर्गांतून प्रतिनिधि निवडून येण्याला मदत होते ही गोष्ट खरी. आणि समतेच्या तत्त्वाच्या दृष्टीनें पहातां स्वराज्य संस्थेंत (मग ती वरिष्ठ असो कानिष्ठ असो) श्रीमंताबरोबर गरीब, विद्वानाबरोबर अशिक्षित, व शहाण्याबरोबर अज्ञानी लोकप्रतिनिधि बसून त्या सर्वांनीं मिळून एकदिलानें एकमतानें सार्वजनिक हिताचें काम करणें हें भूषणास्पद आहे. असे प्रतिनिधि संस्थेंत आल्यानें तिला सर्वांगीण सर्व-व्यापक अशी दृष्टि लाभते. तथापि मतदारी फैलावली व लोकप्रतिनिधींची संख्या वाढली म्हणून संस्थेचा कारभार हटकून सुधारेल अशी हमी देतां येणार नाहीं. कित्येक वेळां असेंहि घडतें कीं थोडे पण निवडक लोक राज्यसंस्थेंत असून त्यांच्या हातीं सत्ता असेल तर तिचा उपयोग अधि-काऱ्यांवर दाब ठेवण्याचे कामीं अधिक यशस्वी रीतीनें होतो. पण प्रति-निधींची संख्या थोडी असली काय जास्त असली काय, त्यांच्यामध्यें स्वार्थ-

परायणता जितकी कमी असेल, कोणतेही प्रश्न समजून घेण्याची व त्याकरितां श्रम करण्याची पात्रता अधिक असेल, व जी गोष्ट खरी व लोकहिताची अशी वाटेल तिच्याविषयीं आग्रह धरण्याची चिकाटी जितकी अधिक असेल त्या मानानें खऱ्या लोकमताची छाप कारभारावर पडेल. तोंपर्यंत लोकमत म्हणजे तें फक्त आडनांवाचें होय. निरनिराळे खात्यांचे अधिकारी आपले अधिकार बेगुमान चालवितात, आणि संस्थेंतील सभासदांची नालायकी किती आहे याचा अंदाज मनाशीं करून उलट त्यांना मनांतून हसत असतात. लोकमताला प्रबळ इच्छाशक्तीचा जोर मागून नेट देण्याला उभा असेल तेव्हांच तें लोकमत प्रभावी होईल; व तें अशा रीतीनें प्रभावी होईल तेव्हांच ती संस्था खरी लोकसत्तात्मक होईल.

(१५४) अधिकारपात्रता व लोकमत

अनुभव असा येतो कीं लोकांना जे हक्क नाहींत ते दिले तरी त्यांच्याकडून त्या हक्कांचा उपयोग व्हावा तसा कसून होत नाहीं. कित्येक लोकांना कोणत्याही अधिकाराची नुसती हेटाळणीच करण्याची सवय असते. अशा लोकांना एखादा नवा अधिकार दिला तर ते त्याचा कौतुकानें व आनंदानें स्वीकार करण्याचें बाजूस राहून, त्याची उलट थट्टाच करितात, आणि अमुक केलें तरी काय होणार ? तमुक केलें तरी काय होणार ? हें त्यांचे निराशाजनक प्रश्न चालूच असतात. दुसरे कित्येक नवे अधिकार मिळाल्यानें मनांतून आनंदतात, पण या हेतूनें कीं या अधिकारांचा उपयोग करून कांहीं तरी अधिक स्वार्थ साधतां येईल. इतर कांहीं लोक असे असतात कीं त्यांना अधिकाराची हाव मोठी पण राज्यकारभार सुधारण्याकडे त्यांचा उपयोग करून घेण्याचें शहाणपण त्यांच्या अंगीं नसतें. यामुळें ते स्वतः निस्स्वार्थीपणानें वागत असले तरी, असें कांहीं भलतेंच करून ठेवतात कीं त्यांना हा अधिकार नसता तर बरा असें म्हणण्याची पाळी येते. कांहीं लोक अधिकारानें इतके फुगून जातात कीं आपणाला कांहींहि अधिकार असला तरी आपण म्हणजे कांहीं सर्व संस्था नव्हे हें लक्षांत न राहून, आपण म्हणजेच संस्था व संस्था म्हणजेच आपण अशा भावनेनें अधिकाराचें अतिक्रमण करतात व फाजिंत होतात.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (भोसले)
नगर वाचनालय, सातारा

(१५५) अवांतर अडचणी

लोकसत्ताक राज्यसंस्थेतील हे व्यक्तिगत दोष झाले. पण दुसरे कित्येक दोष, संस्थेंतच अन्तर्भूत झालेले असतात, व त्यामुळें व्यक्ति आपल्याकडून ठीक वागल्या तरी त्याचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं. उदाहरणार्थ, राष्ट्रांत विशिष्ट मताची किंवा पक्षाची मतदारसंख्या एकंदरीनें पुष्कळ असेल. परंतु प्रत्यक्ष निवडणुकींत असा प्रकार होऊं शकतो कीं, त्या पक्षाचीं भरपूर मतें पडूनहि संस्थेमध्यें अखेर बहुमत होतें तें अशाच दुसऱ्या पक्षाचें कीं, पहावयाला गेल्यास त्यांच्या बाजूला मतदारसंख्या कमी होती, किंवा निवडणुकींत मतें कमी पडलीं, असें होण्याचें. कारण मुळांत मतदारांच्या संख्येची वाटणी निरनिराळ्या मतदारसंघांत यथा-प्रमाण झालेली नसते. थोडे मतदार असणाऱ्या संघाला जितके प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क तितकेच प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क पुष्कळ संख्येच्या मतदारसंघालाहि असूं शकतो. आणि राष्ट्रांत असे विशेष किंवा जादा हक्क असणारे मतदारसंघ जितके अधिक तितकी या प्रकारची विषमता व लोकमताची निष्फळता अधिक अनुभवाला येईल. उदाहरणार्थ, मुंबई कायदेकौन्सिल घेतलें तर त्यांत सुमारें शंभर मतदारसंख्या असणाऱ्या युनि-व्हार्सिटीला एक सभासद पाठवितां येतो. तसेंच सुमारें शंभर मतदारसंख्या असणाऱ्या मुंबई शहर म्युनिसिपालिटीला एक प्रतिनिधि पाठवितां येतो. पण सव्वालाख लोकसंख्या असणाऱ्या पुणे शहराला एकच सभासद पाठ-वितां येतो. व सहा सात लक्ष लोकसंख्या असणाऱ्या कुलाबा जिल्ह्यालाहि एकच सभासद पाठवितां येतो. अर्थात् सभासदाच्या संख्येच्या बाजूनें समता असली तरी मतदारांच्या संख्येच्या बाजूनें ती विषमताच होय. मग कायदेमंडळांत लोकमताचें बरोबर प्रतिबिंब कसें पडावें !

(१५६) प्रतिबिंबाचें विकृत दर्शन.

विलायतेंत या विषमतेचे चमत्कार पूर्वी पुष्कळच पहावयास सांप-डले, व अजूनहि ते पहावयास सापडतात. १८३२ सालापर्यंत व त्या-नंतरहि कांहीं वर्षें असा प्रघात होता कीं, कांहीं कांहीं श्रीमंत व्यक्ति व उमराव लोक यांना निरनिराळ्या युक्त्यांनीं पार्लमेंटांतील तीन तीन चार

चार सभासदांच्या जागा आपल्या खिशांत असल्यासारख्या ताब्यांत ठेवतां येत असत; व त्यामुळें त्या मतदारक्षेत्रांना 'पॉकेट बरोज' (Pocket-Boroughs) असें नांवच पडलें होतें. कांहीं मतदारक्षेत्रांतून दहा वीसच मतदार असतां त्यांना एकेक सभासद निवडतां येई. १८३२ सालापासून ही विषमता बरीच काढून टाकण्यांत आली आहे. पण इतर रीतींची विषमता निघालेली नाहीं. उदाहरणार्थ, १८८६ सालीं होमरूलच्या प्रश्नावर मोठ्या निकराची निवडणूक झाली तेव्हां, या विषमतेच्या वाटणीमुळें अखेर असें आढळून आलें कीं, होमरूलपक्षाच्या बाजूला एकवीस लक्ष मतें पडून त्यांना २८३ जागा काबीज करतां आल्या; पण युनियनिस्ट पक्षाला अवघी वीस लक्ष मतें, म्हणजे एक लक्ष कमी मतें, पडूनहि त्यांना ३८७ जागा मिळाल्या. दुसऱ्या एका निवडणुकींत कॉन्झरव्हेटिव्ह पक्षाला बारा लक्ष मतें पडून ३५६ जागा मिळाल्या. आणि लिबरल पक्षाला चौदा लक्ष मतें पडून जागा मिळाल्या अवघ्या २९६ च. १९२४ सालच्या निवडणुकींत व १९१८ सालच्या निवडणुकींत असेच प्रकार घडले. म्हणजे ज्या एका पक्षाला एकंदर मतसंख्यपैकीं शेकडा त्रेपन्न इतकीं मतें पडलीं त्याला पार्लमेंटांतील एकंदर सभासदांच्या संख्येतील शेकडा ८० जागा मिळवितां आल्या. याचें कारण असें कीं मतदारसंघांची फाळणी कितीही कसोशीनें केली तरी ती तंतोतंत बरोबर होऊं शकत नाहीं. एका संघक्षेत्रांत मतदारसंख्या जितकी असते त्याच्या दुप्पट किंवा तिप्पटही संख्या दुसऱ्या एखाद्या मतदारसंघाच्या क्षेत्रांत असूं शकते. शिवाय राष्ट्रांत अनेक राजकीय पक्ष असल्यास असेंहि घडतें कीं, एखाद्या संघक्षेत्रांत एखाद्या पक्षाला बिन निवडणुकीनेंच जागा हस्तगत होते. एखाद्या क्षेत्रांत दोन पक्ष युद्धाला उभे राहातात तर दुसऱ्या एखाद्या क्षेत्रांत तीनहि पक्षाच्या उमेदवारांची गाठ पडते. यामुळें नोंदलेलीं मतें व निवडणुकींत मिळालेल्या जागा यांचें प्रमाण सारखें बसूं शकत नाहीं. जेथें काळजीपूर्वक समता सिद्ध करण्याचा प्रयत्न झालेला आहे तेथें ही स्थिति, मग जेथें तसा प्रयत्न झालेला नाहीं किंवा निवडणुकीच्या मूळ तत्त्वांतच कांहीं दोष राहिलेले आहेत तेथें समता कशी साधणार ! फ्रान्समध्यें राज्यक्रान्ति झाली तींत मुख्य कटाक्ष विषमता

घालविण्यावर होता, पण क्रांतिकारकांनीं जी राज्यघटना बनवली त्यांत स्त्रियांना मतदारींतून अजिबात वगळलें ! आज इतक्या वर्षांच्या झगडयानंतर विलायतेंत स्त्रियांना मतदारीचा हक्क दिला आहे. पण त्यांतहि विषमता ठेवलीच आहे ती अशी कीं, जो मतदारीचा हक्क पुरुषांना एकविसाव्या वर्षीं प्राप्त होतो तो स्त्रियांना तिसाव्या वर्षापर्यंत प्राप्त होत नाहीं. आणि एकवीस वर्षांखालच्या कोणाहि मनुष्याला तर मतदारीचा हक्कच कोठेंहि नसतो. अर्थात् लोकमत व लोकसत्ता यांच्या दृष्टीनें त्या वयाखालचे लोक कोठे गेले ?

(१५७) ब्रिटिश पार्लमेंटचें उदाहरण

इंग्लंडचें पार्लमेंट इंग्लंडचे सर्व कायदे करतें ही गोष्ट खरी. पण एखादें प्रधानमंडळ अधिकारारूढ आहे तोंपर्यंत त्याला पार्लमेंट हें बहुमताच्या जोरावर आपल्या हातांतील बाहुल्यासारखें नाचवितां येतें. प्रधानमंडळ हें त्या काळापुरतें बहुमतवाल्यापक्षाचें प्रतिनिधि किंवा प्रतीक असें आपण समजूं; आणि एखाद्या निवडणुकींत एका पक्षाला मतदारांच्या बहुसंख्येनें पसंति दर्शविली म्हणजे फिरून निवडणूक होईपर्यंत तें प्रधानमंडळ जे जे कायदे करील ते पासहि होवोत ! पण ते बरोबरच आहेत असें कशावरून म्हणावयाचें ! ते बरोबर असोत नसोत, पास व्हावयाचे याचा अर्थ अल्पसंख्याक मतदारांचें तितका वेळ कांहीं चालावयाचें नाहीं. त्यांना मत, शहाणपण, देशाभिमान असून नसून सर्व सारखाच. पार्लमेंटमध्यें लोकसत्तेच्या राज्यांत हवे त्याला हवें तें करितां येतें अशी आपल्या लोकांची समजूत आहे. पण ती अगदीं खोटी आहे. पार्लमेंटच्या एकंदर बैठकींत एका वर्षांत खासगी सभासदांना आपलीं बिलें पुढें मांडण्याला दहापांच दिवसहि मिळत असतील कीं नाहीं शंकाच आहे. " आम्हांला सरकारी कामाकरितां वेळ पाहिजे" असें प्रधानमंडळानें म्हटलें म्हणजे सर्व खासगी उपक्रमाला कुलूप लागतें, व अल्पसंख्याक सभासदांचें काम म्हणजे सांपडेल तेथें विरोध किंवा नुसती टीका करणें इतकेंच उरतें ! बरें लोकसत्ता आहे म्हणून, मिळेल तें काम करण्याकरितां का होईना, पार्लमेंटच्या बैठकींना किती सभासद हजर असतात हें पाहिलें तर खेद वाटण्यासारखा

प्रकार असतो. आधीं खुद्द पार्लमेंटचें सभागृहच इतकें लहान आहे कीं, पार्लमेंटचे सगळे सभासद हजर राहूं म्हणतील तर त्यांना पुरेशीं बाकेंहि त्या सभागृहांत नाहींत! यामुळें समारंभाच्या पहिल्या दिवशीं, किंवा पुढल्या एखाद्या चुरशीच्या सामन्याच्या दिवशीं, पक्षोपक्षांनीं नेमलेल्या आपल्या गुराख्यांनीं (Whips) उनाड सभासदांचीं गुरें पार्लमेंटमध्यें वळवून आणून घातलीं म्हणजे सभासद लोक कसे कोठें उभे राहातात हें पाहिलें असतां, डोंबाऱ्याचा खेळ पाहाण्याला जमलेल्या निरुंद जागेंतील तमासगिरांची आठवण होते! एखादे वेळीं गर्दीचा हा थाट, नाहीं तर नेहमीं शुकशुकाट!

(१५८) निवडणुकीची सर्कस

पार्लमेंटमध्यें प्रवेश करून घेणाऱ्या सभासदापैकीं उलट सुलट बाजूचे पांचपन्नास लोकच काय ते या लोकसभेच्या कामांत कसून व अभ्यासून लक्ष घालतात. याहून आणखी कांहीं थोडे लोक हे पार्लमेंटचें काम व नियम समजूं शकतात. पण त्यापलीकडे गेलें असतां, सगळाच अंधःकार असतो. आतां पार्लमेंटचे सगळेच सभासद बोलूं लागले तर पार्लमेंटच्या कामाकरितां एका वर्षाचे १४ महिने करावे लागतील हें खरें. तरी भाषणें न करितां का होईना पार्लमेंटचें काम समजणें, त्यांत लक्ष घालणें, त्याचा अभ्यास करणें, खाजगी प्रयत्नांची कसोशी करणें हें तरी कोण किती करितो? आज इंग्लंडांतच पार्लमेंटकडे वोट दाखवून लोकशाहीची थट्टा करणारे पुष्कळ लेखक व तत्त्वज्ञानी आहेत, व त्याचें कारण खरोखरच हल्लींचा अनुभव! मतदारांची स्थिति तर सभासदाहूनहि वाईट आहे. म्हणजे निवडणुकीच्या चार दिवसांत त्यांच्या अंगाला राजकारणाची जी हळद लागेल तेवढ्यानेंच त्यांच्या अंगचे जे काय कपडे रंगतील ते रंगतील. आणि निवडणुकींत झालें तरी त्यांची स्थिति सर्कशींतील श्वापदाप्रमाणें असते! आपण पाहातोंच कीं, सर्कशीच्या तंबूंत गर्दी इतकी चिक्कार भरलेली असते कीं, माणसाळलेला माणूससुद्धां ती पाहून चकीत व्हावयाचा! त्यांतून ते मोठमोठे दर खांबागणिक एकामागून एक लावलेले अल्लाउद्दीन किटसन लाइटचे

दिवे ! बँडच्या बेसूर आवाजाला तर खळच नाहीं. अंगभर पदकें लावून जनावरासारखा नटलेला, हातांत चाबूक घेतलेला रिंगमास्तर उभा ! वाघ-सिंहाची गाडी तंबूंतील पिंजऱ्याच्या तोंडाशीं आणून सोडतांच प्रकाशानें दिपून गेलेल्या डोळ्यांनीं तीं श्वापदें स्वतःच उडी टाकून पिंजऱ्यांतून बाहेर येतात; व चाबकाकडे पाहून ठरीव खेळ करून होतांच, आपल्या सापळागाडीचें तोंड उघडलेलें दिसतांच, बाहेर पडण्यापेक्षां अधिक वेगानें व उतावीळपणानें आपण होऊन आपल्या जागीं जाऊन बसतात. बरोबर अशाच शब्दांनीं विलायतेंतील निवडणुकींमधील मतदारांचें वर्णन कोणी एकानें केलें आहे व तें पुष्कळसें खरें आहे.

(१५९) सण गेला सणंगहि गेले

निवडणूक म्हणजे चार दिवसांचा सण ! निवडणुकीच्या धांदलीच्या काळांत व्याकरणदृष्ट्या पूर्ण असलेलीं वाक्यें बोलण्याचीहि कोणाला सवड होत नाहीं. निशाणें, चित्रें, हस्तपत्रकें व खाणाखुणा यांनींच सर्व मतानुयायांचा झगडा चालावयाचा. आणि एकदां निवडणूक संपली व निकाल जाहीर झाला, म्हणजे फिरून पुढची निवडणूक येईपर्यंत मतदार आपले घरच्याघरीं! बरें, जेथें स्वतः मतदारहि लाचलुचपतीला बळी पडून आपलीं मतें देण्याला तयार होतात, तेथें त्यांच्या प्रतिनिधींनीं पार्लमेंटांत जाऊन साधेल तेव्हां साधेल तसा लग्गा मारल्यास त्याला तरी नांवें कशीं ठेवावयाचीं ? लोकशाही झाली म्हणून लाचलुचपत थांबली अशी गोष्ट नाहीं. या लाचलुचपतीचीं उदाहरणें अगदीं ग्रंथाधारें संक्षेपानें सांगूं लागलों तर तोहि एक ग्रंथच होईल. म्हणून त्याचा नुसता उल्लेख करून पुढें जाणें भाग आहे. सुधारलेल्या राज्यसंस्थेंतील एका नमुनेदार कायदेमंडळाची ही गोष्ट झाली. पण ती जशी इंग्लंडची तशीच इतर अनेक देशांचीहि आहे. आणि ती हकीकत सांगण्याचा हेतु तरी हाच कीं, राजसत्ता जाऊन पुढें लोकसत्ता आली असें वरकरणीं झालें तरी दिसते इतकी लोकमताची सत्ता खरोखर लोकांच्या पदरांत पडत नाहीं.

(१६०) राजा हा प्रजेचा प्रतिनिधि कितपत होईल ?

मतदाराचा व त्याच्या प्रतिनिधीचा संबंध बिंबप्रतिबिंबाचा मानला जातो तो पदरांत पडण्याला इतक्या नडी, तर मग राजा किंवा अध्यक्ष किंवा सर्वाधिकारी यांच्या संबंधांत तर बोलावयासच नको. प्रजाजनापैकीं शेकडा किती जणांच्या तो दृष्टीला पडतो ? मग त्याशीं बोलणें चालणें होण्याची, त्याला दुःखनिवेदन करण्याची, व त्याकडून न्याय मिळविण्याची खटपट प्रजाजन कशी करणार ? " राजा सातव्या मजल्याच्या महालांत बसला असला तरी, खालीं रस्त्यावर सुटलेली घंटेची दोरी कोणीहि हलविली असतां तो त्याची गाठ घेतो, विचारपूस करतो व न्याय देतो" ही योजना कपोलकल्पित गोष्टीला ठीक आहे ! मारक्या धन्याच्या एका जनावरानें म्हणे तोंडांत ती दोरी धरून ओढली, व राजानें खालीं येऊन पाहिलें, तों त्याचें भक्कळ गेलेलें पोट व वण उठलेली पाठ त्याला दिसली ! तेव्हां त्याच्या धन्याला राजानें शिक्षा केली, व त्यापुढें त्या जनावराला खास आपल्या तबेल्यांत नेऊन बांधलें ! ही नवलकथाहि त्याच कपोलकल्पित योजनेला शोभण्यासारखी आहे. आपल्याकडील रामासारख्या न्यायी राजाचीं वर्णनें कवींनीं केलेलीं वाचून आनंद होतो; आणि मुळांत कांहीं का असेना, पण कवीला तरी अशा रामराज्याची कल्पना सुचावी याचा अभिमान वाटून, प्रातिनिधिक तत्त्वाच्या टीकाकाराला देण्याला तें उत्तर चांगलेसें वाटतें. प्रसंगविशेषीं आपण म्हणतोच कीं " पहा, हिंदू लोकांच्या राजकीय कल्पना किती उदात्त त्या. उदाहरणार्थ, रघुवंशांत वर्णिल्याप्रमाणें वरतंतूचा शिष्य कौत्स ऋषि, गुरुदक्षिणेकरितां याचना करण्यासाठीं रघुवंशीय राजाकडे गेला असतां, राजानें त्याला किती तरी कुशल प्रश्न विचारले. आणि शेवटीं असेंहि विचारलें कीं, तुमच्या आश्रमांतील पहिलटकरीण हरिणी सुखानें बाळंत झाली ना ?" पण आणखी हेंहि लक्ष्यांत ठेवावें कीं, राजानें असली कोरडी चौकशी करून भागविलें नाहीं, तर त्याला हवी तितकी गुरुदक्षिणा राजानें दिली. आधुनिक काळांतील एखादा राजा किंवा संस्थानिक चुकूंनं एकदां चार लोकांना भेटलाच तर देखाव्याकरितां असले कांहीं कोरडे प्रश्न विचारतील. पण गुरुदक्षणेकरितां

मागितलेली रक्कम कितपत देतील हें माहीतच आहे. तात्पर्य, हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखराकडे पाहून एखादे वेळीं एखादा देव दिसल्याचा भास व्हावा त्याप्रमाणें प्रजेला राजदर्शन हें अगदीं दुर्मिळ; पण तेंहि खोटें असतें. गव्हर्नरसाहेब गांवांतून जावयाचे असले म्हणजे त्यांचें दर्शन प्रजेला घडावयाचें तर दूरच; पण मुळीं रस्त्याची नाकेबंदीच होते; मग राजदर्शन कुठलें !

(१६१) होमिओपाथिक गोळीचा दाखला

हल्लीं पूर्वीसारखीं नगरराज्यें राहिलीं नाहींत, व आतांचीं राज्यें हीं एवढीं मोठीं झालीं आहेत कीं, राजदर्शन तर राहोच; पण कायदेकौंसिलांत किंवहुना लोकलबोर्डांत व म्युनिसिपालिटींत आपल्यातर्फे निवडून गेलेला प्रतिनिधि कोण कसा आहे याचें सूक्ष्म व्यक्तिज्ञानहि मतदारांना नसतें. कित्येक देशांतील राजपुत्राच्या व राजकन्येच्या विवाहाप्रमाणें, वधूचें वराला दर्शन नाहीं, वराचें वधूला दर्शन नाहीं, प्रतिनिधीद्वारें दोघांनींहि एकमेकांना संमति द्यावयाची व विवाह व्हावयाचा ! निवडणुकींत उमेदवार आपला जाहीरनामा काढतो तो मतदाराला ठाऊक नसतो, व मतदारानें निवडणुकीच्या वेळीं गुप्तपणें टाकलेलें मत उमेदवारांना माहीत नसतें. पण शेवटीं ते निवडतात ते याला निवडतात, हा त्यांचा प्रतिनिधि होतो, व कायदेमंडळांत बसून तो त्यांच्याकरितां काम करतो. कायदेमंडळ व प्रत्यक्ष प्रजा यांचा हल्लीं इतका दूरान्वय आहे. तथापि प्रातिनिधिक राज्यपद्धतीची उपपत्ति मात्र कांहीं खोटी नाहीं. डोळ्याला जवळ जवळ न दिसणारी होमिओपाथिक गोळी पेलाभर पाण्यांत विरवून घेतली असतां, मनुष्याला औषध घेतल्याचा भास होतो. आणि हा नुसता आभासच क्वचित् गुणकारी ठरतो असें वैद्यक शास्त्रावर विश्वास ठेवणारे लोक मानतात. होमिओपाथिक औषध तयार करितांना कित्येक वेळां ही विरवणूक इतकी सूक्ष्म होते म्हणतात कीं, एकास एक लक्षपट! आणि कित्येक कायदेकौंसिलांतून बसणाऱ्या प्रतिनिधींची संख्या व एकंदर मतदारसंख्या यांचें प्रमाण एकास एक लक्ष असेंहि आढळेल. प्रस्तुत लेखक स्वतः मध्यभागातर्फे वरिष्ठ कायदेमंडळांत दोनदां निवडून आला. त्या निवडणुकींतील प्रमाण एकास ३५ हजार इतकें जवळ जवळ पडलें.

म्हणजे त्याला इतक्या लोकांनीं मतें दिलीं नसलीं, व त्यांतील बहुमतानेंच तो निवडून आला असला तरी, पुढें कौंसिलांत बसल्यावर "मी ३५ हजार मतदारांचा किंवा सुमारें ६० लक्ष लोकांचा प्रतिनिधि आहे" असा अभिनिवेश त्याला बाळगतां येई; उलट त्या ६०लक्ष लोकसंख्येपैकीं किंवा ३५ हजार मतदारांपैकीं, ज्याला कायदेकौंसिलाची आटवण होत असेल त्याला तरी अमुक एक गृहस्थ हा तेथें आमचा प्रतिनिधि आहे असा अभिनिवेश असेल. असल्या दूरन्वित का होईना पण आपलेपणाच्या भावनेचें कार्य थोडेंबहुत सफल होतेंच. राज्यसंस्थेच्या विकासाच्या हल्लीच्या प्रचंड स्वरूपांत दिवसेंदिवस हें प्रमाण आणखीहि जास्तच होणार. कारण मतदारांची संख्या वाढणार, किंवा पुढेंमागें २१ वर्षें वयाचे सर्वच स्त्री-पुरुष मतदार होणार. तात्पर्य, राजा बादशहा तर प्रजेच्या डोळ्याला दिसत नाहींच. पण प्रजेचा प्रतिनिधीहि मतदारांनीं डोळ्यांनीं न पाहिलेला असूं शकतो. आणि अधिकारीवर्ग घेतला तरीहि त्यांतले वरिष्ठ अधिकारी फार थोड्या प्रजेच्या दृष्टीस पडतात. प्रजेची गांठ अगदीं कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याशीं पडावयाची. आणि त्यांच्याद्वारें नियम कानू यांच्याशींच काय तो प्रजेचा खरा संबंध यावयाचा. तात्पर्य, प्रातिनिधिक राज्यसंस्थेच्या मुळाशीं बिंबप्रतिबिंब भाव असतो हा संकेत मनाला बरें वाटण्यासारखा आहे यांत शंका नाहीं. तो संकेत प्रत्यक्ष अनुभवांत उतरणें फार कठिण. तथापि अपूर्णगुण अशा मनुष्यसमाजांत कांहीं अनुभव तर कांहीं संकेत मिळूनच काम भागवून घेणें प्राप्त आहे.

(१६२) औषध तेंच, पण अनुपान बदलतें

लोकसत्तेच्या नवीन युगांत कांहीं कांहीं गोष्टी, त्यांचा पुरा विचार केल्याशिवाय, आपण जिभेवर खेळवितों. त्यापैकींच लोकमत व लोकसत्ता या दोन होत. कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांच्या हातीं त्यांच्या राज्यकारभाराची अन्तिम सत्ता असावी, आणि केव्हांहि झालें तरी लोकांकरितां म्हणून जो राज्यकारभार व्हावयाचा त्याला लोकमताचा आधार असावा, हे सिद्धान्त तत्त्वतः निरपवादच होत यांत शंका नाहीं. पण थोडेंफार खोलांत गेलें असतां या दोन्ही सिद्धान्तांना केवळ अपवाद नव्हेत, पण त्यांत बरेंच

श्लेष निघण्यासारखे असतात हें कोणासहि तेव्हांच कळून येईल. अपवाद न म्हणण्याचें कारण हेंच कीं, मूळ तत्त्वाला बाध येईल असें त्या श्लेषांत कांहीं नसतें. पण कोणत्याहि तत्त्वाचा व्यावहारिक उपयोग औषधासारखा करावा लागतो, म्हणजे प्रकृतिमान पाहूनच औषध द्यावें लागतें. औषध तेंच, पण रोग्याची प्रकृति सूक्ष्म असेल तर औषध अल्प प्रमाणांत दिलें पाहिजे; व त्याची प्रकृति एरवी सुदृढ असेल तर औषधाचा डोझ जरा मोठा दिला तरी चालतो. तसेंच, औषध घेणारा मनुष्य प्रौढ व आपलें हित जाणणारा असेल तर त्याला कडू पदार्थाच्या अनुपानांतून औषध घेण्यास सांगण्याला हरकत नाहीं. पण त्या जागीं लहान मूल असेल तर अनुपान गोड पदार्थाचें देवावें लागतें. त्याचप्रमाणें लोकसत्तेच्याहि राज्यांत लोकांना सत्ता वाटून देणें व लोकांचें मत घेणें या गोष्टी वरील औषध व अनुपान यांच्या दाखल्यांतल्याप्रमाणें तारतम्यानें व सारासार विचारानेंच अमलांत आणावयाच्या असतात. आणि तसें न झालें तर औषध चांगलें असूनहि कदाचित् तें पोटांत जात नाहीं, किंवा गेलें तर भलताच परिणाम करितें.

(१६३) लोकमत मोजण्याचे मार्ग

लोकमत हा जरी लोकशाहीचा आधार म्हटला तरी तें 'लोकमत' अजमावावयाचें याचा अर्थ, तें मत प्रगट करण्याची सत्ता किंवा अधिकार ज्यांना दिला गेला आहे अशा व्यक्तींच्या मतांचा हिशेब करूनच तें अजमावावें लागतें. एरवीं दुसरा मार्ग नाहीं. पण लोकमत घ्यावयाचें तर लोकांना एकत्र बोलवावयाचें, व तेथें त्याच्या आवाजावरून किंवा वर केलेल्या हातांच्या संख्येवरून मतमोजणी करावयाची, हे दिवस आतां उरले नाहींत. ही गोष्ट फार तर एखाद्या खेडेगांवांतच शक्य होते. पण आतां खेडीं शहराएवढीं झालीं, शहरें जिल्ह्याएवढीं झालीं, व जिल्हे प्रांताएवढे होऊं लागले, तेव्हां मताधिकारी लोकांना एकत्र जमवून त्यांचें मत घेणें ही गोष्ट सहजच अशक्य कोटींत गेली. राष्ट्राचा विस्तार मोठा यामुळें मताधिकारी लोक फार दूरवर राहाणार. यामुळें (१) एक तर ते असतील तेथें जाऊन त्यांचें मत घेणें, किंवा (२) त्या मताधिकाऱ्यांनीं

आपल्यातर्फे नेमून निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्याद्वारें त्यांचें मत घेणें, हे दोनच मार्ग शिल्लक उरतात.

(१६४) प्लीबीसाईट किंवा रिफरेंडम

परंतु त्यांतल्यात्यांत पहिला मार्ग हा अव्यवहार्य ठरतो. कारण राज्यकारभार म्हटला म्हणजे त्यांत रोज अनेक प्रश्न उत्पन्न होणार; आणि लोकसत्तेची मिजास पाहावी तर ती अशी कीं, लोकांचें मत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें घेतल्याशिवाय कोणताहि महत्त्वाचा प्रश्न निकालांत निघूच नये ! मग उठल्या सुटल्या दरेक प्रश्नावर दरेक मताधिकाऱ्याचें मत त्याच्या घरीं किंवा त्याच्या गांवीं जाऊन घेत बसावयाचें, म्हणजे शेकडों हजारों अधिकाऱ्यांना तोच एक उद्योग वर्षानुवर्ष व वर्षांतल्या प्रत्येक दिवसाला पुरून उरण्यासारखा होईल. अर्थात् ही अडचण सूज्ञ लोकांच्या लक्षांत तेव्हांच येणारी असल्यामुळें, ते मनानें लोकसत्तेचे व लोकमताचे पुरस्कर्ते असतांहि त्यांना देखील ही पद्धति सोडून द्यावी लागते, तिचा आग्रह धरतां येत नाहीं. क्वचित् कर्णाच्या वासवी शक्तीप्रमाणें अगदीं एखाद्या निर्वाणीच्या प्रसंगीं हा एवढा खटाटोप करणें इष्ट वाटेल तर तो ते करतील. पण तेंहि अगदीं नाइलाज म्हणून. जर्मनी, स्वित्झर्लंड इत्यादि कांहीं राष्ट्रांच्या घटनेंत मूलभूत मताधिकारी व्यक्तींचें मत घेऊन त्यावरून अखेर निर्णय करण्याची योजना प्रथमपासूनच राज्यघटनेंत घालून ठेवण्यांत आलेली आहे, व स्वित्झर्लंडमध्यें त्या योजनेचा उपयोग केव्हां केव्हां केलाहि जातो. पण जर्मनींत ही योजना कायदेशीर असूनहि तिचा अंमल अगदीं एखाद्या वेळीं घडतो. आणि इंग्लंडसारख्या देशांत तर या योजनेचें नांवहि कधीं ऐकूं येत नाहीं. तात्पर्य, अशा रीतीनें लोकमत अजमावण्याच्या या अव्यवहार्य पद्धतीचा केवळ नामनिर्देश करूनच ती विचारांतून सोडून देण्याला हरकत नाहीं. मग उरली दुसरी पद्धति म्हणजे मताधिकारी लोकांनीं नेमून निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्याद्वारें त्यांचें मत अजमावण्याची. ही पद्धति सयुक्तिक व व्यवहार्य असल्यामुळें लोकसत्ताक अशा सर्व राष्ट्रांत तिचाच उपयोग सर्रास केलेला आढळतो. या प्रतिनिधींच्या मंडळांना पार्लमेंट किंवा कायदेमंडळ असें म्हणतात;

श्रीराम वाचनालय, लिंब.

आणि त्यासंबंधानें तपशीलाच्या गोष्टी ठिकठिकाणी निरनिराळ्या आढळल्या तरी, त्यांचें मूलभूत तत्त्व जवळ जवळ एकच असतें. तें हें कीं, लोकमत अप्रत्यक्ष रीतीनें का होईना पण तें अजमावण्याचे ठराविक प्रसंग, ठराविक नियम असावे; व त्या त्या प्रसंगीं त्या त्या नियमांनीं मत प्रगट झालें म्हणजे तेंच राष्ट्राचें मत असें समजावें. याहून अधिक कांहीं करतां येतच नाहीं.

(१६५) सत्ताधिकाऱ्यांचा मायावी बहाणा

राष्ट्रामध्यें जी अंतिम सत्ता असते असें तत्त्वतः आपण समजतों ती सत्ता आहे खरीच. ती खोटी नाहीं. लोक जसे तिची घोषणा गर्वानें किंवा अहंकार-बुद्धीनें करतात त्याप्रमाणें राज्यांतले अधिकारीहि ती गोष्ट विनयानें कबूल करतात. तेहि म्हणतात कीं " आम्ही अधिकार चालवितों तो कांहीं आमच्या घरचा किंवा आम्हाला जन्मसिद्ध लाभलेला नाहीं. तर लोकसत्तेनें व लोक-मतावर चालणाऱ्या सरकारानें म्हणजे लोकांनींच आम्हाला दिलेला आहे. म्हणून तो त्यांना केव्हांहि आमच्या हातून काढून घेतां येईल व आम्हाला-हि तो परत करावा लागेल." पण उभयपक्षीं या गोष्टी केवळ वरकरणी झाल्या. त्या प्रत्यक्ष अमलांत येणें हीच लोकमताची खरी कसोटी होय. लोकमतावर राज्यकारभार चालावा ही गोष्ट इतकी स्वाभाविक व सोज्वळ आहे कीं ती कोणीच नाकबूल करीत नाहीं. जुलमी राजेदेखील लोकमताची पर्वा अगदींच करीत नाहींत असें नाहीं. आणि जुलमी एक-तंत्री राजेजसे काय, आज स्वतंत्र राष्ट्रेंदेखील जगांतील इतर राष्ट्रांच्या लोक-मताविषयींची काळजी थोडीबहुत तरी बाळगतात असें दिसून येतें. याचें प्रत्यन्तर हें कीं आपण आपल्या साम्राज्यामध्यें प्रजेवर जो जुलूम करितो त्याच्या हकीकती ऐकून आपणाविषयीं अमेरिकेंतील लोकांचें मन कलुषित होऊं नये याकरितां खुद्द इंग्लंड आज पुष्कळ पैसा खर्च करिते, पोलिटि-कल खात्यांतले आपले गुप्त दूत तिकडे पाठवून अन्तस्थ कारवाई करते, किंवा प्रसंगविशेषीं आपल्यांतील चतुरस्र, कीर्तिमान् व वजनदार मुत्सद्दी वकील म्हणून, व्याख्याते म्हणून, प्रवासी म्हणून अनेक मिषांनीं तिकडे पाठवितें. हेतु हा कीं, त्यांच्या प्रयत्नानें साम्राज्यांतील जुलमाची खरीखोटी दुसरी बाजू कळवून, किंवा हिंदी लोकांची बेसुमार नालस्ती करून, कोणी-

कडून तरी आपल्या दुष्कीर्तीचा उपशम अथवा प्रतिक्रिया करावी. ही स्वतंत्र राष्ट्रांची गोष्ट झाली. जुलमी राजांचीं चरित्रें पाहिलीं तरी ते लोकमताला मान देण्याचा निदान बहाणा तरी करितात हें दिसून येईल. आणि हाच राजाकडून प्रजेला करभार! मनांतून जुलूम करण्याची, म्हणजे आपली इच्छाशक्ति प्रभावी करण्याची बुद्धि असली तरी अगदीं उघडपणें बेगुमानपणें लोकमताचा धिक्कार करणारा राजा मूर्खच समजला पाहिजे. आणि त्याचें फळ त्यानें भोगलेलेंहि आढळेल. मग लोकनियुक्त कायदेमंडळांतून किंवा पार्लमेंटांतून जबाबदार प्रधानमंडळें नेमूनच जेथें त्यांच्या हातून राज्यकारभाराचें काम घेतलें जातें, तेथें हीं प्रधानमंडळें उटल्या बसल्या लोकमताला नमस्कार करितात, व लोकमताला मान दिल्याखेरीज आपण पाण्याचा घोटहि घेत नाहीं असें दाखवितात, यांत आश्चर्य तें कसलें? पण खरी लोकमताची सत्ता प्रभावी व्हावयाची तर लोकांकडून पदोपदीं लोकमत प्रगट झालें पाहिजे, तें अंमलांत येण्याचा आग्रह त्यांनीं धरला पाहिजे, व लोकमत अमलांत आणण्याची टंगळमंगळ अधिकाऱ्यांनीं केल्यास त्यांच्यावर हात उगारण्याची म्हणजे त्यांना पदभ्रष्ट करण्याची, त्यांची उलथापालथ करण्याची, कसोशी त्यांनीं केली पाहिजे. हें न घडेल तर त्या लोकमताची किंमत कुलटेच्या कपाळावरील कुंकवाइतकीच ठरेल. कुंकू लोकमताच्या नांवानें लावावें व लोकांची तात्त्विक सत्ता कबूल करावी, पण आपल्या मनाला मानेल तसा कारभार किंवा स्वैराचार प्रत्यक्ष करावा, असेंच घडेल व 'लोकशाही' हें निवळ पोकळ नांव होईल.

(१६६) महायुद्धानंतरचा चमत्कार

महायुद्धापासून लोकमताच्या सत्तेचें नांव विशेष पुढें आलें. इंग्लंडांत १६८८ पासून, फ्रान्समध्यें १७८० पासून, व युरोपांतील इतर देशांमध्यें १८४८ पासून लोकसमाजाकडून राजकीय हक्कांची मागणी सक्रिय सुरू झाली. पण चळवळ करून स्वतः लोकांना आपल्याकरितां लोकसत्तेच्या कार्याला जें उज्ज्वल स्वरूप आणतां आलें नाहीं तें १९१५पासून, म्हणजे महायुद्ध ऐन रंगांत आल्यापासून आलें. याचें कारण स्वतः राज्यकर्त्यांनींच त्याला उचलून हातीं धरलें हें होय. लोक करीत होते तोंपर्यंत जी चळवळ स्वार्थी भासली

व त्यामुळें जिला थोडा कमीपणा आला. तींच राजे प्रधान अध्यक्ष अशा— म्हणजे प्रत्यक्ष सत्ता गाजविणाऱ्या--अधिकाऱ्यांच्या हातून होऊं लागतांच तिला परोपकाराचें स्वरूप व त्यामुळें मोठेपणा आला. वास्तविक महायुद्धाचें खरें कारण इंग्लंड व जर्मनी यांची आर्थिक चढाओढ व चुरस ! पण युद्ध सुरू झाल्यावर सर्विया व बेलजम या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याच्या पायमल्लीचें निमित्त करून दोस्तराष्ट्रें " लोकसत्तेवर संकट !" " लोकसत्तेची लाज राखा !" " लोकसत्तेच्या संरक्षणाकरितां हातीं हत्यार घ्या !" असा आक्रोश करूं लागलीं; आणि हा आक्रोश अटलांटिक महासागर ओलांडून पलीकडे गेल्यामुळें भोळा प्रेसिडेंट विल्सन या आक्रोशांत सामील झाला. पूर्वीहि उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका यांचें युद्ध झालें त्यांत, वास्तविक एका बाजूला गुलामांच्या पद्धतीपासून होणारा आर्थिक फायदा वाचविणें, व दुसऱ्या बाजूला अमेरिकेच्या राज्यघटनेचें कायदेशीर तत्त्व संभाळणें, असले हेतु होते. तथापि प्रेसिडेंट अब्राहिम लिंकन यानें ' लोकसत्तेला ' धोका आल्याचा बहाणा केला. पण दरोड्याची दंगल सुरू झाली म्हणजे आंतील चोरच तींत मिसळून ' चोर चोर ' म्हणून ओरडू लागतात, किंवा आगीचा भडका होऊन लोक ती विझवावयाला लागले म्हणजे स्वतः आग लावणारे लोकच काचा मारून घांगरी उचलून इतरांबरोबर हौदाकडे धावूं लागतात, असा अनुभव केव्हां केव्हां येतो त्यांतलाच वरील प्रकार होय.

(१६७) पण तात्पर्य उघड आहे

युद्धानंतर तहाचे वेळीं जर्मनीला कायमचा लगाम व पायबंद घालण्याचें कारस्थान सुरूं झालें तेव्हां कपटपटु लॉईड जॉर्ज यानें व त्याचीच री ओढून प्रे० विल्सन यानें एक नवा सिद्धान्त उत्पन्न केला. तो असा, " लोकसत्तेचा संचार अबाधित होण्याइतके जगाचे मार्ग सुरक्षित ठेविले पाहिजेत !" हे मार्ग सुरक्षित ठेवावयाचे म्हणजे त्यांतून कायसर विल्यमसारख्या वाटमाऱ्या दरोडेखोरांचें कायमचें उच्चाटन करावयाचें ! ठीक आहे. जर्मन कायसर याला पकडून ठेवा किंवा फांशी द्या; कांहीं हरकत नाहीं. तो तरी असा काय चांगला होता कीं त्याची ऐट त्याच्या शत्रूंनीं

चालू द्यावी? पण त्याच्या उच्चाटनानें तरी जगांतले मार्ग लोकमताच्या सुखसंचाराला हवे तितके सुरक्षित झाले काय असा प्रश्न उत्पन्न होतो. आणि कित्येकांच्या मतें लॉइड जॉर्ज किंवा मुसोलिनी इत्यादि मनोमनस्वी सत्तालोलुप प्रधान हे कायसर विल्यमइतकेच लोकमताचे शत्रु असून त्यांनीं आपापल्यापरीनें लोकसत्तेला खिंडींत गाठून तिचा खून करण्याला कमी केलेलें नाहीं. तात्पर्य, केवळ लोकमतार्चे लोकसत्तेचें नांव घेऊन ओरडत उठलें म्हणजे मनुष्य खरा लोकमतवादी लोकसत्तावादी ठरतो असें नाहीं. तर युगधर्माप्रमाणें "लोकसत्ताक राज्यपद्धति" हें एक नवें ध्येय लोकांच्या तोंडीं खेळूं लागलें आहे इतकाच त्याचा अर्थ. खरी लोकसत्ता, खरें लोकमत म्हणजे काय याचाच अर्थ जेथें निश्चित नाहीं, तेथें लोकसत्ताक राज्यपद्धतीची कल्पनाहि अनिश्चित असावी यांत काय आश्चर्य? कारण ध्येय स्पष्ट निश्चित असलें तरी तें साधण्याचीं साधनें बरोबर नक्की हाताला सापडणें ही गोष्ट परम कठीण होऊन बसते. लोकसत्तेच्या साधनांचेंहि असेंच झालें आहे. ही गोष्ट पटण्याला इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं, ज्या राष्ट्रांतून लोकसत्ताक राज्यपद्धति असल्याचें बाहेर लोक समजतात त्यांतलेच जाणते लोक या गोष्टीचा ठासून इनकार करणारे आढळतात. यावरून काय समजावें? आणि हे लोकहि लोकसत्ताविरोधी किंवा विद्वेषी नव्हत, तर त्या सत्तेचा ध्येयरूपानें आत्यंतिक स्वरूपांत पुरस्कार करणारे. ते विद्वेषी असतील तर सहजच गैरसमज करून घेतील. पण पुरस्कारकर्ते गैरसमज कां करतील? अर्थात् त्यांच्या नैराश्ययुक्त उद्गारांना महत्त्व दिलेंच पाहिजे. ते निराश होतात म्हणूनच लोकसत्ता ही एक केवळ माया आहे असें त्यांना केव्हां केव्हां म्हणावें लागतें.

भाग (८)

राज्यसंस्था व स्वातंत्र्य

(१६८) स्वातंत्र्यवादाचा पूर्वपक्ष

(१) अराजकता विराजकता या स्थिति वाईट. (२) राज्यसंस्था ही चांगली व समाजसुस्थितिकरितां अवश्य. (३) राज्यसंस्था म्हटली कीं पूर्ण व अंतिम सत्ता ही त्या संस्थेंत कोणाच्या तरी हातीं असून सर्व प्रजाजनांनीं ती मानलीच पाहिजे. (४) नाहीं तर राजदंड सोसण्यास तयार झालें पाहिजे. अशा क्रमानें राज्यसंस्थेचें महत्त्व वाढवून ठेवलें म्हणजे मग प्रश्न उत्पन्न होतो तो असा कीं, राज्यसत्तेविषयीं हें सांगितलें तें सर्व ठीक आहे, पण मग प्रजेची वाट काय ? प्रजासमाजाला व व्यक्तीला स्वातंत्र्य म्हणून कांहींच नाहीं व नसावें कीं काय ? आणि तसें झालें म्हणजे मग मनुष्यानें जगावें तरी कशाला ? बिचारी अराजकता तरी बरी ! कारण तिच्या अमलांत मनुष्याच्या अंगांत बळ असेल तर ज्याचा त्याला आपला हात उगवून तरी घेतां येतो. पण राज्यसंस्थेच्या अमलांत तेंहि कांहीं करतां येत नाहीं. कारण तुमची ही राज्यसत्ता अशा व्यक्तिकर्तृक पराक्रमाला, तो जुलूम म्हणून आड येणार ! पण राज्यसत्ताधारी व्यक्तीला किंवा संस्थेला हवा तो जुलूम किंवा अन्याय करण्याला व प्रजाजनांची स्वतंत्रता हिरावून घेण्याला पूर्ण मोकळीक ! कारण तुमच्या राज्यसंस्थेचें तत्त्वच हें कीं, प्रजाजनांपैकीं प्रत्येकावर मुख्य राज्याधिकारी व्यक्तीची किंवा उपसंस्थेची सत्ता चालली पाहिजे ! तर मग राज्यसंस्थेचें ध्येय व स्वातंत्र्याच्या कल्पनेनें वेडावलेल्या कवींचें ध्येय यांत कायमचा दुस्तर विरोधच आहे कीं काय ?

(१६९) एकांतवासांत स्वातंत्र्य सुलभ

भावनात्मक ध्येयवादी कवि आणि थंड डोक्यानें विचार करणारे राज्यशास्त्रज्ञ यांच्या सिद्धान्तामध्यें जो हा दुस्तर विरोध म्हणून दिसतो तो तितकासा खरा नाहीं. वास्तविक ज्याला स्वातंत्र्य आवडत नाहीं किंवा गुलामगिरी

आवडते असा मनुष्यच काय, पण इतर कोणताहि प्राणी नाहीं व असणें शक्य नाहीं. पण एका काळचा अनुभव दुसऱ्या बदललेल्या काळाला लावून तेंच ध्येय असें मानल्यानें हा विरोधाभास उत्पन्न होत आहे. आतें प्राचीनकाळचें व्यक्तिस्वातंत्र्याचें ध्येय आधुनिक काळांत कल्पनारम्य वाटलें तरी व्यवहार्य ठरत नाहीं. प्राचीनकाळीं जगांत वस्ती थोडी, पाऊलवाटेशिवाय रहदारीचा मार्ग नाहीं, चहूकडे अरण्यें माजलेलीं, वस्तीला शिकारीला शेतकीला जमीन हवी तितकी ऐसपैस, अशा परिस्थितींत मनुष्यप्राणी वाटेल तसा स्वेच्छाचारी वागत असे. त्याला संगतीची इच्छाच झाली तर त्यानें होऊन उठून दुसऱ्या माणसाकडे जावें. एका दृष्टीनें हा एकांतवास किती तरी रमणीय होय. आणि त्याचें प्रत्यंतर हेंच कीं, हल्लींच्या काळींहि त्या जुन्या एकांतवास सुखाचा अनुभव निदान मधून मधून केव्हां केव्हां मिळाला तर त्यावर मनुष्य उडी घालतो. श्रीमान व हौशी लोक शहरांत मोठमोठ्या वाड्यांतून राहत असले तरी खेडेगांवीं बागांत शेतांत नदीकडेला, वनश्री, मोकळी हवा, निर्मळ वाहतें पाणी, यांच्या लोभानें ते लहान झोंपडया मांगर बांधून ठेवतात, आणि सवड सापडतांच तेथें जाऊन चार दिवस राहून येतात. पण ही चार दिवसांची गोष्ट झाली. नेहमींचें काय ?

(१७०) पण संगत केली, स्वतंत्रता गेली !

पण या एकांत निर्जन निवासापेक्षां दुसरें कांहीं त्याला अधिक प्रिय नाहीं असें म्हणावें तर, तो शहरांत येऊन कां राहूं लागला ? अपवाद म्हणून एकांतवास त्याला मधून मधून प्रिय असला तरी, नेहमीं नियमतः तो शहरच्या गर्दीत कां राहण्याचें पसंत करितो ? याचें उत्तर हेंच कीं, मनुष्य हा खरोखर मनानें कायमचा एकांतवासप्रिय नाहीं. तो जुटीनें जमावानें राहणारा म्हणूनच अगदीं प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. मनुष्यगुणांच्या स्वाभाविक परिणतीला, त्याच्या संसारिक गरजा भागण्याला, शत्रुपासून त्याचें संरक्षण होण्याला, सहानुभावी समानधर्म अशा कळपांतच राहणें त्याला श्रेयस्कर असतें. म्हणून ते त्याला आवडतेंहि. कळप हा शब्द माणसांना लावला म्हणून कांहीं बिघडत नाहीं. कारण सर्व प्रकारच्या प्राथमिक प्रवृत्तींत मनुष्य हा पशुपक्षांसारखाच आहे. आहार, निद्रा, भय–निवारण

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
राज्यसंस्था व स्वातंत्र्यसमर वाचनालय, सातारा

इत्यादि गोष्टी एकांतवासांत जितक्या सफळ होण्याचा संभव त्यापेक्षां त्या सुसंघटित अशा कळपांतच खरोखर अधिक शक्य आहेत. आणि एकाच्या-ऐवजीं जेथें दहा जमले तेथें दहांचीं मनें, दहांच्या आकांक्षा या सगळ्या सारख्याच असल्यानें, त्या सफळ करून देण्याच्या कामीं त्या दहांपैकीं प्रत्येकाला इतरांशीं सहकारिताच नव्हे तर स्वार्थत्यागहि करावा लागतो, हें कवि नीट लक्ष्यांत घेत नाहींत.

(१७१) कवींचे क्रियावान बंधु—' अराजक ! '

कवींचे दुसरे बंधु अराजकतावादी हे कवींहून अधिक कठीण. कारण कवी स्वातंत्र्यगीत नुसता गात बसेल. पण गाऊन गप्प बसेल. पण अराजक क्रांतिकारक हा ह्यातांत जंबिया पिस्तूल किंवा बाँब घेऊनच उठावयाचा ! त्याला मुळीं कसलेंच राज्यनियंत्रण नको. अन्यायाचा, जुलमाचा, स्वातंत्र्यनाशाचा खरा प्रतिनिधी म्हणून त्यानें आपल्या मनानें एखादी व्यक्ति हेरून रोखूनहि ठेवलेली असते. आणि त्याचा घात केला म्हणजे याला वाटतें कीं आपण कृतकृत्य झालों ! त्याला हें माहीत नसते कीं कोणतीहि एक व्यक्ति मनुष्यवर्गावर जुलूम करण्याला व स्वातंत्र्य हिरावून घेण्याला समर्थ नसते. अशा प्रकारच्या अनेक व्यक्ति असतात. त्यांचा संघ किंवा संस्था असते. त्यांच्या हातीं सत्ता व सत्तानुकूल साधनें असतात. अशा लोकांची परंपरा अखंड असल्यासारखी असते, यामुळें एक जुलमी दुष्ट आपण मारला तर त्याची जागा घेण्याला दुसरा कोणी पुढें येण्याला असतोच. हें सर्व तो क्रांतिकारक जाणतो. परंतु निदान एका व्यक्तीच्या हातीं आहे तें तरी तिनें करावें, नुसतें मनांत पिचत बसण्यांत काय अर्थ आहे ? असें म्हणून तो उडी घेतो. अशा रीतीनें हा धाडसी सुधारक निःस्वार्थी म्हणून पूज्य वंदनीयहि वाटतो. पण पुष्कळ वेळां अराजकता निर्माण करावयाची म्हणजे काय कसें करावयाचें व तें कसें टिकवावयाचें व स्वातंत्र्य पदरांत पाडून घ्यावयाचें, याचें तत्त्वज्ञान कांहींच त्याचे जवळ असत नाहीं. शेंडेनक्षत्र उगवलें, अपशकून करून गेलें, बाकी नित्यक्रम चाल आहे तो आहेच, म्हणून वाईट वाटतें.

(१७२) स्वातंत्र्याची देवघेव

पण कवीलोक जर स्वातंत्र्यालाच सर्वांत श्रेष्ठ असा 'अर्थ' समजतात, तर त्या अर्थाचाहि थोडाबहुत त्याग करण्याला प्रत्येक मनुष्यानें तयार व्हावयाला नको काय ? दहांतल्या प्रत्येकानें आपली स्वतंत्रता थोडथोडी स्वेच्छेनें आखडती घेतली, व त्यामुळें उरल्या सर्व स्वतंत्रतेचा उपभोग जर त्या सर्वांना निश्चित व निर्भय मिळत असला, तर तो स्वार्थत्याग म्हणण्यापेक्षां तें स्वार्थसाधनच कां म्हणू नये ? चार लाकडांची चौकट करावयाची असली तर, सांधेजोड होण्याकरितां त्यांतल्या प्रत्येक लाकडानें आपलें टोक थोडेसें तासून घेण्याला, व आपल्या टोंकात खाच घेऊन तींत दुसऱ्या लाकडाच्या टोंकाला जागा करून देण्याला, तयार झालें पाहिजे. चारही लाकडें आपल्यांतला एक तुकडाहि गमावण्याला तयार नसतील तर सांधेजोड होणार नाहीं व चौकट बनणार नाहीं. तात्पर्य, इतर वस्तूंच्या अदलाबदलीप्रमाणेंच आपल्या स्वतंत्रतेचा कांहीं अंश दुसऱ्याला देणें व दुसऱ्याचा घेणें हा निव्वळ अदलाबदलीचाच एक प्रकार व उघड सौदा होतो. तेव्हां वास्तविक तो शुद्ध स्वार्थत्याग तरी कसा म्हणावा ? दहा माणसें एकत्र येऊन सर्वस्वी आपल्या मनाप्रमाणें स्वतंत्र वागूं द्या बरें ! म्हणजे मग पहा काय चमत्कार होतील ते ! पण त्या दहांना उपजत बुद्धीनेंच हें कळतें कीं जगांत दिल्याघेतल्याशिवाय कांहीं नाहीं. आणि स्वातंत्र्याची देवघेवहि त्यांतलीच होय.

(१७३) कर्मबद्ध जीवात्म्याची अनुकंपनीय स्थिति

मनुष्य हा स्वातंत्र्य प्रेमी स्वातंत्र्यवादी असें आपण म्हणतों. पण निग्रह व नियंत्रण यांचा उपयोग जगांत किती आहे ही गोष्ट त्याची त्याला घरच्या घरींच काय पण प्रत्यक्ष स्वतःच्या व्यक्तिचरित्रांतहि दिसून येण्यासारखीच आहे. मात्र याचा प्रथम थोडासा वेदांत पद्धतीनें विचार करूं. परब्रह्म हेच कायतें सर्वस्वी स्वतंत्र खरें. पण जीवात्मा हा स्वतंत्र आहे काय ? मुळींच नाहीं. बिचाऱ्याचा उपाधीशीं झगडा सुरू नाहीं असा क्षण तरी जातो काय ? एका देहाचें पतन झाल्यावर दुसऱ्या देहाचा स्वीकार करीपर्यंत त्याचा कितीसा काळ जात असेल हें माहीत नाहीं ! पण दुसरा देह न घेण्याचें स्वातंत्र्य त्याला असूनहि, तो त्या स्वातंत्र्याचा उपयोग करीत नाहीं

असें म्हणावयाचें ? कीं मुळांत त्याला तें स्वातंत्र्यच नाहीं ? पण दुसरा देह घेणें, ही गोष्ट ऐच्छिक असली किंवा अनिच्छेनें घडत असली, तरी ती घडते खरी. म्हणजे एकदां कर्मांचें लचांड मागें लागल्यामुळें त्यांतून त्याची मुक्तताच सहसा होत नसावी असें वाटतें. पिंजऱ्यांत ठेवलेल्या पांढऱ्या उंदरासारखी त्याची स्थिति होतें. उत्क्रांतीचा उद्योग म्हणून तो पिंजऱ्यांत ठेवलेल्या रहाटावर चढतो, व सायकलस्वाराप्रमाणें पाय मारूं लागतों, तों एक दांडा पायाखालून जाऊन दुसरा दांडा तेथें येतो. पण उंदीर उद्योग करूनहि जागच्या जागेवरच ! मुक्तीचा प्रयत्न म्हणून आपणाकडून तो करीत असतां क्षणोक्षणीं तें मायाचक्र त्याला दमवीत असतें व फसवीत असतें.

(१७४) पण कर्मांचा मूळधनी ज्याचा तोच ना ?

जीवात्मा अविनाशी व उपाधी ही विनाशी हें खरें. पण जी उपाधि बदलून बदलून का होईना पण त्याला चिकटून राहते, त्याची पाठ सोडीत नाहीं, ती विनाशी म्हणून तरी काय उपयोग ? तिच्या ताब्यांतून सुटून अमृतत्व किंवा मोक्ष मिळवावा आणि स्वातंत्र्यसिद्धीचा झेंडा उभारावा व मिरवावा ही त्याची इच्छा खरी. पण कर्माच्या कायद्यानें बद्ध झाल्यामुळें बिचाऱ्याचें कांहीं चालत नाहीं. नेहमीं झगडा सुरू. उपाधी उत्पन्न करणाऱ्या ईश्वराविरुद्ध त्याची नित्य तक्रार व अध्यात्मिक राजद्रोहात्मक चळवळ सुरू आहे. स्वतंत्र मानल्या जाणाऱ्या जीवात्म्याकडून "ईश्वरा, कशाला फिरून जन्माला घातलेंस" ही रडकथा रोज सुरूच आहे ! "आत्म्याच्या अंगावर पडलेलें नामरूपादि मायासृष्टीचें घोंगडें कोठें विरळ असेल तर कोठें दाट असेल, त्यांतून बाहेरचा उजेड दिसत असेल किंवा नसेल, पण तें सर्वच्यां सर्व अंगावरून निघाल्याशिवाय त्याचा कोंडलेला आत्मा बाहेर पडून मोकळी हवा खाऊं शकत नाहीं, व तोंपर्यंत घामाघूम करणारा उबारा कमी होत नाहीं." मुळांत आयता तो थंड ब्रह्मात्मस्वरूप निर्गुण होता तो काय वाईट होता ? कशाला त्यानें सगुण होण्याची इच्छा केली ? कशाला तो लीलाप्रिय झाला ? कशाला त्यानें सूक्ष्म देह (लिंगदेह), स्थूल देह, मन, बुद्धि, प्राण इत्यादिकांच्या व्यवस्था बंधनाचा स्वीकार करून कर्मचक्राच्या रहाटावर पहिलें पाऊल ठेवलें ?

(१७५) सिद्धांतिक महत्प्रश्नाची मांडणी

अव्यक्ताला व्यक्त व निर्गुणाला सगुण करण्याचें (ऐच्छिक) आद्यकर्म घडल्यामुळेंच मायासृष्टीचें चक्र सुरू होतें. त्यानंतर क्रिया व प्रतिक्रिया रूपानें मायासृष्टि व कर्म यांचा आघात व परिणाम एकमेकावर होऊं लागतो. आणि आत्मा जो या भानगडींत एकदां गुरफटून जातो तो मग त्या बंधनांतून बाहेर पडलाच तर महत्प्रयासानें बाहेर पडतो ! अंतरात्म्याचें स्वरूप हें अर्थातच बदलत नाहीं. पण कर्माप्रमाणें एक प्रकारचें नामरूप बदलून दुसऱ्या प्रकारचें हीन किंवा उच्च नामरूप त्या ठिकाणीं येतें. द्रव्य तेंच; पण आकार घाट रंग घटना वेगळी, नांव वेगळें, गुण वेगळे. आधिभौतिक शास्त्रांतहि, शक्ति अविनाशी आहे–ती फक्त आपलें नामरूप व क्रियाप्रकार बदलते–असाच सिद्धांत आहे. " या नामरूपाना आधारभूत झालेली जी शक्ति तिलाच संमष्टिरूपानें ब्रह्म व व्यष्टिरूपानें जीवात्मा " असें म्हणतात. कर्माप्रमाणें इतर आनुषंगिक गोष्टी व फल स्वरूपी गोष्टी बऱ्या वाईट झाल्यास त्याचा दोष कर्मालाच आहे. त्यांत परमेश्वराचा दोष नाहीं. पण दोष कोणाचाहि असला तरी जीवात्म्याची वाट काय ? त्याला स्वातंत्र्य मिळवावयाची, प्रस्थापित करावयाची कांहीं आशा आहे काय ? कीं त्यानें कर्माचा व नामरूपात्मक प्रकृतीचा दास होऊन, जुन्याजन्मातलें कर्म व या जन्मातलीं नाठाळ इंद्रियें नेतील तिकडे गेलें पाहिजे ?

(१७६) या प्रश्नाला वेदांत शास्त्राचें उत्तर

याला वेदांतशास्त्राचें उत्तर आशा उत्पन्न करण्यासारखेंच आहे. तें शास्त्र जीवाला म्हणतें:—"बाबा, तूंच कर्मानें उपाधीचें चक्र उत्पन्न केलें आहेस हें खरें. पण तुझ्या मनांत मोक्ष मिळविण्याची खरी इच्छा झाली म्हणजे तुझ्या इंद्रियांना मोक्षानुकूल कर्में करण्याची प्रवृत्ति होईल. वाफ भांडयांत नुसती कोंडली तर ती स्फोट करीत नाहीं. पण ती तापविली गेली म्हणजे स्फोट करिते. अशा रीतीनें जें नैमित्तिक आगंतुक प्रेरकत्व आत्म्याला येतें तें कर्माच्या कार्यापासून भिन्न व स्वतंत्र असतें. ती प्रेरणा प्रकृतिसृष्टींतील नाहीं, तर ब्रह्मसृष्टींतली आहे. हा झगडा सुरू झाला आणि मोक्ष

मिळविण्याची इच्छा टिकून असली म्हणजे, आत्माच मनुष्याला मोक्षानुकूलकर्में हुडकून काढण्याला पसंत करण्याला शिकवितो व मग त्याचा त्यापुढील व्यवहार मोक्षाच्या दिशेनें होतो. या गोष्टीला अनुलक्षूनच गीतेंत " उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् । आत्मैव ह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः " असें म्हटलें आहे. असो. कर्मविपाकानें येणारें पारतंत्र्य व आत्मस्वातंत्र्य या दोन सिद्धांताचा समन्वय वेदांतशास्त्रज्ञानी केला आहे त्याहून, राज्यशास्त्रांतील व्यक्तिस्वातंत्र्याचा व राज्यसत्तेचा समन्वय करणें हें कांहीं अधिक कठीण नाहीं.

(१७७) 'स्वातंत्र्य' शब्दाच्या अर्थाचीच खरी अडचण

राज्यसंस्थेंतहि व्यक्तीला स्वातंत्र्य असतेंच. पण होते काय कीं, राजकीय बाबतींत 'स्वातंत्र्य' या शब्दाचा अर्थ निश्चित नसतो. विशेषतः कवि वगैरे भावनाप्रधान लेखक स्वातंत्र्याचीं कवनें करितात. आणि तितकेच भावनाप्रधान, पण कविता न करिता न येणारे, लोक तीं कवनें गातात. यांत अशा कांहीं एक प्रकारच्या स्वातंत्र्याची कल्पना असते कीं व्यवहारांत ती कधींच अनुभवाला येणार नाहीं. प्लेटोप्रमाणें कोणी कवि, स्वातंत्र्याची विधायक रचना केलेली एखादी गोष्ट किंवा नाटक किंवा काल्पनिक इतिहास किंवा प्रबंध लिहील तर त्याला कळेल तरी कीं, त्याचें स्वातंत्र्य ही काय वस्तु आहे ! व ती राज्यसंस्थेंत सोळा आणे कां मिळणार नाहीं ! पण स्वातंत्र्याचीं स्तोत्रें पुष्कळ वेळां बिनबुडाचीं बिनहाडाचीं असतात. त्यांत कोणत्या तरी जुन्या किंवा नव्या फाजील जुलमी अन्यायी व्यक्तीचें किंवा संस्थेचें चित्र डोळ्यापुढें ठेवून, त्यावर प्रतिक्रियारूप विध्वंसात्मक टीकाच केलेली असते. पण ती टीका नित्याच्या प्रत्यक्ष व्यवहाराला मार्गदर्शक होऊं शकत नाहीं. कित्येक वेळां जुलूम तर नाहींच, पण नुसतें साधें बंधन हेंच कवीचें पित्त खवळविते ! उदाहरणार्थ, एकाद्या मालकानें आपला पोपट सोन्याच्या पिंजऱ्यांत ठेवला, त्याला ताज्या पेरू डाळिंबाशिवाय दुसरें खाणेंच ठेवलें नाहीं, हिरव्या रेशमाचे पडदे रात्रीं त्याच्या पिंजऱ्यावर सोडले व पुण्यप्रद राम-

नामाचा पाठ पढविला, तरी कवि म्हणणार "अधः पात ! हाय हाय ! कोण ही स्वातंत्र्यहानि !"

(१७८) व्यक्तिनिष्ठ हक्कांच्या मर्यादा

राज्यसंस्था झाली तरी तिच्यांतील प्रजाजनांना व्यक्तिशः शक्य तितकें आचारस्वातंत्र्य असावें हें कोणीहि कबूल करील. पण 'शक्य तितकें' म्हणजे किती हाच मुख्य प्रश्न व तो फारच अवघड आहे. शक्य याचा अर्थ "स्वतः व्यक्ति हवें म्हणेल तितकें" असा खचित करितां येणार नाहीं. त्याला दुसरें कांहीं तरी गमक असलें पाहिजे. आणि तें हेंच कीं, "त्या व्यक्ती-प्रमाणेच इतर प्रजाव्यक्तींचें स्वातंत्र्य संभाळून उरेल तें." "नारूचा स्वातंत्र्यावर जितका हक्क तितकाच घारूचाहि का नाहीं ! त्याचा तो हक्क कोणी काढून घेतला ! हे हक्क, कोणी आधीं बोलला कोणी आधीं पुढें येऊन मागूं लागला, म्हणून ते त्याला द्यावयाचे असें म्हणतां येणार नाहीं. "आधीं बोलेल तो तीन खाईल व मागाहून बोलेल तो दोन खाईल" अशी पांच लाडवांची वांटणी एका गोष्टींतल्या पैजेमध्यें ठरली होती तसें का येथें कांहीं आहे ! म्हणजे आधीं मागेल त्याला तीन हक्क किंवा तिप्पट हक्क व मागाहून मागेल त्याला दोन किंवा दुप्पट हक्क असें कांहीं राज्य-संस्था प्रजेला म्हणूं शकत नाहीं. सार्वजनिक हक्काच्या, सार्वजनिक उप-भोगाच्या गोष्टी मर्यादित असतील तेथें आधीं कोण? व कुणाला काय व किती ! हें तद्विषयक कांहीं नियम करून त्याप्रमाणें सरकार सांगूं किंवा देऊं शकेल. पण कांहीं हक्क जन्मसिद्ध व अगदीं प्राथमिक असतात, तेथें आधीं व मागाहून याला अर्थच राहात नाहीं. करारानें हक्क ठरतील तर आगेंमागें जास्त कमी हें होऊं शकेल.

(१७९) उलट सुलट उदाहरणें

याचें एकेक उदाहरण घेऊं. जी. आय. पी. रेलवे आतां सरकारच्या मालकीची झालेली आहे. ती कांहीं नियमाप्रमाणें रात्रींच्या प्रवासाकरितां डब्यांतून जागा राखून ठेवते. म्हणून, जेथें एकच जागा शिल्लक उरली असेल तेथें, 'अ' नें आधीं अर्ज केल्यास त्याला ती मिळावी, 'ब'नें

श्रीराम वाचन

मागाहून अर्ज केल्यास ती त्याला मिळूं नये असें म्हणण्या भांडण्याचा हक्क 'अ'ला कायदेशीरपणें उत्पन्न होईल. सरकारी मैदानांतील खुल्या जागेवर कोणी आधीं जाऊन उभा राहिला असेल तर ती जागा त्या वेळेपुरती त्याची झाली, दुसऱ्या कोणाला तेथें येऊन " ती मला पाहिजे, तूं निघून जा " असें म्हणतां येणार नाहीं. किंवा समजा, एका डोंगरांत सोन्याच्या खाणी निघण्यासारख्या आहेत म्हणून कोणी एकानें, सरकार मागेल ती फी भरून, प्रथम परवाना काढला व मनांपली म्हणजे कुलहक्काची सनद घेतली, तर ती काढून सरकाराला दुसऱ्या कोणाला देतां येणार नाहीं. पण एखाद्या बुडणाऱ्या गलबतावर आधीं मला जगूं द्या असें म्हणून 'अ'नें जर 'ब'ला उचलून समुद्रांत फेकून दिलें तर तो खुनी आरोपी ठरेल, व समुद्रांत बुडण्याऐवजीं फांशी जाऊन मरेल !

(१८०) मूलभूत हक्कांची उपलक्षणात्मक यादी

हक्कांमध्येंहि दोन प्रकार आहेत हें वर सांगितलेंच. पैकीं मनुष्याचे कांहीं कांहीं हक्क जन्मसिद्ध असतात. ते देऊन दिले जात नाहींत व काढून घेऊं म्हटल्यानें काढून घेतले जात नाहींत. उदाहरणार्थ (१) जगण्याचा हक्क. (२) आत्मपोषणार्थ उद्योग करण्याचा हक्क. (३) स्वधर्माप्रमाणें आचरण्याचा हक्क. (४) मातृभाषा बोलण्याचा हक्क. (५) पसंत पडतील ते सामाजिक आचार स्वीकारण्याचा हक्क. (६) पसंत पडेल त्या माणसाशीं संगती ठेवण्याचा म्हणजे खासगी किंवा जाहीर सभांत भाग घेण्याचा हक्क. (७) मतप्रतिपादनाचा हक्क. (८) वडिलार्जित स्वार्जित वित्त मत्ता उपभोगण्याचा हक्क. (९) आत्मसंरक्षणाचा हक्क. (१०) मुलांवरील पालकत्वाचा हक्क इत्यादि.

(१८१) मूलभूतहक्कांनाहि मर्यादा पडूं शकतात

वरील हक्क जन्मसिद्ध सनातन खरे. पण ते हक्कहि अमर्यादित असूं शकत नाहीं. ही गोष्ट या सर्व हक्कांच्या विधानांचा अगदीं शब्दशः अर्थ करूं लागलों तर उघड होईल. पण त्याचीं उदाहरणेंच देऊं:—

(१) **जगण्याचा हक्क**—खून केल्याबद्दल ज्याला फांशीची शिक्षा

झाली आहे त्यानें हा हक्क मूलभूत म्हणून सांगून काय उपयोग ? फांशीची शिक्षा डोक्यावर घेऊन तो तुरुंगांतून पळून गेला तरी त्याला पकडून आणून आधीं फटके मारतील व मग फांशीहि देतील. कारण जेव्हां त्यानें खून केला तेव्हां आपणाप्रमाणें दुसऱ्यालाहि जगण्याचा हक्क आहे हें त्यानें लक्षांत ठेवलें काय ?

(२) **आत्मपोषणार्थ उद्योग करण्याचा हक्क**—शब्दशः घेतल्यास या हक्कांत चोरी करणें, दरोडे घालणें, या गोष्टीहि येऊं शकतील; पण ते गुन्हे आहेत व राजा त्याला या मार्गांनीं आत्मपोषण करण्याला अर्थातच प्रतिबंध करील. येथेंहि हा 'हक्कदार' (?) ज्याची चोरी करूं म्हणणार त्याला आपल्या वित्ताची मालाची चोरी होऊं नये, मालकी संभाळण्याला सरकारनें मदत करावी, असें म्हणण्याचा हक्क आहेच कीं नाहीं ? चोरीची संवयच आहे व एरवीं तलफ भागत नाहीं असें असेल तर त्यानें आपल्याच एका खिशांतला पदार्थ चोरून दुसऱ्या खिशांत घालण्याचा खेळ करावा ! बरें, या चोरानें चोरी करून माल घरीं आणून ठेवला, आणि दुसरा कोणी चोर येऊन तोच नेऊं म्हणूं लागला तर मग कसें ? चोरी न उमगल्यास पचनीं पडलेल्या मालासंबंधानें स्वतः हा चोरच उद्यां नागरिकाचा प्रजाजनाचा जन्मसिद्ध हक्क सांगून पोलिसाची मदत मागेल कीं नाहीं ? व ती सरकारला द्यावीच लागेल कीं नाहीं ?

(३) **स्वधर्माप्रमाणें आचरण्याचा हक्क**—घरीं बसून दार लावून वाटेल त्यानें वाटेल तो धर्माचार पाळावा. पण मुसलमानाला चौकांत हिंदुसमक्ष गाय मारण्याला, किंवा हिंदूला मशिदीपुढें वाद्य वाजविण्याचा नवा प्रघात पाडण्याला, सरकार हरकत करूं शकते हें प्रसिद्ध आहे व तें योग्यहि आहे. तसेंच घरीं, दारें लावून घेऊनच का होईना पण, जर कोणी शाक्तपंथी मनुष्य-वध करूं म्हणेल तरी त्या "धार्मिक बलिदाना"च्या आचाराला प्रतिबंध होणारच ! आपखुषीनें धर्मांतर करण्याचा हक्क प्रजेला आहे. पण धर्मांतर जुलूमजबरदस्तीनें करविणें हा गुन्हा होईल. येथेंहि हक्क म्हणून आरंभिलेल्या एकाच्या कृत्याशीं दुसऱ्याच्या प्रतियोगी हक्काचा संबंध येतो. म्हणून हक्कांच्या या झगड्यांत सरकारनें हात घातला व प्रतिबंध केला तर, ती व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्काविरुद्ध गोष्ट घडली असें होत नाहीं.

आपला धर्म दुसऱ्याला पटविण्याच्या हक्कासारखाच, तो न पटवून घेण्याचाहि हक्क, स्वयंभू आहे.

(४) **मातृभाषा बोलण्याचा हक्क**--या हक्काला प्रतिबंध सहसा होत नाहींच. क्वचित् प्रसंग येईल तर तो असा कीं,कायदेकौंसिलच्या सभेंत उत्तम फर्डे इंग्रजी बोलणारा म्हणून माहीत असलेला मनुष्य मुद्दाम बाष्कळपणा करावा, कौंसिलची थट्टा उपहास करावा, या बुद्धीनें मातृभाषेंतूनच बोलण्याचा हक्क सांगेल तर अध्यक्ष त्याला तसें करण्याला परवानगी कदाचित् न देईल. अर्थात् नियमाप्रमाणेंच तें करितां येईल तर! याहि ठिकाणीं दुसऱ्याच्या हक्काचा संबंध येतो. कारण कायदेकौंसिलचें काम राज्याचें व राष्ट्राचें आहे. त्यांत एक सभासद काय बोलतो हें समजून घेण्याचा हक्क इतर सभासदांना आहे. फारच झालें तर "देशभाषेंतून बोलण्याची परवानगी नाहीं तर मीं बोलतच नाहीं" असें वाटेल तर सभासदानें म्हणावें. त्याच्यावर भाषण करण्याचा जुलूम अध्यक्षालाहि करितां येणार नाहीं. उलटपक्षीं सभासदाला जर खरोखरच मातृभाषेशिवाय दुसरी भाषाच येत नसली तर मात्र त्याला स्वभाषेंतून बोलूंच द्यावें लागेल. या ठिकाणीं हक्कांची उलट सुलट मर्यादा कशी पडते हें पाहण्यासारखें आहे. आजच्या वरिष्ठ कायदेकौंसिलांतून कांहीं भाषणें मराठींत व ऊर्दूंत होतात. तशीच तीं तामील भाषेंतूनहि होऊं शकतील.

(५) **पसंत पडतील ते सामाजिक आचार स्वीकारण्याचा हक्क**— सामान्यतः हा सरकारी प्रतिबंधाचा विषय होऊं शकत नाहीं. स्त्रियांनीं पुरुषांचीं किंवा पुरुषांनीं स्त्रियांचा पोशाख अशीहि अदलाबदल केली तरी चालेल. पण "मीं कोणताच पोशाख न करितां केवळ नैसर्गिक स्थितींत सार्वजनिक जागेंत हिंडे फिरेन" असा हक्क कोणी सांगूं लागेल तर तो मानला जाणार नाहीं. कारण "डोळ्यांनीं असभ्यपणाचे आचार पहाण्यास आम्हाला भाग पडूं नये, अथवा आमच्या सदभिरुचीला योग्य संरक्षण मिळावें" असें म्हणण्याचा हक्क प्रत्येकाला आहे. लंडनमध्यें उन्हाळ्याच्या दिवसांत वयांत आलेली [कायदेशीर सज्ञान] अविवाहित स्त्रीपुरुषांचीं जोडपीं हाईडपार्क सारख्या मैदानांत किंवा सार्वजनिक बागांत मनसोक्त कामुकक्रीडा करितात. यांत कदाचित् ते आपण फक्त लग्नविधीविरुद्ध सामाजिक बंड करतो असें म्हणतील,

व खरोखर त्यांच्या स्वैराचारानें कोणत्याहि विवाहसंस्थेच्या कायद्याचा भंग होत नाहीं. तथापि पोलीस अशा लोकांना हुडकून काढून पकडून त्यांच्यावर खटले करितात, व त्यांना न्यायकोर्टांत शिक्षा होतात, याचें कारण "मनाची नाहीं तरी जनाची तरी लाज हवी" हें सूत्र होय. कांहीं गोष्टी दिसल्यानें डोळ्यांना मनाला दुःख होतें तें होऊं नये हा दुसऱ्याचा हक्क येथें स्वैरवर्तनाच्या हक्काच्या आड येतो.

(६) **पसंत पडेल त्या माणसाशीं संगति ठेवण्याचा हक्क**—हा हक्क दिवसेंदिवस अधिकाधिक मान्य होत चालला आहे. लोक आर्थिक व्यवहाराकरितां किंवा सार्वजनिक हित साधण्याकरितां कंपन्या असोसिएशन वगैरे करितात, व त्या रजिस्टर करण्याकरितां कायदे व नियमहि असतात. अर्थात् एका व्यक्तीचे जे मालमत्तेसंबंधाचे वगैरे हक्क ते, (अनेक व्यक्तींची संघटना ही देखील एक व्यक्तीच आहे अशा समजुतीनें,) जुटीनें व्यवहार करण्याकरितां मनुष्याला मागतां येतात. कायदाहि ते देतो. तथापि येथेंहि मर्यादा आहेच. कारण चोरीचा माल विकत घेण्याकरितां, व त्याचा नफा वाटून देण्याकरितां, जर कोणी कंपनी काढली किंवा जुगारीच्या खेळाची कंपनी काढली, तर कायदा त्याला हरकत घेईल. कारण अशा कंपन्यांचा व्यवहार इतर लोकांच्या हिताला बाधक असतो. अशा कंपन्या रजिस्टर होऊं शकत नाहींत. जाहीर सभांतून जमून सहकारितेनें ठराव करून मत प्रदर्शित करण्याचा हक्क न्याय्य आहे. सरकारच्या व प्रजेच्या लढ्यांत विशेष प्रकारच्या सभा समित्या होऊं नयेत असे नैमित्तिक हुकूम सरकार केव्हां केव्हां करिते. पण त्यांना चांगले वाईट म्हणणें या विषयीं सर्वसामान्य नियम घालतां येत नाहींत. तें प्रत्येक प्रसंगीं गुणावगुणावरूनच म्हटलें पाहिजे.

(७) **मतप्रतिपादनाचा हक्क**—हा हक्क अर्थात् न्याय्य व जन्मसिद्ध असाच आहे. या हक्काची व्याप्ति जुन्या काळापेक्षां हल्लींच्या नव्या काळांत दिवसेंदिवस वाढत आहे. कायदेकौंसिलें व पार्लमेंट यांचा तर सामान्यतः असा नियमच असतो कीं, त्यांत सभासद जें काय बोलेल त्याबद्दल त्याच्यावर खटला होऊं नये. पण तेथेंहि उगीच एकाद्या व्यक्तीची निंदा कोणी सभासद करूं लागेल तर अध्यक्ष त्याला थांबवूं शकेल. तीच गोष्ट असभ्य

अपमानास्पद अशा शिव्यांची. परंतु एरवीं भाषण कितीहि कडक व प्रत्यक्ष राजद्रोही असलें तरी त्याकरितां त्याच्यावर खटला होऊं शकत नाहीं. "धैर्य असेल तर हेच शब्द कौंसिलच्या, पार्लमेंटच्या बाहेर पडून मग बोला पाहूं कीं" असे म्हणून प्रतिपक्षी त्याला घोडयावर घालोत किंवा नामर्द म्हणून फजीत करोत. पण कायदेमंडळांत तो बोलला हा तरी गुन्हा होत नाहीं. कौंसिलाबाहेरहि, पार्लमेंटबाहेरहि, "राज्यघटना बदलावी, इतकेंच काय, पण राजा नसावा त्याचा राजमुगूट विकून वितळून त्याचे पैसे करावे व प्रजेच्या हितासाठीं ते खर्च करावे" असे कोणी म्हटलें, तरी तें निवळ मतप्रतिपादन या सदराखालीं पडेल व त्यावर खटला होणार नाहीं. पण प्रत्यक्ष सक्रिय बंडखोरी ही मात्र सरकार अर्थातच चालू देणार नाहीं. येथें या व्यक्तीच्या हक्काला इतरांच्या हक्काचा विरोध आला म्हणून प्रतिबंध. हीच मर्यादा.

(८) मालकीची मालमिळकत उपभोगण्याचा हक्क—हा अगदीं प्राथमिक स्वरूपाचा हक्क असल्यामुळें त्याला बंधनें फार थोडीं असतात. तथापि या हक्काच्या उपभोगाकरितां आपल्या मिळकतींतून सरकारला कायदेशीर कर द्यावे लागतात, कायदेशीर खासगी कर्जफेड करावी लागते, मृत्यूमुळें डोईबदल झाल्यास, (एकाकडून दुसऱ्याला वारसाहक्कानें मृत्यूपत्रानें मिळकत जात असली तरी) सरकाराला म्हणून त्याचा कांहीं अंश डेथडयूटीच्या कोर्टफीच्या रूपानें द्यावा लागतो. तसेंच आपली मिळकत वापरावयाची तर ती दुसऱ्याच्या हक्काला, कायदेशीर सुखोपभोगाला, बाध न येईल अशाच रीतीनें वापरली पाहिजे. आपल्या घरचें सांडपाणी दुसऱ्याच्या घरांत शिरणार नाहीं, आपल्या घरच्या बांधकामाचे दगड दुसऱ्याच्या अंगावर पडणार नाहींत, अशीच व्यवस्था ठेवला पाहिजे. आपलें कुत्रें चावरें असेल तर त्याला मुसकें घातलें पाहिजे. आपलें मूल मारकें असेल तर तें आवरलें संभाळलें पाहिजे. दुसऱ्याचा परंपरागत उजेड हवा बंद होईल अशा रीतीनें आपलें घर बांधतां नये किंवा झाड वाढूं देतां नये. आणि अशा कामीं दुसरा मालक आपल्या जागेवर करितां येतील ते प्रतिकाराचे प्रकार करील त्यांना हरकत घेतां नये. तात्पर्य, या सर्व बाबतींत आपले व दुसऱ्याचे हक्क हे चक्राच्या दात्यांप्रमाणें तीक्ष्ण असतात. तेव्हां त्यांचे हे

दाते एकांत एक बरोबर बसतील, एकमेकांवर आपटणार नाहींत, असाच मिळकतीचा उपभोग घेतला पाहिजे.

(९) आत्मसंरक्षणाचा हक्क--हाहि जन्मसिद्ध व नैसर्गिक असाच हक्क किंबहुना सर्वांत अधिक महत्त्वाचा हक्क आहे. म्हणून त्याची व्याप्ति विस्तृत व मर्यादा थोड्या असा प्रकार आहे. दिवाणी कायद्याच्या दृष्टीनें तर कांहीं मर्यादाच नाहीं असें म्हणतां येईल. पण फौजदारी कायद्याच्या दृष्टीनें कांहीं मर्यादा आहेत त्याहि संकुचित नाहींत.प्रत्येक देशाच्या पीनल कोडांत गुन्ह्यांच्या अपवादाच्या सदरांत या मर्यादा स्पष्ट सांगितलेल्या असतात.

(१०) स्वतःच्या मुलांवरील पालकत्वाचा हक्क–मुलाचे अज्ञानदशेंत पालनपोषण करण्याची जबाबदारी ज्याप्रमाणें कायद्यानें आईबापांवर टाकलेली आहे, त्याचप्रमाणें त्यांचा संभाळ करण्याच्या कामांत इतरांनीं हात न घालावा असेंहि म्हणण्याचा त्याचा हक्क उघडच प्राप्त होतो.पालन-पोषणाची जबाबदारी एकावर, व त्यांना ताब्यांत ठेवण्याचा हक्क दुसऱ्याचा, हें विसंगत होय.आईबापांपैकीं पालन करण्याचा पहिला हक्क बापाचा, त्यानंतर आईचा. पण विशेष कारणाकरितां न्यायकोर्टें सरकारतर्फे या दोघांचाहि हक्क काढून घेऊन तो एखाद्या सरकारी अधिकाऱ्याकडे देतात, किंवा खासगी गृहस्थ किंवा दूरचा नातलग याजकडेहि देतात. अल्पवयी मुलांना फूस लावून अनीतिमार्गाला लावण्याचा धंदा करणारे कांहीं दुष्ट लोक असतात, व दुर्दैवाची गोष्ट कीं हा धंदा करणारे आईबाप व आप्तहि अनेक खटल्यांतून उघडकीस येतात. या ठिकाणीं सरकारचा अभिनिवेश सात्त्विक असून तो असा कीं, अज्ञान मुलें हीं प्रथमतः आईबापांचीं मुलें खरी, परंतु त्यानंतर तीं राष्ट्राचीं मुलें होत. म्हणून आईबाप त्यांचा संभाळ करूं न शकतील तर तो करण्यास सरकारनें सरसावून आपल्या सत्तेनें आईबापांनाहि योग्य तो प्रतिबंध केला पाहिजे.

(१८२) स्वतंत्रता ही सापेक्ष आहे पण ती आहे !

तात्पर्य,हक्क व स्वातंत्र्य हीं सापेक्ष आहेत. म्हणून कोणत्या स्थितींत कोणत्या दर्जाचें स्वातंत्र्य मागावें याचा विचार सुटला म्हणजे मग अनवस्थाच प्राप्त होणार. निर्जन अरण्यांतल्या तळ्यांत नग्नस्नान करणें व लंडनच्या रस्त्यांत

नग्नपणें हिंडणें हीं दोनहि सारखींच ठरतील काय ! वास्तविक दोनहि क्रिया एकाच स्वरूपाच्या होत. पण ज्या स्वातंत्र्याची अपेक्षा पहिल्या उदाहरणांत योग्य ठरेल ती दुसऱ्यांत कधींहि योग्य ठरणार नाहीं. मनुष्य हा कळपांत, संघात, समाजांत राहाण्याची इच्छा करूं लागला तेव्हांपासूनच त्यानें आपलें स्वातंत्र्य आपल्याच हातानें गमावण्यास सुरवात केली असें म्हणावें लागतें. तात्विक दृष्ट्या राज्यांतली सर्वश्रेष्ठ अंतिम सत्ता ही राजाच्या हातीं आहे हें खरें असलें तरी, त्याबरोबर हेंहि खरेंच आहे कीं त्या सत्तेमुळें प्रजाजनांतील व्यक्तिस्वातंत्र्य सर्वस्वीं नष्ट होत नाहीं. वरिष्ठ राज्यसत्तेचें कार्य व उद्देश हे सामुदायिकच असणार. प्रजेंतील व्यक्तीकडे राज्यसत्ता ही व्यक्तिदृष्ट्या पाहत नाहीं, तर शक्य तितक्या सामुदायिक रीतीनें पाहतें. आणि असें केल्यानें जो कोणचा फायदा होतो तो व्यक्तिकरितां कधींच नसतो तर सर्वच प्रजासमाजाकरितां, निदान कांहीं वर्गाकरितां,तरी असतो. आणि वर्ग म्हटला तरी तो लहानसा समाजच. राज्यसत्ता व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा मेळ ईश्वरी नियति व जीवात्म्याचें कर्मस्वातंत्र्य यांच्याप्रमाणें बसूं शकतो हें पूर्वी सांगितलेंच आहे. पण हें भारी तोलाचें आध्यात्मिक उदाहरण सोडून अगदीं क्षुद्र स्वरूपाचें असें व्यवहारांतलेंच उदाहरण घेतलें तरी तीच गोष्ट सिद्ध होते. आपण घरच्या पाळीव जनावरांना दाव्यानें किंवा कासऱ्यानें बांधून ठेवतों. त्यामुळें त्याला पळून लांब जातां येत नाहीं हें खरें. पण दावें हें थोडें मोठें, त्याहून मोठें, आणखी त्याहून मोठें अशी कल्पना केली असतां, जनावराला त्याच्या कामापुरती, म्हणजे जखडून न राहतां खाऊन पिऊन निजून शेवटीं पाय मोकळे करण्यापर्यंत, स्वतंत्रता मिळतेच कीं नाहीं ! राज्यसंस्थेतल्या प्रजाजनाला तर याहिपेक्षां किती तरी अधिक स्वातंत्र्य असतें !

(१८३) दुतर्फी स्वातंत्र्याची टक्कर होणार नाहीं काय ?

आपणाला जसें स्वातंत्र्य हवेंसें वाटतें तसें तें इतरांनाहि हवें असतें हें अगदीं सामान्यबुद्धीच्या माणसालाहि कळतें. हें न कळतें तर, मनुष्य घराबाहेर पडला असतां वाटेवर जातां येतां त्याच्या इतर माणसाशीं टकरीच टकरी घडत सुटतील. पण वाटेनें जातां येतां समोरासमोर कोणी दोघे

आले असतां त्यांतला प्रत्येकजण दुसऱ्याला बगल देऊन जात असतो. आणि हें त्याला आत्मौपम्यबुद्धीनेंच कळतें,त्याकरितां कायदा लागत नाहीं. रस्त्यानें गाडया मोटारी यांनीं डाव्या हातानें जावें असें म्हटलें म्हणजे त्या हुकमानें रस्त्याच्या दोनहि बाजूंच्या रहदारीची आपोआप व्यवस्था होते. कारण रस्त्याची डावी बाजू ही एका दृष्टीनें उजवी आणि जी उजवी तीच दुसऱ्या दृष्टीनें डावी होऊं शकते. रस्त्यावर जाण्यायेण्याचा नियम दर्शविण्याकरितां "डाव्या बाजूनें जा" अशी पाटी असते ती कदाचित् पायीं चालणाऱ्या मनुष्यव्यक्तींना उद्देशून लिहीत नसतील. पण जो हिताचा मार्ग जनावरांनीं ओढण्याच्या गाडयांना तोच स्वतःच्या पायांनीं चालणाऱ्या माणसांनाहि कां लागूं होऊं नये! कदाचित् गाडयामोटारींच्या टकरीइतक्या माणसांच्या टकरी घातक होत नसतील. पण पुष्कळ वेळां असें वाटतें कीं हा उत्कृष्ट नियम मनुष्येंहि पाळतील तर आहे याच्या निम्यानेंहि रस्त्यावरील गर्दी त्रासदायक होणार नाहीं. रस्त्यानें जाण्यायेण्याचा नियम हेंच एकंदर व्यवहारांतल्या स्वातंत्र्यनियमनाचें उपलक्षण समजावें म्हणजे झालें. अगदीं पहिला पाय पडला त्या बिंदूपासून त्याच दिशेनें अगदीं सरळ रेषेनें मनुष्य जाऊं म्हणेल, व समोरून येणाऱ्या कोणालाहि बगल म्हणून देणारच नाहीं असें म्हणेल, तर रस्त्यांतच काय पण ज्याच्या त्याच्या घरांतहि टकरी होऊं लागतील! पण हें जर घडूं नये, तर मनुष्यानें आपल्या गतीच्या दिशेला व गतीच्या वेगाला प्रसंगानुसार दुसऱ्याकरितां म्हणून कांहीं थोडी मर्यादा घालण्याला तयार झालें पाहिजे. आपल्या कल्पनेंत जोंपर्यंत एकच व्यक्ति असेल तोंपर्यंत तिला अशी मर्यादा घालण्याची कल्पना अर्थातच येणार नाहीं. पण एकीच्या जागीं दोन किंवा अनेक व्यक्ति आल्या कीं या मर्यादेला प्रारंभ झाला, व व्यक्तिस्वातंत्र्याची सापेक्षता सिद्ध झाली. आणि हें जाणून मनुष्य हा स्वतःच जर बगल देण्यास तयार होतो तर राज्यसत्ता झाली तरी जें नियमन घालतें तें सर्वांनीं सर्वांना अशीच बगल द्यावी म्हणूनच असत नाहीं काय! राज्यसत्ता ही नियमन करिते नियंत्रण घालते तें कोणा एकट्या व्यक्तीच्या दुस्वासानें नव्हे, तर त्यानें सामुदायिक कल्याण होणारें असतें

म्हणूनच. तुरुंग व वेड्यांचीं इस्पितळें यासाख्या प्रतिबंधाच्या जागा दुसऱ्या कोणत्या ! परंतु त्यांचा हेतु काय असतो !

(१८४) राज्यसंस्थेचें कार्यक्षेत्र व स्वातंत्र्य-नियमन

राज्यसंस्थेकडून होणाऱ्या नियंत्रणाचा व त्याच्या कार्यक्षेत्राचा कार्य-व्याप्तीचा अवश्य संबंध असतो, व यासंबंधाचें त्रैराशिक समच असतें. अर्थात् राज्यसंस्थेच्या वाढीबरोबर सरकारच्या कर्तव्याच्या कल्पनाहि वाढूं लागल्या. त्या कल्पनांच्या वाढीचा परिणाम व्यक्ति-स्वातंत्र्य कमी होऊन सरकारी सत्तेचें क्षेत्र वाढण्यांत होतो. मात्र वाढलेल्या सत्तेनें सरकार जें कांहीं करतें तें प्रजेच्या म्हणजे नागरिकांच्या हितबुद्धीनेंच करते, अहित-बुद्धीनें करीत नाहीं, ही गोष्ट बहुतेक सर्व लोक कबूल करतात, आणि अशी कबुली देत असतांच जे सूक्ष्म भेद तत्त्वाचे म्हणून निघतात त्यावरच राज्यांतील राजकीय पक्षांची रचना होते. ते पक्ष स्वतःला वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न करीत राहतात. पण हा प्रयत्न होत असतां, कोणत्याहि वेळीं जें कायदेमंडळ अधिकारारूढ असतें तें स्वतंत्र मतदारांनींच निवडून दिलेलें असतें, व त्या कायदेमंडळांतूनच प्रधान-मंडळ नेमण्यांत आलेलें असतें. यामुळें त्यांतील कोणताहि पक्ष व कोणतेंहि मत प्रभावी झालें व त्याप्रमाणें राज्यकारभार चालला तरी, ती गोष्ट एकंदरीनें लोकमताच्या संमतीनेंच होत असतें हें कोणालाहि नाकबूल करितां येत नाहीं. सरकारचें काम प्रजेंतील व्यक्तिमात्राला आपलें स्वातंत्र्य राखून तें अनुभविण्याला जे अडथळे येतील ते दूर करावयाचे इतकेंच. समजूत अशी कीं, प्रत्येक मनुष्याला आपलें हिताहित कळत असतें व त्या दृष्टीनें जो तो आपली बुद्धि चालवून आपल्या हातून होईल तितका स्वहित साधण्याचा प्रयत्न करीत असतो. जी एकाचीं गोष्ट तीच सर्वांची. पण त्यांतच अशी गोम निघते कीं ज्यांत एकाचें हित त्यांत दुसऱ्याचें अहित व ज्यांत एकाचें अहित त्यांत दुसऱ्याचें हित असा विरोध व्यवहारांत उत्पन्न होऊं शकतो, व अशा प्रसंगीं न्यायान्याय पाहून एकाचा हक्क संरक्षण करण्याकरितां दुसऱ्याच्या अतिक्रमणाचें निवारण करणें हें सरकारचें कर्तव्य ठरतें.

याचा अर्थ असा नव्हे कीं अशा प्रकारच्या पोलिसबंदोबस्ताहून सरकारचें दुसरें कर्तव्यच नाहीं. कारण न्यायदान व पोलिसबंदोबस्त एवढ्यावरच कोणत्याहि राज्यकारभाराची समाप्ति झालेली क्वचितच आढळेल.

(१८५) आत्मघातालाहि प्रतिबंध !

एकापासून दुसऱ्याचें संरक्षण करावें, कोणालाहि कपटानें किंवा जुलूम-जबरदस्तीनें स्वार्थ साधून दुसऱ्याचें नुकसान करूं देऊं नये, हें तर सरकारचें कर्तव्य ठरतेंच. परंतु यापलीकडे जाऊन एकाविरुद्ध दुसऱ्याला मदत करण्याशिवाय त्या दोघांनाहि उपयुक्त व हितकर अशा कांहीं गोष्टी सरकारला आपल्या सत्तेनें करितां येण्यासारख्या असतात, व त्या सरकारानें करूं नये असें म्हटलें तर सहजच वेडेपणा होईल. एकापासून दुसऱ्यांचें रक्षण करण्याप्रमाणें स्वतः ज्याचा तोच आत्मघातकी होऊं पाहील तर त्याचेंहि रक्षण करणें हेंहि सरकारच्या कक्षेंत येईल. अर्थात् खुनाप्रमाणें आत्महत्येलाहि सरकार प्रतिबंध करील; व येथें दुसऱ्या कोणाचा प्रतिकार करण्याचा प्रश्न नसून ज्याचा तोच आत्मघातकी होऊं पाहातो, म्हणून त्याचे त्या बाबतींत व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेण्याचा हक्क सरकाराला प्राप्त होतो ही गोष्ट कोणीहि नाकबूल करणार नाहीं. तसेंच सरकारनें पब्लिक वर्क्स खातें काढून रस्ते केले, बांधले किंवा पोस्ट ऑफिस, तार ऑफिस काढून लोकांचीं पत्रें पोचविण्याची किंवा तांतडीनें बातम्या पोचविण्याची व्यवस्था केली, किंवा इस्पितळें काढलीं, किंवा बाजार बसविले, बांधले, आगगाडीचे रस्ते बांधले. किंवा निराश्रित लोकांना काम मिळावें म्हणून उपयुक्त कारखाने काढले, तर यांत व्यक्तिस्वातंत्र्याच्या संरक्षणाचा प्रश्न येत नसून सामुदायिक हित साधण्याचा प्रश्न येतो. कोणीही व्यक्तिस्वातंत्र्यवादी सरकारच्या या कारभाराला नांवें ठेवणार नाहीं. अर्थात् या कामापुरता जसा सरकारच्या कर्तव्याचा विस्तार झाला तसाच तो आणखी वाढवून त्यांत अशाच इतर गोष्टी समाविष्ट करतां येतात. व्यक्तिस्वातंत्र्य हें सामुदायिक हितसाधनाला विरोधी ठरवूं शकत नाहीं. ज्याचें हित त्याला कळतें, आपल्या बुद्धीप्रमाणें आपलें हित साधण्याला प्रत्येकाला मोकळीक असावी, त्याच्या अंगच्या पात्रतेप्रमाणें त्याला यश किंवा अपयश लाभेल, हें म्हणणें खरें

असलें तरी जी गोष्ट एक मनुष्य दुसऱ्याकरितां सहसा करीत नाहीं, व जी सामुदायिक हिताची गोष्ट करण्याला कोणाहि एकाला सामर्थ्य असूं शकत नाहीं, तीच गोष्ट सर्वांच्याकडून थोडथोडा द्रव्यांश घेऊन कोणा सरकारानें स्वतःपुढें येऊन सर्वांकरितां केली तर तिला काय हरकत? कारण असें केल्यानें व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट न होतां, बुद्धिविकासाला व कर्तृत्वाला वाटेल तितकी विविधता व वाव राहून सामुदायिक हिताच्या गोष्टी करितां येतील. अमेरिकेंत जेथें अगदीं नव्या वसाहती वसल्यामुळें सर्वच गोष्टी हव्या तितक्या व हव्या तशा करण्याला, दुसऱ्याला उपसर्ग लागल्याशिवाय, पुष्कळ वाव होता तेथें, सरकारचें कार्यक्षेत्र अगदीं संकुचित असावें हा सिद्धान्त प्रथम पटला. पण तेथेंच पुढें तो तसा टिकला नाहीं. व्यक्तींचेंच काय पण स्वतंत्र संस्थानांचेंही स्वातंत्र्य मर्यादित असूं शकतें, व ही मर्यादा घालणारी अशी कांहीं तरी उच्च भावना व त्रिष्ठ शक्ति असूं शकते ही गोष्ट पुढें उत्तर अमेरिकेनें दक्षिण अमेरिकेशीं युद्ध करून सिद्ध केली. आणि हल्लीं तर अमेरिकन सरकार हें व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षां समुदायस्वातंत्र्य श्रेष्ठ या तत्त्वाच्या जोरावरच राज्य करीत आहे.

(१८६) जुन्या तत्त्ववेत्त्यांचें मत मागें पडलें

फ्रान्समध्यें एवढी मोठी राज्यक्रान्ति होऊन प्रजासत्ताक राज्य स्थापित झालें तरी राजाच्या ऐवजीं लोकसभा व तिचें मंत्रिमंडळ एवढाच फरक झाला. ही क्रान्ति करणारांनीं व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षां समता व विश्वबंधुत्व यावरच अधिक जोर दिला. इंग्लंडांत जॉन स्टुअर्ट मिलसारख्या तत्त्ववेत्त्यांनीं, ते स्वातंत्र्यवादाचे पुरस्कर्ते असूनहि, असें म्हटलें आहे कीं "केवळ व्यक्तिसंरक्षण हेंच काय तें सरकारचें मुख्य कर्तव्य किंवा एकटें एक कर्तव्य होऊं शकत नाहीं. जें कोणा एकाचेंच नव्हे तें सर्व सरकारचेंच कर्तव्य होय. इतकेंच काय पण पुढें पुढें सरकारच्या कर्तव्याची सीमा वाढून व्यक्तिस्वातंत्र्याला उघड उघड आळा घालणें हेंच सरकारचें मुख्य कर्तव्य होऊन बसतें." उदाहरणार्थ, आपल्या लहान मुलांना शिक्षण द्यावें किंवा त्यांना तशींच राहूं द्यावी हें व्यक्तिस्वातंत्र्याचें अगदीं साधें उदाहरण म्हणून वाटेल. परंतु बहुधा लोकसत्ताक अशा प्रत्येक राष्ट्रांत सक्तीच्या शिक्षणाचे

कायदे झालेले आहेत. परदेशांतून आपल्याला हवा तो माल आणविण्याची स्वतंत्रता प्रत्येकाला सामान्यतः असते व असावी हें ठीकच आहे. पण पिण्याची दारू, हत्यारें, परदेशांत खरेदी केलेले गुलाम वगैरे आपल्या देशांत आम्ही येऊं देणार नाहीं असें तर सरकाराला म्हणतां येतेंच. शिवाय आंत येऊं देण्यासारख्या मालावरहि जकाती बसवून मालांच्या किंमती कमी-जास्त होऊं देण्याचा अधिकारहि हल्लीं कोठलेंहि सरकार बजावीत असतें. इंग्लंडमध्यें कांहीं विशेष स्थानिक परिस्थितीमुळें खुल्या व्यापाराचें साम्राज्य सुमारें एक शतक चाललें. परंतु आतां तेंच इंग्लंड संरक्षित व्यापाराचे पुरस्कर्ते बनलें आहे. व्याज किती घ्यावें ही गोष्ट सावकार व कुळ यांच्या दरम्यान करारानें ठरावी हें ठीक आहे. परंतु अमुक एका दरापलीकडे सावकारानें व्याज घेऊं नये असे कायदे करणाऱ्या सरकाराला जुलमी न म्हणतां नीतिमानच म्हणतात. मुंबईत रेंट ॲक्ट झाला तो भाडेकऱ्यांवर जुलूम न व्हावा म्हणून केला म्हणून तो न्याय्यच मानला गेला. तसेंच फॅक्टरी ॲक्ट होऊन कारखानदारांनीं मजुरांपासून किती तास काम घ्यावें, त्यांना सुट्टी केव्हां द्यावी, त्यांना कमीतकमी किती वेतन मिळावें, कारखान्यांत आरोग्याच्या सोई कशा असाव्या, या गोष्टी कारखानदारांच्या संबंधानें जुलमाच्या दिसल्या तरी खरोखर त्या दुर्बळावरील जुलूम वाचविणाऱ्याच होत. कांहीं आधुनिक तत्त्वज्ञानी म्हणतात कीं आतां समाजांतील परस्पर संबंधाची अतिशय गुंतागुंत झाली आहे, आणि याकरितां अगदीं साधा व मूलभूत दिसणारा जो स्वातंत्र्याचा एक हक्क, म्हणजे मतस्वातंत्र्याचा, त्यालाहि आळा घालणें प्राप्त होत आहे. युद्धाच्या वेळीं राष्ट्राच्या हिताकरितां म्हणून मुद्रणस्वातंत्र्याला आळा घालण्यांत येतोच कीं नाहीं ! पण मग शांततेच्या काळांतहि रशियासारख्या देशांतील सरकारानें आपलें अर्थोत्पादनादि कार्यक्रम अमलांत आणण्याकरितां जर मुद्रणस्वातंत्र्याला आळा घातला तर त्याला कोणी नांवें कां ठेवावी ! कारण युद्धाचा हेतु राष्ट्राचा मुलूख अखंड अभंग राहावा व राष्ट्राची इभ्रत रहावी असा असतो. पण एखाद्या स्वदेशी सरकाराला जर असें वाटलें कीं आपल्या कांहीं उपक्रमानें राष्ट्राची अर्थोत्पादक शक्ति एकदम पुष्कळ वाढविण्यासारखी आहे तर, त्या उपक्रमाविरुद्ध प्रयत्न होऊं नयेत म्हणून, मुद्रणस्वातंत्र्याला आळा घातला तर

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
राज्यसंस्था व स्वातंत्र्यनगर वाचनालय, सातारा

त्याला तरी नांवें कां ठेवावीं ! राष्ट्राचा मुलूख अखंड अबाधित ठेवणें हें एकां बाजूला, आणि संघटित शक्तीनें व सक्तीनें जर देशाची संपत्तिमत्ता वाढविणें शक्य असेल तर ती वाढविणें हें दुसऱ्या बाजूला, या दोन गोष्टींची तुलना केली तर दुसरी गोष्ट पहिलीहून कमी महत्त्वाची का मानावी ? आणि पहिलीकरितां जर मुद्रणस्वातंत्र्याला आळा घालणें योग्य ठरेल तर दुसऱ्या गोष्टीकरितांहि तें योग्य ठरावें असें समाजसत्तावाद्यांचें म्हणणें आहे !

(१८७) व्यक्ति रुष्ट पण समाज पुष्ट

येथपर्यंत व्यक्तिस्वातंत्र्याविषयीं विवेचन झालें. त्याचा मथितार्थ इतकाच कीं राज्यसंस्थेची परिणति जसजशी होत चालली आहे तसतसें व्यक्ति-स्वातंत्र्य हटत चाललें आहे असा भास होतो. पण आधीं तें खरें नाहीं. आणि खरोखर जेथें तें हटलेलें आढळतें तेथें ती गोष्ट स्वतः त्या मनुष्याच्या व त्याच्या समाजाच्याहि हिताला पोषक व वर्धक अशीच असते. पण या हानीचा मोबदला त्याला अन्य रीतीनें भरपूर मिळालेला आहे. तो असा कीं लोकसमाज हा राजे लोकांच्या जुलमापासून पूर्णपणें स्वतंत्र झाला असून, त्या समाजाला मिळालेलें स्वातंत्र्य हें पर्यायानें त्या समाजांतीलें प्रत्येक व्यक्तीचेंच स्वातंत्र्य होय. म्हणून हें स्वातंत्र्य लोकांनीं अलीकडे कोणकोणत्या बाबतींत मिळविलें आहे याचा थोडासा विचार करूं. "लोकांना कितीहि स्वातंत्र्य दिलें तरी काय ? त्यांच्या अंगीं शहाणपण, अनुभव, सत्प्रवृत्ति, स्वार्थत्यागाची तयारी व श्रम करण्याची पात्रता, आणि कांहीं अंशीं आत्म्यौपम्य भाव, हे गुण नसले तर त्या सत्तेपासून खरें सुराज्य निर्माण होत नाहीं व सुख लागत नाहीं." हें खरें. तरी पण स्वातंत्र्य मिळविणें ही पहिली पायरी, व वरील गुणांनीं तिचे फायदे पदरांत पाडून घेणें ही दुसरी पायरी होय. आधीं पहिल्या पायरीवर चढावें आणि मग दुसरीवर चढतां येतें कीं नाहीं हें पहावें हा क्रम स्वाभाविकच आहे; आणि त्याप्रमाणें गेल्या कित्येक शतकांत प्रत्येक राष्ट्रांतील प्रजा आधीं होईल तितकी सत्ता व स्वातंत्र्य हीं मिळविण्याच्या उद्योगाला लागलेली आहे असें आढळते.

(१८८) जुन्या जुलमी सत्तेवरचा पहिला विजय

या चढाईच्या धोरणांत पहिला हल्ला अनियंत्रित राजसत्तेवर झालेला आहे. लोकांचें राजाला म्हणणें हें कीं "आम्ही प्रजाजन आजवर तुमचे 'गुलाम' होतों, पण यापुढें तें चालणार नाहीं." याचा अर्थ असा नव्हे कीं प्रत्येक प्रजाजनाच्या पायांत बिड्या घातलेल्या होत्या, किंवा प्रत्येकाच्या पाठीमागें हातांत चाबूक घेऊन राजा त्याला आपल्या कामावर राबवीत असे. पण ही बकासुराची पाळी केव्हां केव्हां शब्दशः कांहीं लोकांवर येत असे हें कांहीं खोटें नाहीं. वेठ बिगारीला लोक धरून, त्यांना मजुरी मुळींच न देऊन, किंवा फार थोडी देऊन, राजे लोकांनीं आपले राजवाडे, महाल, क्रीडामंदिरें, बागबगीचे बांधून तयार करून घेतले नाहींत काय? लोकांना सक्तीनें सैन्यांत दाखल करून लढाईवर पाठविलें नाहीं काय? राजाला खर्चाला पैसा कमी पडला म्हणजे त्यानें वाटेल त्या श्रीमंत व्यक्तीवर किंवा वर्गावर हुंड्या लिहून पैसे वसूल केले नाहींत काय? राजे लोकांनीं लोकांच्या घरच्या बायका जबरीनें काढून नेणें वगैरे सारख्या कमालीच्या दुष्टपणाच्या व अनीतीच्या गोष्टी आपण सोडून देऊं. पण त्या सोडून दिल्या तरी राजे लोकांनीं केवळ आपला आर्थिक स्वार्थ किंवा आपली इभ्रत किंवा आपली चैन हीं पुरी करण्याकरितां आपल्या इच्छेप्रमाणें लोकांवर सक्ती केली नाहीं काय! लोकावर जुलूम केला असें यथार्थपणें म्हणण्याला शेकडा शंभर लोकांवर तो जुलूम झाला पाहिजे असें नाहीं. पण वर सांगितल्याप्रमाणें कांहीं थोड्या लोकांवर तरी तो होतो. आणि सोडतींत कोणाच्या दुर्दैवाचें तिकिट निघेल हें अर्थातच निश्चित कळण्यासारखें नसल्यामुळें, प्रजाजनापैकीं प्रत्येकाला मनांतून ती धास्ती वाटत राहाते. सर्वांना आपण एकाच संकटांत आहों अशी भावना जागृत राहून, सर्वच आपापल्या परीनें या जुलुमाचा प्रतिकार करीत असतात. अनियंत्रित राजसत्ता याचाच अर्थ, "कोणावर केव्हां धाड पडेल याचा नियम नाहीं" असा करितां येतो. म्हणून लोकांचा हात चालू लागला म्हणजे लोक राजाला म्हणू लागतात—"हा अनियंत्रित कारभार बस झाला. लेखी स्पष्ट कायदेकानू झाले पाहिजेत; ते सर्वांना सारखे लागू असले पाहिजेत; व ते लोकांनाच काय पण तुम्हालाहि लागू असले पाहिजेत!"

कायदा केला तो फक्त प्रजाजनापैकीं एकमेकांना लागू होण्यापुरताच केला, आणि स्वतः राजाला मात्र तो लागू नाहीं, तर तें नियंत्रण नव्हे. तो कायदा नव्हे. राजाचें राज्य चालण्याला, म्हणजे अप्रत्यक्ष रीतीनें लोकांच्याच हिताकरितां, ज्या गोष्टी प्रजेपासून घेणें व मिळणें हें रास्त असेल त्या, सारासार विचारानें योग्य तितक्या लोकांकडून घ्याव्या. पण त्या कांहीं ठराविक नियमानें! तसें झालें तरच त्यांची मागणी करणें हें जसें राजाच्या दृष्टीनें कायदेशीर ठरेल, त्याचप्रमाणें ठरल्याहून अधिक मागणी करणें हें प्रजेच्या दृष्टीनें बेकायदेशीर ठरेल. असा दुतर्फी लागू होणारा कायदा झाला म्हणजे त्यांतूनच ज्याला आपण 'हक्क' म्हणतो ते निर्माण होतात. एका रुपयाच्या दोन बाजूला जसे दोन छाप असतात, तसे या कायद्याच्या एका अंगच्या छापाला कर्तव्याचें बंधन किंवा जबाबदारी हें नांव देतां येईल, तर दुसऱ्या अंगच्या छापाला हक्क हें नांव देतां येईल.

(१८९) आधुनिक प्रजा राजाला काय म्हणते ?

"राज्य चालावयाला पैसा हवा ! कबूल ! त्याकरितां कर मागा. देतों. पण कोणापासून किती कर केव्हां घ्यावा हें कायद्यानें आधीं निश्चित ठरवा; व त्यांतून दुतर्फी कर्तव्यें व हक्क निर्माण होऊं द्या. म्हणजे तो कर आम्ही देऊं. परदेशाशीं युद्ध जुंपलें आणि आम्हीं आपखुषीनें सैन्यांत दाखल झालोंच नाहीं व राष्ट्ररक्षणाला मदत केली नाहीं, तर सक्तीच्या लष्करी नोकरीचा कायदा करा. आणि कोण किती लोक घ्यावयाचे, त्यांना पगार किती द्यावयाचा, मेल्यावर त्यांच्या बायकापोरांना पेन्शन किती द्यावयाचें, अन्नवस्त्र, रजा, सुट्या, व सवलती कोणत्या मिळणार, याचा कायदा किंवा कानू किंवा नियम करा; आणि मग त्याप्रमाणें आम्ही लष्करभरती न केली तर आम्हाला शिक्षा करा. कोणत्या कृत्याला गुन्हा म्हणावें हें आधीं निश्चित ठरवून पीनल कोड तयार करा; तसेंच दिवाणी मुलकी कारभार चालविण्याचे व न्यायदानाचे योग्य ते कायदेकानू करा; म्हणजे मग आम्ही त्याप्रमाणें वागूं; व न वागल्यास शिक्षा करण्याची सत्ता तुम्हाला आहेच. आम्ही ही सत्ता अजिबात काढून घ्यावी असें म्हणत नाहीं. फक्त

तिचें नियमन म्हणजे नियमांनीं नियंत्रण करूं इच्छितों. याशिवाय आणखीहि एक गोष्ट झाली पाहिजे ती अशी कीं, कायदे कानू कराल ते मुख्यतः आमच्या माहितीकरितां व वर्तनाकरितां असल्यामुळें आमचाहि त्याकामीं सल्ला घेणें योग्य ठरेल. म्हणून तोहि घेत जा. अगदींच एकतर्फी तुमच्या एकट्याच्या मर्जीस येईल तसा कायदा केलात तर तो कायदाच होऊं शकत नाहीं. कारण आमची त्याला संमति नाहीं. तुमच्या एकट्याच्याच इच्छेनें कायदा केला काय, न केला काय, सारखाच. आज कराल, उद्या काढून टाकाल. आज कराल, उद्यां बदलाल. पण आमचा सल्ला घ्यावा संमति घ्यावी असें ठरल्यास वरील गोष्टी उठल्या बसल्या तुम्हांला करतां येणार नाहींत. तुम्हांला तें करतांना अडचण पडेल. तात्पर्य, तुमच्या स्वैरकारभाराला अडचण हीच आमच्या स्वातंत्र्याची सनद, आमच्या हक्कांची जामिनकी."

(१९०) कायद्याचें नियंत्रण म्हणजे स्वातंत्र्य !

अशा रीतीनें गेल्या दोन तीन शतकांत अनेक राज्यांतील प्रजाजनांनीं जागे होऊन राजसत्तेवर जो पहिला हल्ला केला व पहिलें ठाणें काबीज केलें तें राजाच्या बेकायदा बेलगामी वर्तनाचें; व असें करतांना त्यांनीं ज्या तीन मागण्या केल्या व पदरांत पाडून घेतल्या त्या अशा. (१) राजाचें वर्तन व प्रजेशीं वागणूक हीं (ज्याचे शब्द व ज्याचा अर्थ निश्चित आहे व ज्याला कालाच्या दृष्टीनें कायमपणा आहे अशा) कायद्यानें नियंत्रित झालीं पाहिजेत. (२) तो कायदा प्रजाजनांतील सर्वांना व स्वतः राजालाहि बंधनकारक असला पाहिजे; आणि (३) तो कायदा करतांना कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें राजानें प्रजाजनांची संमति घेतली पाहिजे. या मागणीला इंग्रजींत Reign of Law अर्थात् "कायद्याचें राज्य" असे शब्द लावतात. म्हणजे कारकीर्द राजाची असली तरी सत्ता कायद्याची पाहिजे ! आतां असे कायदे केल्यावरहि ठेवणींतले म्हणून कांहीं अधिकार राजा आपल्या खिशांत राखून ठेवीत असतो, व जरूरीप्रमाणें त्यांचा उपयोग तो करीत असतो. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत सामान्यतः कायद्याचें राज्य सुरूं असलें तरी, एखादे वेळीं गव्हर्नर जनरल हा ऑर्डिनन्स म्हणून

काढतो हें प्रसिद्ध आहे; व या ठेवणींतल्या राखीव अधिकाराचेंच तें उदाहरण होय. तसेंच फ्रान्समध्यें Lettre de cachet म्हणून बेलगामी वॉरंटाचा एक प्रकार आहे तो रिपब्लिकच्या अध्यक्षाला अजूनहि अमलांत आणतां येतो. तसेंच पूर्वी आयर्लेंडांत बंडाळी सुरू होती तेव्हां Coercion Acts नांवाचे कायदे केले जात. किंवा हल्लीं हिंदुस्थानांतहि बंगाल्याकरितां दडपशाहीचे कांहीं विशेष कायदे केले आहेत ते फक्त नांवाचे कायदे असून वस्तुतः त्यांनीं पोलिस व मॅजिस्ट्रेट यांना हवी तशी दडपशाही व जुलूम करण्याचाच परवाना दिलेला असतो. वरील विषांवर विलायतेंतील Petition of Rights व हिंदुस्थानांतील 'हेबिअस कॉर्पस ॲक्ट' असले कांहीं उतारे आहेत. अर्थात् त्रिगाचा अंमल किती व उताऱ्याचा गुण किती हें जसें अनुभवास येईल तसें खरें. पण ठेवणीतले हे कायद्यांचे प्रकार अपवाद म्हणून वगळले तर सर्वांना सारखे लागू होणाऱ्या कायद्याचें नियंत्रण म्हणजे तें एक प्रकारें स्वातंत्र्यच होय असें म्हणतां येतें.

(१९१) करांबाबत स्वतंत्रता

पण राज्यांत नुसतें कायद्याचें वर्चस्व स्थापून भागत नाहीं. तर राज्याचा जमाखर्च म्हणजे राज्याच्या पिशवीचें तोंड हातीं ठेवण्याची सत्ताहि लोकांना राजांकडून काढून घ्यावयाची होती. आणि गेल्या चार शतकांत ती त्यांनीं काढून घेतली. १७ व्या शतकांत इंग्लंडांत राजा व प्रजा यांचें युद्ध झालें याचें कारण, पहिल्या चार्लस राजानें लोकांकडून कराच्या रूपानें वाटेल तितका पैसा मिळविणें सुरू केलें हें होय. १८व्या शतकांत इंग्लंडच्या राजाच्या हातून अमेरिकन वसाहत निघून गेली व स्वतंत्र झाली त्याचें कारण, तिसऱ्या जॉर्ज राजाच्या प्रधानमंडळानें अमेरिकन वसाहतवाल्यांवर सक्तीनें बसविलेला कर हा होय. फ्रान्सच्या राज्यक्रांतीलाहि हेंच कारण झालें. म्हणजे गरीब लोकांकडून हवा तसा कर वसूल होत असे; पण उमराववर्ग व उपाध्यायवर्ग हे स्वतःला कर देण्यापासून मुक्त समजत हल्लीं जुन्या व नव्या राज्यांतून कर बसवावयाचा तो लोकसभेच्या संमतीनें व मंजुरीनेंच बसविला जातो. आणि उमराव सभांना जरी एकंदर राज्यघटनेंत स्थान

असलें तरी, कर बसविणें न बसविणें याविषयीं कायदे करण्याच्या बाबतींत या उमरावसभेची लुडबूड लोक चालूं देत नाहींत. त्यांनीं राजापासून स्वातंत्र्य मिळविलें व उमराव लोकावर समानतेचें तत्त्व हक्कानें प्रस्थापित केलें; किंबहुना एक पायरी पुढेंच जाऊन उमराव लोकांवर कर बसविण्यांत कांहीं कमीपणा उरूं दिला नाहीं. पण ते बसविण्याची सत्ता मात्र उमराव सभा वगळून लोकसभेनें आपल्या हातीं घेतली. तसेंच, लोकसभेंत झालें तरी प्रधानमंडळ हेंच कर बसविण्याची योजना तयार करितें, व आपल्या बहुमताच्या जोरावर ती अंमलांत आणूं पाहातें. पण पूर्वी निवडणुकींत विश्वासार्ह मानलेल्याहि पक्षानें व त्यांतील मंत्रीमंडळानें तयार केलेली योजना मान्य नसल्यास लोकसभेंत प्रधानमंडळाचा पराभव होतो. आणि अशा रीतीनें लोक आपली सत्ता बजावण्याचें काम आपलेच हातीं घेतात, व एक जबाबदार प्रधानमंडळ घालवून देऊन त्याचे जागीं दुसरें प्रस्थापित करतात. अशा रीतीनें राज्याच्या पिशवीचें तोंड आपल्या हातीं ठेवण्याची स्वतंत्रता हा राजकीय स्वतंत्रतेचा एक भाग ठरतो.

(१९२) 'दुःखामिळतां वाटेकरी'

राजावर नियंत्रण घालण्याकरितां कायदा करावयाचा तो नुसत्या राजाला न लागतां सर्व प्रजाजनानाहि सारखाच लागू व्हावयाचा असतो. आणि यांतूनच एक विरोधाभासात्मक असा सिद्धान्त, म्हणजे दिसण्यांत चमत्कारिक असा सिद्धान्त, निर्माण होतो. तो असा कीं, सामुदायिक स्वतंत्रता म्हणजेच सामुदायिक परतंत्रता होय! पण जें सर्वांना सारखें लागूं होतें त्यामुळें परतंत्रतेचें दुःख वाटत नाहीं. कारण स्वतंत्रता व परतंत्रता ही भावना कांहींशी अन्यसापेक्ष असते. शिवाय सामुदायिक बंधन म्हणजे परतंत्रता ही तरी सामुदायिक फायद्याकरितांच असते अशीहि लोकांना आंतून जाणीव असते. निदान परस्पर समानता दिसली म्हणजे मनुष्याचें पुष्कळसें समाधान आपोआपच होतें. कारण मग प्रश्न इतकाच उरतो कीं, सर्वांच्याच स्वतंत्रतेंत जे सामुदायिक वैगुण्य आहे तें समाजाच्या राज्याच्या फायद्याकरितांच आहे किंवा कसें? आणि तें वैगुण्य किती उरूं द्यावें, किती कादून टाकावें! याचा विचार सर्वच जण मिळून सामुदायिक दृष्टीनें करूं लागले, म्हणजे तो विचार

निःस्वार्थी (व्यक्ति-स्वार्थ ज्यात नाहीं असा) म्हणून निर्विकारपणानें व शुद्ध बुद्धीनें होतो. आणि तो केल्यानंतर मग, जर स्वतंत्रतेचें माप थोडें कमी भरलें, परतंत्रता किंचित् उरली ती राहिली, तरी चालेल असें लोकांचें लोकांनाच बाटूं लागून त्यामुळें त्यांना दुःख होत नाहीं. Social sorrow loses half its pain असें इंग्रजींत एक वाक्य आहे. त्याचें भाषांतर " दुःखा मिळतां वाटेकरी। दुःखभार हलका शिरीं ॥ " असें करितां येईल. ' स्निग्धजनसंविभक्तं दुःखं सह्यवेदनं भवति '! गांवांत रोगराई नाहीं ती अवचित प्रगट होऊन एकाच घराला बाधली म्हणजे तें दुःख फार चाटतें. पण प्लेग कॉलरा इन्फ्ल्युएंझा यांची सांथ गांवांत आली म्हणजे घरोघरीं तेंच असें पाहून दुःख हलकें होतें. एक मूल रडत असलें म्हणजे त्याला दुसऱ्या रडणाऱ्या मुलापुढें करावें; म्हणजे दोन्ही मुलें रडण्याची थांबतात असा चमत्कार केव्हां केव्हां घडतो असें मानसशास्त्रज्ञ म्हणतात.

(१९३) समानतेच्याद्वारें स्वातंत्र्यलाभ

कायद्याच्या राज्यांत मुख्य गोष्ट समानता ही आहे व तिचा पहिला अंमल राजावर झाला हें आपण पाहिलें. पण समानतेचें कार्य तेवढ्यानें संपत नाहीं. कारण समाजांतली, राज्यांतली विषमता ही एकट्या राजामध्येंच सांठविलेली नसते. तिचे इतर आधारस्तंभ पुष्कळच असतात. एखादें गांठाळ लांकूड असावें, म्हणजे ठिकठिकाणीं त्याच्या शरीरांत गांठीच गांठी असतात. आणि लांकूडफोड्याला ती एकेक गांठ घेऊन फोडावी लागते. त्याप्रमाणेंच समाजांतील अनेक वर्ग व व्यक्ति या पूर्वार्जित परंपरागत हक्कांच्या जोरावर आवळून गाठाळून बसलेल्या असतात. या हक्कांना " Vested Rights " असें म्हणतात. वतनदारी हें त्याचेंच भाषांतर. आणि राजाला नियंत्रण लावून त्याला वतनदारीच्या गुहेंतून ओढून काढून चौकांत चवाट्यावर आणण्याला समाजाला जितके श्रम पडले त्यांहून अधिक श्रम हे इतर वतनदार मोडून काढण्याला पडले आहेत. ही सामाजिक समता प्रस्थापित करणें हें काम देखील राजकीय सत्तेनेंच लोकांना आपल्या अभिरुचीप्रमाणें करून घेतां येतें, व तसें त्यांनीं तें आजवर करून घेतलें आहे. इंग्लंडांत लोकसत्ता प्रभावी असली तरी राजा हा

अजून शिल्लक उरलेला आहे, व एक राजदरबारमंडळ म्हटलें म्हणजे त्याच्या अनुषंगानें त्यांतील अठरा सोंगेंहि आलींच. या सोंगांचें मुख्य लक्षण म्हटलें म्हणजे सामाजिक उचनीचपणाचा भेदभाव. यामुळें विलायतेंत राजाच्या खालोखाल निरनिराळ्या दर्जाचे पदवीविभूषित अमीर उमराव अजून शिल्लक आहेत. कोणी ड्यूक, कोणी मार्किस, कोणी व्हायकाउंट, कोणी लॉर्ड, कोणी बॅरन, कोणी सर इत्यादि अनेक दर्जाच्या उमरावांच्या पायऱ्यांनीं राजसिंहासन उंच होऊन बसलेलें आहे. आणि त्यावर बसणारा राजा हा अर्थात् त्याहून उंच. पण अमेरिका, फ्रान्स वगैरे लोकसत्ताक राज्यांत हे सामाजिक दर्जे व त्यांतील भेदाभेद हे शिल्लक उरलेले नाहींत. लष्कर, आरमार व बजावणी इत्यादि सरकारी खात्यांतील अधिकारीवर्ग यांना अधिकारपरत्वें लहान मोठे हुद्दे देण्यांत येतात, कारण त्यांच्या कामांत अधिकारपद हाच शिस्तीचा मुख्य पाया आहे. परंतु अमेरिकेचा व फ्रान्सचा प्रेसिडेंट व रस्त्यांतून चालणारा कोणताहि इतर सामान्य प्रतीचा प्रजाजन यांचेमध्यें कोणताहि सामाजिक भेदभाव अगर तद्दर्शक भेदभाव नाहीं. येथेंहि समानतेच्या द्वारेंच स्वातंत्र्य प्रतीत होत आहे. सामाजिक उचनीच भाव काढून टाकल्यावर कोणत्याहि विशिष्ट वर्गाला राज्यांतील कोणताहि विशिष्ट फायदा उरूं देऊं नये ही गोष्ट आपोआपच पुढें येणारी आहे. म्हणून सरकारी पैशानें ज्या ज्या लोकोपयोगी कामावर खर्च होतो त्यांचा फायदा घेण्याचा हक्क सर्व वर्गांना व लोकांना सारखाच राहिला पाहिजे हें तत्त्व मान्य करावें लागतें. उदाहरणार्थ, शिक्षण घेण्याचा अधिकार सर्व वर्गांना सारखाच आहे. आणि राष्ट्रांतील यच्चयावत् मुलांना कोणताहि भेदभाव न ठेवतां निदान प्राथमिक तरी शिक्षण दिलें पाहिजे, हा सिद्धान्त लोकसत्ताप्रधानच काय पण राजसत्ताप्रधान राष्ट्रांतहि मान्य झाला आहे व अंमलांत येऊं लागला आहे.

(१९४) समानतेच्या आणखी बाबी

वंशपरंपरागत म्हणून जितके हक्क पूर्वी होते तितके सगळे आतां जवळ जवळ नष्ट झाले आहेत. हल्लीं भेदभावाचीं कांहीं टेंगळें समाजाच्या अंगावर दिसून येत असलीं तरी तीं नवीं आहेत. म्हणजे समान हक्काच्या पायांवरच

उभे राहून, बुद्धिवान लोक, चाणाक्ष हुशार लोक, द्रव्यदृष्टया व्यापार धंदा करून बेसुमार पैसा मिळवितात. असे लोक हीं एक प्रकारची प्रस्थें बनतात, व लोकांच्या डोळ्यांत खड्यासारखीं खुपूं लागतात. शिवाय अशा लोकांना संहति, सहकारिता, संघटना यांचें रहस्य समजत असल्यामुळें तें आपले संघ किंवा सिंडिकेटस, कॉरपोरेशन्स देखील बनवितात. "एकैकमपि अनर्थाय किमुयत्र चतुष्टयं।" या न्यायानें गरीबाना होणारा श्रीमंतांचा उपद्रव अनेक परीनें वाढतो. जुन्या काळच्या राजांनीं आपली सत्ता चालवून, आपल्या आवडत्या लोकांना विशेष हक्क, मोठ्या नोकऱ्या, व्यापाराचे परवाने, किंवा सरकारी खजिन्यांतील पैसा वगैरे देऊन, मोटेपणाला चढविलें म्हणून त्याच्याविरुद्ध लोकांना सहजच गवगवा करतां आला. पण आतां समानतेच्या जागेवर गरिबांच्या बरोबरीनें प्रथम उभे राहून, केवळ आपल्या बुद्धिबळावर, पुढें ज्यांनीं संपत्ति मिळविली त्यांच्याविरुद्ध तक्रार करण्याला काय जागा ! अर्थात् हीं नवीं विषमतेचीं टेंगळें समाजाच्या अंगांवर उठलेलीं नाहींशीं करावयाचीं तर, या बुद्धीच्या पैशाच्या मांडवलावरच नियंत्रण घातलें पाहिजे. आणि ही गोष्ट हल्लीं रशियासारख्या कांहीं देशांत प्रयोगावस्थेंत आहे. पण राजाची सत्ता घालवून आपल्या हातीं सत्ता आणणे हें ज्यांना पटलें व न्यायाचें वाटलें, त्यांना ही पुढची पायरी एकदम मान्य होत नाहीं. म्हणून फ्रान्स अमेरिकेसारख्या लोकसत्ताक राष्ट्रांत वडिलार्जित किंवा वंशपरंपरागत विशेष हक्क जरी सर्वस्वीं नष्ट केले आहेत तरी, श्रीमंत व गरीब हा भेद त्यांना अद्यापि बुडवितां आला नाहीं, किंवा बुडविण्याची इच्छाहि झाली नाहीं. अमेरिकेंत तर श्रीमंतीचीं टेंगळेंच काय पण टेंकाडेंहि समाजाच्या अंगावर उमटलेलीं असून, कांहीं लोकांनीं लोकशाही सत्तेचा उपयोग करून, कायद्याचे मोठमोठे वाफेचे नांगर लावून, हीं टेंकाडें जमीनदोस्त करण्याची खटपट सुरू केली आहे. परंतु हें युद्ध अद्यापि संपलेलें नाहीं. तसेंच रशियांतहि जुलमी राजसत्ता गेली, पण जुलमी लोकसत्ता जवळ जवळ जुलमी राजसत्तेइतकीच त्रासदायक होऊं लागली आहे, व त्याविरुद्ध आंतून प्रतिक्रियाहि सुरूं आहे. पण तेथेंहि हें युद्ध अजून नुकतेंच सुरूं असून, त्याचा निकाल लागण्याला बराच अवकाश आहे. आज लोक-

शाहीनें मिळविलें तें इतकेंच कीं, राजसत्ता व राजकर्तृक विषमता हीं नाहींशीं करून टाकलीं आहेत.

(१९५) आर्थिक व्यवहारस्वातंत्र्य

यानंतर मनुष्याच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न येतो. पूर्वी राजे लोकांना आपल्या स्वराज्याकरितां, किंवा आपल्या समाजांतील विशिष्ट वर्गाच्या स्वार्थाकरितां, मक्ते देण्याची पद्धति ठेवली होती व व्यापार उद्योगधंदे यांच्यामध्यें पक्षपाती कायदाहि ते करीत. आधींच ईश्वरानें बुद्धिबळ मनुष्यांना सारखें वाटून दिलेलें नाहीं. त्यांतून वरील प्रकारचे कायदे किंवा प्रघात अंमलांत राहिले तर, ईश्वरनिर्मित वैषम्याच्या कारणांना मनुष्यनिर्मित वैषम्याच्या कारणांची भर पडणार ! आणि त्याप्रमाणें लोकसत्ता प्रभावी होऊं लागल्यावर ही आर्थिक विषमता नाहींशी करून टाकण्याचे प्रयत्न लोकांनीं चालविले. खुल्या व्यापाराचें तत्त्व जें इतकें उदयाला मध्यंतरी आलें त्याचें कारण हेंच. हल्लीं उद्योग व व्यापारधंदे या बाबतींत बोलून-चालून पक्षपाती असे कायदे होत नाहींत. राष्ट्रांनीं खुल्या व्यापाराला कांहीं वेळ आळा घातला तरी तो कांहीं अंशीं सरकारी खजिन्याच्या फायद्याकरितां म्हणजे उत्पन्न वाढविण्याकरितां, पण मुख्यतः देशांतील उगवत्या उद्योगधंद्यांना व कारागिरीला संरक्षण देण्याकरितां घातला जातो. असें झाल्यास राष्ट्रांतील कांहीं वर्गाकडून हाकाटी होते. पण ती, राजकीय स्वातंत्र्य नष्ट झालें समानता बुडाली अशा मुद्द्यावर होत नसून, आर्थिकदृष्ट्या एक धोरण दुसऱ्यापेक्षां अधिक बरें किंवा वाईट, आणि यापैकीं एका धोरणानें दुसऱ्यापेक्षां राष्ट्राचा आर्थिक फायदा अधिक किंवा कमी होण्याचा संभव, या मुद्द्यावरच माजलें तर भांडण माजतें. खुल्या व्यापाराला आळा घालणें ही गोष्ट कायदा केल्याशिवाय होत नाहीं. आणि तो कायदा मतदारांच्या विश्वासाला पात्र अशा मतदारांकडून व प्रधानमंडळाकडून होत असतो. त्याचप्रमाणें कांहीं निवडक उद्योगधंदे हे खाजगी लोकांच्या हातीं राहूं द्यावे कीं, राष्ट्रीय सरकारनें ते आपल्या खातेवारींत ओढून व आपल्या हक्कानें चालवून, त्याचा नफा एका वर्गाला होऊं न देतां, राष्ट्राच्या तिजोरींत तो भरावा, या वादांतील तत्त्व हळुहळू पुढें येत आहे. हिंदुस्थानांत

काही आगगाड्या व जंगलें हीं सरकारच्या मालकीची असून, त्यांचा सर्व कारभार सरकारी मालकीनें चालतो. रशियाची मजल याचेहीं पलीकडे गेलेली आहे; म्हणजे तेथें जवळजवळ कोणताहि उद्योगधंदा खाजगी लोकांच्या हातीं राहूं नये, तो सर्व राष्ट्रीय सरकारनें स्वाधीन करून चालवावा, अशाविषयीं प्रयोग सुरू आहेत. इंग्लंडांतील रेल्वे या अद्यापि खाजगी कंपनींच्या मालकीच्या आहेत, व देशांतील कोळशाच्या वगैरे खाणी या सरकारी मालकीच्या व्हाव्या अशीं मतें पुढें येत आहेत. आणि या मतांना कायद्याचें स्वरूप आल्यास, पूर्वी खाजगी व्यक्तींना व खाजगी संघांना जे हक्क होते ते सक्तीनें काढून घेतल्यासारखें होणार आहे. पण यामुळें लोकसत्तेची कोणी पिछेहाट झाली असें म्हणत नाहीं. राष्ट्राकरितां व्यक्तीवर बंधन घालणें हें लोकशाहीचें लक्षण समजलें जातें. आणि तें लोकांना मानवतें याचें कारण हेंच कीं, जुन्या काळीं या सर्व नियंत्रणाचा फायदा राजा किंवा त्यांच्या आश्रयाखालीं वाढणाऱ्या कांहीं मोजक्या व्यक्ती यांच्या पदरांत पडतो असें धडधडीत दिसून येत असे. आज व्यक्तींच्या हक्कांचें नियंत्रण झालें तरी त्याचा फायदा पर्यायानें सर्व राष्ट्राच्या खिशांत पडणारा आहे, तो कांहीं राष्ट्राच्या किंवा पार्लमेंटच्या अध्यक्षाच्या खिशांत पडणारा नाहीं, अशी खात्री वाटल्यामुळें पुढें मागें लोकसभेनेंहि या गोष्टीला अनुमोदन देणें संभवनीय आहे. अर्थात् येथें व्यक्ति नियंत्रणाचें किंवा विषमतेचें फक्त रूपांतर झालें असें जरी कोणी म्हटलें तरी त्या नुसत्या नांवावरून कोणी फसलें जाणार नाहीं. कारण लोकसत्तेच्या प्रगतीची दिशा येथें बदललेली नाहीं. फक्त तिच्या अमलाचा प्रकार बदललेला असेल.

(१९६) स्त्रीवर्गाला समान हक्काची प्राप्ती

तसेंच आत्मौपम्यबुद्धीनें, मनुष्यसमाजांतील स्त्रियांना जे सामान्यहि हक्क पूर्वी नव्हते ते द्यावे ही गोष्ट लोकशाहीला पटत चालली असून, स्त्रिया व पुरुष यांच्या दरम्यान, प्रजाजन किंवा नागरिक किंवा लोकसमाजाचा अवयव या नात्यानें, कोणचाहि राजकीय भेदभाव यापुढें राहाणार नाहीं असें दिसतें. पूर्वी पुरुष वारस नसेल तेव्हां राजघराण्यांतील स्त्रिया गादीवर

बसत आल्या आहेत, आणि अमीर उमराव पुरुषांबरोबर त्यांच्या स्त्रियांनाहि उमरावगिरीचे सर्व हक्क मिळत आले आहेत. पण सामान्य समाजांतील स्त्रियांना हक्कांपासून व अधिकारापासून दूर ठेवण्याचा जो गुन्हा घडला तो पूर्वी लोकांचा लोकांनींच केला होता. आणि त्यांच्या मनांत आतां पुढें समताबुद्धि उत्पन्न झाली असल्यामुळें, आपल्या बरोबरीचे हक्क स्त्रियांनाहि द्यावे असें पुरुषांना वाटूं लागलें आहे. समाजाच्या खासगी किंवा घरगुत्ती कारभारांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे हक्क मिळणें याला कायद्याची मदत नको आहे. परंतु समाजांतील इतर लोकांशीं करार करणें, स्वतःची म्हणून माल मिळकत पुरुष-नातेवाइकाच्या मालमिळकतीहून वेगळी व स्वतंत्र ठेवणें व भोगणें, राष्ट्रीय पार्लमेंटाच्या निवडणुकींत व स्थानिक स्वराज्याच्या निवडणुकींत स्त्रियांनीं मतदार होणें, किंवा त्यांतील सभासदांच्या जागेकरितां निवडणुकीस उभें राहणें, वगैरे गोष्टी कायद्याशिवाय होणाऱ्या नाहींत. त्याहि लोकांनीं आतां केल्या आहेत. या दृष्टीनें स्त्रियांना समानता मिळवून देणें हा राजकीय स्वातंत्र्याचाच एक भाग आहे.

(१९७) कुटुंबीयांना स्वातंत्र्यप्राप्ति

कौटुंबिक स्वातंत्र्य याचा राजसत्तेशीं संबंध पोहोचत नाहीं. म्हणजे कौटुंबिक संबंधांत कुटुंबांतील लोकांना परस्पर स्वातंत्र्य पूर्वीहून अधिक मिळालें तरी तें राजसत्तेतून काढून घेतलें असें नाहीं. तर कदाचित् कुटुंबांतल्या कुटुंबांतच जी राजसत्ता पूर्वी चालत असेल तिच्यांतून काढून घेतलें असें फार तर म्हणतां येईल. उदाहरणार्थ, पूर्वी खुद्द विलायतेंतहि स्त्रियांना स्वतःची म्हणून मिळकत कायदेशीर अधिकारानें धारण करतां येत नसे. अलीकडे स्त्रियांना हा अधिकार मिळाला आहे. आणि विवाहित स्त्रियांना वादीप्रतिवादी या नात्यानें स्वतंत्र अधिकारानें न्यायकोर्टांत काम चालवितां येतें. तसेंच पूर्वी विवाहाला कराराचें स्वरूप नव्हतें तें पाश्चात्य देशांत आतां सरसकट प्राप्त झालें आहे; म्हणजे हा करार करून शिवाय जर वधुवरांना विवाहाचा धार्मिक विधि करावासा वाटलाच तर त्यांनीं तो खुशाल करावा. अर्थात् येथें धर्माधिकाऱ्याच्या हातीं जी सत्ता पूर्वी होती ती आतां राहिली नाहीं. वधूवरांनीं करार केला तर तो नोंद-

वीत नाहीं असें सरकारी अधिकाऱ्याला म्हणतां येत नाहीं. तसेंच मुलांचें रक्षण व पालनपोषण करण्यासंबंधीं पूर्वी आईबापांवर कायदेशीर बंधनें नव्हतीं तीं हल्लीं कायद्यानें घातलीं आहेत. वधूवरांच्या बाबतींत समानतेच्या तत्त्वाची प्रगति दिसून येते, तर मुलांच्या बाबतींत कायद्याचा बहाणा असा दिसून येतो कीं, कोणतीहि मुलें हीं आईबापांचीं मुलें असलीं तरी तीं एका अर्थी राष्ट्राचीहि मुलें आहेत. म्हणून त्यांची घ्यावी तशी काळजी जनक आईबापांनीं न घेतली तर आईबापांच्या ठिकाणी दुसऱ्या दृष्टीनें असणारें राष्ट्र हें ती घेऊं शकेल, व त्याकरितां जरूर तर आईबापांवरहि बंधन घालील. सक्तीचें शिक्षण हें आईबापांवर घातलेलें नवीन बंधन होय, व हें घालतांना आईबापांची सत्ता कमी होऊन त्या जागीं लोकशाहीची सत्ता प्रस्थापित झाली. म्हणजे याचा अर्थ फिरून असा झाला कीं, राष्ट्रांतील प्रजाव्यक्तीवर बंधनें घालावीं, त्यांची स्वतंत्रता जरूर तर कमी करावी, पण ती पूर्वीप्रमाणें राजानें करावयाचीं नाहीं तर लोकशाहीनें करावयाची. किंवा तीच गोष्ट मुलांच्या हक्कांना प्राधान्य देऊनहि संपादितां येण्यासारखी आहे. कारण "आम्ही अल्पवयी असतां आमची काळजी आईबापांनीं घ्यावी किंवा राष्ट्रानें ती घेण्याला त्यांना भाग पाडावें हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे" असें मुलांनीं म्हटल्यास त शोभण्यासारखें आहे.

(१९८) गरीब वर्गांना स्वातंत्र्यप्राप्ति

जुन्या काळीं मक्त्यांची पद्धति असून जकाती, दर्यावर्दी वाहतुक वगैरेंचे कायदे विशिष्ट वर्गांना मदत करणारे असे होते. यामुळें कोणी मनुष्य म्हणाला कीं, आपण आपल्या बुद्धीप्रमाणें हवा तो हवा तेवढा धंदा करून पैसे मिळवूं तर त्याला अनेक बाजूंनीं अडचण होती. धंद्यांधंद्यांतहि समानता नव्हती. एका धंद्याला सरकारी मदत अधिक, दुसऱ्याला कमी असें असे. यामुळें कांहीं भांडवल किफायतशीर धंद्यांत न पडतां मोकळें राही. ती स्थिति प्रथम बदलली व ती बदलल्यानें लोकांना आर्थिक स्वातंत्र्य मिळालें असें वाटलें. खुला व्यापार सुरू झाला. परंतु फिरून लवकरच कारखानदारी अशा पद्धतीवर गेली कीं, तिच्या योगानेंहि कांहीं वर्गावर, दुसऱ्या एका प्रकारचा असला तरी, जुलूमच होत आहे असें

लोकांना वाटूं लागलें. आपलें भांडवल हवें त्यांनीं हव्या त्या धंद्यांत घालावें ही मोकळीक मिळाली. पण मोठें भांडवल घालून उभारलेल्या धंद्यांत पुष्कळ नफा व्हावा म्हणून रात्रंदिवस कारखाने चालविण्यांत येऊं लागले. कारखान्यांतील हवा व जागा रोगट असली तरी कारखानदार ती सुधारण्याला पैसा खर्च न करितां मजुरांना त्यांत राबवून घेऊं लागले. तसेंच मजुरीच्या आशेनें किती अल्पवयी मुलांमुलींना कामावर घ्यावें, किती वेळ त्यांना राबवावें, किती थोडी मजुरी त्यांना द्यावी, या गोष्टींना ताळतंत्र उरलें नाहीं. तेव्हां सदरील लोकांनीं तक्रारी केल्यामुळें या बडया कारखानदारांच्या निर्दय वर्तनाला कायद्यानेंच आळा घालावा अशी कल्पना निघाली. म्हणजे भांडवलवाल्या लोकांना एक स्वातंत्र्य मिळालें तर दुसरें गेलें. नोकरीचा करार सज्ञान मनुष्यांना हवातसा करितां यावा हें वाढत्या स्वातंत्र्याचें लक्षण असें प्रथम वाटलें. पण वर उल्लेखिलेल्या दयाबुद्धीनेंच असें सुचविलें कीं, मजूर लोकांना आपल्या हिताविरुद्ध करार करून देतांच येऊं नये. म्हणजे काम मिळण्याच्या गरजेमुळें त्यांनीं वाटेल तसले करार कारखानदाराला लिहून दिले तरी न्यायकोर्टानें किंवा सरकारानें त्यांतले कोणते मानावे व कोणतें मानूं नये याविषयीं विवेक सुरू झाला. याचा अर्थ रीतसर केलेले करार बजावण्याचें जें स्वातंत्र्य तें नाहींसें झालें! म्हणजे येथेंहि फिरून प्रश्न उत्पन्न झाला कीं, एका दारानें स्वतंत्रता येते व दुसऱ्या दारानें जाते तेव्हां ही स्वतंत्रतेची प्रगति कशी म्हणावी! पण ही खरोखर स्वतंत्रेची प्रगतिच आहे. कारण जीं बंधनें पूर्वी एकतंत्री जुलमी राजा घालीत होता, व स्वार्थाकरितां घालीत होता, तीं आतां घातलीं तरी लोकसत्ताच घालते; व त्यांचा हेतू कोणत्या एकाच वर्गाचा सांपत्तिक स्वार्थ साधून देण्याचा नसून तीं बंधनें भूतदयेमुळें घातलीं जातात. अर्थात् भूतदयेकरितां कोणावरहि घातलेलें बंधन याला बंधन म्हणतां येत नाहीं.

(१९९) राष्ट्राला स्वातंत्र्यप्राप्ति

स्वातंत्र्याचा हक्क हा जसा कुटुंबांतील व्यक्तींना व राष्ट्रांतील कोणत्याहि वर्गाला जन्मसिद्ध असतो त्याचप्रमाणें सामुदायिक रीतीनें तो प्रत्येक राष्ट्रालाहि असतो; व तो हक्क इतर म्हणजे अतिक्रमणशील राष्ट्रांविरुद्ध बजाव-

प्याचा असतो. राष्ट्रांतल्या राष्ट्रांत सत्तेचें पारडें थोडें राजाकडे झुको किंवा थोडें प्रजेकडे झुकतें असो, तो राजा व ती प्रजा हीं त्याच राष्ट्राची म्हणून तांटांत सांडलें काय वाटींत सांडलें काय एकच. पण एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर अतिक्रमण करण्याचा हक्क पोचत नाहीं, असाहि राज्यशास्त्रांतला एक सिद्धान्त आहे. या सिद्धान्ताच्या जोरावर एकोणिसाव्या शतकांत राष्ट्रीयत्वाची कल्पना विशेष उदयाला आली. आणि युरोपियन राष्ट्रांनीं नेपोलियन विरुद्ध, इटालीनें ऑस्ट्रियाविरुद्ध, ग्रीस वगैरे खिस्ती राष्ट्रांनीं तुर्की सुलतानाविरुद्ध लढाया केल्या. तसेंच चालू शतकांत महायुद्धानंतर स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर लहानसहान राष्ट्रांची पुनर्रचना झाली, किंवा आयर्लंडला स्वराज्य मिळालें, किंवा हिंदुस्थान स्वराज्याची मागणी करीत आहे, या सर्वांना आधार म्हणजे प्रत्येक राष्ट्राचा स्वतंत्र राहाण्याचा जन्मसिद्ध हक्क. अमेरिकेनें इंग्लंडविरुद्ध बंड केलें, किंवा कॅनडा ऑस्ट्रेलिया वगैरे ब्रिटिश लोकांच्याच वसाहती स्वातंत्र्याचा हक्क इंग्लंडविरुद्ध पुरेपूर पदरांत पाडून घेण्याच्या खटपटींत आहेत, या ठिकाणीं वरील उदाहरणांतल्याप्रमाणें स्वकीयविरुद्ध परकीय अशा स्वरूपाचे भांडण नसून, एकाच राष्ट्रांत निरनिराळे वर्ग समानतेच्या तत्त्वावर इतरांच्या बरोबरीचे हक्क मागतात त्याप्रकारचें हें भांडण आहे. मध्यें महासागर असले तरी इंग्लंड व या वसाहती यांना परस्परांना आपण एकाच झाडाच्या खांद्या किंवा एकाच शरीराचे अवयव आहों असें वाटतें. हिंदुस्थान वगैरेंचें तसें नाहीं. आयर्लंडांत रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट हा भेद तीक्ष्ण आहे. हिंदुस्थानांत तर धर्मांचें व जातींचें भांडण प्रसिद्ध आहे म्हणून आयर्लंडला व हिंदुस्थानाला तुम्ही मुळांत राष्ट्रच नाहीं, अठरा धान्यांचें कडबोळें आहां, असें म्हणून इंग्लंडनें धुडकावून लावण्याचा प्रयत्न केला. पण दक्षिण आयर्लंडांतील म्हणजे मूळच्या आयरिश राष्ट्रांतील लोकांनीं धर्मभेद विसरून जाऊन एकमुखानें स्वराज्याची मागणी केली तेव्हां इंग्लंडला ती नाकारतां आली नाहीं. आयर्लंडचें राष्ट्रीयत्व मान्यच करावें लागलें. हिंदुस्थानासंबंधानें इंग्लंड आज तोच डाव खेळत आहे. पण समजा, उद्यां हा डाव फसून हिंदु, मुसलमान, शीख, अस्पृश्य, पारशी, खिश्चन हे सर्व लोक एकमुखानें स्वराज्याची मागणी करतील, तर इंग्लंडला हिंदुस्थानचें एकराष्ट्रीयत्व मान्य

केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कॅनडाच्या राज्यांतील फ्रेंच व इंग्रज हे वंशानें वेगवेगळे असतांहि त्यांनीं एकराष्ट्रीयत्व सिद्ध केलें. इटली, जर्मनी, यांच्या-संबंधानेंहि परकी राजांनीं प्रथम त्यांच्या अराष्ट्रीयत्वाचीच सबब पुढें आणली होती, परंतु ती पुढें टिकली नाहीं.

(२००) स्वातंत्र्यवादाचा निष्कर्ष

वरील सर्व विवेचनावरून हें दिसून येईल कीं राज्यसंस्थेच्या हल्लींच्या परिणत स्वरूपांत अनियमबद्ध राजसत्ता बहुतेक नष्ट होऊन समाज व व्यक्ति यांना पूर्वीपेक्षां पुष्कळ अधिक स्वातंत्र्य लाभलें आहे. मात्र स्वातंत्र्य या शब्दाचा अर्थ एकच व निश्चित नाहीं. तो परिस्थितीप्रमाणें बदलत असतो. व्यक्तिदृष्ट्या मनुष्याला मूलभूत व निसर्गसिद्ध हक्कांचेहि स्वातंत्र्य पूर्वीच्या अनियंत्रित राजसत्तेच्या काळांत नव्हतें तें आतां त्याला अबाधित रीतीनें प्राप्त झालें आहे. पण याहून अन्यप्रतीचें त्याचें स्वातंत्र्य समाज व त्यांतील राज्यसंस्था यांच्या हक्कांनीं व कर्तव्यक्षेत्रांनीं कमी अधिक मर्यादित होत असतें. समाजहित हें व्यक्तिहितापेक्षां अधिक श्रेष्ठ मानण्याकडे जगाची आज प्रवृत्ति आहे. तथापि उलटपक्षीं ज्या कायद्यांच्या योगानें समाजहिताकरितां व्यक्तिस्वातंत्र्याला मर्यादा पडते, ते कायदे करणें न करणें याविषयीं मत देण्याचा अधिकार बहुधा प्रत्येक राष्ट्रांतील जनतेला मिळाला आहे. यामुळें ही मर्यादा मनुष्य मात्र हां एका अर्थानें आपली आपण च घालून घेतो असें म्हणतां येते. आणि असें झालें म्हणजे मग मनुष्याला आपल्या स्वातंत्र्याला मर्यादा पडल्याची तक्रार करितां येत नाहीं. एक गोष्ट निश्चित दिसते ती ही कीं, यापुढें जें काय बरेंवाईट होईल तें समाज आपल्या हातानें व आपल्या हिताकरितांच करील. पण आपल्याच हातानें हवें तें करून घेण्याची कल्पना निश्चित राहिली तरी हितसाधनाच्या कल्पना वरचेवर बदलणार. यामुळें समाजांतील निरनिराळे वर्ग व उपवर्ग यांच्यापैकीं केव्हां एकाला तर केव्हां दुसऱ्याला अधिक स्वातंत्र्य मिळालें किंवा अधिक बंधन पडलें असा देखावा दिसल्याशिवाय व त्यामुळें थोडासा असंतोष उत्पन्न झाल्याशिवाय कंव्हांहि व कोठेहि राहाणार नाहीं.

श्रीराम वाचनालय, लिंब.

भाग (८)

स्वराज्य व सुराज्य

(२०१) स्वराज्य म्हणजे ' स्वयं-पाक '

या ग्रंथाच्या प्रारंभीं राज्यशास्त्र व राज्यकला यांचें विवेचन आलेंच आहे. तेथें हेंच दर्शविलें आहे कीं, राज्यशास्त्राचें अध्ययन केलें म्हणजे त्यामुळें कोणालाहि राज्यकारभाराचें कोणतेंहि एकादें कार्य हटकून निर्दोष रीतीनें करितां येईल असें कोणी समजूं नये. आणि जी गोष्ट एकाद्या मनुष्य-व्यक्तीची तीच मनुष्यसमाजाचीहि समजावी. एकाद्या गालिचाकरितां नक्षीचा नमुना काढावयाचा असल्यास,व तो काढण्याचें काम कोणा एकाच्याच हातीं दिल्यास, तो केवळ आपल्या एकट्याच्याच मताप्रमाणें व एकच हेतू मनांत धरून तें चित्र काढील. पण शंभर स्वतंत्र माणसांचे हातीं तो नमुना तयार करण्याचें काम दिलें तर त्यांत किती गोंधळ माजेल याची कल्पना सहज करितां येते. आधुनिक काळचा राज्यकारभार हा अशाच प्रकारें शंभर माणसांच्या हातीं करण्यास दिलेला नक्षीच्या नमुन्याचा खेळ असतो. तेथें सर्व-साधारणपणें समाजाचें हित व सुख हा हेतू असा दिसला (व तो तसा असतोहि) तरी त्या शंभर माणसांच्या दोनशें हातांनीं कशा प्रकारचा कारभार निष्पन्न होईल हें हटकून कोण सांगूं शकेल ! शेवटीं बनेल तोच नमुना खरा. म्हणून राज्यकारभारांतलें नमुने वाईट चांगले असें म्हणत बसण्यांत फारसा अर्थ नाहीं. राज्यकारभारातले सुख म्हणजे सुराज्याचें सुख हें स्वतंत्र अधिकाराच्या व स्वतंत्र बुद्धीच्या लोकसमाजानें आपल्या इच्छेला येईल त्याप्रमाणें घडवून व मानून घ्यावयाचें असतें. म्हणून त्यांतून जें कांहीं बरें वाईट निघेल तें त्याचें त्याला. जो स्वयंपाक करणारा तोच खाणारा असला म्हणजे पदार्थांना चांगले वाईट म्हणण्याचा हक्क इतरांना काय आहे ! पण त्याबरोबर हेंहि म्हटलें पाहिजे कीं, स्वतः स्वयंपाक करणारानें मात्र तो खाताना वाईट तोंड करतां कामा नये. कारण दुसऱ्यानें स्वयंपाक केला तर नांवें ठेवतां येतात.

पण स्वतःच्या स्वयंपाकाकरितां तो दुसऱ्याला नांवें कशीं ठेवणार व तीं कोण ठेवूं देईल ! भाकरी कच्ची राहिली किंवा करपली तर ती ज्याची त्यालाच खावी लागणार हें ठरलेलेंच आहे. पण अशा प्रकारच्या सिद्धान्ताला कोलदांडा न म्हणतां सरळ सत्य सिद्धान्त असेंच म्हटलें पाहिजे. चांगला स्वयंपाक खावयाला मिळाला पाहिजे, मग तो कोणाच्याहि हातून मिळो, ही एक मनोभूमिका. आणि दुसरी मनोभूमिका अशी कीं, शब्दशः स्वयंपाकच हवा, म्हणजे माझा मीच करून खाईन, मग तो कसा का होईना ! या दोन भूमिकांपैकीं मनुष्यानें कोणती तरी एक पसंत केली पाहिजे. मग तिनें अखेर जें काय साधेल तें साधेल व न साधेल तें न साधेल. साधलें तेंच चांगलें ठरलें तर तो पुरुषार्थाचा पराक्रम मानावा. पण बिघडलें तर तक्रार करीत बसणें हें नादानपणाचें ठरेल. आणि तें कोणीहि ऐकणार नाहीं. मुख्य दृष्टी चांगले पदार्थ खाण्याला मिळण्यावरच ठेवली असतां, एकादे वेळेला दुसऱ्याच्या हातचा स्वयंपाक खाल्ल्यानें स्वतःचे श्रम वांचतील व पदार्थहि चांगला मिळेल असा दुहेरी संभव असतो. पण तसें न होतां स्वयंपाक बिघडला तर, वाईट पदार्थ खावयाला लागावयाचा तो लागून शिवाय परावलंबित्वाची दुष्कीर्ति ! आणि बिघाडांत सांगू तशी दुरुस्ती होण्याची खात्री नाहीं !

(२०२) जबाबदारीचें स्वराज्य

वास्तविक मनुष्याला सुराज्य हवें व स्वराज्यहि हवें. आणि वर सांगितलेल्या दुतर्फी अडचणी लक्षांत घेतल्या म्हणजे तो स्वराज्यच पसंत करील असें वाटतें. अर्थात् स्वतः निवड करणाराची ही गोष्ट झाली. आणि ज्याची त्यानें आपण होऊन निवड केली म्हणजे दुसऱ्याला त्यांत बोलण्याला अवकाशच उरत नाहीं. जबाबदारीचें स्वराज्य ही एकच गुरुकिल्ली अशी आहे कीं तिनें राज्यशास्त्रांतले सर्व प्रश्न सुटतात. पण मनुष्य परतंत्र झाला म्हणजे ज्या भानगडी व जीं दुःखें उत्पन्न होतात त्यांना राज्यशास्त्राच्या दृष्टीनें प्रश्नच म्हणतां येत नाहींत. राज्यकारभाराची स्वाधीनता प्राप्त झाल्यावर जे उत्पन्न होतील तेच खरे प्रश्न. आणि त्या प्रश्नांचें उत्तर एकच. लोकांनीं आपल्या स्वतंत्र इच्छेनें राज्यकारभाराचा जो नमुना पसंत केला

व ज्यांत त्यांनीं समाधान मानलें आणि जबाबदारीचे सर्व परिणाम आनंदानें स्वीकारले, तो नमुना; ती राज्यघटना उत्तम. मात्र त्या लोकाकरतां ती उत्तम हें खरें. कारण उत्तम हा शब्दच असा आहे कीं तो निरपेक्ष रीतीनें लावतांच येत नाहीं. त्याचा उपयोग नेहमीं सापेक्ष रीतीनेंच केला पाहिजे. अमुक राज्यघटना किंवा राज्यकारभाराचा अमुक नमुना हा सर्वोत्कृष्ट आहे हा वाद घालीत बसणें हा मूर्खपणा होय. कारण जें आनंदानें स्वीकारले तेंच चांगलें. चांगलें म्हणजे ज्याचें त्याला चांगलें. सगळ्या जगाला चांगलें असें नाहीं. जगांतले सुख दुःख, चांगलेपणा वाईटपणा हें ठरविण्याचा जर एकच छाप ईश्वरानें अमलांत ठेवला असता तर नीतिशास्त्र किंवा आचारविषयक तत्वज्ञान हें जन्मालाच आलें नसतें. ठराविक शिक्याचें माप सरकारी बाजारांत असेल, पण ईश्वरनिर्मित संस्कृतीच्या बाजारांत नाहीं. तेथें बिनशिक्याच्या मापाच्या राशीच्या राशी पडलेल्या असतात. आणि सवद्याचा माल व त्याचा दरदाम यांत जशी दुकानदार व गिऱ्हाईक यांची एकवाक्यता व्हावयाची, तशीच ती वजनामापासंबंधानेंहि होण्याची असते. आपल्या शक्तीनें मिळवूं तें स्वराज्य व आपल्या हातानें पदरांत पाडून घेऊं तें सुराज्य. अशा चालचलाऊ व्यावहारिक व्याख्या केल्याशिवाय राजकीय व्यवहारच काय पण राजकीय तत्त्वज्ञानहि निभावणार नाहीं. एरवी निरपेक्ष व निश्चित अशी म्हणून कोणतीहि बाब सांगितली तरी तिच्यावर हटकून आक्षेप व अपवाद घेऊन दाखवितां येतात. मागें एके ठिकाणी आम्ही राज्यघटनेच्या नमुन्याची सात–आठ नांवें दिलीं आहेत. पण इतिहासानें अशी मौज केली आहे कीं हे सर्व नमुने उत्कृष्ट म्हणून एकेकाकाळीं लोकसमाजानें स्वीकारले, व दुसऱ्या काळीं म्हणजे कालांतरानें तेच नमुने लोकनिंदित व त्याज्य ठरले !

(२०३) क्रिया व प्रतिक्रिया हेंच जीवन

जुन्या चित्रपद्धतीप्रमाणें देवता व सत्पुरुष यांच्या मुखाभोंवती एक प्रकारचें तेजोवलय दाखविण्याची रीत असे. तें अर्थात् शुभ्र रंगाचें वलय असे. पण राज्यघटनांचे जे सात आठ प्रकार वर सांगितले त्यांपैकीं प्रत्ये-

काच्या ऐतिहासिक आकृतिचित्रांत त्याच्या मुखाभोंवतीं एकेक रंगवलय दिसून येतें. मात्र ते शुभ्र रंगाचे नसून काळ्या रंगाचे असतें ! क्रियेबरोबरच तिची प्रतिक्रिया जन्मते असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आणि या क्रिया प्रतिक्रियांचें आंदोलन म्हणजेच जगाचें जीवन होय. मग त्या जीवनाचें कोणतेंहि अंग घ्या. हरबर्ट स्पेन्सर यानें 'Life is Rhythm' अशी जीवनाची व्याख्या केली आहे. आणि कोठेंहि चित्शक्ती प्रगट होते ती दुहेरी तालबद्ध ठोक्यांनींच प्रगट होते असा अनुभव पाहिला म्हणजे स्पेन्सरची ही व्याख्या पुष्कळअंशी समर्पक आहे असें वाटतें. शरीरांतील काळजाचे ठोके, नाडीचे ठोके, व रुधिराभिसरणाचें स्पंदन या गोष्टी आहेत तोंपर्यंतच जीवन आहे. तसेंच कोणतेहि यंत्र घेतलें तरी एक क्रिया सुलट व दुसरी क्रिया उलट अशा पद्धतीनेंच त्यांतील भागांची रचना केलेली आढळते. मग राज्यशास्त्रांत राज्यसंस्थेच्या जीवनाचीहि तीच व्याख्या कां मानूं नये ? एरवी, कोणचीहि एक राज्यपद्धति चांगली म्हणून एकदां लोकांना पटली म्हणजे मग तीच सतत अखंड चालूं कां न राहावी ? आणि तीच तशी चालूं राहात नाहीं याला परतंत्र परिस्थिती ही जशी कारणीभूत होते, तशी स्वतंत्र अशा समजल्या जाणाऱ्या स्थितीतहि तशीच कारणें उत्पन्न होतात. आपण गादीवर निजलो असतां दुसऱ्या कोणाला ती हवी झाली म्हणून त्यानें आपल्याला उचलून फेकून दिले तर तें पराधीन कारण म्हणता येईल. पण आपण आपल्याच हातानें तयार केलेल्या बिछान्यावर उजव्या कुशीला निजलो असतां कांहीं वेळानें आपण होऊनच डाव्या कुशीला वळतो, या परिवर्तनाला स्वाधीन समजल्या जाणाऱ्या स्थितीतलेंच कांहीं कारण असत नाहीं काय ? आणि तें कारण अगदीं सोप्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे आपण फार वेळ एकाच कुशीवर निजलो तर अंग भारावते हें होय. मग कोणी जर असें म्हणूं लागेल कीं, न दुखेखुपेसा आपणच तयार केलेला बिछाना, ज्या कुशीवर निजलो ती कूस आपलीच, आणि भारावते तें अंगहि आपलेंच. असें असतां इच्छाशक्तीला हें भारावणें काढून कां टाकतां येऊं नये ? तसें झालें तर एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळण्याचे श्रम वाचणार नाहींत काय ? व झालेल्या या परिवर्तनांत गर्भित असलेली वस्तुनिंदा वाचणार नाहीं काय ?

पण याचें उत्तर स्पेन्सरनें दिलेल्या जीवनाच्या व्याख्येला अनुसरूनच दिलें म्हणजे झालें.

(२०४) इतिहास तीच साक्ष देतो

राजसत्ता, लोकसत्ता, व या दोहोंचे मिळून निरनिराळ्या प्रमाणांत बनलेले मिश्र प्रकार, यांचें अखंड परिवर्तनच इतिहासांत दिसून येतें, आणि राज्यशास्त्र हें कल्पनेपेक्षां इतिहासाच्या दुर्बिणींतून किंवा चष्म्यातूनच पाहिलें पाहिजे असें जें मत या ग्रंथाच्या प्रास्ताविक भागांत आम्ही दर्शविलें आहे तें याचकरितां. जे एकतंत्री राज्यसत्तेचे भोक्ते म्हणून दिसावे त्यांचीं खरी मतें पाहिलीं तर तीं लोकसत्तेकडे झुकणारीं. आणि जे तोंडानें लोकशाहीचा पुकारा करणारे दिसतात ते प्रत्यक्ष कृतींत सर्वसत्ता आपल्या हातीं ठेवण्याची पराकाष्ठा करतात ! नेपोलियन बोनापार्ट हा जुलमी एकतंत्री बादशहा वाटतो. परंतु त्याच्याच राज्यांत फ्रान्समध्यें अशा कांहीं पांच चार संस्था निर्माण झाल्या म्हणजे त्यानें होऊन निर्माण केल्या कीं, लोकसत्तेची बीजें त्यांत रुजलीं तींच पुढें फळाला आलीं. उलट फ्रेंच राज्यक्रांतीचा एक विधाता अशी पदवी ज्याला देण्यांत येते तो व्हॉलटेअरच लोकसत्ताक राज्यासंबंधानें काय म्हणतो तें ऐका. तो म्हणतोः—" राज्यसत्ताप्रकारांची चिकित्सा फोल ठरते. सत्ता लोकांच्या हातीं असावी हें तत्त्वदृष्ट्या ठीक आहे. पण लोकसत्तेमुळेंच राजकीय पक्ष संभवतात, व त्यांच्यायोगानें प्रत्यक्ष यादवीच न जुंपली तरी राष्ट्रीय एकतानता बिघडते. गरीब व लहानशा क्षेत्रमर्यादेंतील लोकांना लोकसत्ताक घटना चांगली. पण सामान्यतः बोलावयाचें तर मनुष्य आपलें राज्य आपण करण्याला बहुधा अपात्रच असतो ! राजशाही बरी कीं लोकशाही बरी असें मला विचाराल तर मी म्हणेन कीं, आज चार हजार वर्षें या प्रश्नावर वाद सुरू आहे. श्रीमंतांना विचारा कीं ते म्हणतील राज्य हें शिष्टतंत्र असावें; कारण श्रीमंत थोडे असतात व तेच शिष्ट होऊन बसतात. बरें, सामान्य लोकांना विचारा. ते म्हणतील समाजांतील प्रत्येकाचे हातीं राज्यसत्ता सारखी वाटून गेली पाहिजे. आणि राजांना विचारा म्हणजे त्यांचें उत्तर ठरलेलें कीं एकतंत्र राज्यपद्धति हीच सर्वोत्कृष्ट. आणि तें खरें असावें असें जवळजवळ दिसतेंहि.

कारण एरवी सगळ्या जगभर राज्यें राजसत्ताकच कशीं ? उंदरांना मांजराच्या गळ्यांत घांट बांधावीशी वाटते खरी. पण त्यांना ती बांधतां येईल तर ! गरीब मनुष्याला विचारून पाहावें म्हणजे तोच खरें उत्तर देतो. तो म्हणतो, "मी पडलो गरीब निर्बळ. मला कोणी प्रबळानें खाऊन टाकूं नये इतकीच माझी इच्छा. सिंहानें माझा एकच घास केला काय किंवा शंभर उंदरांनीं मला कुरतडून खाल्लें काय ! मी मेलों हेंच खरें कीं नाहीं ! तात्पर्य, मला कोणीहि जगवो. मग तो राजा असो, नाहींतर माझेच लोक असोत."

(२०५) चांगलें व वाईट ? कीं स्थिर व चंचल ?

जगांत आज लोकसत्तेशिवाय दुसरा शब्द ऐकूं येत नाहीं. पण हा राजसत्तेविरुद्ध प्रतिक्रियेचा काल आहे येवढें लक्षांत ठेवले म्हणजे पुरे. समाजाचें जें भांडें आज हजारों वर्षें राजसत्तेच्या तापानें तापलें तें हल्लीं निवत चाललें आहे. अशा वेळीं लोकसत्तेच्या स्तुतीचे शीतल वारे सहजच उपयोगी पडतात. पण ज्याला आपण प्रजासत्ताक राज्यघटनेचा उत्तम नमुना आज मानतों तोच भविष्यकाळीं उत्तम ठरेल असा नियम नाहीं. म्हणून राज्यशास्त्राच्या दृष्टीनें वस्तूंचे विभाग चांगले व वाईट असे न पाडतां, स्थिर व चल असे भाग पाडले पाहिजेत. पैकीं स्वतःकरितां व स्वकीयांकरितां सुख व स्वातंत्र्य यांची मनुष्याची इच्छा ही स्थिर व अचल गोष्ट समजावी. हें त्याचें ध्येय हजारों वर्षांच्या इतिहासांत टिकलेलें दिसून आलें आहे, व हें आपलें ध्येय पुढेंहि केव्हां तो बदलील अशी कल्पना करवत नाहीं. मग काळाच्या उदरांत काय असेल तें खरें ! पण हें ध्येय सफल होण्याचीं साधनें मात्र नुसतीं चलच नव्हेत तर चंचलहि आहेत. म्हणून भविष्यकाळीं तीं कोणतीं अनुभवास येतील हें काय सांगावें ! एका बाजूनें समाज विस्कळित होत आहे तर दुसऱ्या बाजूनें तो संघटित होत आहे तेव्हां त्याचें स्थिर लक्षण कोणतें म्हणावें ! साहाराच्या मैदानांत वाळूचे ढींग एका ठिकाणाहून उचलून ते दुसऱ्या ठिकाणीं व दुसऱ्या आकाराचे घालण्याचें काम वारा नित्य करीत असतो. तसेंच सिंधु व गंगा या नद्या आज या तीराला तर उद्यां त्या तीराला वाहातांना दिसतात. राज्यसत्ताभिलाषी, स्वातंत्र्याभिलाषी, क

सुखाभिलाषी मनुष्य व्यक्ती व समाज यांची इच्छा व प्रयत्न असेच खेळ आजवर खेळत आले आहेत व पुढेंहि खेळत राहातील.

(२०६) सत्ताबदल ही सुखाची जामिनकी नव्हे

रामराज्याचें सुवर्ण युगाचें चित्र अर्थातच पुष्कळसें कल्पनाशक्तीनें व दैदीप्य भावनेच्या रंगानें काढलेलें. तें सर्वस्वीं सर्व ठिकाणीं अनुभवाला येणें शक्य नसतें, व आज तर नाहींच नाहीं, हें कोणीहि कबूल करील. जुन्या काळीं झालें तरी तें चित्र सर्व ठिकाणीं सारखेंच लागू पडणारें होतें असेंहि नाहीं. कारण ज्या पहिल्या राजाला राजा बनवून ब्रह्मदेवानें अराजकता मोडली, व बृहस्पतिनीति शुक्रनीति अशासारखे उत्कृष्ट राजनीतीचे ग्रंथ त्याच्या हातीं देऊन सुराज्य प्रवृत्त केलें, त्याचाच नातु वेन राजा हा जुलमी ठरून प्रजेनें त्याचा वध केला. तेव्हां आतां जुन्या काळचा म्हणून तरी विश्वास काय धरावा ! किंवा त्याचे गोडवे गावे ! सूर्यवंशांतील राजे झाले म्हणून ते एकसारखे एक सर्वच तेजस्वी असे झाले नाहींत. किंवा आपल्या राज्यांतील कोना कोपऱ्यांत सूर्यकिरणाप्रमाणें शिरून, अनीति अन्याय दुःखें हीं पाहून त्यांनीं त्यांचें निवारण केलेलें नाहीं. किंवा चंद्रवंशांतील राजे झाले म्हणून, त्यांचाहि कारभार एकजात प्रजेला शीतल झाला असें तरी कोठें आहे ! वेन राजा रामचंद्रापूर्वी होऊन गेला ! कालिदासानें रघुवंशाच्या शेवटल्या सर्गांत वर्णन केलेला रघुवंशांतील अग्निवर्ण राजा हा रामचंद्रापासून कितीशा पिढ्यांनीं दूर होता ! किंबहुना खोखोच्या खेळांतील गड्याप्रमाणें चांगले व वाईट राजे एका शेजारी एक पण एकमेकाच्या उलट दिशेकडे तोंड करून बसलेले सगळ्या इतिहासांत आढळतात. त्यांत कोणा राष्ट्राला वंदावयाला नको व कोणाला निंदावयाला नको ! कारण मनुष्यस्वभावच तसा आहे. जें कुटुंबांत घडतें तेंच राज्यसंस्थेंत घडतें. पण आतां दिवसेंदिवस राजा नाहीसा होत चालला आहे. रोज उठून ऐकावें तों एखाद्या नव्या प्रजासत्ताक राज्याची वार्ता कानीं पडते. चीन, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, रशिया, टर्की, ग्रीस, पोर्चुगल, स्पेन या देशांतल्या राज्यक्रान्त्या अगदीं तुमच्या आमच्या डोळ्यादेखतच झाल्या नाहींत काय ! तेव्हां आतां आपण असेंच घेऊन चाललें पाहिजे कीं, राजसत्तेचें युग संपलें व

प्रजासत्तेचें युग आलें. पण तेथेंहि पुनः हाच प्रश्न उद्भवल्याशिवाय राहात नाहीं. तो असा कीं, एकतंत्री राजा जाऊन त्याच्या ठिकाणीं रिपब्लिक व त्याचा लोकानियुक्त अध्यक्ष हे आले तरी सुराज्य पूर्णपणें पदरांत पडलें काय ? जेथें प्रजासत्ताक राज्य जुनें होतें किंवा नवीन झालें, तेथें तरी प्रजा सर्वस्वीं आपल्या अधिकारी मंडळावर खूष असून तिला सुराज्याबद्दल सर्टिफिकेट देत आहे काय ? जबाबदारीचें तत्त्व अंमलांत आलें तरी ती जबाबदारी कितपत खरोखर अंमलांत येते ? जुन्याकाळीं राजे लोकांचे हस्तक होऊन प्रधानानें जुल्मू केला तर त्याचा इन्साफ करण्याचा हक्क बजावून, प्रजा प्रधानाचा शिरच्छेद करीत असे त्याप्रमाणें, आज एकातरी प्रधानमंडळाला, निदान त्यांतल्यात्यांत एखाद्याला तरी इनसाफ करून फांशी दिल्याचें किंवा तुरुंगांत टाकल्याचें उदाहरण आहे काय ?

(२०७) जबाबदारीचें राज्य म्हटलें तरी तेंच

हल्लींच्या जबाबदारीचा अर्थ फार सौम्य व सोज्वल झालेला नाहीं काय ? सुरपाटाच्या खेळांत गडी मारला तर त्याच्या पाठींत रपाटा तरी बसतो. पदच्युत होणाऱ्या मुख्य प्रधानाला आज इतकेंहि दुःख किंवा लाज वाटत नाहीं ! " इन अँड आऊट " म्हणजे " पदारूढ व्हावें, पदच्युत व्हावें " हा नव्यायुगातल्या राजकारणात एक खेळच होऊन बसल्यासारखा झाला आहे. कारण पदच्युत झालेले प्रधान लगेच समोरच्या म्हणजे विरोधकांच्या बाकांवर खुशाल जाऊन बसतात. आणि त्यांना मनांत असें घेऊन चालतां येतें कीं, प्रधानमंडळाची क्रान्ति हा नुसता लंबकाचा खेळ आहे. हलता लंबक एका टोंकाला गेला कीं, कांहीं काळानें तो दुसऱ्या टोंकाला जाणारच. प्रधानमंडळांत बसलें म्हणजे ओठ आवळून, खिशांत हात घालून, गंभीर चेहरा करून, जबाबदारीच्या ओझ्यानें मान वांकून आतां मोडते असें भासवित लचकत लचकत भाषणें करावी ! आणि विरोधकांच्या बाकांवर जाऊन बसलें म्हणजे तोंडाचा पट्टा मोकळा सोडावा, बाष्कळपणाचा हास्यविनोद करावा, तोंडाला येतील त्या कोटथा प्रतिकोटथा कराव्या, आणि प्रधानमंडळ एखादें वेळीं जुनेंच धोरण अमलांत आणित असतांहि "देश बुडाला, लोक बुडाले" अशी हाकाटी करावी, व्यक्तिशः कांहीं प्रसाद

खिशांत पडला तर तो घ्यावा, व एक ट्रेन चुकली तर तिच्या मागोमाग हटकून येणाऱ्या दुसऱ्या लोकल ट्रेनमध्यें उडी मारून बसण्याकरितां प्रवासी हातांत बॅग घेऊन प्लॅटफॉर्मवर उभा राहतो त्याप्रमाणें, प्रधानमंडळांत शिरण्याकरितां फिरून येणाऱ्या सुवर्णसंधीची वाट पहावी !

(२०८) ईश्वराकडे मागण्याचा खरा वर

सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, पूर्वी एकतंत्री राजे झाले म्हणून त्यांच्यापैकीं कोणालाहि आपल्या देशाची, आपल्या लोकांची भक्ति नव्हती असें नाहीं. किंवा जुन्या काळच्या एकतंत्री राजाचा प्रधान होणारा प्रत्येक मनुष्य आपमतलबी व देशबुडव्या होता, त्याला राष्ट्राभिमान मुळींच नव्हता, असें खरोखर म्हणतां येत नाहीं. आणि आज जरी राज्यसंस्थेचें नांव बदलून तिच्या डोक्यावर डेमॉक्रसीचें 'लोकसत्ते'चें लेबल लागलें असलें तरी, जुने दुर्गुण जाऊन अध्यक्ष व प्रधानमंडळ यांच्या अंगीं कांहीं अलौकिक दिव्य गुण स्वर्गातून उतरले आहेत असेंहि म्हणण्याचें कारण नाहीं. फरक झाला असेल तर तो इतकाच कीं पूर्वी आपल्या हातांत सत्ता नव्हती, आपल्याला राज्यकारभारांत कांहीं बोलण्याची संधि नव्हती, अशी तक्रार लोकांना यथार्थपणें करितां येत असे ती हल्लीं जाऊन "ईश्वरा चूक होणारच तर ती माझी मलाच करण्याची संधि दे" असा वर मागून घेतल्याप्रमाणें, दुसऱ्याच्या ऐवजीं लोक आपल्या चुका आपणच करूं लागले आहेत. तसें नसतें तर राज्यक्रान्ति झाल्याबरोबर, म्हणजे राजा जाऊन त्याच्या जागीं रिपब्लिकचा अध्यक्ष आल्याबरोबर, राज्यव्यवस्थेचें रूप एकदम बदलावयाला पाहिजे होतें ! पण तसें घडल्याचें कोठेंहि दिसत नाहीं. म्हणून नव्या लोकशाहीचें म्हणणें जें पटण्यासारखें आहे तें इतकेंच कीं, "होय ! चूकच कां होईना ! पण ती करण्याचें श्रेय आमचें आम्हांला मिळूं दे. चुकाच व्हावयाच्या व कुराज्य गांजणारच, तर तें आमचें आमच्या हातानें तरी घडूं दे ! तोहि एक हक्कच आहे ! आणि तो हक्क, आत्मस्वातंत्र्याचा अनुभव व जन्मसिद्ध हक्काची फलश्रुति या नात्यानें आम्ही बजावूं इच्छितों. आमच्या अंगांत कर्तृत्व असेल किंवा आमच्या नशिबीं असेल तितकें सुराज्य आमच्या पदरांत पडेल. पण उगाच जन्मभर असंतुष्ट राहून लोकांनाच नांवें

ठेवीत बसावयाचें, त्यापेक्षां आपली आपल्यालाच नांवें ठेवून घ्यावीं लागलीं तर त्यापासून मनाला कांहीं बोध तरी मिळेल. आणि उठल्या सुटल्या परनिंदा करणाऱ्या बेजबाबदार जिभेला थोडा तरी आळा पडेल."

(२०९) जबाबदारीचा खरा अर्थ

अशा प्रकारचा प्रांजल व मर्दपणाचा युक्तिवाद जे लोकशाहीचे प्रतिनिधी व वकील करितात त्यांना मानच दिलाच पाहिजे. आणि त्यांच्या म्हणण्याविरुद्ध कांहीं आक्षेप घेतां येण्यासारखा नाहीं. आपल्या कृत्याची जबाबदारी आपण घेणें म्हणजे चांगल्यावरोबर वाईट फळाचा स्वीकार करण्याची तयारी ठेवणें हीच खरी जबाबदारी. राजबंधनें पूर्वीच्या राजांच्या जुलमापेक्षां वेगळ्या रीतीनें व्यक्तीवर अधिकाधिक जखडून बांधलीं जाऊं लागलीं, अशा स्थितींत व्यक्तिस्वातंत्र्याचा जो विकास हल्लींच्या युगांत होत आहे, त्याला वरील प्रकारचा प्रांजल व मर्दपणाचा युक्तिवाद शोभण्यासारखा आहे. बरें, हल्लींच्या लोकसत्तेच्या काळांत विभूतिपूजा सर्वस्वीं लोपली आहे असेंहि नाहीं. जुन्या काळीं जसे विभूतिपूजेच्या बुद्धीनें लोक राजाकडे पाहून त्याचा हुकूम मानणें यालाच, राजभक्ति किंवा राजनिष्ठा हा भावनेला गोंजारणारा शब्द लावून, मिळेल त्या सुखांत कालक्रमण करीत असत, त्याप्रमाणें आजच्या लोकसत्तेच्या काळांतहि 'डिक्टेटर' उत्पन्न होतच आहेत व लोक त्यांना भजतच आहेत. ग्रीसचा व्हेनिझेलॉस, इटलीचा मुसोलिनी, जर्मनीचा हिटलर, स्पेनचा प्रायमो डी रीव्हेरा, इंग्लंडचा ऑलिव्हर क्रॉम्वेल, फार काय पण आजहि हिंदुस्थानचे महात्मा गांधी, हे डिक्टेटर म्हणजे एका अर्थी राजापेक्षाहि मान्य होऊन राहिलेले पुढारी हे विभूतिपूजेशिवाय डिक्टेटर झाले काय ? तेव्हां मनुष्याच्या स्वभावांतील आत्मस्वातंत्र्याची बुद्धी जितकी खरी तितकी त्याची विभूतिपूजेची भावनाहि अजून खरी आहे. या दोहोंचा खेळ अगदीं सरमिसळ चाललेला असून, मनुष्य "मी करितो तेंच बरोबर करीत आहे" असें म्हणेल, तेव्हां "होय बाबा, तेंच खरें" असें नुसतें म्हणून गप्प बसणें भाग आहे. एरवीं लोकसत्ता प्रवृत्त झाली म्हणून, त्या प्रमाणानें प्रजेचा संतोष किंवा प्रजेला मिळणारें सुराज्यसुख वाढलें असें म्हणवत नाहीं.

(२१०) राज्यशास्त्रांतली नीति

असो. शेवटीं एकाच गोष्टीचा विचार करावयाचा उरला तो करून हें प्रकरण संपवूं. राजकीयदृष्ट्या समाजांतील व्यक्तीच्या वर्तनाचा विचार करावयाचा असतां त्याला नीतिशास्त्र किंवा अध्यात्मशास्त्र यांची उंची कसोटी लावितां येत नाहीं. कारण मनुष्य हा मुख्यतः स्वार्थी असतो. म्हणून त्याचें कार्याकार्य ठरवितांना त्याच्या दृष्टीनेंच बहुधा पहावें लागतें. त्याच्या या 'कर्तव्य' क्षेत्रांत अध्यात्मशास्त्रांतला परमार्थ येऊंच शकत नाहीं. निदान तो परमार्थ दृष्टीनें, धार्मिक दृष्टीनें, जें करील त्याचा संबंध समाजाच्या राजकीय व्यवस्थेशीं येत नाहीं. त्याच्या कर्तव्यक्षेत्रांत परार्थ हा मात्र येऊं शकतो. पण तोहि निवळ परोपकारबुद्धीनें नव्हे, तर स्वार्थसाधक परार्थ म्हणून. त्याचें कर्तव्य ठरवितांना एका बाजूला स्वार्थाची प्रेरक शक्ती, व दुसऱ्या बाजूला समाजांतील इतर व्यक्तींचा तशाच प्रकारचा स्वार्थ न दुखविण्याविषयीं त्याजवर असलेल्या नियंत्रणाची शक्ति, या दोन शक्तींचा छेद कोठें कसा पडतो एवढेंच पहावयाचें असतें. अध्यात्माच्या दृष्टीनें परमार्थ हें ध्येय म्हणून उल्लेखितां येतें. पण राजकीय समाजांतील मनुष्याच्या कर्तव्याचा विचार करितांना त्या ध्येयाची गरजच नसते. त्यानें आपलें कर्तव्य समाजांतील इतर लोकांच्या संबंधांत निरपवाद रीतीनें केलें म्हणजे तो कृतकृत्य झाला असें म्हणावें लागतें.

(२११) चांगल्यावाईट नागरिकांच्या प्रति

भर्तृहरीनें एका सुप्रसिद्ध श्लोकांत चांगल्या वाईट मनुष्यांच्या प्रति लावून वर्णन केल्या आहेत. "एते सत्पुरुषाः परार्थघटकाः" इत्यादि हा तो श्लोक होय. त्यांत तो म्हणतो कीं " आपला फायदा टाकून देऊनहि जो लोकांचें कल्याण करतो किंवा हित साधितो त्याची प्रत पहिली. त्याला सत्पुरुष असें म्हणावें. लोकासाठीं झटणारा, पण त्याबरोबर स्वार्थ न सोडणारा, या मनुष्याची प्रत दुसरी. त्याला सामान्य म्हणावें. आपल्या फायद्यासाठीं लोकांचें नुकसान करणारा मनुष्य याची पायरी तिसरी. त्याला राक्षस असें म्हणतां येईल. पण स्वतःचा फायदा नसतांहि दुसऱ्याचें नुकसान करणाऱ्या मनुष्याची प्रत चौथी; व भर्तृहरि म्हणतो त्या मनुष्याला काय म्हणावें

दाखल नं 3960 ग्रंथानुक्रमांक
किंमत — पाने २५०

हें मला समजत नाहीं !" कदाचित् त्याला राक्षसाधम असें म्हणतां येईल. पण 'राजकीय' समाजांतील मनुष्यानें पहिल्या कोटींत पडावे अशी कोणीहि अपेक्षा करीत नाहीं. आतां असे कांहीं लोक राजकीय समाजांतहि असतात कीं, ते स्वतःचें नुकसान करून समाजाचा फायदा करून देतात, व त्याकरितां लोकहि त्यांची देशभक्तांत व राजकीय सत्पुरुषांत गणना करितात हें वेगळें. पण अशा प्रकारची अलौकिक विधायक देशभक्ति करणें हें राजकीय समाजांतील मनुष्याचें 'कर्तव्य आहे !' अशी भाषा कोणी वापरीत नाहीं. कारण तशी समजूतच नाहीं. तसेंच चौथ्या प्रतीच्या म्हणजे राक्षसाधम मनुष्यालाहि राजकीय समाजाच्या नीतिशास्त्रांत स्थान नाहीं. कारण दुसऱ्याचें नुकसान केल्याबद्दल त्याला शासन होईल, व तेंहि निरर्थक केलें म्हणून कदाचित् थोडें अधिकच शासन होईल. राहतां राहिले मधले दोन वर्ग. त्यांपैकीं स्वार्थाकरितां दुसऱ्याचें नुकसान करणाऱ्या तिसऱ्या कोटींतल्या मनुष्यासंबंधानें मात्र एकदम निर्णय देतां येणार नाहीं. कारण त्यानें इतर कोणाचें नुकसान केलें हें खरें असेल, पण स्वतःचा कायदेशीर व न्यायाचा स्वार्थ साधण्याकरितां केलें असेल, आणि तो साधतांना जर आपाततः त्याच्या हातून तें नुकसान घडलें असेल, तर येथें सूक्ष्म धर्माचा विचार अर्थातच उत्पन्न होईल. कारण स्वार्थसंरक्षणाची योग्य मर्यादा कोठें संपते हें ठरलें म्हणजे मग, त्यापलीकडे गेल्यानें त्याच्या हातून इतरांचें जें नुकसान झालें असेल त्याबद्दल त्याला शासन भोगावें लागेल. त्या मर्यादेच्या आंत दुसऱ्याच्या हिताला अपाय करण्यासारखी गोष्ट त्याच्या हातून घडली तरी त्याबद्दल त्याला शासन होणार नाहीं. त्याच्यावर जें नियंत्रण समाजानें किंवा कायद्यानें घातलेलें असतें तें "कोणच्याहि स्थितींत दुसऱ्याचें नुकसान करूं नये" अशा स्वरूपाचें नसतें, तर "स्वार्थ-संरक्षणाची योग्य मर्यादा उल्लंघून त्यानें दुसऱ्याचें अनहित करूं नये" यावरच ती नियंत्रणाची मर्यादा पडते. राहतां राहिला दुसऱ्या कोटींतला 'सामान्य' म्हटलेला मनुष्य. म्हणजे जो स्वतःचा स्वार्थ न सोडतां त्यांतल्या त्यांत होईल तें लोकांचेंहि हित साधितो. अस्सल नीतिशास्त्र हें मनुष्याच्या कृत्यांचें परीक्षण हेतुमूलक दृष्टीनें करणारे असल्यामुळें, अशा दुटप्पी माणसाच्या वर्तनाला तें मोठेंसें सर्टिफिकेट देणार

नाहीं. कारण या शास्त्राच्या मतें तेंच कृत्य सत्कृत्य ठरेल, कीं ज्यांत मुळा-मध्यें निस्वार्थीपणाच आहे. नीतिशास्त्राचा कटाक्षच तसा असतो.

(२१२) राजकीय कर्मयोगशास्त्र

पण राजकीय कर्मयोगशास्त्र हें नीतिशास्त्राइतकें कडक नाहीं. कारण तें आपले सिद्धान्त निस्वार्थीपणावर उभारीत नाहीं, तर स्वार्थ आणि परार्थ हीं दोन्ही तत्त्वें स्वीकारूनच त्यांच्या तारतम्यानें कर्माकर्मांचें सिद्धान्त तें सांगतें. तात्त्विकदृष्ट्या परार्थसाधन हेंच श्रेष्ठ प्रतीचें ध्येय असेल. परंतु राजकीय समाजाच्या व्यवहारांत परमावधीची शुद्ध नीति कोणती हें न पाहतां, एकासारख्या दुसऱ्या माणसानें सामान्यपणें कसें वागावें इतकेंच पाहणें असतें. या जगांत राहणाऱ्या सामान्य मनुष्याला इतर लोकांप्रमाणें स्वतःला ऐहिक समृद्धि व ऐश्वर्य प्राप्त करून घेण्याची आवश्यकता असते, व ती मिळविण्याचा नैतिक हक्कहि त्याला असतो. म्हणून राजकीय समाजांत परम साध्य कोणतें या प्रश्नाचें उत्तर "स्वार्थाबरोबर साधणारा परार्थ" हेंच होय. म्हणून शहाणा स्वार्थ, दूरदर्शी स्वार्थ, सात्त्विक स्वार्थ हा राज्यशास्त्रांतील व्यक्तिधर्मांत ग्राह्य ठरतो. आत्मौपम्य बुद्धीनें जें आपणाला प्रिय व हितकर तेंच समाजांतील इतरांनाहि असणारच अशी बुद्धि ठेवून मनुष्य वागला तर ठीकच. त्याच्या हातून परहिताचा नाश होणार नाहीं, व राजसत्तेनें त्याला नियंत्रण घालण्याचा प्रसंग येणार नाहीं. पण त्याच्या ठिकाणीं आत्मौपम्य बुद्धि प्रगट झाली नाहीं, तरी व्यावहारिक समाजशास्त्राच्या दृष्टीनें त्याला नांव ठेवतां येत नाहीं व सरकारला त्याला नियंत्रण घालतां येत नाहीं. फक्त त्याच्या स्वार्थ बुद्धीनें नंगा नाच घालून त्याजकडून इतरांचें नुकसान न करविलें म्हणजे झालें. "मी मेलों तरी चालेल, पण स्वार्थाकरितां मी दुसऱ्याला मारणार नाहीं" ही गीतेतल्या पहिल्या अध्यायांतल्या अर्जुनाची उंची भाषा मनुष्यानें बोलावी, किंवा तितक्या उच्च भावनेनें वागावें, अशी समाजशास्त्राची किंवा राज्यशास्त्राची अपेक्षाच नसते. फक्त स्वहितसंरक्षण व परहितनाश याचा छेद जेथें पडतो त्याच्या पलीकडे त्यानें पाऊल टाकलें कीं नाहीं इतकेंच पाहणें असतें. "मी लोकांचा घात केला तर लोकहि माझा घात करतील" या

कल्पनेनें तो नीट वागला तरी चालेल. दुसऱ्याविषयीं प्रेम नसलें तरी स्वार्थमूलक भीतीनेंहि तो मर्यादेंत राहिला तरी काम झालें. त्याच्यावर वेगळें नियंत्रण घालण्याचें कारण सरकारला उरत नाहीं. आणि अशा रीतीनें जो तो वागूं लागला म्हणजे, व प्रत्येकानें आपलें हित अशा निरपवाद रीतीनें साधलें म्हणजे, समाजांतील पुष्कळांचें पुष्कळ हित आपोआपच सिद्ध होण्यास मदत होते. या प्रकारें व्यक्तीचें व समाजाचें हित साधलेलें पाहणें इतकेंच राज्यशास्त्राचें कार्य आहे. अर्थात् त्याला कोणी पहिल्या प्रतीचें नीतिशास्त्र म्हणणार नाहीं. परंतु राज्यशास्त्रांत हें मर्यादित व्यावहारिक नीतिशास्त्रच पुरें असतें. आणि राष्ट्रांतील कायदे आणि राज्यसत्ता हीं हें व्यावहारिक नीतिशास्त्र पदरांत पडण्यापुरताच खटाटोप करितात.

परिशिष्ट १

भावी हिंदी स्वराज्य-घटना

या ग्रंथाच्या मुख्य भागांत केवळ तात्त्विक विवेचनच करण्यांत आलें आहे. त्यांत कोणत्याहि एका किंवा अनेक राष्ट्रांतील राज्यघटना किंवा राज्यकारभार यांचा तपशीलवार विचार आम्ही केला नाहीं. सामान्यपणें राज्यघटना व राज्यकारभार या विषयातल्या मुख्य पांच पंचवीस मुद्यांपैकीं प्रत्येक मुद्यावर इंग्रजी भाषेंत पांचपांच दहादहाहि ग्रंथ आहेत. आणि प्रत्येक राष्ट्रासंबंधानें फिरून तपशीलवार विचार करणारे ग्रंथ वेगळेच. अर्थात् हे सर्व बाजूला ठेवून, व त्या दिशेचा विचार सोडून, या अवघ्या दोनशें पानांच्या ग्रंथांत सर्वसाधारण तात्त्विक विवेचन करण्यावरच आम्हाला राज्यशास्त्रनिरूपणाचें हें काम भागवून घ्यावें लागलें. तथापि खंडीभर कापूस पिंजला, पण एक हातभरहि सूत काढलें नाहीं तर त्याचा काय उपयोग ? याकरतां एखाद्या राष्ट्राच्या तरी घटनेचा तपशील द्यावा हें योग्य, म्हणून हिंदुस्थानच्या राज्यघटनेचाच तपशील थोडक्यांत याखाली देण्याचें योजिलें आहे. पण ती घटना हल्लीं अमलांत असलेली मात्र नव्हे. कारण हल्लींची घटना कदाचित् लवकरच बदलण्याचा संभव आहे. शिवाय बदलणारी नवी घटना ही देखील राष्ट्राला समाधानकारक ठरण्याचा संभव नाहीं. पण सुमारें तीन वर्षांपूर्वी हिंदी राष्ट्रीय सभेनें नेहरू कमिटीचा म्हणून एक रिपोर्ट मंजूर केला, त्याबरोबर तदंतर्गत घटनाहि मंजूर केली. आणि त्यानंतर लाहोर येथें सन १९२९ सालीं प्रत्यक्ष स्वातंत्र्याचा ठराव मंजूर झाला तरी, विधायक निर्मितीच्या दृष्टीनें नेहरू-रिपोर्टीतील घटना अजून शिल्लकच आहे. तिची जागा दुसऱ्या कोण्या घटनेनें अजून घेतलेली नाहीं. म्हणून ती घटना लोकदृष्टीनें अद्यापि अबाधित आहे व स्वातंत्र्याला बरीच जवळजवळ आहे. म्हणून त्या घटनेच्या कलमांचा सारांश या खालीं दिला आहे.

भावी हिंदी

स्वराज्य–घटनेचीं कलमें

(१) वसाहतीच्या नमुन्याचें स्वराज्य आज खालील देशांत आहेः— कानडा, आस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, आयर्लंड. म्हणजे या प्रत्येक देशांत स्वतंत्र पार्लमेंट आहे; प्रधानमंडळ या पार्लमेंटाच्या हुकमांत वागतें. हिंदुस्थानांतहि अशाच प्रकारचें स्वराज्य असावें.

(२) हिंदी पार्लमेंटानें केलेले कायदे सर्व हिंदुस्थानभर अमलांत राहतील. तसेंच हिंदुस्थानालगत समुद्रावरहि कांहीं मैलांपर्यंत त्या कायद्यांचा अंमल राहिला पाहिजे. अशा रीतीनें हिंदी पार्लमेंट स्वतंत्र झालें म्हणजे विलायतेंतील पार्लमेंटानें केलेल्या कोणत्याहि कायद्याचें बंधन हिंदुस्थानावर राहणार नाहीं. हिंदुस्थानांतील कायदेमंडळांनीं केलेले कायदे जुने म्हणून यापुढें अमलांत रहावयाचे नाहींत. तथापि जुने कोणतेहि कायदे पुढेंहि अमलांत रहावे असें हिंदी पार्लमेंटाला वाटेल तर तसें ठरविण्याचा अधिकार अर्थातच त्यास राहील.

(३) **हिंदी नागरिक** म्हणजे स्वतः ज्याचा, किंवा ज्याच्या बापाचा, जन्म हिंदुस्थानाच्या भूमींत झाला, किंवा तसा जन्म न झाला तरी ज्यानें कायम वस्ती करून हिंदुस्थान हा देश आपला म्हणून मानला, तो हिंदी नागरिक समजावा. परदेशाच्या एखाद्या नागरिकाला हिंदुस्थानचा नागरिक व्हावयाचें असेल तर त्यानें यापुढें 'मी त्या परदेशाचा नागरिक नाहीं' असें लिहून दिलें पाहिजे.

(४) प्रत्येक हिंदी नागरिकाला खालीं लिहिलेले **मूलभूत हक्क** जन्मसिद्ध आहेत, व ते त्याला कोणी द्यावे लागत नाहींत असें समजण्यांत येईलः—

१ देशांतील जनता म्हणजे जनतेंतील सर्व व्यक्ती मिळून सर्व राज्याधिकाराचें उगमस्थान होय. राष्ट्रांतील कोणत्याहि कायद्यानें अगर अधिकारानें काम चाललें तरी मुळांत त्याला संमति किंवा परवानगी जनतेनेंच दिलेली आहे असें मानण्यांत येईल.

याचा अर्थ असा कीं, हिंदी राष्ट्र हें इतर सर्व राष्ट्रांपासून स्वतंत्र आहे, आणि राष्ट्रांतील प्रत्येक अधिकारी हा लोकतंत्र आहे. इतर कोणत्याहि

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

राष्ट्राची हुकमत हिंदुस्थानावर नाहीं, आणि हिंदुस्थानांतील लोकशाहीची हुकमत मात्र हिंदुस्थानांतील प्रत्येक अधिकाऱ्यावर आहे.

२ कोणाहि हिंदी नागरिकाचें स्वातंत्र्य किंवा त्याची मिळकत यांना (मुळांत कायदा असल्याशिवाय) कोणाहि अधिकाऱ्याला बंधन घालतां येणार नाहीं किंवा सरकारजमा करतां येणार नाहीं.

३ हिंदी नागरिकानें कोणत्याहि विषयावर त्याला पसंत पडेल तें मत स्वीकारावें किंवा प्रगट करावें. धार्मिक मतें किंवा आचार यांचे बाबतींतहि त्याला अशीच पूर्ण मोकळीक राहील. मात्र त्यानें आपलीं मतें किंवा आचार प्रगट करतांना सार्वजनिक शांतता किंवा संभावितपणा किंवा नीति यांचा भंग किंवा उपमर्द करूं नये.

४ मतप्रसाराकरितां किंवा आचारपालनाकरितां हिंदी नागरिकांना हवे तेवढे किंवा हवे तसे संघ बनवितां येतील. मात्र संघांनीं शांतताभंग करूं नये किंवा हत्यारें वापरूं नयेत.

५ प्रत्येक हिंदी नागरिकाला सारख्याच हक्कानें प्राथमिक शिक्षण फुकट मिळालें पाहिजे. ज्या शाळांना सरकारी किंवा निमसरकारी मदत हवी असेल त्यांनीं शाळेंतील कामांत जाति, धर्म, पंथ यांचा भेद ठेवतां कामा नये.

६ सर्व हिंदी नागरिक दिवाणी कायद्यानें सारखेच मानले जातील. अमुक श्रेष्ठ म्हणून त्याला सवलत आणि अमुक कनिष्ठ म्हणून त्याला बंधन अशी गोष्ट राहणार नाहीं.

७ फौजदारी कायदाहि सर्व नागरिकांना सारखाच लागू होईल.

८ कोणतेंहि कृत्य घडलें त्या वेळीं त्या वेळच्या कायद्यानें तो गुन्हा ठरत असेल तरच तो गुन्हा. आज नवा कायदा केला तर त्यामुळें, काल किंवा त्यापूर्वी झालेलीं कृत्यें यांना गुन्हे मानतां येणार नाहीं.

९ फटक्याची शिक्षा यापुढें अमलांत राहणार नाहीं. तसेंच सरकारी शिक्षेच्या नांवाखालीं कोणाहि नागरिकाच्या शरीराचा छळ किंवा त्याला इजा केली जाणार नाहीं.

१० प्रत्यक्ष युद्ध सुरू नसेल तेव्हां कोणाहि अधिकाऱ्याला, कोणाहि नागरिकास कायदेशीर चौकशी न करतां अटकेंत ठेवतां येणार नाहीं. व

त्याला कोणी तसें अटकेंत ठेवल्यास त्याला न्यायकोर्टापुढें आणून हजर करण्याचा हुकूम वरिष्ठ कोर्टाला मागतां येईल व तो दिला जाईल.

११ कोणत्याहि एखाद्या विशिष्ट धर्मावर सरकारी पैसा खर्च केला जाणार नाहीं. हिंदी राष्ट्राचें सरकार स्वतःचें म्हणून कोणतेंहि धर्मखातें ठेवणार नाहीं. तसेंच कोणी अमुक एका धर्माचा म्हणून त्याला अधिक हक्क किंवा सवलत आणि कोणी इतर धर्माचा म्हणून त्याला कमी हक्क किंवा सवलत असें होणार नाहीं.

१२ जी शाळा सरकारी मदत घेईल तिनें विद्यार्थ्यांना कोणत्याहि एका विशिष्ट धर्माचें शिक्षण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें देऊं नये. किंवा तें घेण्यांसाठीं विद्यार्थ्यांवर सक्ती करूं नये.

१३ पगार, अधिकार किंवा सन्मान मिळणारी सरकारी जागा किंवा हुद्दा, किंवा परवानगीनें चालणारा कोणताहि धंदा किंवा व्यापार, यांच्या बाबतींत प्रत्येक धर्माच्या किंवा पंथाच्या लोकांना सर्वस्वी समान हक्क राहतील.

१४ रस्ते, विहिरी, पाणवठे, धर्मशाळा अशा सार्वजनिक उपभोगाच्या जागेचा किंवा इमारतींचा उपयोग करण्याचा हक्क प्रत्येक नागरिकाला सारखाच राहील.

१५ आपापल्या धंद्यांतील किंवा व्यवहारांतील हितसंबंध दृढ व बळकट करण्याकरितां, किंवा आपली आर्थिक स्थिति सुधारण्याकरितां, नागरिकांनीं निरनिराळे संघ बनविले तर त्याला हरकत नाहीं. तसेंच कोणी कोणाला करारानें बांधून घेतलें एवढ्यामुळें, अशा संघांत सामील होण्याचा कोणाहि नागरिकाचा हक्क गमावला गेला किंवा नाहींसा झाला, असें समजण्यांत येणार नाहीं. असलीं कृत्रिम बंधनें बेकायदेशीर समजलीं जातील.

१६ कोणी कोणाशीं नोकरीचा करार केला असला तरी तो करार इच्छेला आल्यास मोडण्याचा हक्क कोणाहि नागरिकाला राहील. आतां करार मोडल्यामुळें होणारी दुसऱ्याची नुकसानी दिवाणी न्यायकोर्टानें भरून देण्याचा हुकूम केला तर अर्थातच करार मोडणाराला ती नुकसानी भरून द्यावी लागेल. पण नोकरीचा करार मोडणें हा पूर्वीप्रमाणें यापुढें फौजदारी गुन्हा होणार नाहीं.

१७ जनतेच्या हिताच्या दृष्टीनें हिंदी पार्लमेंट खालीं लिहिलेल्या गोष्टीकरितां योग्य ते कायदे करील. त्या गोष्टी अशाः—

नागरिकांचें आरोग्य राहावें. आपल्या श्रमानें उपजीविका करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं राहावी. काम करण्याची ज्याची तयारी असेल त्याला काम मिळावें. व कोणतेंहि काम दिलें तरी त्याकरितां त्याला निदान गरिबीनें गुजरा होईल, अन्नवस्त्र मिळेल, इतकी मजुरी कमींत कमी मिळावी. कामकरी स्त्रिया प्रसूत होतील तेव्हां, त्याआधीं व त्यानंतर कांहीं दिवस त्यांना काम न करतांहि घरबैठी भाकरी मिळावी. कामकरी आईबापांचीं लहान मुलें किंवा बेकार, दुबळे, पंगू, म्हातारे–कोतारे लोक यांना घरबैठी भाकरी मिळावी. शेतकऱ्यांकडे त्यांच्या जामिनी कायम राहाव्या.

१८ प्रत्येक नागरिकाला हत्यारें वापरण्याचा हक्क आहे. मात्र याविषयीं जे कायदे पार्लमेंट करील त्यांना धरूनच तीं वापरलीं पाहिजेत.

१९ नागरिक या नात्यानें स्त्रिया व पुरुष दोघांचेहि हक्क सर्व बाबतींत सारखेच राहातील.

हिंदी पार्लमेंट

(५) विलायतेचा राजा म्हणजे हिंदुस्थानाचा बादशहा, सेनेट सभा, प्रतिनिधी सभा (छोटी सभा) इतक्यांचें मिळून हिंदी पार्लमेंट होईल. हिंदी स्वराज्यासंबंधीं कोणताहि कायदा करण्याचा अधिकार या पार्लमेंटच्याच हातीं राहील.

(६) हिंदुस्थानाकरितां राजानें आपला एक प्रतिनिधि म्हणून नेमावा. तो गव्हर्नर–जनरल. राजा त्याला जे अधिकार जीं कामें नेमून देईल तीं त्यानें करावीं. पण तीं करतांना स्वराज्याच्या घटनेचा कोणताहि नियम त्यानें मोडतां कामा नये. त्याची नेमणूक किती वर्षांची असावी हें राजानें ठरवावें.

(७) (अ) गव्हर्नर–जनरलला योग्य तो पगार ठरविण्यांत येईल व तो हिंदुस्थानाच्या खजिन्यांतून राजाच्या नांवें खर्च पडून गव्हर्नर जनरलास देण्यांत येईल.

(आ) कोणत्याहि गव्हर्नर–जनरलाच्या नेमणुकीच्या ठराविक मुदतीच्या दरम्यान त्याच्या पगाराची रक्कम कमी करण्यांत येणार नाहीं.

(८) ' सिनेट ' सभेचे सभासद २०० असावेत. त्यांची निवडणूक प्रांतिक कायदेमंडळांनीं करावी. प्रत्येक कायदेमंडळाला प्रांतांतील लोकसंख्येच्या प्रमाणानें जागा देण्यांत याव्या. मतें फुकट न जातां सर्व वर्गाला आपले प्रतिनिधी हिस्सेरशीनें हटकून निवडून देतां येतील अशा एखाद्या सुधारलेल्या व अनुभविक निवडणुकीची पद्धत स्वीकारली जाईल.

(९) ' प्रतिनिधि ' सभेचे सभासद ५०० असावेत. व या निवडणुकीकरितां मतदारसंघ कसे बनवावेत हें स्वतः पार्लमेंटानेंच कायदा करून ठरवावें. मात्र हे संघ बनवितांना अशी खबरदारी घेतली जावी कीं स्त्री असो वा पुरुष असो, कोणीही २१ वर्षें वयाचा झाल्यावर त्याला निवडणुकींत मत देण्याचा अधिकार जन्मसिद्ध हक्कानेंच प्राप्त होईल. विशेष कारणांकरितां कोणाचा हा अधिकार काढून घेणें योग्य वाटेल तर कायद्यांतच तशी तजवीज करतां येईल. या सभांच्या सभासदांची संख्या वाढविणें झाल्यास तो अधिकार पार्लमेंटाला राहील.

(१०) एकदां निवडलेल्या प्रतिनिधी–सभेची मुदत (पहिली बैठक झाल्यापासून) ५ वर्षांची राहील. सेनेट सभेची मुदत ७ वर्षें राहील. मात्र या मुदती वाढविणें किंवा मुदत भरण्यापूर्वी सभा बरखास्त करणें या गोष्टी गव्हर्नर–जनरल याला, विशेषच कारण असेल तर, करतां येतील. पण सभा अस्तित्वांतच नाहीं अशी गोष्ट ६ महिन्यांपेक्षां अधिक चालणार नाहीं. या मुदतींत नवी सभा भरविलीच पाहिजे. सभा कोठें भरवाव्या केव्हां भरवाव्या हें ठरविण्याचा अधिकार गव्हर्नरजनरल याचा. पण सभा भरली असतां त्या दिवसापुरती ती तहकूब करण्याचा अधिकार अध्यक्षाचा. सभेंतील कामाचा निकाल हल्लींप्रमाणें बहुमतानेंच लागावयाचा आहे. एखाद्या सभेचे एक अगर अधिक सभासद कोणतेहि कारणानें कमी झाले असले आणि त्यांची जागा नवी निवडणूक होऊन भरून निघाली नसली, तरी त्याकरितां सभा बंद राहूं शकत नाहीं.

(११) सेनेट व प्रतिनिधि सभेला एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष असावा. दोघांचीहि नेमणूक निवडणुकीनें व्हावी. अध्यक्ष व उपाध्यक्ष हे

मुळांत मतदारसंघाकडून निवडून आलेले असे म्हणजे त्या त्या सभेचे सभासदच असले पाहिजेत.

(१२) अध्यक्ष, सभासद वगैरेंना सामान्य हक्क व विशेष हक्क कोणते असावेत, त्यांना कोणत्या गोष्टींत माफी असावी अगर सवलती असाव्यात, या गोष्टी पार्लमेंट कायद्यानें ठरवील.

(१३) जीं कामें प्रांतिक कायदेमंडळाला तोडून दिलीं नसतील त्या सर्व कामासंबंधानें सुराज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें पार्लमेंट वेळोवेळीं हवे तसे कायदे करील. हिंदुस्थानांत राहणारे किंवा हिंदुस्थानाबाहेरहि तात्पुरते राहाणारे हिंदी नागरिक किंवा सरकारी अधिकारी किंवा नोकर यांच्या वर्तनासंबंधानें कायदे करण्याचा अधिकार हिंदी पार्लमेंटाला राहील. फक्त ब्रिटिश पार्लमेंटाचा लष्करी कायदा सांभाळूनच हे कायदे हिंदी पार्लमेंटाला करतां येतील.

(१४) परराष्ट्रांशीं व्यवहार करण्याचे जे जे अधिकार कोणत्याहि वसाहतसरकारला आहेत तेच हिंदी पार्लमेंटाला राहातील. मात्र हिंदी संस्थानांशीं हिंदी पार्लमेंटाचा संबंध कसा राहावा याचा विचार स्वतंत्रपणें व्हावा.

(१५) वरिष्ठ कायदेमंडळाचें एकंदर कामकाज कसें चालावें याबिषयीं सरकार तपशीलवार नियम करील. मात्र ते नियम तत्त्वतः पार्लमेंटाच्या कायद्याला धरूनच असले पाहिजेत.

(१६) सरकारी कामकाज चालण्याकरितां नोकर ठेवावे लागतील. त्यांच्या वार्षिक पगाराच्या रकमेचा अंदाज करून, सरकारी उत्पन्नांतून ती रक्कम मिळण्याकरितां स्वतः प्रधानमंडळानें पार्लमेंटापुढें बिल आणावें. हीं बिलें याच विशिष्ट कामाचीं, म्हणून त्यामध्यें राज्यकारभाराच्या इतर गोष्टींचा संबंध आणूं नये. तसेंच अमुक एक कर बसविण्याकरितां म्हणून सरकार बिल पुढें आणील त्यांतहि इतर गोष्टींचा संबंध आणूं नये. पैशाच्या व्यवहारासंबंधाची अगर कर बसविण्याबद्दलचीं बिलें प्रधानमंडळाखेरीज इतर म्हणजे खासगी सभासदांना पुढें मांडतां येणार नाहींत.

(१७) कर कोणते बसवावे, किती बसवावे, कसे वसूल करावे, कोणत्या सवलती द्याव्या, कोणाला किती माफी द्यावी, सरकारी कर्ज कसें उभारावें, कसें फेडावें या सर्व बाबींसंबंधानें कसलाहि किरकोळ किंवा तपशीलवार मुद्दा असला तरी त्याला वर कलम १६ मध्यें सांगितलेले निर्बंध लागू होतात.

(१८) पैशाअडक्याचा व्यवहार व कराची योजना या संबंधाचीं बिलें फक्त प्रतिनिधिसभेपुढेंच आणतां येतील. आणि कोणत्याहि बिलाचें स्वरूप काय, म्हणजे त्याला वरील निर्बंध लागावे कीं नाहीं, हें ठरविण्याचा अधिकार त्या सभेच्या अध्यक्षाला राहील.

(१९) वरील प्रकारचें कोणतेंहि बिल प्रतिनिधिसभेनें मंजूर केल्यानंतर तें सेनेट सभेपुढें ठेवण्यांत येईल. पण या अशा बिलासंबंधानें सेनेट सभा जे ठराव करील त्यांना केवळ सूचना किंवा शिफारसी याहून अधिक मातब्बरी राहणार नाहीं. या सूचना व शिफारसी विचारांत घ्याव्या किंवा न घ्याव्या किंवा कितपत घ्याव्या हें ठरविण्याचा अखेरचा अधिकार प्रतिनिधिसभेला राहील व तिनें अखेर मंजूर केलेल्या कायद्याप्रमाणेंच अंमल होईल.

(२०) पैशाचा व्यवहार व करयोजना या बाबी वगळल्या असतां बाकी कोणत्याहि विषयासंबंधीं कायद्याचें बिल दोहोंपैकीं कोणत्याहि सभेंत प्रथम आणतां येईल. पण तिनें तें मंजूर केलें तरी, उरलेल्या दुसऱ्या सभेनेंहि तें पसंत केलें तरच त्याला कायद्याचें स्वरूप येईल. दोनहि सभांनीं शब्दशः अक्षरशः एकमतानें मंजूर केलेल्या बिलालाच कायद्याचें स्वरूप येईल; इतरांना येणार नाहीं. दोनहि सभांमध्यें मतभेद झाला तर दोनहि सभांची मिळून सभा भरवून वादग्रस्त बाबींचा विचार करण्यांत येईल. अशा संयुक्त सभेंत दोनहि सभांच्या सभासदांना सारखेच हक्क राहतील.

(२१) वरीलप्रमाणें कोणत्याहि बिलाला अखेर दोनहि सभांची, वेगवेगळी किंवा एकत्र, संमति मिळाल्यावर तें बिल गव्हर्नर–जनरलाकडे जाईल. तेव्हां त्यानें राजाच्या नांवानें अशा बिलाला मंजुरी द्यावी, किंवा नापसंत असल्यास संमति देऊं नये, किंवा स्वतः संमति न देतां " राजेसाहेबांना योग्य दिसेल तसें ते स्वतः करतील " असें म्हणून तें बिल वर पाठवावें. तसेंच बिलाला स्वतःची संमति न देतां किंवा तें वर राजाकडे न पाठवितां, स्वतःलाच योग्य वाटतील त्या सूचना करून त्यांसह तें बिल पार्लमेंटाकडे फेरविचाराकरितां पाठवावें. तसें घडल्यास पार्लमेंटसभेनें योग्य तो विचार करून, आणि बिल दुरुस्त करून किंवा न करतां, योग्य वाटेल त्याप्रमाणें तें बिल फिरून पूर्वीप्रमाणें अखेर संमतीकरितां गव्हर्नर–जनरला-

कडे पाठवावें. मात्र गव्हर्नर–जनरल किंवा राजेसाहेब यांची अखेर संमति मिळाल्याशिवाय कोणत्याहि बिलाला कायद्याचें स्वरूप येणार नाहीं.

वरिष्ठ प्रधानमंडळ.

(२२) राज्यकारभाराची मुख्य सत्ता राजाकडे राहाते अशी समजूत आहे. पण ही निवळ समजूतच होय. कारण राजाचा प्रतिनिधि म्हणून गव्हर्नर–जनरल यानेंच राजाचे सर्व अधिकार प्रत्यक्ष बजावावयाचे असतात. तथापि हे अधिकार व्यक्तिशः त्यालाहि एकट्याला नाहींत. त्याला सल्ला देण्याकरितां जबाबदार असें एक प्रधानमंडळ नेहमीं असलें पाहिजे. या प्रधानमंडळांत एक मुख्य प्रधान व सहा उपप्रधान अशी संख्या तूर्त ठरविण्यांत यावी. मुख्य प्रधान नेमावयाचा तो गव्हर्नर जनरल यानें आपल्या पसंतीप्रमाणें नेमावा. पण सहा दुय्यम सहकारी उपप्रधान किंवा कारभारी कोण असावे हें मुख्य प्रधानानें आपल्या मर्जीप्रमाणें ठरवावें; व त्यांचीच नेमणूक गव्हर्नर–जनरलानें केली पाहिजे. प्रधानमंडळांत अनेक लोक असले, व सोयीकरितां प्रत्येकाकडे वेगवेगळें काम खातेवारीनें नेमून दिलें असलें, तरी कोणत्याहि खात्यासंबंधानें वाद उत्पन्न झाल्यास, सर्व प्रधानमंडळानें मिळूनच बऱ्यावाईट कारभाराची जबाबदारी घेतली पाहिजे.

(२३) प्रधानापेक्षां खालच्या सर्व दर्जाचे अधिकारी हे गव्हर्नर जनरलानें किंवा त्यानें हा अधिकार दिलेल्या खालच्या अधिकाऱ्यानें किंवा पार्लमेंटाचा कायदा ठरवून देईल त्यानें नेमावें.

(२४) लष्कर, आरमार, विमानी फौज या सर्वांचा मुख्य अधिकार गव्हर्नर–जनरल याजकडे राहील. कारण तो अधिकार मुळांत राजाचाच आहे.

(२५) कोणत्याहि देशांत आपल्यातर्फे कोण किती वकील किंवा गुमास्ते नेमावेत, त्यांना पगार किती द्यावा, त्यांजकडे कामें काय असावीं हें सर्व हिंदुस्थानसरकारनें ठरवावें.

(२६) एकंदर सरकारी हिशेब–खात्यावर ऑडिटर–जनरल (सरहिशेबनवीस) नांवाचा मुख्याधिकारी नेमावयाचा तो हिं० सरकारनें नेमावा.

(२७) वर हिं० सरकारच्या नोकरींत किंवा खालीं प्रांतिक सरकारच्या नोकरींत कोणकोणते नोकर किती पगाराचे असावे हें, सरकार एकदां ठरवून देईल. त्यानंतर अशा नोकरांच्या जागा वाढविणें, कमी करणें, किंवा पगारामध्यें कमजास्त करणें या गोष्टी या कामीं अधिकार दिलेल्या फडणविशी अधिकाऱ्याच्या संमतीशिवाय कोणासहि करतां येणार नाहींत.

प्रांतिक कायदेमंडळें

(२८) प्रत्येक प्रांतापुरता कायदे करण्याचा अधिकार स्वतः राजेसाहेब आणि त्या प्रांताचें कायदेमंडळ यांजकडे राहील.

(२९) सर्व हिंदुस्थानाकरितां जसा गव्हर्नर-जनरल तसाच प्रत्येक प्रांताकरितां एक गव्हर्नर आपला खास प्रतिनिधि म्हणून राजानें नेमून द्यावा.

(३०) प्रांतिक गव्हर्नराचा पगार ठराविक असावा व तो ठरविण्याचा अधिकार हिंदी पार्लमेंटाला राहील.

(३१) प्रांतिक कायदेमंडळाकरितां प्रतिनिधी सभासदांची संख्या नियमित असावी. म्हणजे दर लाख लोकसंख्येला एक सभासद अशी असावी. एखाद्या प्रांताची लोकसंख्या शंभर लक्षांहून कमी असल्यास, त्या प्रांताच्या कायदेमंडळांत संख्येच्या प्रमाणाबाहेर पण जास्तींत जास्त शंभरापावेतों सभासद असल्यास हरकत नाहीं.

प्रत्येक सभासद ठराविक मतदारसंघाकडून निवडून आला असला पाहिजे. (सरकारी नेमणुकीचे सभासद मुळींच नसावे.) या निवडणुकीकरितां योग्य दिसेल त्याप्रमाणें मतदारसंघ बनवावे. कोणत्याहि मतदारसंघाच्या आवारांतील २१ वर्षांवरचा कोणीहि, मग ती स्त्री असो वा तो पुरुष असो, मतदारसंघाच्या यादींतून वगळला जातां कामा नये. कोणत्या विशेष दोषाकरितां मतदारीचा हक्क मनुष्याला राहूं नये हें कायद्यानें कायमचें ठरविलें जावें. हा दोष ज्यांच्या ठिकाणीं नाहीं त्या प्रत्येक मनुष्याला मतदारीचा हक्क असला पाहिजे.

(३२) प्रांतिक कायदेमंडळाची मुदत सामान्यतः त्याच्या पहिल्या बैठकीच्या तारखेपासून पांच वर्षांची असावी. तथापि ही मुदत प्रसंगविशेषीं योग्य कारणाकरितां वाढविणें, कमी करणें, मुदतीच्या आधीं कायदेमंडळ

बरखास्त करणें, त्याच्या सभांच्या जागा व दिवस नेमून देणें, इत्यादि अधिकार गव्हर्नरला राहातील. तथापि का० मंडळ बरखास्त झाल्यापासून सहा महिन्यांच्या आंत नवीन कायदेमंडळ बनविण्यांत आलेंच पाहिजे. मंडळाचे कोणतेहि निर्णय त्यांतील बहुमतानेंच होतील. कोणी एक किंवा अनेक सभासदांची जागा रिकामी आहे, एवढ्यानें मंडळाचें कोणतेंहि काम थांबणार नाहीं. सभा चालू असतां एखाद्या दिवशीं सभेचें काम थांबवून तें पुढच्या दिवसावर ढकलण्याचा अधिकार अध्यक्षाला राहील.

(३३) प्रां. कायदेमंडळाचा अध्यक्ष व उपाध्यक्ष हे दोघेहि मंडळानें आपल्याच सभासदांमधून निवडले पाहिजेत.

(३४) प्रांतिक कारभाराचे विषय कोणते हें हिंदी पार्लमेंट ठरवून देईल. तें ठरवून दिल्यावर मग त्या सर्व विषयांसंबंधानें सुराज्यव्यवस्थेकरित हवे ते कायदे आपल्या पसंतीप्रमाणें प्रां. कायदेमंडळाला करण्याचा अधिकार आहे.

(३५) अशा 'प्रांतिक' म्हणून ठरलेल्या विषयासंबंधानें पूर्वीचे जे कायदे असतील किंवा पुढें होतील ते आपल्या मर्जीप्रमाणें बदलण्याचा अधिकार प्रां. का. मंडळाला राहील.

(३६) सरकारी पैशाच्या व्यवहारासंबंधानें, म्हणजे महसूल व खर्च या संबंधानें, कोणताहि कायदा करावयाचा झाला तर त्याचें बिल पुढें आणण्याचा अधिकार प्रांतांकरितां (खालीं दिल्याप्रमाणें) नेमलेल्या प्रधान-मंडळालाच राहील. खासगी सभासदांना तो अधिकार नाहीं.

(३७) प्रां. प्रधानमंडळानें एखादा कायदा मंजूर केला तर तो आपल्याला पसंत आहे किंवा नापसंत आहे हें गव्हर्नर जाहीर करील.

(३८) तो कायदा गव्हर्नरला नापसंत असेल तर त्याचा अंमल होऊं शकणार नाहीं.

(३९) तो कायदा गव्हर्नरला पसंत असला तरी त्याची एक प्रत गव्हर्नर-जनरलाकडे पाठविली पाहिजे. आणि वर गव्हर्नर-जनरलाचीहि संमति मिळेल तरच तो कायदा अमलांत येईल.

(४०) मात्र गव्हर्नर-जनरलानें आपल्या नापसंतीचीं कारणें लेखी जाहीर केलीं पाहिजेत.

(४१–४२) गव्हर्नर–जनरलानें प्रां. कायद्याला संमति दिली तरी देखील, खुद्द राजेसाहेबांना तो कायदा नापसंत असल्यास तो कायदा फुकट जाईल व त्याचा अंमल होणार नाहीं.

प्रांतिक प्रधानमंडळ

(४३) प्रांताचा सर्व कारभार गव्हर्नराच्या हातीं. मात्र त्याला सल्ला देण्याकरितां एक प्रांतिक प्रधानमंडळ राहील.

(४४) प्रत्येक प्रांताकरितां पांच सभासदांचें एक प्रधानमंडळ राहील. हे सभासद गव्हर्नरानें नेमावयाचे आहेत.

(४५) परंतु मुख्य प्रधान हाच तेवढा गव्हर्नरानें आपल्या पसंतीप्रमाणें नेमावा, व हा मुख्य प्रधान जे बाकीचे चार पसंत करील त्यांचीच नेमणुक गव्हर्नरानें केली पाहिजे.

वरिष्ठ न्याय-कोर्ट व हायकोर्टें

(४६) स्वराज्यस्थापनेनंतर एक मुख्य न्यायाधीश व इतर कांहीं दुय्यम न्यायाधीश मिळून एक वरिष्ठ न्यायकोर्ट हिंदी पार्लमेंटाकडून निर्माण करण्यांत येईल.

(४७) या न्यायकोर्टाच्या अध्यक्षाची व इतर न्यायाधिशांची नेमणुक हिंदुस्थानसरकाराकडून होईल, त्याचा पगारहि तेंच सरकार ठरवील. मात्र कोणाहि न्यायाधिशाचा जो पगार नेमणुकीच्या वेळीं ठरेल तोच पगार तो तें काम सोडून देईपर्यंत चालू राहील, कमी करण्यांत येणार नाहीं.

(४८) हा सरन्यायाधीश किंवा इतर न्यायाधीश यांपैकीं कोणी आपल्या कामाला नालायक आहे असें वाटेल तर पार्लमेंटाच्या दोनही मंडळींनीं एकाच वेळीं तसा ठराव मंजूर केल्यास ती विनंति मान्य करून हिंदुस्थानसरकार त्या न्यायाधिशाला कामावरून दूर करूं शकेल.

(४९) या वरिष्ठ न्यायकोर्टाकडे मुख्य कामें खालीलप्रमाणें सोंपविण्यांत येतील:—

१ हिं. सरकार व हिं. संस्थानिक यांच्या दरम्यान तह करार वगैरेसंबंधीं उत्पन्न झालेले अखेर वादाचे प्रश्न.

२ हिं. सरकारच्या तर्फे किंवा हिं. सरकाराविरुद्ध मांडण्यांत येणारे दावे.

३ परदेशच्या वकिलातीसंबंधाचे दावे.

४ हिंदुस्थानांतील एक प्रांत व दुसरा प्रांत यांच्या दरम्यान उत्पन्न होणारे अखेरचे दावे.

५ स्वराज्यघटनेच्या कायद्यासंबंधाचा म्हणजे त्याच्या अर्थासंबंधाचा कोणताहि प्रश्न.

(५०) तसेंच वरिष्ठ कोर्टाच्या सामान्य न्यायाधिशाच्या अव्वल निकालावरील अपिलें. पूर्वी प्रांतिक हायकोर्टाचे ठरावावर खुद्द राजेसाहेब (प्रिव्ही कौन्सिल) यांजकडे होणारी अपिलें, यांपैकीं पार्लमेंटाच्या नियमाप्रमाणें जीं वरिष्ठ न्यायकोर्टाकडे सोंपविलीं असतील त्यांची सुनावणी करवून त्यांचा निकाल करण्याचा अधिकारहि या वरिष्ठ कोर्टाकडे राहील.

(५१) या वरिष्ठ कोर्टाच्या निकालावर कोणाकडेहि अपील करतां येणार नाहीं. तोच निकाल अखेरचा मानला जाईल.

(५२) या उप्पर स्वतः वरिष्ठ कोर्टानेंच जर असें ठरविलें कीं 'आमच्या कांहीं प्रकारांच्या ठरावावर राजेसाहेब व त्यांचें (प्रिव्ही) कौन्सिल याजकडे अपील जाण्यास हरकत नाहीं' तर तसलीं अपिलें प्रिव्ही कौन्सिलकडे जाऊं शकतील, मात्र वरिष्ठ कोर्टानें कोणत्याहि दाव्यांत तसें लेखी सर्टिफिकीट दिलें पाहिजे. याशिवाय स्वतः राजेसाहेबांनाच केव्हां वाटलें कीं, आपण एकादे अपील विशेष कारणाकरितां घ्यावें व सुनवावें तर त्यांना तो अधिकार अर्थातच राहील.

(५३–५४) याशिवाय प्रत्येक प्रांताकरितां खास असें एकेक हायकोर्ट राहीलच. यांत एक मुख्य न्यायाधीश राहील व इतर न्यायाधीश जास्तींत जास्त एकोणिसापर्यंत राहतील. या सर्वांची नेमणूक हिंदुस्थानसरकार करील.

(५५) कोणत्याहि हायकोर्टाकरितां न्यायाधीश नेमावयाचा तो त्या कोर्टांत दहा वर्षांहून अधिक काम केलेल्या ॲडव्होकेट (वकील) वर्गातूनच नेमला पाहिजे.

(५६–५८) गव्हर्नर–जनरलाशिवाय दुसरा कोणीहि हायकोर्टाच्या

न्यायाधिशांना कामावरून काढूं शकत नाहीं. मात्र प्रांतिक कायदेमंडळानें या कामीं मुद्दाम ठराव करून त्याला काढून टाकण्याची विनंति आधीं गव्हर्नरला प्रथम केली पाहिजे. तसेच न्यायाधिशांचे पगार, रजा, पेन्शन यासंबंधाचे नियम गव्हर्नर–जनरलच करील.

(५९) मुख्य किंवा इतर एखादा न्यायाधीश एकदम रजेवर गेल्यास, गव्हर्नर–जनरल हा त्यांच्या जागीं दुसऱ्या कोणाची नेमणूक करीपर्यंत, प्रांतिक सरकारला त्या जागीं तात्पुरती किंवा हंगामी नेमणूक करण्याचा अधिकार आहे.

(६०–६२) या हायकोर्टांना हल्लींच्या हायकोर्टाकडे चालू असणारे सर्व मामुली अधिकार राहतील व त्याकरितां सनद देण्यांत येईल.

(६३) विशेष कारणाकरितां एखाद्या हायकोर्टाचा अधिकार किंवा क्षेत्रमर्यादा वाढवावी असें गव्हर्नर–जनरल यास योग्य वाटेल तर त्याला तसें करतां येईल.

(६४) गव्हर्नर–जनरल, गव्हर्नर, सरन्यायाधीश, इतर न्यायाधीश, वरिष्ठ किंवा प्रांतिक प्रधानमंडळांचे सभासद यांनीं सरकारी रीतीनें आपल्या अधिकारांत केलेल्या कोणत्याहि कृत्याबद्दल त्यांच्या कोणत्याहि कोर्टाकडे फिर्याद (दिवाणी किंवा फौजदारी) करतां येणार नाहीं.

(६५) विशेष कारणाकरितां जादा हायकोर्ट निर्माण करणें योग्य वाटेल तर तें निर्माण करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलास राहील.

(६६) प्रत्येक प्रांताला एक ॲडव्होकेट–जनरल (सरकारी बॅरिस्टर) नेमण्यांत येईल.

(६७) हिंदी स्वराज्यांत एकंदर सरकारी मिळकतीचा, नांवाचा धनी गव्हर्नर–जनरल–इन–कौन्सिल हा राहील. व आजवर राजा बादशहा स्टेट–सेक्रेटरी यांच्या नांवें जे हक्क नोंदलें गेलें असतील तेहि त्यांच्याकडेच येतील.

(६८) हिंदी स्वराज्यांतील उत्पन्नाचा कोणताहि पैसा त्याच्याच कार्याकडे खर्च झाला पाहिजे. इतर कामाकडे खर्च होतां कामा नये.

(६९) या उत्पन्नांत स्वराज्याच्या मालकींतील सर्व प्रकारचा महसूल, नजराणे, दंड, सरकारजमा होणारी बेवारशी मिळकत वगैरे सर्व प्रकारची मिळकत येते असें मानलें जाईल.

(७०) रेल्वे, टपाल, बंदर याबाबत होणाऱ्या महसुलाचा एक स्वतंत्र फंड म्हणून केला जाईल व त्यांतील पैसा त्याच कामाकडे खर्च केला जाईल. इतर संकीर्ण महसुलाचाहि असाच एक निधी समजला जाऊन, त्यांतून खर्च फक्त स्वराज्यसरकाराच्या कामाकडेच होईल.

(७१) खर्चाच्या बाजूला खालील कलमें मुख्यतः असतील. ईस्ट इंडिया कंपनीनें केलेलें कर्ज. १८५८ नंतर हिंदुस्थानसरकारनें केलेलें कर्ज. व नवीन स्वराज्याच्या कायद्यानें होणारें कर्ज व खर्च.

(७२) स्वराज्याचें पार्लमेंट स्थापन झाल्याबरोबर सरकारनें कमिशन नेमून खालील गोष्टींची चौकशी व निर्णय करावा. (१) एकंदर उत्पन्नांतून वरिष्ट सरकारला व प्रांतिक सरकारांना तोडून देण्याचा हिस्सा. (२) नित्य-नैमित्तिक आर्थिक संबंधाचा वाद निघाला तर तो तोडण्याची व्यवस्था. (३) लष्करी, नाविक, व वैमानिक शिक्षण देण्याकरितां संस्था काढून व इतर रीतींनीं करण्याची व्यवस्था. (४) देशांत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण सुरू करणें व मागसलेल्यांना विशेष सवलती देणें.

(७३) या कमिशनाचा रिपोर्ट आपल्या शिफारसीसह गव्हर्नर-जनरल इन-कौन्सिल यांनीं तजविजीकरितां हिंदुस्थानाचें पार्लमेंटपुढें ठेवावा.

(७४) जमाखर्च, उत्पन्न, कर्ज या संबंधानें नवा कायदा होईपर्यंत जुने कायदे अमलांत राहतील.

(७५) हिंदुस्थानाचें संरक्षण करण्याकरितां गव्हर्नर-जनरल-इन्-कौन्सिल यांनीं एक 'संरक्षण मंडळ' कायमचें नेमावें. मुख्य प्रधान, लष्करमंत्री, परराष्ट्रीय मंत्री, सेनापति, नाविक व वैमानिक दळाचे अधिपति, लष्करव्यवस्थेचे मुख्य कामगार हे त्यांत सभासद असावेत. या कमिटीनें स्वराज्यसरकारला या निरनिराळ्या खात्यासंबंधानें सल्लामसलत द्यावी. व कायम खर्च किती ठेवावा, खर्चवाढ कमी कशी करावी वगैरे गोष्टीविषयीं सल्ला द्यावा.

(७६) हा सल्ला घेऊन गव्हर्नर-जनरल अंदाजपत्रक तयार करतील तें पार्लमेंटामधील लोकसभेपुढें मंजुरीकरितां ठेवावें.

(७७) प्रसंगविशेषीं कारण पडल्यास गव्हर्नर-जनरल यांनीं लष्करी खर्च जरूरीपुरता करावा. परंतु त्याची वर्दी ताबडतोब कायदेमंडळाला

द्यावी. या मंडळाची सभा सुरू असली तर उत्तमच. पण नसली तर ती ताबडतोब बोलवावी.

(७८) लष्कर, विमानें, आरमार या खात्यांतील नोकरासंबंधानें शिस्तीचे नियम हे संरक्षण–मंडळानें हिंदुस्थानाचे पार्लमेंटपुढें ठेवून मंजूर करून घ्यावे. याविषयीं इतर कोणास सूचना मांडतां येणार नाहींत.

(७९) स्वराज्यस्थापनेच्या पूर्वी जे लोक सरकारच्या वरिष्ठ नोकरींत असतील ते पुढेंहि स्वराज्याचे नोकर होतील.

(८०) त्यानंतर कमीजास्ती करावयाचे ते पब्लिक सर्व्हिस कमिशन नांवाचें कायमचें मंडळ नेमून त्याकरवीं करवावे.

(८१) अधिकारी वर्ग कसा बनवावा ? कसा तयार करावा ? नेमणुकी कशा कराव्या ? त्याच्या नोकरीचे नियम काय असावेत ? याविषयीं स्वतः पार्लमेंटानें कायदे करून त्याअन्वयें पुढें नियम करण्याचें काम गव्हर्नर–जनरल किंवा प्रांतिक सरकार याजकडे सोंपवावें.

(८२) एकंदर खात्यासंबंधानें वरील सर्व व्यवस्था सुचविण्याकरितां पब्लिक सर्व्हिस कमिशन म्हणून एक कायमचें मंडळ नेमावें, व त्याला योग्य तो अधिकार द्यावा.

(८३) या मंडळाचे सभासद दर पांच वर्षांनीं बदलावे. स्वराज्यस्थापनेपूर्वी नोकरींत असणाऱ्या कोणाहि नोकराला नोकरी सोडून जावेसें वाटेल, तर पहिल्या तीन वर्षांचे आंत त्याला तसें करतां येईल. आणि तसें केल्यास त्याला जुन्या नियमाप्रमाणें पेन्शन, ग्रॅच्युइटी, नुकसान भरपाई देण्यांत येईल.

(८४) लष्कर, विमान, आरमार या खात्यांतील काळ्या व गोऱ्या अधिकाऱ्यांचे पगार भत्ते वगैरे संबंधानें जुने हक्क कायम राहतील; व त्या हक्कांपैकीं कांहीं काढून घेतल्यास योग्य नुकसानभरपाई गव्हर्नरजनरल यांच्या शिफारसीवरून देण्यांत येईल.

(८५) हिंदुस्थानासंबंधानें तह किंवा करार यांच्यायोगानें जे हक्क ज्या जबाबदाऱ्या पूर्वी उत्पन्न झाल्या ते हक्क किंवा जबाबदाऱ्या स्वराज्यसरकारहि संभाळील. मतभेद झाल्यास नवीन वरिष्ठ कोर्ट त्याचा निकाल देईल.

(८६) प्रांतरचना कोठेंहि नवी करावयाची झाल्यास ती भाषेच्या

तत्त्वावर व प्रांतांतील बहुमताला मान्य असेल तरच करावी. पण हें करतांना स्वराज्यव्यवस्था व आर्थिक शक्याशक्यता याहि गोष्टी लक्षांत घ्याव्या.

(८७) स्वराज्यघटनेचें कोणतेंहि अंग अगर कलमें बदलावयाचीं झाल्यास तें करण्याचा अधिकार हिंदी पार्लमेंटाला आहे. या संबंधानें कोणताहि कायदा व्हावयाचा तर तो हिंदी पार्लमेंटाच्या दोनही सभांनीं एकत्र बसून मंजूर केला पाहिजे, व तिसऱ्या वाचनाचे वेळीं दोनही सभांच्या इतक्या संख्येनें त्याला मान्यता दिलेली असली पाहिजे.

अधिकारविषयांची वांटणी.

यानंतर दोन परिशिष्टांत मिळून नेहरू कमिटीनें वरिष्ठ सरकार व प्रांतिक सरकार यांच्या दरम्यानच्या कारभाराच्या विषयांची वांटणी करून मांडली आहे. उदाहरणार्थ, खालील विषय **वरिष्ठ सरकारच्या** अधिकारांत राहतील:—

(१) देशी व परदेशी व्यापार व व्यापारी मंडळाचे कायदे. (२) कस्टम, इन्कमटॅक्स, एक्साईज, अफू वगैरे करांच्या बाबी. (३) देशी धंद्याच्या संरक्षणाकरितां द्यावयाच्या सवलती. (४) सरकारी कर्ज. (५) चालू नाणें व चलन. (६) सर्व प्रकारच्या पेढ्यांविषयींचा कायदा व कागदी चलनाची व्यवस्था. (७) बिल, चेक, हुंडी, प्रॉमिसरी नोट, वगैरेसंबंधानें कायदा. (८) जहाजें, उतारूं, व्यापारी बंदरें, समुद्रमार्ग वगैरे. (९) रेल्वे व लष्करी महत्त्वाचे राजमार्ग. (१०) विमानासंबंधीं सर्व व्यवस्था. (११) पोस्ट, तार, टेलिफोन, बिनतारी संदेश वगैरे. (१२) लष्कर, विमानें व आरमार या संबंधानें सर्व कारभार. (१३) परराष्ट्रीय व हिंदी संस्थानें यांचे संबंध, परदेशीं जाणाऱ्या हिंदी नागरिकांचें संरक्षण, किंवा देशांत येणाऱ्या परदेशी लोकांचें नियंत्रण. (१४) उद्योगधंद्याकरितां परदेशी जाणारे व परदेशांतून येणारे लोक. (१५) क्वारंटाईन, आरमारी इस्पितळें वगैरे. (१६) सरकारी नौकरवर्ग. (१७) हिशेबतपासणीखातें. (१८) हायकोर्टें व वरिष्ठ कोर्ट. (१९) दिवाणी हक्कासंबंधानें सर्व कायदे. (२०) फौजदारी कामासंबंधानें सर्व कायदे. (२१) दिवाळखोरी. (२२) लग्न, सोडचिठ्ठी, अज्ञा-

नाचें पालन करण्याचे हक्क वगैरे. (२३) पुस्तकें, चित्रें, कविता, नवीन शोध, युक्त्या वगैरे हक्कांचे नियम. (२४) सरकारी कामाकरितां सक्तीनें जमीनखरेदी. (२५) दस्तऐवजाची नोंदणी. (२६) जन्ममृत्यूचीं नोंदणी. (२७) खानेसुमारी व इतर आंकडेबंद माहिती. (२८) हत्यारें दारूगोळा. (२९) पेट्रोलियम ज्वालाग्राही पदार्थ वगैरे. (३०) वजनें मापें. (३१) किनाऱ्यालगत मासे मारण्याच्या जागा. (३२) सर्व्हे खातें, भूगोल संशोधन खातें, हवामान व ज्योतिष. (३३) हिंदी पार्लमेंटाच्या निवडणुकी. (३४) राजधानीची व्यवस्था. (३५) प्रांताप्रांतांची कारवाई. (३६) कारखान्यासंबंधाचा कायदा. (३७) मजूरवर्गासंबंधीं कायदा. (३८) खाणी वगैरे. (३९) वैद्यकपरीक्षा वगैरे. (४०) सरकारी कामाला लागणाऱ्या मालाची खरेदीविक्री. (४१) सरकारातर्फे मतप्रसाराचें खातें. (४२) वनस्पति, पुराणसंशोधन खातें, प्राणिरक्षण वगैरे. (४३) सर्व प्रकारचें संशोधन. (४४) मुलखांची वांटणी, प्रांतरचना वगैरे. (४५) स्वराज्याच्या मिळकतीची राखण व हिशेब. (४६) जंगलखात्याचें कायदे. (४७) स्टँपखात्याचा कायदा.

खालील बाबी **प्रांतिक सरकारच्या** कारभारांत राहतीलः—

(१) जमीनमहसूल, इनाम सर्व्हे व सेटलमेंट खातें (२) दारू खातें व मादक पदार्थ (३) स्थानिक व प्रांतिक कराचे प्रश्न (४) प्रांतिक सरकाराकरितां लागणारी जमीन सक्तीनें घेणें (५) प्रांतिक जंगलाची व्यवस्था (६) शेतकीखातें (७) प्रांतिक बंदरांतील मासेमारी (८) पाणीपुरवठा, कालवे, ड्रेनेज वगैरे (९) इमारती, रस्ते, पूल, छोट्या रेल्वे (१०) परस्परसहकारी खातें (११) खनिज संपत्ति (१२) दुष्काळी व्यवस्था (१३) यात्रेकरूंची व्यवस्था (१४) स्थानिक स्वराज्य (१५) वैद्यक खातें व वैद्यकशिक्षण (१६) सार्वजनिक आरोग्य व त्यासंबंधानें आंकडेबंद माहिती (१७) सर्वसामान्य धंदेवाईक शिक्षण (१८) अज्ञानाच्या इस्टेटीचें संरक्षण (१९) जमीनसुधराई व शेतकऱ्यांना देण्याचें कर्ज (२०) जमीनधारा व कुळें यांचे संबंध (२१) सरकारी ट्रस्टची व्यवस्था (२२)

उद्योगवृद्धि व शोध (२३) पोलीस खातें (२४) लोकोपयोगी, विशेषतः अन्नाच्या पदार्थांतील भेसळ (२५) उतारूंच्या वाहतुकीच्या व इतर वाहनांची व्यवस्था, व नाटकगृहें, सिनेमा वगैरेंचें नियंत्रण (२६) तुरुंग-व्यवस्था (२७) मागासलेले लोक व त्यांची व्यवस्था (२८) भूगत द्रव्य (२९) प्रांतिक न्यायखातें (३०) कायदेमंडळाच्या निवडणुकी (३१) प्रांतिक कायदेमंडळाबद्दल करण्याचे नियम वगैरे (३२) प्रांतिक सरकारच्या पतीवर काढण्यांत येणारें कर्ज (३३) जन्म, मृत्यु, विवाह यासंबंधींच्या कायद्याची बजावणी (३४) प्रांतिक हायकोर्टाचे लॉ रिपोर्टस (३५) प्रांतिक बंदरें (३६) सार्वजनिक ग्रंथसंग्रह (३७) कोंडवाडे (३८) पशूंचें आरोग्य, संरक्षण व संवर्धन (३९) कारखा-न्यांच्या कायद्याची बजावणी (४०) मजूर व पालक यांच्या तंट्याचा निकाल (४१) गॅस, विजेची बत्ती इत्यादि (४२) बॉयलर ॲक्टाची बजावणी (४३) धूर वगैरे सार्वजनिक आरोग्याला अपायकारक गोष्टी यांना निर्बंध (४४) मजूर लोकांचीं वसतिगृहें (४५) आकस्मिक मृत्यूची चौकशी करणारे अधिकारी (४६) प्रांतिक सरकारला लागणाऱ्या मालाची खरेदी–विक्री (४७) सरकारी प्रेस (४८) प्रांतिक सरकाराचे नोकर (४९) प्रांतिक सरकारची राजधानी (५०) स्थानिक संस्थांच्या निवडणुकी (५१) कोर्टफी वगैरे (५२) मालाची निपज, पुरवठा व वांटणी (५३) उद्योगधंद्याची वाढ (५४) देवस्थानें, सार्वजनिक धर्मादाय (५५) जुगार व सट्टेबाजी (५६) क्रूर कृत्यांपासून जीवजंतूंचें संरक्षण (५७) स्टँप खात्याच्या कायद्याची बजावणी (५८) दस्तऐव-जाचीं नोंदणी (५९) वजनें, मापें यांची व्यवस्था (६०) हत्यारें, दारूगोळा, विषें, पेट्रोल व इतर ज्वालाग्राही पदार्थ यांची कायद्याप्रमाणें व्यवस्था (६१) वर्तमानपत्रें वगैरेची नोंदणी (६२) धंदेवाईक लोकांची परीक्षा व पात्रता (६३) लोकल फंडाची हिशेबतपासणी.

परिशिष्ट २

जुन्या हिंदु समाजांतील राजधर्म व प्रजाधर्म

प्रस्तुत पुस्तकांत राज्य संस्थांविषयीं निरनिराळ्या अंगांनीं विवेचन केलें आहे; व तें करितांना, अवश्य तेथें, हिंदुस्थानांतील राज्य संस्थांचा उल्लेख मधून मधून केला आहे. तथापि, हिंदुस्थानांतील राज्य-संस्था व समाज रचना, आणि इतर देशांतील राज्य संस्था व समाज रचना, यांच्यामध्यें कांहीं कांहीं बाबतींत फरक आहे. म्हणून या परिशिष्टांत जुन्या हिंदु लोकांच्या राजकीय कल्पना व संस्था यांच्या इतिहासाचें अगदीं थोडक्यांत दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे.

ऋग्वेदामध्यें राज्यशास्त्राला उपयोगी पडतील असे उल्लेख फारसे नाहींत. त्यांत 'राजा' हा शब्द आलेला असून, त्या काळीं लोकांना राजसंस्थेची कल्पना चांगली होती एवढें मात्र खास दिसतें. ऋग्वेदाच्या सातव्या मंडळांत 'दाशराज्ञ'संबंधानें बरींच सूक्तें आहेत. या युद्धांत सुदासाविरुद्ध दहा राजे एकत्र होऊन लढत होते असा उल्लेख आहे. आतां 'राजा' या शब्दाच्या उल्लेखानें तो गृहपति किंवा कुलपति किंवा गोत्रपति किंवा राष्ट्रपति किंवा तत्कालीन राजांचा राजा (सम्राट) यांपैकीं कोण कोणत्या अर्थी तो शब्द प्रचारांत होता हें नक्की समजण्याला मार्ग नाहीं. तथापि राज्यसंस्थेचीं बीजें व राजाच्या कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य, म्हणजे आपल्या प्रजेकरितां युद्ध करणें, याचा उल्लेख ऋग्वेदाच्या सातव्या मंडळांत आढळतो. याहून अधिक विस्तृत व मुद्याचा उल्लेख दहाव्या मंडळांत आढळतो. १७३ वें सूक्त अशा अर्थाचें आहे. "हें राजा! तुला आम्ही उदयाला आणलें आहे. तूं आमचा राजा हो. तूं नित्य व स्थिर रहा. सर्व लोक राजा म्हणून तुझी इच्छा करोत. तुझ्या हातून राज्य नष्ट होऊं नये. तूं पर्वतासारखा स्थिर रहा. इंद्राप्रमाणें स्थिर रहा व राष्ट्राचें रक्षण कर. अभिषेक केलेल्या राजाला या निश्चित हविर्द्रव्यानें इंद्र स्थिर करो. त्याला सोम व ब्रह्मणःपति आपला असें म्हणोत. आकाश, पृथ्वी व हें सर्व जग ज्याप्रमाणें अचल आहे त्याप्रमाणें लोकांचा हा राजा कायम टिको. राजा!

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

वरुण, बृहस्पति, देव, इंद्र व अग्नि तुला राज्यावर स्थिर करोत व तुझें राष्ट्र स्थिर करोत. निश्चित हविर्द्रव्यानें आम्ही कायमचा सोम उत्पन्न करूं व तुलाहि कर देणाऱ्या अशा प्रजा इंद्र निर्माण करो." पुढें १७४ व्या सूक्ताचें तात्पर्य असें आहे–" देवांकडे ज्या हविर्द्रव्यानें इंद्र येतो त्यानें आम्हांला राष्ट्राकरितां तयार कर. हे राजा ! देव सविता राष्ट्र प्राप्त करून देवो. कीं, ज्याच्यायोगें तूं सर्व सत्ताधारी होशील. जसा मी हविर्द्रव्यामुळें शत्रुरहित झालों, सर्व प्राण्यांचा व लोकांचा धनी झालों तसाच निःशत्रूहि झालों आहे. राष्ट्रयुक्त होत्साता व शत्रु पराभव करणारा झालों आहे."

अथर्व वेदांत राज्य संस्थेसंबंधानें पुष्कळ उल्लेख आढळतात. या वेदांतील उल्लेख हे राज्यसंस्था अस्तित्वांत असलेली समाजस्थिति आणि त्याचप्रमाणें ती संस्था अंमलांत येण्यापूर्वीची समाजस्थिति ही दोन्ही दर्शवितात. राज्यसंस्था होण्यापूर्वी अराजकता होती व ती लोकांना अप्रिय होती, भीतिप्रद होती, असें अथर्व वेद सांगतो. " प्रारंभी हे सर्व जनपद विराज होतें. तें पाहून सर्व भयभीत झाले आणि आतां सर्वत्र असेंच होईल कीं काय अशी त्यांना भीति वाटली. ज्ञानी ऋषींनीं जगविण्याची इच्छा धरून तप केलें; त्यांतून बल, ओज आणि राष्ट्र यांची उत्पति झाली."

पुढें महाभारतामध्यें जी अराजकतेची समाजस्थिति दर्शविली आहे ती वेदकालापूर्वीची असूं शकेल. पण अथर्व वेदकालीं समाज या अराजकतेच्या भयाण स्थितींतून निघून राज्यसंस्थेपर्यंत येऊन पोहोचला होता, इतकेंच नव्हे, तर राजपद हें लोकनियुक्त असण्याच्या कल्पनेपर्यंत ती स्थिति येऊन पोहोचली होती असें दिसतें. अराजकतेपुढें विराजकता आली, म्हणजे, तींत फक्त राजा नव्हता, पण समाज सुस्थित होता. या विराजकतेंतून सभा निर्माण झाली म्हणजे लोकसभा. त्या सभेची पुढें समिति झाली. त्या समितींत लोकांना निमंत्रण करून बोलावीत असत. कदाचित् ही प्राथमिक ग्रामसभाच असेल. या समिति शब्दाचें भाषांतर कित्येक इंग्रज ग्रंथकारांनीं Meeting Assembly किंवा 'कॉंग्रेस' असें केलें आहे. पण या समीतिपेक्षांहि मोठी अशी एक राष्ट्रीय महासभा असे. राष्ट्र म्हणजे ज्या अर्थी ग्राम किंवा गांव असाच अर्थ घेतां येत नाहीं, त्याअर्थी ही सभा ग्रामपंचायतीपेक्षां अधिक महत्त्वा-

चीहि असावी. ती कदाचित् फार थोड्या वेळां भरत असेल, पण राजाची निवड करून त्याला गादीवर बसविणें, व अयोग्य राजाला गादीवरून काढून टाकणें, वगैरे कामांचा या महासभेशीं संबंध दिसतो. 'संस्था' हा शब्द अथर्ववेदांत आढळतो. आणि त्याचा अर्थ 'घटना' अगर 'कॉन्स्टिटयूशन' असा करतां येईल. राजांना निवडून देणारे लोक ते 'राजकर्ते' होत. आणि राजा जर लोकांनीं करावयाचा तर तो वंशपरंपरेचा नसावा असें दिसतें. "प्रजा हाच राजाचा आश्रय आहे. देवांनीं राजाचें घर प्रजेमध्येंच ठेविलेलें आहे. हे राजा! राज्यकारभार चालविण्यासाठीं या पांचहि दिशांतील प्रजा तुझीच इच्छा करोत आणि तुलाच निवडून देवोत. हें तुझें राजपद नष्ट न होवो" वगैरे उल्लेख अगदीं स्पष्ट आहेत. उपनिषदांतील "राजा हेंच राष्ट्राचें सौंदर्य आहे, राजा हीच राष्ट्राची शोभा आहे" असें उल्लेखहि अथर्ववेदांत आढळतात.

महाभारताच्या आधीं रामायण झालें या दृष्टीनें प्रथम रामायणकालीं राजकीय कल्पना काय होती हें पाहूं. तसें पाहातां हें आढळतें कीं, अथर्ववेदामध्यें राजांना लोकांनीं निवडण्याची जी कल्पना व पद्धत तीच रामायणकालींहि होती. वाल्मिकीरामायणांत अयोध्याकांडाच्या तिसऱ्या सर्गांत श्री. रामचंद्राला 'युवराज' नेमण्याचा प्रसंग आहे. या गोष्टीचा विचार करण्याकरितां दशरथानें सभा भरविली. सभेला लोकसंमत असे राजे जानपद इत्यादि आले होते. त्यांना दशरथानें सल्ला विचारला. तेव्हां त्यांनीं रामाला युवराज नेमण्याबद्दल संमति दिली. तेव्हां दशरथ म्हणाला, "विचार करूनच संमति द्या. कारण मी म्हातारा म्हणून तुम्हांला त्रासदायक नाहीं. पण माझ्या जागीं तरुण तरतरीत युवराज येऊन त्यानें राजदंड हातीं घेतला तर कसें होईल!" त्यावर लोकांनीं उत्तर दिलें कीं, "महाराज, राम हा तुमचा वडील मुलगा आहे एवढ्याच कारणानें आम्ही त्याला युवराज नेमण्याविषयीं संमति देत आहों असें नाहीं. तर त्याच्या अंगीं तसेच विशेष गुण आहेत." यानंतर दुसराहि एक असाच प्रसंग घडला.रामाच्या विरहानें दशरथ मृत्यु पावला. रामाहून धाकटा भाऊ लक्ष्मण तोहि वनांत गेला. भरत आपल्या आजोळीं होता. मिळून गादीवर राजा नाहीं अशी स्थिति प्राप्त झाली. अराजक समाजस्थितिविषयीं समाजाच्या ठिकाणीं भीति

श्रीराम वाचनालय, लिंब.

व विद्वेष हीं पूर्वापार होतीच. तेव्हां 'राजकर्त्या द्विजां'नीं पुढाकार घेऊन सभा भरविली, व इक्ष्वाकूच्या वंशापैकीं कोण पुरुष गादीवर बसवावा असा प्रश्न उपस्थित केला. तेव्हां निरनिराळ्या उपसभा (Sub-committees) भरवून वाटाघाट झाली. मुख्य सभेनें वसिष्ठाला पुढारी नेमलें व त्याला असा अधिकार देण्यांत आला कीं, "इक्ष्वाकूच्या कुळांतीलच कोणीतरी पुरुष गादीवर बसवावा असा निर्बंध आम्ही मानीत नाहीं, तरी तुम्ही कोणत्याहि कुळांतील योग्य पाहून राजपुत्राची शिफारस करावी." तेव्हां वसिष्ठानें सांगितलें कीं, "दशरथानें मरणसमयीं कैकेयीचा वर पूर्ण करण्याकरितां भरताला राजपद देण्याचें वचन दिलें तेव्हां तेंच आपण पुरें केलें पाहिजे." हें मत महासभेला मान्य झालें व त्याप्रमाणें भरताला आजोळाहून आणून गादीवर बसविलें. फिरून रामायणाच्या किष्किंधाकांडांतहि असाच एक, म्हणजे राजा निवडण्याचा, प्रसंग आढळतो. कपिनायक वाली हा दुंदुभिसुताशीं युद्ध करण्याला गेला आणि त्याचा पत्ता पुष्कळ काळ लागेना, तेव्हां किष्किंधेच्या मंत्रिमंडळानें अशीच सभा भरवून वालीचा भाऊ सुग्रीव याला गादीवर बसविलें. या निवडणुकींत मंत्रिमंडळाबरोबर लोकांनींहि भाग घेतला होता. इतकेंच नव्हे तर सुग्रीवाची इच्छा नसतां लोकांनीं आपल्या इच्छेच्या जोरावर त्याला राजा केला.

यानंतर महाभारताकडे वळूं. अराजकाची स्थिति चांगली नाहीं, याविषयीं महाभारतांत विशेष जोराचें प्रतिपादन आहे. तत्कालीन लोकांची अशी खात्री होती कीं, वाईट जुलमी राजा एक वेळ पुरवला, त्याला कांहीं तरी आळा घालितां येतो, उपाय करतां येतो, पण अराजकतेपासून होणारे दुष्परिणाम त्याहून फारच भयंकर असतात. हें खालील सोपपत्तिक शब्दांत सांगितलें आहे (शांतिपर्व, अध्याय ६८) "सर्व धर्मांचें मूळ राजा हें आहे. तो नसेल तर अधर्मानें वागणाऱ्या लोकांना कोण दंड करील ? चंद्रसूर्यांच्या अभावीं जग अंधारमय होईल. तीच स्थिति अराजकाची समजावी. अराजक असेल तर अमुक एक वस्तु माझी असें कोणास म्हणतां येणार नाहीं, व म्हटलें तरी तें प्रबळ लोकांपुढें टिकणार नाहीं. स्त्री-पुत्र-द्रव्य सर्व नाहींशी होऊन शून्याकार होईल. बलात्कार, वध होऊं लागतील. दरवडे पडूं लागतील. शेतकी व व्यापार बुडतील. लग्नसंस्था,

धर्म, यज्ञ, वेदाध्ययन सर्व नष्ट होऊन लोक भयानें जिकडे तिकडे पळूनः जाऊं लागतील. म्हणून समाजाला राजा असलाच पाहिजे " अशी लोकांचीः खात्री झाली होती. पण त्याबरोबरच सुराज्य म्हणजे काय, व प्रजेला स्वराज्याचा हक्क निदान राजा निवडण्यापुरता असावा, अशीहि लोकांची समजूत होती. " रक्षण करण्याला राजा असला म्हणजे लोक आपल्या घरांचीं दारें उघडीं टाकून निर्भयपणें झोप घेऊं शकतात." असें म्हणण्याइतकाः सुराज्याचा अनुभव लोकांना आला होता. पण त्यांतल्या त्यांत " राजाः करावयाचा तर चांगला पाहून निवडावा " असाहि प्रजेचा आग्रह असे..

निवडलेल्या राजाबद्दल प्रजेचा आदर व प्रेम हीं हल्लींच्या काळापेक्षां तेव्हांः प्रजेमध्यें अधिक होतीं असें दिसतें. " एकदा नीट पाहून राजा निवडलाः म्हणजे मग त्याच्याविषयीं मनांत कोणी पाप आणील किंवा त्याला अपायः करील तर तो नरकांत जाईल" असें शांतिपर्वांत सांगितलें आहे. याचाचः अर्थ हा कीं, राजा ही पृथ्वीवरील एक देवता आहे."त्याच्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रसंगीं यम, अग्नि, सूर्य, कुबेर, इत्यादि देवतांचें रूप प्रगट होतः असतें; व त्या त्या देवतागुणांना योग्य अशीं कृत्यें राजा करीत असतो." राजाच्या कर्तव्यांत अनुग्रह व निग्रह या दोहोंचाहि समावेश केलेला महाभारतांत आढळतो. शांतिपर्वांत राजदंडासंबंधीं मोठेंच रूपक केलें आहे. या दंडाचें नावें व्यवहार, धर्म, वाक्वचन अशीं आहेत. त्याचा योग्य उपयोग केला असतां, म्हणजे राजानें तो समताबुद्धीनें व रागद्वेषरहितः असा उपयोगांत आणिला असतां, धर्म अर्थ व काम यांची प्राप्ति प्रजेला होते. " हा उपयोग दंडनीतीला अनुसरूनच राजानें करावा, व बृहस्पतिनीति व शुक्रनीति हेच ते दंडनीतीच ग्रंथे " म्हणून सांगितले आहेत. हें सर्व दंडाचें अत्यंत उदात्त पण साधें विधान झालें. पण रूपकांत त्याचें विशेष वर्णन असें केलें आहे कीं, " दंड हा शामवर्ण, त्याला चार प्रचंड दाढा, चार हात, आठ पाय, अनेक नेत्र व शंकूसारखे कर्ण असून तो जटाधारण करणारा व मृगचर्म परिधान करणारा आहे." मात्र हा दंड फक्त क्षत्रियांच्या हातीं असतो असें सांगितलें आहे. याचा अर्थ प्रत्यक्ष राज्याच्या गादीवर बसण्याला क्षत्रिय हेच योग्य असा दिसतो. तथापि ब्राह्मणांची योग्यता राजांनाहि सदुपदेश करण्याची असेंहि सांगितलें आहे.

इतकेंच नव्हे तर विद्याविनयसंपन्न ब्राह्मण हा राजदंडापासून मुक्त आहे असेंहि सांगितलें आहे.

बृहस्पतिनीतीचें विषय व शुक्रनीतीचें विषय शांतिपर्वामध्यें सविस्तर व तपशीलवार वर्णन करून सांगितले आहेत; व हल्लींची चाणक्यनीति पाहिली म्हणजे तिजवरून राजांच्यासंबंधीं जी माहिती मिळते तीच पुष्कळशीं शांतिपर्वांत दिलेली आहे. इटॅलियय तत्त्ववेत्ता व मुत्सद्दी मॅकिव्हेली यानें प्रजेशीं राजानें कपटाचें, अरेरावीचें, कठोरपणाचें व निष्प्रेम वर्तन कसें करावें असें ज्यांत सांगितलें आहे तो 'प्रिन्स' नामक ग्रंथ, आणि त्यापूर्वी दीड दोन हजार वर्षें शांतिपर्वांत केलेल्या राजधर्माचें व प्रजाधर्माचे वर्णन वाचलें, आणि त्यांची तुलना केली, म्हणजे प्रत्येक हिंदुमात्राला आपल्या पूर्वजांच्या राजकीय संस्कृतीविषयीं अभिमानच वाटेल. चाणक्यनीतिमध्यें अठरा कारखान्यांची तपशीलवार माहिती दिली आहे. त्यांविषयीं पाल्हाळ करण्याचें कारण नाहीं. परंतु इतकें खचित नमूद करतां येईल कीं, प्रजेचे व राजाचे संबंध लक्षांत घेतां राजानें करण्याच्या म्हणून ज्या ज्या गोष्टी त्या ग्रंथांत सांगितल्या आहेत त्यांना सुराज्यव्यवस्थेचें उत्तम स्वरूप आहे. यावर कोणी म्हणेल कीं, "पुराणांतल्या वांग्याची भाजी करून खातां येत नाहीं!" तर तो आक्षेप आधुनिक काळांतील युरोपियन तत्त्ववेत्त्यांच्या राजनीति ग्रंथांनाहि सारखाच लागतो. या आधुनिक ग्रंथांतील विवेचन केवळ कल्पनासिद्ध असतांहि जर त्याबद्दल पाश्चात्य संस्कृतीचे गोडवे गावयाचे, तर तितक्याच प्रमाणानें कल्पनासिद्ध असलेल्या राजनीतिवरून हिंदु लोकांच्या संस्कृतीचे गोडवे कोणीहि कां गाऊं नयेत! आज जगांत अनेक कारणांनीं लोकसत्तेचा प्रभाव जितका दिसून येतो तितका हिंदुस्थानांत दोन हजार वर्षांपूर्वी दिसत नव्हता, ही गोष्ट खरी आहे. तथापि युरोपखंडांत झालें तरी लोकसत्तेचा उदय, एक इंग्लंडखेरीजकरून, सन १८४८ पर्यंत इतर कोणत्या देशांत कितीसा झाला होता! भरतवर्षांत जुन्या काळीं एका दृष्टीनें राजाला देव बनवून राज्याची सर्व मालकी त्याच्याकडे आहे असें मत प्रचलित असलें तरी, भारतीय काळीं समाजांतील सर्व लोक राजकीय बाबतींत लक्ष घालीत असत. आणि कोणतीहि महत्त्वाची गोष्ट जरी राजा आपल्या अधिकारानें करी, तरी आपण करतों तें बरोबर आहे ही गोष्ट प्रजेला निदान

समजावून तरी देण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असें राजे मानीत असत. कौरव–पांडवांचें युद्ध उपस्थित झालें असतां, "यांत न्याय कोणाच्या बाजूला व अन्याय कोणाच्या बाजूला हें ठरवून, पांडवांची बाजू न्यायाची वाटते म्हणूनच मी त्यांना साहाय्य करणार आहे, असें आपल्या राज्यांतील पौरजानपदांना मी समजावून सांगेन" असें श्रीकृष्णानें म्हटल्याचें महाभारतांत आहे. इतकेंच काय पण एका राजानें जर दुसऱ्या राजाला जिंकलें तर, जेत्या राजानें जित राजाच्या प्रजेला असें विचारावें कीं "मी तुमचा राजा होणार आहे तर मला करभारं द्याल ना!" असेंहि महाभारतांत सांगितलें आहे. अर्थात् जेत्या राजाला कर देत नाहीं असें म्हणून कोणत्याहि जित प्रजेचें कसें निभावणार ही गोष्ट वेगळी. पण राजानें नव्या प्रजेला विचारून तिच्या संमतीनें राज्याधिकार घ्यावा हें तत्त्व काल्पनिक असलें तरी रम्य व मोहक आहे यांत काय संशय! आणि व्यवहारांत तरी नसेल कशावरून!

महाभारतांत वर्णिलेलें मुख्य कथानक राजे लोकांचेंच असल्यामुळें, महाभारत हा एक प्रकारें भरतखंडाच्या इतिहासांतील एका विशिष्ट काळच्या राजकारणाचा व राजकीय कल्पनांचा इतिहास होऊन राहातो हें उघडच आहे. तथापि, प्रत्यक्ष कौरव-पांडवांच्या राजकारणाच्या इतिहासाशिवाय त्या ग्रंथांत ठिकठिकाणीं सामान्य राजनीतीची व राजधर्माची चर्चा पुष्कळच आलेली आहे. विशेषतः शांतिपर्वांत यासंबंधी बरेच विवेचन आहे. यामुळें महाभारतांत जी राजकीय मतें उल्लेखिलेलीं व प्रतिपादिलेलीं आढळतात त्यांवरून सुमारें २००० वर्षांपूर्वीच्या हिंदुसमाजाची राजकीय मतें काय होतीं याविषयीं अनुमान बांधण्यास हरकत नाहीं.

महाभारतकालीं, व अर्थात् त्या पूर्वीहि हिंदुस्थानांत जिकडे तिकडे लहान सहान राज्यें च शेंकडो असून तीं स्वतंत्र होतीं. प्रत्येक राज्य आपल्या पुरते स्वायत्त पूर्णाधिकार–संपन्न व स्वावलंबी असें होते. ज्या स्थितीला इंग्रजींत 'Sovereignty' असें म्हणतात ती या राज्यांमध्यें पूर्णांशानें प्रगट झालेली होती. यापैकीं पुष्कळ राज्यें हीं नगरांतर्गत अशीच असली पाहिजेत हें उघड आहे. याच सुमारास नगराहूनहि मोठ्या प्रदेशावरील राज्यांची कल्पना उदित होऊं लागली होती. परंतु पांडवांनी केलेला दिग्वि-

जय म्हणजे कांहीं 'साम्राज्य स्थापना' नव्हे. निदान हल्लींच्या अर्थानें त्या वेळची ती साम्राज्यस्थापना नव्हती. क्षात्रवृत्तीचें तें एक प्रकारचें महत्-प्रदर्शन होतें. " भरतखंडांत क्षात्रबलानें व पराक्रमानें आम्हीच सर्वश्रेष्ठ आहो " अशी ती घोषणा होती. आणि ती घोषणा यथार्थ आहे असें सिद्ध करण्या करितां पांडववीर चारहि दिशांना युद्धाला आव्हानें देत फिरून परत आले. त्यांत कांहीं ठिकाणीं पांडवाना विरोध झाला, कांहीं ठिकाणीं त्यांना प्रत्यक्ष युद्ध करून अजिंक्य पत्र मिळवावे लागलें. व एक दोन ठिकाणीं तर अर्जुनाचा पराभवहि झाला. पांडव हे भरतखंडांतले या काळचे 'अधिराजे' होत ही गोष्ट कोणाहि तत्कालीन राजांनीं नाकबूल केली नाहीं. पण हल्लींच्या काळाप्रमाणें " ज्याला जिंकला त्याला पायाखालीं तुडवून नाहीसा केला" असें मात्र पांडवांनीं केलें नाहीं. कुस्तीच्या फडांत एका मल्लानें दुसऱ्याला पाडलें म्हणजे तत्पूर्वी त्यांच्यांत उत्पन्न झालेलें क्षणिक वैर त्या कुस्तीनेंच संपतें. पराभव पावलेला मल्ल हा कांहीं विजयी मल्लाचा जन्मभर गुलाम बनून, त्याच्या घरीं पाण्याच्या माकणी वाहत किंवा जळणाची लांकडें फोडीत राहात नाहीं. ही दुष्ट राजनिती आधुनिक काळचीच आहे. तेव्हांची राजनीती अशी कीं, युद्धाचा निकाल लागतांच करभाराचा वहुमान दिला घेतला गेला कीं वैर संपलें, व जित व जेते यांची पुनः मैत्री झाली ! युद्धांत पराजय झाला तरी त्यामुळें कोणाहि राजाचे मांडलीकाचें राजकीय स्वातंत्र्य नष्ट होत नसे. ही गोष्ट फक्त पांडवकालापर्यंतचीच आहे.

या विशिष्ट राजनीतीमुळें अल्पप्रमाण अशी राज्यें स्वतंत्र राहूं शकत. आधुनिक काळीं आक्रमणाचें धोरण,विजिगीषा,व महत्वाकांक्षा हीं सर्वच वाढली असून त्यांच्या शमनाची साधनेंहि उपलब्ध होत गेल्यानें, राज्यांचा देशविस्तार वाढला. अर्थातच त्यामुळें राज्याना त्यांतील लोकावरून पडणारें नांव अपुरें ठरूं लागले व प्रादेशिक नाव मिळूं लागले. परंतु त्या जुन्या काळीं प्रायः लोकांवरूनच राज्यांना नांवें पडत असत. यावरून त्या वेळची राज्यें अल्पप्रमाण असावी, व राज्याचा मुख्य आधार त्यातील लोकामध्यें आपण एकवंशीय आहो या भावनेचा असावा, असें वाटते. राजा,लोक व देश यांचे नांव एकच असाहि प्रकार पुष्कळशा तत्कालीन उदाहरणांत दिसून येतो.महाभारत-

कालीन देशांच्या यादींत दोनशे बारा लोक वर्णिलेले आहेत. त्यांच्या त्याच्यांत विवाहसंबंध होत असला तरी प्रत्येकाला आपापल्या विशिष्ट कुलाचा गोताचा अभिमान होता, व म्हणून या दोनशे बारा लोकांची अल्पप्रमाणाची निरनिराळी लहान लहान राज्येंच होती, व त्यांच्यामध्यें कलह व लढाया राजकारणावरून होत, असें वाटतें. केवळ पंजाब व सिंध येवढ्या टापूंतच आलेक्झांडर यानें जिंकलेल्या पन्नास लोकांची म्हणजे राज्यांची यादी उपलब्ध आहे. पुढें सर्व भरतखंडभर दिग्विजय करून स्वतःला श्रेष्ठ क्षत्रिय वीर म्हणवून घेणारे जे पांडव त्यांनीं प्रथम अवघ्या पांच गांवांची मागणी आपल्या हिस्याकरितां म्हणून करावी, या दोन गोष्टींचा मेळ घालणाऱ्या मार्मिक मनाला तत्कालीन राजकीय समाजरचनेची चांगली कल्पना येईल. सभापर्वात ' गृहे गृहे हि राजानः ' असें वचन आढळतें. त्याचा अर्थ शब्दशः 'घरोघर', म्हणजे ' My house is my Castle ' या इंग्रजी म्हणीप्रमाणें, माझ्या घरचा मी राजा आहे असा घ्यावयाचा नाहीं. तर कदाचित् प्रत्येक शहर नगर हे एकेका राज्यासारखेच असे, असा त्या वचनाचा लाक्षणिक अर्थ घेतला पाहिजे.

युधिष्ठिराला व्यासानें एके ठिकाणीं खालीलप्रमाणें उपदेश केला आहेः— " जिंकलेल्या भूपतींच्या राष्ट्राकडे आणि नगराकडे जाऊन त्यांचे बंधू पुत्र अथवा पौत्र यांना त्यांच्या राज्यांवर अभिषेक करून बसवावें. मग ते बाल्यावस्थेंत असोत किंवा गर्भावस्थेंत असोत ! ज्यांना पुत्र नसेल त्यांच्या कन्यांना अभिषेक करावा ! " हें उदात्त धोरण कोणीकडे व अधिराजाचा केवळ कृपा-प्रसाद म्हणजे फक्त तीन पिढ्या टिकणारें राज्य, किंवा राजवंशांत सरळ शाखेंत पुरुष संतती असेल तेथपर्यंतचें राज्य, हें आधुनिक काळचें कृपणपणाचें धोरण कोणीकडे ! खुद्द जे अधिराजे त्यांचीहि उदार दृष्टी असल्यावर लहान सहान राज्यें त्या काळीं निर्भयपणें जगत असल्यास काय आश्चर्य! शांतिपर्वात तर असेंहि स्पष्ट म्हटलें आहे कीं," जिंकलेल्या राजास कधीहि पदच्युत करूं नये, तर तो जिवंत असल्यास पुनः गादीवर कायम ठेवला जावा. किंवा मृत झाला असल्यास त्याच्या मुलाला किंवा " नातेवाईकाला'हि गादीवर बसवावें. " महाभारतांतील शांतिपर्वात जें राजकीय स्थितीचें म्हणून वर्णन आहे कौरव पांडवांच्याहि पूर्वीच्या काळांतलें, म्हणजे

जेव्हां सर्वच लोकसंघ स्वतंत्र होते, एक दुसऱ्यावर राज्य करीत नव्हता, व राज्यसंस्थेची म्हणजे राजाची कल्पना अद्यापि उदित झालेली नव्हती, अशा काळाचें तें वर्णन आहे. कारण खुद्द कौरव पांडव कालीं जुन्या सुवर्ण युगाच्या उज्वल राजकीय कल्पना किंचित् सदोष होऊन, राजा हा सर्व सत्ताधारी अनियंत्रित व ईश्वरी अंश ही कल्पना पुढें येऊ लागली होती.

कृतयुग केव्हां अवतरलें असेल तें असो, पण भीष्मांच्या माहितीप्रमाणें, "कृतयुगांत मुळीं राजेच नव्हते. लोक सर्वस्वी स्वतंत्र होते. व आपल्या इच्छेनेंच धर्माचें परिपालन करीत होते. पण पुढें कामक्रोधादि षड्रिपूंचा उठाव झाला; ज्ञानाचा लोप व धर्माचा नाश झाला; कर्तव्याकर्तव्य कळेनासें झालें; तेव्हां ब्रह्मदेवानें राजनीतीचा एक मोठा ग्रंथ लिहिला; तो संक्षेपरूपानें प्रजापतीनें पृथ्वीचा पहिला राजा अनंग याला दिला; व या ग्रंथांतील राजनीतीप्रमाणें राज्य कर असें त्याला सांगितलें. पण या राजनीतिग्रंथाचा प्रभाव अवघा तीन पिढ्याहि टिकला नाहीं. कारण अनंग राजाचा प्रत्यक्ष नातू जो राजा वेन त्यानें हा ग्रंथ बाजूला ठेऊन लोकांवर जुलूम केला. तेव्हां लोकांनीं त्याला ठार मारून त्याच्या मांडीपासून पृथू या नांवाचा राजा उत्पन्न केला. त्यानें सर्व लोकांना सुखी करून प्रजेचें रंजन केलें म्हणून त्याला 'राजा' ही यथार्थ संज्ञा मिळाली, व तेव्हांपासून राजा हा विष्णूचा अवतार असें लोक मानूं लागले. पण पुढें झालेल्या राजांपैकीं सर्वांनींच राजधर्म उत्तम तऱ्हेनें पाळला हें जसे घडलें नाहीं, तसेंच प्रजेनेहि प्रजाधर्म सर्वस्वी उत्तम प्रकारें पाळला असेंहि घडलें नाहीं. यांत काय आश्चर्य! अर्थात् प्रजेलाहि योग्य नियंत्रणाखालीं ठेवण्याला कांहीं साधन हवेंच होतें, आणि तें साधन म्हणजे राजदंड हा होय. आणि या दंडावरूनच राजनीतीला दंडनीति असें नांव पडलें." वरील कथा शब्दशः खरी न मानली तरी तिजवरून एक गोष्ट दिसून येते ती ही कीं, प्राचीन काळापासून कौरव पांडव कालापर्यंत भरतखंडांतील लोकांच्या राजकीय कल्पनांत व वस्तुस्थितींत एक मोठें स्थित्यंतर झालें होतें. भारतीय राज्यशास्त्राच्या सिद्धान्त-सोपानांतील पहिली पाहिरी म्हणजेच हें स्थित्यंतर होय. आणि तें स्थित्यंतर असें कीं, अगदीं अल्पप्रमाण लोकसंघ म्हणजे कुटुंबें

कुळें, गोत्रें हीं सर्वस्वी स्वतंत्रपणें आपापलीं राज्यें चालवीत होतीं, ती स्थिति जाऊन तिच्या जागीं राजा आला व तो राजा तत्कालीन आधिदैविक संस्कृतीमुळें दैवी स्वरूपांत आला.

हस्तिनापूरच्या राजपदावर कोणाला बसवावें, धर्माला कीं दुर्योधनाला, अशी वाटाघाट सुरू झाली तेव्हां दुर्योधनाला भीति पडली कीं, पांडवांच्या गुणांवर लुब्ध होऊन प्रजानन त्यांनाच राज्यावर बसवितील! यावरून गादीवर बसवण्याचा अधिकार प्रजाजनांच्या हातीं होता असें उघड दिसतें. या ठिकाणीं सभा व परिषदा यांचा उल्लेख आहे. लोकांनीं असें ठरविलें कीं कौरव दुर्गुणी आहेत, आणि त्यांच्या अंधळ्या बापाला पूर्वी गादी दिली नाहीं तशी त्याच्या मुलांनाहि देऊं नये. भीष्माला हस्तिनापूरची गादी द्यावी असा लोकांत एक पक्ष होता. पण "मी केव्हांहि राजपद घेणार नाहीं" अशी त्यानें प्रतिज्ञा केली असल्यामुळें लोकांची निराशा झाली; आणि भीष्माच्या अभावीं त्यांनीं धर्माला गादीवर बसविलें. वरील सर्व वर्णनांत राजा निवडण्यासंबंधीं जे उल्लेख आहेत त्यांचा खुलासा एकच मार्गानें होतो व तो हा कीं, राजाच्या निवडणुकींत हल्लींच्या प्रजासत्ताक राज्यांच्या अध्यक्षांच्या निवडणुकीप्रमाणें लोकांना अधिकार होता. तसेच इतरहि उल्लेख विचार करण्यासारखे आहेत. भारतपूर्वकालीं अराजक प्रजेनें मनूला राज्यपद देऊं केलें. पण प्रजेचें पाप राजालाहि लागतें या भीतीमुळें तो तें घेईना. पण प्रजाजनांनीं त्या भीतीचें निराकरण केल्यावर त्यानें तें राजपद पतकरलें. यांत राजकारणाला 'कृत्यतम' म्हणजे 'सर्वोत्कृष्ट कर्तव्य' असें म्हटलें आहे.

पौराणिक काळ सोडून देऊन आपण ऐतिहासिक काळांत आलों तरी तेव्हांहि ग्रामाध्यक्ष किंवा राज्याध्यक्ष यांची निवड लोकांनीं करण्याविषयींचे उल्लेख सांपडतात. प्रो. व्हिस डेव्हिड्स् यांनीं बुद्धकालीन इतिहास लिहिला; त्यांत असें लिहिलें आहे कीं, त्यावेळीं हिंदुस्थानच्या बऱ्याच मोठ्या भागावर अधिराजा असा कोणी नव्हता. पण राज्यसंस्थेची माहिती व परिचय लोकांना चांगला होता. या राज्यसंस्था क्वचित् राजांच्या क्वचित् अभिजननियंत्रित पुढाऱ्यांच्या अमलाखालीं होत्या. जैन ग्रंथांवरूनहि भरतखंडांत स्वतंत्र प्रजासत्ताक राज्यांचें अस्तित्व दिसून येतें. त्यांत जातिनिहाय राज्यें,

अथवा संयुक्त नगर राज्यें अशीं होतीं, पण सर्व स्वतंत्र अशीं होती. प्रोफेसर मजकुरांनीं अशा दहा अकरा ज्ञातिराज्यांचीं नांवें दिलीं आहेत त्यांतच गौतम-बुद्ध ज्या जातींत जन्माला आला तिचें राज्य होतें. या प्रत्येक राज्यांत सभा व सभागृहें असत. सर्व राज्यावर मिळून एका सभेपुरता एक असा अधिपति असे. ग्रीक इतिहासांतील 'अरकॉन्स' व रोमन इतिहासांतील 'कॉन्सल्स्' यांच्यासारखेच हे अधिकारी असत. या अधिकाऱ्यांच्या अमलाखालीं लोक आपल्या राज्यांतील सर्व कायद्यांचा अमल सभा-समित्यांतून करीत, व कोणीहि एक दुसऱ्याला करभार देत नसे. 'केरळोत्पत्ति' ग्रंथांमध्यें वर्णिल्याप्रमाणें मलबार प्रांतांत ब्राह्मणांचीं लोकसत्ताक राज्यें होतीं. प्रसंगविशेषीं निरनिराळ्या ग्रामराज्यांतील लोक एकत्र जमून सर्वांकरितां एखादा संरक्षक अधिकारी नेमून देत; व त्याला जमिनीच्या उत्पन्नापैकीं एकषष्ठांश भाग तोडून देत. पुढें हे अधिकारी ग्रीस किंवा रोममधील अधिकाऱ्यांप्रमाणें जुलमी झाले, तेव्हां प्रजेनें ते अधिकारी काढून टाकून एका प्रसिद्ध गृहस्थाला घाटावरून बोलावून राजपद दिलें! ही गोष्ट इ. स. २१६ या सुमारास घडली. या राजाला गादीवर बसवितांना प्रजेनें त्याजकडून शपथप्रमाण करवून एक करार करून घेतला, त्याचे शब्द लक्षांत घेण्याजोगे आहेत व ते असेः—"राज्यकारभारांतल्या ज्या गोष्टी प्रजेला करतां येणार नाहींत अशाच तेवढ्या मी स्वतः करीन. जे कज्जे, मुकदमे, प्रजा आपले आपण तोडील त्यांत मी हात घालणार नाहीं." केरळ प्रांतांत ही प्रजानियुक्त राजांची परंपरा बरींच वर्षें चालली. राजाची निवडणूक कांहीं ठराविक मुदतीपर्यंत असे. पण ती मुदत वाढविलीहि जाई. ही पद्धत मल्याळ प्रांतांतहि होती. नाड म्हणून नायर लोकांचा संघ असे. या संघाकडे राजा निवडणें व त्याच्या कारभारावर देखरेख ठेवणें या गोष्टी सोंपविलेल्या असत. केरळोत्पत्ति ग्रंथांत स्पष्टच म्हटलें आहे कीं, "या नाड-संघाचा हेतु हाच कीं, राजाविरुद्ध असणारे प्रजेचे हक्क कमी होऊं नयेत किंवा ते उपयोगांत न आल्यामुळें त्यांची विस्मृति लोकांना होऊं नये." या संघांना 'पार्लमेंट' असें नांव मलबारचें गॅझेटियर लिहिणाऱ्या इंग्रजानें दिलें आहे.

कौटिलीय अर्थशास्त्र हा ग्रंथ प्रसिद्ध असून त्यात राज्यशास्त्रांतील उप-

पत्ति अनेक आढळतात. भारतादि ग्रंथांतील आधार कौटिल्यानें घेतलेंच आहेत, तथापि त्याच्या ग्रंथांत दिलेल्या भरपूर माहितीवरून तत्कालीन राजकीय कल्पना काय होत्या, व विशेषतः प्रत्यक्ष राज्यकारभार कसा चालत होता हें चांगलें कळून येतें. कौटिल्याच्या मतें अराजकता ही स्थिति अत्यंत अनिष्ट होय; व एरवीहि मोठा मासा लहान माशाला खातो त्याप्रमाणें मनुष्यांची एकमेकांशीं स्पर्धा, जुलूम व नाश करून स्वार्थ साधण्याची प्रवृत्ति असते. यामुळेंच राजसत्ता अस्तित्वांत येते, व राज्यसत्ताधीशांना प्रजा स्वेच्छेनें ठराविक कर वगैरे देऊन त्यांच्या मोबदल्यांत आपलें रक्षण करून घेत. कौटिल्य मतें राज्यसंस्था ही मनुष्यानें आपल्या बुद्धीनेंच निर्माण केली आहे. म्हणजे रूसोप्रमाणें राजा व प्रजा यांच्यामध्यें एक प्रकारचा करार आहे असें तो मानतो. लोकांनीं एकमेकांचा नाश न करण्याचें कारण प्रेम हें नसून राजदंडाची भीति हें होय, व या दंडाचें महत्त्व त्याला दैवी स्वरूप देऊन व र्णन केलें असलें तरी तें केवळ काव्यबुद्धीनें होय हें 'अर्थशास्त्रा'वरून उघड दिसतें. इतकेंच नव्हे तर राजा हा राष्ट्राचें पालन करण्याकरितां नेमलेला सार्वजनिक सेवक आहे, अर्थात् लोकांकडून त्याची नेमणूक निवडणूक व्हावी व त्याचा पगार ठरविला जावा या गोष्टी कौटिल्याला संमत असून तत्कालीं त्या रूढ होत्या असें तो दर्शवितो. राज्यकारभारासंबंधानें युवराज म्हणजे राजप्रतिनिधी, मंत्रीमंडळ, त्याची कार्यपद्धती—तसेंच सेंद्रिय व जिवंत राज्यसंस्थेची अंगेउपांगें—या सर्वांविषयीं कौटिलीय अर्थशास्त्रांत जितका तपशील दिलेला आहे तितका संस्कृत ग्रंथांत इतर कोठेंहि आढळत नाहीं. मात्र कौटिल्याच्या ग्रंथांत राजांची कर्तव्यें कितीहि काटेकोर, कठोर व निश्चित रीतीनें सांगितली असलीं तरी, राजाचें कर्तव्य हें प्रजेच्या हक्कापासून वेगळे आहे असें तो मानतो असें दिसतें. म्हणजे राजा आपले कर्तव्य न करील तर अधोगतीला जाईल, पण प्रजेला अमुक हक्क आहेत व तिनें ते अमुक प्रकारानें बजावावे असें स्पष्ट सांगितलेलें नाहीं.

प्राचीन हिंदु लोकांच्या मनांत स्वतंत्रतेचीं बीजें फार खोल रुजलीं होतीं याचें प्रत्यन्तर राजे लोकांच्या निवडणुकीवरून दिसतेंच. पण भरतखंडांत गुलामगिरीची पद्धति नव्हती असें मिगॅस्थिनीस लिहितो त्यावरूनहि तें दिसून येतें. वेदकालीं मुलाच्या प्राणावर बापाची सत्ता असेल, व तशा प्रकारचें

एक प्रसिद्ध उदाहरण ब्राह्मणग्रंथांत आहे हि. तथापि इतिहाससंशोधकांच्या मतें, रोमच्या राज्यांत कुटुंबांतील बापाला मुलावर जितकी सत्ता होती तितकी हिंदु कुटुंबांतील बापांना केव्हांहि नव्हती. धर्माच्या बाबतींतहि राजापासून लोकांना स्वातंत्र्य होतें तें असें कीं, राजाला जरी विष्णूचा अंश असें कांहीं हेतूंपुरतें मानण्यांत येई तरी, इतर देशांतील राजांप्रमाणें भरतवर्षांत धर्माज्ञा करण्याचा अधिकार स्वतः राजांना नव्हता. श्रुति-स्मृति-सदाचार इत्यादि धर्ममूलें मानलेलीं असून, श्रुति-स्मृतीचा अर्थ करण्याचा किंवा कोणताहि नवा आचार प्रवर्तित करण्याचा अधिकार स्वतः राजाला नव्हता. राजा हा फक्त अंमलबजावणीचा मुख्य अधिकारी. त्याच्याकडे कायदा करण्याचा किंवा कायद्याचा अर्थ करण्याचा अधिकार नव्हता. तो अधिकार सर्वस्वीं ग्रामपंचायती ज्ञातिसभा इत्यादिकांकडे असे. ज्ञातिसंघ, धर्मसंघ, वृत्तिसंघ, व्यापारीसंघ इत्यादिकांनीं बहुतेक लोकसत्ता आपल्या हातीं वाटून घेतली होती. या दृष्टीनें पहातां भरतखंडांतील 'सॉव्हरिन्टी'ची कल्पना व इतर देशांतील सॉर्व्हारन्टीची कल्पना यांत महत्त्वाचा फरक असल्याचें दिसून येईल. राजांचें मुख्य काम म्हटलें म्हणजे संकटसमयीं राज्याचें रक्षण करणें, परराष्ट्रांशीं युद्ध व तह करणें, व स्वदेशाची कीर्ति परदेशांत पसरविणें हें होतें.

प्रधानमंडळांची उत्पत्ति हिंदुस्थानांत अलीकडची नसून पुरातन आहे. राजानें प्रधान कोणत्या कामाकरितां कसे नेमावे याविषयीं शुक्रनीतींत पुष्कळ सांगितलें आहे. आधुनिक राज्यपद्धतींत बहुधा असें एकहि खातें नाहीं किंवा एकहि कारखाना नाहीं कीं, त्याचा प्रतिनिधि जुन्या हिंदु लोकांच्या राज्यकारभारांत आढळत नाहीं. शिवाजीमहाराजांच्या अष्टप्रधानमंडळाची कल्पना त्यांची स्वतःची नसून अगदीं जुन्या राजनीतीच्या ग्रंथांतून घेतलेली आहे. तसेंच "राजा हा स्वतः पापाचा धनी होत नाहीं; जो काय अपराध घडेल तो प्रधानाचा; व लोकांना अन्याय झाल्यास त्याबद्दल प्रधानाला शिक्षा व्हावी" असा शिरस्ता असे. मुद्राराक्षसनाटकांत असें म्हटलें आहे कीं, "हत्ती जर मस्त होऊन अपघात करूं लागला तर तो माहुताच्या हयगयीचा परिणाम म्हणून त्याला शिक्षा करावी, त्याप्रमाणें राजाच्या हातून चूक झाली तर तो अपराध प्रधानाच्या अंगीं लावावा."

मुख्य खात्यांच्या खालीं, हल्लींच्या स्थानिक स्वराज्य संस्थाप्रमाणें, जुन्या काळीं हिंदुस्थानांत सर्व स्थानिक कारभार मुखत्यारीनें करणाऱ्या ग्रामसंस्था होत्या. १९१४ सालीं सर शंकरन् नायर यांनीं मॉडर्न रिव्ह्यूमध्यें दक्षिण हिंदुस्थानांतील दहाव्या शतकांतील ग्रामसंस्थांच्या निवडणुकीचे नियम तपशीलवार दिले आहेत; व सर शंकरन् यांनीं असें म्हटलें आहे कीं, "मतदारांमध्यें स्त्रियांचा समावेश होता; व स्त्रियाहि ग्रामसंस्थेच्या सभासद निवडल्या जात. न्यायाच्या कामांतहि स्त्रियांना सभासद नेमल्याचीं उदाहरणें आहेत." तसेंच व्हिन्सेंट स्मिथ यानें असें लिहिलें आहे कीं, "पाटलीपुत्र शहरांत जुन्या काळीं म्युनिसिपालिटी तीस सभासदांची होती; व त्या तिसांतून पोटमंडळें नेमून गांवांतील खातेवार कारभार त्यांजकडे सोंपविला होता." या निरनिराळ्या खातेवार उपमंडळांचीं कामें व्हिन्सेंट स्मिथ यानें अगदीं तपशीलवार दिलीं आहेत. नगररक्षणाविषयीं कशा प्रकारच्या योजना पूर्वी लोक करीत याविषयीं पाटलीपुत्र, कनोज, उज्जयिनी, विजयनगर, यांचीं वर्णनें वाचावीं म्हणजे कळून येईल.

भरतखंडांत होऊन गेलेल्या प्रसिद्ध व कीर्तिमान अशा राजांचीं नावें किती तरी सांगतां येतील. त्यांतील कांहीं देतोः—बिंबिसार, अजातशत्रु, उदयन, महापद्मनंद, चन्द्रगुप्त, बिन्दुसार, अशोक, हाला, यज्ञश्री, समुद्रगुप्त, स्कन्दगुप्त, प्रतापगुप्त, शिलादित्य, प्रभाकरवर्धन, हर्ष, अनंगपाल, पृथ्वीराज, कलचूरि, भोज, मुंज, विक्रमादित्य, पुलकेशी, इत्यादि. याशिवाय पौराणिक राजांचीं नांवें पाहिलीं तर तीं वेगळीच. वरील सर्व हकीकतीवरून हिंदुस्थानांत राज्यव्यवस्था कशा उदयाला आल्या असतील हें चांगलें दिसून येईल. वरील हकीकतींत, राज्यसंस्थांचे सर्व प्रकार व लोकसत्तेचीं मुख्य अंगें व तत्त्वें, यांचा जो उल्लेख आला आहे त्यावरून राज्यांतील अधिकाराची विभागणी कशा पद्धतीनें होत असेल व राष्ट्राचा तोल कसा संभाळला जात असेल याचीहि कल्पना येईल. हिंदु लोक हे राजसत्ता स्वाधीन करण्याला योग्य नाहींत असा आक्षेप स्वार्थी इंग्रज मुत्सद्यांकडून घेतला जातो त्याचें उत्तर वरील हकीकतींत सांपडेल. आधुनिक काळांत केवळ निवडणुकीची पद्धति व प्रातिनिधिक संस्थांची पद्धति पुष्कळ फैलावली आहे, आणि राजसत्ताक राज्यें जाऊन त्यांच्या जागीं प्रजासत्ताक

राज्यें निर्माण झालीं आहेत, या गोष्टीवरून पाश्चात्य मुत्सद्दी आपली राजकीय श्रेष्ठता प्रस्थापित करूं पाहतात. पण प्रातिनिधिक संस्था, मतदार-संघ, व निवडणुकीचे नियम, एवढयानींच कोणतेंहि राज्ययंत्र बिनबोभाट चालतें किंवा राज्यकारभारापासून प्रजेला अवश्य तें सुख मिळतें, ही गोष्ट हटकून सिद्ध होत नाहीं. हिंदुस्थानच्या प्राचीन युगांत राज्यक्रात्यांचीं उदाहरणें थोडीं असलीं तर त्याचा असाहि अर्थ होऊं शकेल कीं इकडे पाश्चात्य देशांपेक्षां राजसत्ता व लोकसत्ता यांचा मेळ अधिक घातला जात होता. आधुनिक काळांतील प्रजासत्ताक राज्यांच्या अपकीर्तीचें अप्रत्यक्ष वर्णन या पुस्तकांतील पूर्वीच्या कांहीं भागांत आलेंच आहे.

परिशिष्ट ३

शिवकालीन राजसत्तेची चिकित्सा (एक नुसतें टिपण).

शिवकालीन महाराष्ट्रांत राज्यसंस्था कशा प्रकारची होती, व उदाहरणार्थ शिवाजीला प्रथम आपल्या जहागिरींत व राज्यांत 'राजसत्ता' खरी कितपत होती, याचा विचार करावयाचा तर खालीं दिलेल्या प्रश्नांचीं साधार उत्तरें द्यावीं लागतील. मात्र या टिपणांत तीं स्वतः देण्याचा आमचा विचार नाहीं. फक्त अभ्यासाच्या पुस्तकांत विद्यार्थ्यांच्या बुद्धीच्या उद्बोधाकरितां प्रश्न देतात त्या धर्तीवर मुद्दे सुचविण्याचाच हेतू आहे.

राज्य म्हणजे काय? त्या अर्थानें शिवकालीन महाराष्ट्रांत राज्य एकच होतें कीं अनेक? महाराष्ट्र या शब्दाची व्याख्या तरी तेव्हां काय होती ? राज्याची व्याप्ति मोजण्याचे प्रकार काय होते ? देशावरून, लोकांवरून कीं सत्तेवरून ? यापैकी 'महाराष्ट्रांत' व आसपास, पूर्वी व तेव्हां, राज्यें कोणत्या प्रकारचीं होती ? राजे व अधिराजे यांचे संबंध, राजे व मांडलिक यांचे संबंध, राजे व वतनदार यांचे संबंध, राजे व जहागिरदार यांचे संबंध, राजे व सुभेदार, सरदार, कमाविसदार, तालुकदार यांचे संबंध कसे होते ?

स्वतंत्र राजाची अंगें व लक्षणें कोणती ? यापैकीं शिवाजीच्या स्वराज्यांत कोणती होती कोणती नव्हती ? सत्ताप्रकार कोणता होता व त्याच्या मर्यादा व बंधनें कोणती होती ? 'प्रजा' 'लोक' म्हणून जे कोणी होते त्यांना कांहीं हक्क होते काय ? राजाचे खालीं इतरांपैकीं कोणाला स्वातंत्र्य किती होतें ? ठरीव मायन्यांवरून याविषयीं कांहीं बोध होतो काय ? राजावर जातिसंघ व जातिपंचायती यांचें कितपत बंधन होतें ? चातुर्वर्ण्यसंघाचें राजावर कितपत बंधन होतें ? धर्मगुरूंचें बंधन कितपत होतें ? धर्मशास्त्राचें बंधन कितपत होतें ? राजघराण्यांत राजे ही पदवी केव्हां कोढून प्रथम आली व ती कोणत्या अर्थानें ? ही पदवी असलेले कोण कोण त्या वेळीं होते ? पदवी व्यक्तिपुरती कीं वंशपरंपरागत होती ? पदवी व जहागिर व तनखा व नोकरी यांचे कांहीं संबंध होते काय ? शहाजीचा राज्यकारभार महाराष्ट्राकडील जहागिरींत किती व कसा झाला ? त्याचेकडून शिवाजीला राजेपणा

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
परिशिष्ट ३ नगर वाचनालय,सातारा

पैकीं काय काय मिळालें ? सम-कालीन शहाजी व शिवाजी यांचे संबंध कसे होते ? इकडील जहागिरीच्या कारभाराविषयीं शहाजीचीं आज्ञापत्रें तिकडून येत असत काय ? मानिली जात असत काय ? इकडच्या जहागिरीच्या उत्पन्नाचा कांहीं अंश शहाजीकडे जात असे काय ?

शिवाजीच्या स्वातंत्र्याच्या पायऱ्या अशा दिसतातः—(१) दादाजीच्या देखरेखीखालचा शिवाजी (२) सनदा देणारा निवाडपत्रें, देणग्या, दानें, इनामें देणारी शिवाजी (३) किल्ले काबीज करणारा शिवाजी (४) मोंगल व विजापूर यांच्या मुलखावर स्वारी करणारा शिवाजी (५) त्यांच्याशीं युद्ध व तह करणारा शिवाजी (६) राज्यभिषेक करून घेतलेला शिवाजी. या सहा प्रकारांत राज्यशास्त्राच्या दृष्टीने चढती मर्यादा व चढता अर्थ कांहीं आहे काय ?

राज्याला कांहीं पद्धत लावावी अशी शिवाजीला प्रथम इच्छा केव्हां झाली ? अव्यवस्था कोणती असेल व ती कशी दूर झाली ? एकादी डोळ्यापुढची राज्यपद्धति शिवाजीनें अनुकारिली कीं स्वतंत्र बुद्धीनें तयार केली ? एकादा जुना स्वकीय किंवा परकीय नमुना त्याच्या डोळ्यापुढें होता काय ? किंवा परिस्थितीप्रमाणें त्याची पद्धती बनत गेली ? अष्ट-प्रधानमंडळांत खातेवारी ही जुनी होती कीं नाहीं ? खात्यांत पूर्वी एकीकरण कितपत होतें ? खातीं फोडलेलीं कितपत होतीं ? प्रधान-मंडळ जुन्या Ministry च्या स्वरूपाचें होतें कीं Cabinetच्या स्वरूपाचें होतें ? Civil, Military, Judicial यांत अधिकारभेद कितपत होता ? मामुली कामांत हुकूम कोणाचे चालत ? हुजुरापर्यंत कामें कोणती जात ? बादशहाकडे अपीलें होत काय व कोणत्या बाबींत ? कायदेशीरपणाचा प्रश्न निघाला असतां, कायदेशीर कोणतें व बेकायदेशीर कोणते हें कोणत्या आधारानें ठरविलें जात असेल ?

या प्रश्नानंतर आतां थोडीशी चर्चा करूं. हिंदुपदपादशाहीच्या संस्थापकाला नुसतें शिवाजी म्हटलें काय, शिवाजी राजा म्हटलें काय, शिवाजी महाराज म्हटलें काय, सर्व सारखेंच. किंबहुना या तिहींतील पहिला एकेरी शब्दच बहुमानाची परम सीमा होऊन बसला आहे.

बहुमान हा मर्यादित असतो तेव्हांच तो कांहीं एखाद्या पदवीनें व्यक्त करावा लागतो. अमर्याद बहुमान व्यक्त करण्याचें वेळीं सर्व पदव्या फुकट जातात. कारण त्या अपुऱ्या पडतात. ईश्वर हा अमर्याद शक्तिमान् व अमर्याद गुणवान् असल्यामुळेंच, त्याला कोणी कसलीहि पदवी लावीत नाहींत. याचें कारण पदवी लावणें म्हणजे त्याची योग्यता मर्यादित करणें असें होतें. म्हणून ईश्वरासंबंधीं बोलतांना, तूं तो हे एकेरी एकवचनी शब्दच लावतात. इंग्रजींत ईश्वराला संबोधितांना, You हा शब्द देखील लावीत नाहींत. कारण त्याचा अर्थ एकवचनी किंवा (बहुमानार्थी) अनेक वचनींहि होतो. म्हणून 'Thou' हा स्पष्ट एकवचनी शब्दच लावतात. त्याचप्रमाणें इतिहास व वाङ्मय यामध्यें महाराष्ट्रांतील हिंदुपदपादशाहीच्या संस्थापकाला 'शिवाजी' हा एकच एकवचनी व निरुपाधिक असा शब्द लावण्याचा प्रघात आहे.

तथापि राजकीय दृष्टीनें राजे, राजा, महाराज, इत्यादि पदव्यांना प्रायः कांहीं अर्थ असतो. कारण त्या त्या शब्दांनीं राजाच्या राजकीय सत्तेचा विशिष्ट दर्जा किंवा प्रत दर्शविण्याचा हेतु असतो. म्हणून शिवाजीसंबंधानें 'राजे' 'महाराज' या शब्दांचा सूक्ष्म अर्थ तात्विकदृष्ट्या चिकित्सेचा विषय होऊं शकतो.

संकल्पित विषय किंवा मुद्दा असा कीं, शिवाजी हा राज्यशास्त्रदृष्ट्या खरा 'राजा' म्हणजे 'सर्व सत्ताधीश अधिकारी' खरोखर केव्हां झाला ?

इंग्रजींत अंतिम राजसत्तादर्शक शब्द 'सॉव्हरेंटी' हा आहे. मग तें राजपद एखाद्या व्यक्तीला लागो किंवा सामुदायिक रीतीनें एखाद्या देशांतील सर्व लोकांना मिळून लागो. हिंदुस्थानांत 'मॉनर्की' म्हणजे राजसत्ताशासित अशीं संस्थानें आहेत. तेथें सॉव्हरीन हा शब्द व्यक्तीला लागतो. इंग्लंडांत तो शब्द राजा व लोकनियुक्त पार्लमेंट या दोघांना मिळून लागतो. आणि फ्रान्स, अमेरिका वगैरे राष्ट्रांत तो शब्द सर्वस्वीं सामुदायिकच आहे. तथापि या तिन्ही ठिकाणीं राजत्व ओळखण्याची कांहीं मुख्य गमकें आहेत.

राजा आणि राज्य हे शब्द सापेक्ष आहेत. ज्या मुलखाला राजा आहे तें राज्य. ज्या राजाला स्वतःचा असा मुलूख आहे तो राजा. राज्य या शब्दाला विस्तारवाचक किमान मर्यादा नाहीं. पण त्याचप्रमाणें राजा या शब्दा-